२३/३/२०१५

# निर्देश पत्र

## मिरा - भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय : स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प).
ता.जि.ठाणे ४०१ १०१. दुरध्वनी क्र. : २८१९२८२८ / २८१९३०८७

( सचिव विभाग)

क्रमांक :

तारीख :

| | |
|---|---|
| विषय | मा. महासभा |
| | ~~विषय~~ विशेष |
| | २६ - 23/03/2015 रोजी: 11:00 |
| | ~~विषय~~ प्रकरण क्र - ६० ते ८८ |

प्रकरण सुरु झाल्याची तारीख : पुरक यादी - ८९ ते ९३

प्रकरण बंद केल्याची तारीख :

| दिनांक | कार्यवाही |
|---|---|
| | |

(१)

९४/१९५

### अभिलेखाचे वर्गीकरण

| बाब क्रमांक | वर्ग | परिक्षणाचे वर्ष | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| | (अ / ब / क / त -१ /ड) | | १ ते |

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (पश्चिम) ता.जि. ठाणे ४०१ १०१

## नगरसचिव विभाग

जा.क्र मनपा/सचिव/ ९८७ /२०१५-१६ दिनांक :- २६/०३/२०१५.

## // परिपत्रक //

प्रति,
**सन्मा. श्री./श्रीमती** ______________________

नगरसेवक / नगरसेविका,
मिरा भाईंदर महानगरपालिका

महोदय/महोदया,

या परिपत्रकाद्वारे आपणांस कळविण्यांत येत आहे की, मा. महासभा सोमवार दि. २३/०३/२०१५ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता आयोजित करण्यात आली होती. सदर सभा तहकुब केल्याने विषयपत्रिकेवरील प्रलंबीत विषय क्र. ८२ ते ८८ व पुरक घोषणा क्र. ८९ ते ९३ या विषयांवर चर्चा करण्यासाठी ही सभा **सोमवार, दिनांक ३०/०३/२०१५ रोजी मा. विशेष महासभा संपलेनंतर** मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात आयोजित केलेली आहे.

तरी सदरहू सभेस सर्व सन्मा. सदस्यांनी उपस्थित राहावे हि विनंती.

**मा. महापौर सो. यांच्या आदेशाने.**

(हरेश न. पाटील)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

VP/PC-1/ D/MY DOC/NS/PARIPATRAK-MAHASABHA-2012-17

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- १८/०३/२०१५.

## मा. महासभा दि. २३/०३/२०१५
## पुरक घोषणा

प्रति,
सन्मा. श्री./श्रीमती. ____________________

नगरसेवक/नगरसेविका,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील अनुसूची प्रकरण २ नियम १ (ज) अन्वये दिनांक २३/०३/२०१५ रोजी आयोजित केलेल्या मा. महासभेच्या विषयपत्रिकेमध्ये पुढील विषय समाविष्ट करणेची पुरक घोषणा करण्यांत येत आहे.

| प्र.क्र. | विषय |
|---|---|
| ८९ | सन्मा. सदस्य श्री. प्रशांत केळूसकर यांचा दिनांक १६/०३/२०१५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.<br>-----<br>मिरा भाईंदर महानगरपालिका सभागृहात मा. पदाधिकारी व अधिकारी यांची आसन व्यवस्था संसदीय कामकाजाच्या परंपरेनुसार व प्रचलित नियमाप्रमाणे करणेबाबत. |
| ९० | सन्मा. सदस्य ॲड. सुहास रकवी यांचा दिनांक १६/०३/२०१५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.<br>-----<br>भाईंदर (प.) राममंदिर येथील दैनंदिन बाजार हा भाईंदर (प.) पोलीस स्टेशन समोरील कुबेरा हॉटेल ते सुभाषचंद्र बोस मैदानापर्यंत स्थलांतरीत करणेबाबत. |
| ९१ | सन्मा. सदस्य डॉ. आसिफ शेख यांचा दिनांक १६/०३/२०१५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.<br>-----<br>स्थायी समिती सदस्या श्रीम. वंदना मंगेश पाटील (राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी) यांनी राजीनामा दिल्यामुळे त्यांच्या रिक्त झालेल्या जागेवर "महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २३ अन्वये" एका सदस्याची नेमणूक करणेबाबत. |
| ९२ | सन्मा. सदस्या श्रीम. शिल्पा भावसार यांचा दिनांक १६/०३/२०१५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.<br>-----<br>वृक्ष प्राधिकरण समिती सदस्य डॉ. आसिफ गुलाब शेख (राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी) यांनी राजीनामा दिल्यामुळे त्यांच्या रिक्त झालेल्या जागेवर "महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २३ अन्वये" एका सदस्याची नेमणूक करणेबाबत. |
| ९३ | सन्मा. सदस्य श्री. मदन उदितनारायण सिंह यांचा दिनांक १७/०३/२०१५ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.<br>-----<br>प्रभाग समिती व मा. महासभेमध्ये झालेल्या ठरावाप्रमाणे कार्यवाही होत नसलेबाबत. |

(हरेश ल. पाटील)
महापालिका नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

E:\01 Backup 02\1 D\01 My Document\01 Nagar Sachiv\04 Purak Ghoshna\01 Purak Ghoshana 12-17\Purak Ghoshana - 14-15.doc

भनपा/सचिव/मुरक धोरणा/२७/१-दि. १६/०३/१५


# प्रशांत एन. केळुसकर
**सभापती**
मिरा भाईंदर महानगरपालिका
विशेष कार्यकारी अधिकारी - महाराष्ट्र शासन

मिरा भाईंदर महानगरपालिका
मुख्य कार्यालय,
स्व. इंदिरा गांधी भवन, भाईंदर (प.),
ता. जि. ठाणे - ४०१ १०१.

. कार्यालय : सेवन इलेवन मेंशन, दिपक हॉस्पीटल लेन, सेवन स्क्वेयर एकेडमी जवळ, मिरा-भाईंदर रोड, मिरा रोड (पु.) जि. थाण- ४०१ १०७.
दूरध्वनी : 2810 5050 मोबाईल : 9320346115 ईमेल : keluskar_p@yahoo.in


जावक क्र ५

दिनांक : 16/03/2015

**दि. २३/०३/२०१५ च्या महासभेमध्ये "ज" खाली प्रस्ताव घेणेबाबत..**
**प्रकरण क्र. ८९ करिता**

प्रति,
मा. नगरसचिव सो.,
मिरा भाईंदर महानगरपालिका.

**विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिका सभागृहात मा. पदाधिकारी व अधिकारी यांची आसन व्यवस्था संसदीय कामकाजाच्या परंपरेनुसार व प्रचलित नियमाप्रमाणे करणेबाबत..**

संसदीय कामकाजाच्या परंपरेनुसार व प्रचलित नियमानुसार देशातील संसदेमध्ये, सर्व राज्यातील विधीमंडळ व काही महापालिकेतील सभागृहामध्ये (हाऊसमध्ये) पिठासीन अधिकारी, मा. पदाधिकारी व अधिकारी यांना बसण्याची व्यवस्था निश्चित केलेली आहे. त्यानुसार आपल्या मिरा भाईंदर महानगरपालिका सभागृहात देखील संसदीय परंपरेप्रमाणे मा.पदाधिकारी यांना सिनियरिटीप्रमाणे (ज्येष्ठतेप्रमाणे) अनुक्रमांकानुसार आसन निश्चित/नियोजन करून त्यांना नेमूण दिलेल्या ठिकाणी आसनाची व्यवस्था करणे गरजेचे आहे. जेणेकरून सभागृहीतल जेष्ठ सदस्यांना पुढच्या आसनावर व नविन सदस्यांना त्यानंतरच्या अनुक्रमानुसार आसनाची व्यवस्था होवू शकेल व प्रत्येक सदस्याचा योग्य तो मान सन्मान राखला जाईल. तसेच अधिकाऱ्यांना देखिल पदाधिकाऱ्याप्रमाणे सभागृहात आसन व्यवस्था निश्चित करून देणे आवश्यक आहे.

संसदीय कामकाजाच्या परंपरेनुसार आपल्या मिरा भाईंदर महापालिकेच्या सभागृहामध्येच मा. महापौर यांना गाऊन परिधान करण्याकरीता देण्यांत यावा. तसेच मा. महापौर यांच्यासोबत मा. उप-महापौर, मा. आयुक्त व नगरसचिव फक्त हेट डायसवर (व्यासपिठावर) बसतील. मा. महापौर यांच्या आसनाच्या मागे शिलेदार उभा राहिल व या शिलेदारास युनिफॉर्म असावा. त्याबरोबर महापौर यांच्या समोर राज दंड राहिल. व सचिव कोट घालून सभेचे कामकाज पाहतील. त्याकरीता नमूद केल्याप्रमाणे पोषाखाची व्यवस्था करण्यात यावी.

तसेच इतर संबंधित विभागाचे विभाग प्रमुख असलेल्या उप-आयुक्त किंवा विभाग प्रमुख यांच्या आसनाची व्यवस्था मा. नगरसेवकांच्या आसनासमोरील मोकळ्या जागेत खाली करण्यांत यावी. तसेच सत्ताधारी पक्ष व सभागृहनेता आणि विरोधी पक्ष व विरोधी पक्ष नेत्यांसह मा. नगरसेवकांना सिनियरिटीप्रमाणे (ज्येष्ठताप्रमाणे) अनुक्रमांकानुसार आसनाची व्यवस्था करण्यांत यावी.

तरी वरील प्रमाणे मा. महासभा सभागृहात मा. पदाधिकारी व अधिकाऱ्यांचे आसनाची व्यवस्था संसदीय कामकाजाच्या नियमाप्रमाणे प्रशासनाने तातडीने करावी व पुढील मा. महासभेपासून याची अंमलबजावणी करण्याकरीता सदर विषय येत्या मा. महासभेत घेण्यात यावा ही विनंती.

सुचक :- (सही)　　　　　　अनुमोदक :- (सही)

प्रशांत एन. केळुसकर　　　　　　जयश्री एम. बसाणी

मनपा/नसचिव/पुरक धोबला/२२/2 दि. १६/०३/२०१५

दिनांक :- १६/०३/२०१५

प्रकरण क्र० ९० करिता.

प्रति,

मा. नगरसचिव ,
मिरा-भाईंदर महानगरपालिका.

मा. महासभा दि. २३/०३/२०१५ करिता "ज" अन्वये प्रस्ताव

विषय :- भाईंदर (प.) राममंदिर रोड येथील दैनंदिन बाजार हा भाईंदर (प.) पोलीस स्टेशन समोरील कुबेरा हॉटेल ते सुभाषचंद्र बोस मैदानापर्यंत स्थलांतरीत करण्याबाबत.

उपरोक्त विषयांकीत प्रकरणी कळविण्यांत येते की, भाईंदर (प.) येथील राममंदिर रोड वरील महापालिकेमार्फत बाजार बसविण्यात येत असतो. सदर ठिकाणचा रस्ता अरुंद असुन त्या ठिकाणी बाजार भरत असल्यामुळे सदर रस्त्यावरुन येथील स्थानिक नागरिकांना, शाळेतील मुलांना, महिलांना व वयोवृध्दांना रस्त्यावरुन ये-जा करण्यास फारच अडचणीचे व गैरसोयीचे होत आहे. तसेच सदर रस्त्यांवरुन अंतयात्रा, अॅब्युलन्स, पाण्याचे टँकर व अग्नीशमन दलाची गाडी नेण्यास देखील फारच त्रासाचे होत आहे.

तरी भाईंदर (प.) राममंदिर रोड येथील दैनंदिन बाजार हा भाईंदर (प.) पोलीस स्टेशन समोरील कुबेरा हॉटेल ते सुभाषचंद्र बोस मैदानापर्यंत स्थलांतरीत करण्यात यावा असा प्रस्ताव मी मांडत आहे.

सुचक : अॅड.सुहास रकवी

अनुमोदक : डॉ. आसिफ शेख.

मनपा/सचिव/पु.घो./23/3/2014-15,
दि. 16/3/2015

प्रति,
मा.नगरसचिव, प्रकरण क्र. 17 करिता
मिरा भाईंदर महानगरपालिका

दि. 16/03/2015.

**मा.महासभा दि.२३/03/२०१५ करीता 'ज' अन्वये प्रस्ताव.**

**विषय :- स्थायी समिती सदस्या श्रीम.वंदना मंगेश पाटील (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी) यांनी राजीनामा दिल्यामुळे त्यांच्या रिक्त झालेल्या जागेवर 'महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २३ अन्वये' एका सदस्याची नेमणूक करणेबाबत...**

**संदर्भ :- महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग यांचेकडील क्रमांक : संकीर्ण/२००८/४३४/ प्र.क्र.१५१/२००८/नवि-३२ दि.२० ऑक्टोबर २००८ रोजीचे परिपत्रक.**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या स्थायी समिती सदस्या श्रीम.वंदना मंगेश पाटील यांनी राजीनामा दिल्यामुळे सुमारे चार महिन्यांपासून रिक्त झालेल्या जागेवर 'महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २३ अन्वये' एका सदस्याची नेमणूक करणे आवश्यक आहे. संदर्भिय महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाच्या दि. २० ऑक्टोबर २००८ च्या परिपत्रकानुसार कोणत्याही समितीच्या कारणामुळे रिक्त होणाऱ्या जागांवर निवृत्त झालेल्या सदस्य ज्या मान्यता प्राप्त पक्षाचा नोंदणीकृत पक्षाचा, गटांचा, आघाडींचा किंवा फ्रंटचा असेल त्याच मान्यताप्राप्त पक्षाच्या, नोंदणीकृत पक्षाच्या, गटाच्या आघाडीच्या किंवा फ्रंटच्या सदस्यास नामनिर्देशित करणे अपेक्षित आहे, असे स्पष्टपणे नमूद केले आहे. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या स्थायी समिती सदस्याच्या राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्याच एका सदस्याची नेमणूक करणे कायदेशिररित्या घटनेच्या व अधिनियमांतील तरतुदीनुसार बंधनकारक आहे.

तरी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या स्थायी समितीच्या सदस्या श्रीम.वंदना मंगेश पाटील यांनी राजीनामा दिल्यामुळे त्यांच्या रिक्त झालेल्या जागेवर एका सदस्याची कायदेशिररित्या घटनेनुसार व अधिनियमांतील तरतुदीप्रमाणे तातडीने नियुक्ती करण्यांत यावी, असा प्रस्ताव मी देत आहे.

कळावे,

आपला,

(डॉ.आसिफ शेख)

**ता.क.: सोबत महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग यांचेकडील दि.२० ऑक्टोबर २००८ चे परिपत्रक.**

[illegible]

[illegible]

[illegible]

महाराष्ट्र शासन

क्रमांक : संकीर्ण २००८/४३४/प्र.क्र.१५१/२००८/नवि-३२

नगर विकास विभाग,

मंत्रालय, मुंबई ४०००३२.

दिनांक : २० ऑक्टोबर, २००८.

प्रति,

नगर सचिव,

मिरा-भाईंदर महानगरपालिका,

मिरा-भाईंदर, जि. ठाणे.

**विषय :-** महानगरपालिकेतील स्थायी समितीच्या रिक्त होणाऱ्या जागा, व इतर समित्यांच्या वेळोवेळी विविध कारणांनी रिक्त होणाऱ्या जागा भरण्याच्या पध्दतीबाबत.

**संदर्भः-** आपले क्र.मनपा/सचिव/२०६/२००८-०९, दि.२०.१०.२००८ चे पत्र.

**महोदय,**

आपल्या उपरोक्त विषयावरील संदर्भाधीन पत्राचे अनुषंगाने कळविण्यात येते की, महानगरपालिका अधिनियमान्वये गठीत करण्यात येणाऱ्या समित्यांमध्ये महानगरपालिकेतील सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांना व गटांना खात्रीपुर्वक पुरेसे प्रतिनिधीत्व मिळावे म्हणून समित्यांवर बलाबलानुसार प्रतिनिधीत्व देण्याबाबतची तरतुद अधिनियमात सुधारणेद्वारे करण्यात आली आहे. मिरा-भाईंदर महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक ऑक्टोबर, २००७ मध्ये झाली असुन तदनंतर स्थायी समितीच्या सदस्यांची नेमणूक बलाबलानुसार करण्यात आली आहे. सदरहु बलाबल कायम असल्यास जे निम्मे सदस्य निवृत्त होत आहेत ते ज्या मान्यताप्राप्त पक्षाचे, नोंदणीकृत पक्षाचे, गटाचे, आघाडीचे किंवा फ्रंटचे असतील त्याच मान्यताप्राप्त पक्षाचे, नोंदणीकृत पक्षाचे, गटाचे, आघाडीचे अथवा फ्रंटचे नवीन सदस्य स्थायी समितीवर नेमणे अध्यारुत आहे, जेणेकरुन बलाबलानुसार प्रतिनिधीत्व देण्याबाबतच्या तरतुदीची पुर्तता होवु शकेल.

तसेच कोणत्याही समितीच्या कोणत्याही कारणामुळे रिक्त होणाऱ्या जागांवर निवृत्त झालेला सदस्य ज्या मान्यता प्राप्त पक्षाचा, नोंदणीकृत पक्षाचा, गटांचा, आघाडीचा किंवा फ्रंटचा असेल त्याच मान्यताप्राप्त पक्षाच्या, नोंदणीकृत पक्षाच्या, गटाच्या, आघाडीच्या किंवा फ्रंटच्या सदस्यास नामनिर्देशित करणे अपेक्षीत आहे. मात्र अशा वेळेस पूर्वीच्या तुलनेने पक्षांच्या / गटांच्या तौलनिक संख्येत बदल झालेला नसावा.

आपला,

( फ. ब. खान )

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्राप्त दि. १७/३/५९
स. १०.३५ वा.
१७/३/५९

मनपा/सचिव/ पुरक घोषणा/ २८१/४ दि. १७/०३/१५

प्रकरण क्र. ९२ करिता. दि. १६/०३/२०१५.

प्रति,
मा.नगरसचिव,
मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा.महासभा दि.२३/०३/२०१५ करीता 'ज' अन्वये प्रस्ताव.**

**विषय :- वृक्ष प्राधिकरण समिती सदस्य डॉ.आसिफ गुलाब शेख (राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी) यांनी राजीनामा दिल्यामुळे त्यांच्या रिक्त झालेल्या जागेवर 'महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २३ अन्वये' एका सदस्याची नेमणूक करणेबाबत...**

**संदर्भ :- महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग यांचेकडील क्रमांक : संकीर्ण/२००८/४३४/ प्र.क्र.१५१/२००८/नवि-३२ दि.२० ऑक्टोबर २००८ रोजीचे परिपत्रक.**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या वृक्ष प्राधिकरण समिती सदस्य डॉ.आसिफ गुलाब शेख यांनी राजीनामा दिल्यामुळे सुमारे चार महिन्यांपासून रिक्त झालेल्या जागेवर 'महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २३ अन्वये' एका सदस्याची नेमणूक करणे आवश्यक आहे. संदर्भिय महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाच्या दि. २० ऑक्टोबर २००८ च्या परिपत्रकानुसार कोणत्याही समितीच्या कारणामुळे रिक्त होणाऱ्या जागांवर निवृत्त झालेल्या सदस्य ज्या मान्यता प्राप्त पक्षाचा नोंदणीकृत पक्षाचा, गटांचा, आघाडींचा किंवा फ्रंटचा असेल त्याच मान्यताप्राप्त पक्षाच्या, नोंदणीकृत पक्षाच्या, गटाच्या आघाडीच्या किंवा फ्रंटच्या सदस्यास नामनिर्देशित करणे अपेक्षित आहे, असे स्पष्टपणे नमूद केले आहे. त्यामुळे राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या वृक्ष प्राधिकरण समिती सदस्याच्या राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्याच एका सदस्याची नेमणूक करणे कायदेशिररित्या घटनेच्या व अधिनियमातील तरतुदीनुसार बंधनकारक आहे.

तरी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या वृक्ष प्राधिकरण समिती सदस्य डॉ.आसिफ गुलाब शेख यांनी राजीनामा दिल्यामुळे त्यांच्या रिक्त झालेल्या जागेवर एका सदस्याची कायदेशिररित्या घटनेनुसार व अधिनियमांतील तरतुदीप्रमाणे तातडीने नियुक्ती करण्यांत यावी, असा प्रस्ताव मी देत आहे.

कळावे,

आपला,

(सौ. शिल्पा भावसार)
नगरसेविका

**ता.क.: सोबत महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग यांचेकडील दि.२० ऑक्टोबर २००८ चे परिपत्रक.**

प्राप्त दि. १७/०३/२०१५
वेळ = १२:२० वा.

महाराष्ट्र शासन

क्रमांक : संकीर्ण २००८/४६४/प्र.क्र. २५४/२००८/नवि-३२

नगर विकास विभाग,

मंत्रालय, मुंबई ४०००३२.

दिनांक : २० ऑक्टोबर, २००८.

प्रति,

नगर सचिव,

मिरा-भाईंदर महानगरपालिका,

मिरा-भाईंदर, जि.ठाणे.

**विषय :-** महानगरपालिकेतील स्थायी समितीच्या रिक्त होणाऱ्या जागा, व इतर समित्यांच्या वेळोवेळी विविध कारणांनी रिक्त होणाऱ्या जागा भरण्याच्या पध्दतीबाबत.

**संदर्भ:-** आपले क्र.मनपा/सचिव/२०६/२००८-०९, दि.२०.१०.२००८ चे पत्र.

**महोदय,**

आपल्या उपरोक्त विषयावरील संदर्भाधीन पत्राचे अनुषंगाने कळविण्यात येते की, महानगरपालिका अधिनियमान्वये गठीत करण्यात येणाऱ्या समित्यांमध्ये महानगरपालिकेतील सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांना व गटांना खात्रीपुर्वक पुरेसे प्रतिनिधीत्व मिळावे म्हणून समित्यांवर बलाबलानुसार प्रतिनिधीत्व देण्याबाबतची तरतुद अधिनियमात सुधारणेद्वारे करण्यात आली आहे. मिरा-भाईंदर महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक ऑक्टोबर, २००७ मध्ये झाली असुन तदनंतर स्थायी समितीच्या सदस्यांची नेमणूक बलाबलानुसार करण्यात आली आहे. सदरहु बलाबल कायम असल्यास जे निम्मे सदस्य निवृत्त होत आहेत ते ज्या मान्यताप्राप्त पक्षाचे, नोंदणीकृत पक्षाचे, गटाचे, आघाडीचे किंवा फ्रंटचे असतील त्याच मान्यताप्राप्त पक्षाचे, नोंदणीकृत पक्षाचे, गटाचे, आघाडीचे अथवा फ्रंटचे नवीन सदस्य स्थायी समितीवर नेमणे अध्याहृत आहे, जेणेकरुन बलाबलानुसार प्रतिनिधीत्व देण्याबाबतच्या तरतुदीची पुर्तता होवु शकेल.

तसेच कोणत्याही समितीच्या कोणत्याही कारणामुळे रिक्त होणाऱ्या जागांवर निवृत्त झालेला सदस्य ज्या मान्यता प्राप्त पक्षाचा, नोंदणीकृत पक्षाचा, गटांचा, आघाडीचा किंवा फ्रंटचा असेल त्याच मान्यताप्राप्त पक्षाच्या, नोंदणीकृत पक्षाच्या, गटाच्या, आघाडीच्या किंवा फ्रंटच्या सदस्यास नामनिर्देशित करणे अपेक्षीत आहे. मात्र अशा वेळेस पूर्वीच्या तुलनेने पक्षांच्या / गटांच्या तौलनिक संख्येत बदल झालेला नसावा.

आपला,

( फ. ब. खान )

उप सचिव, महाराष्ट्र शासन

मनपा/सचिव/पुरक घोषणा/२५/५ दि. १७/3/१५


# मदन उदितनारायण सिंह

**नगरसेवक**

मिरा भाईंदर महानगरपालिका

विशेष कार्यकारी अधिकारी - महाराष्ट्र शासन

मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय,

छत्रपति शिवाजी महाराज मार्ग,

भाईंदर (प.), ता. जि. ठाणे - ४०१ १०१.

ऑफिस : शॉप नं. १०, राजपूत पॅलेस, आर. एन. पी. पार्क, भाईंदर (पूर्व), ता. जि. ठाणे - ४०१ १०५.

दूरध्वनी : 28151461 मोबाईल : 9322598737


जावक क्र.________________ दिनांक : 17/03/15

दि 23/03/२०१५ च्या महासभेमध्ये "ज" खाली प्रस्ताव घेणेबाबत..

प्रकरण क्र. ९३ करिता

प्रति,

मा. नगरसचिव साहेब

मिरा-भाईंदर महानगरपालिका

**विषय :- प्रभाग समिती व मा. महासभेमध्ये झालेल्या ठरावाप्रमाणे कार्यवाही होत नसलेबाबत..**

महोदय,

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतुदीनुसार महानगरपालिका महासभा, प्रभाग समिती सभा नगरपालिकांच्या विकास कामाकरीता पर्यायाने लोकप्रतिनिधींची जनहिताची कामे करणेकरीता या सभांचे आयोजन केले जात असते. या सभांमध्ये प्रत्येक विषयांवर साधकबाधक चर्चा होवून या विषयांचे रूपांतर ठरावामध्ये केले जाते. याचे कारण प्रशासनास कामांकरीता आर्थिक प्रशासकिय व विविध प्रकारच्या मंजुऱ्या या ठरावांव्दारे दिल्या जातात.

साधारणतः अशी प्रथा आहे की, सन्मा. नगरसेवक विविध कामांचे विषय मा. महासभेमध्ये व प्रभाग समित्यांमध्ये ठेवत असतात. या सर्व विषयांना सर्व प्रकारच्या मान्यता व मंजुऱ्या देवूनही प्रशासन हेतुपुरस्कर व जाणीवपूर्वक कोणत्याही प्रकारची कार्यवाही करत नसल्याचे दिसून येत आहे. यामुळे प्रत्येक प्रभागामध्ये काम करण्यास नगरसेवकांना काम करणे अडचणीचे जाते. व नागरीकांना उत्तर देणे कठीण होत आहे. प्रभाग समितीमध्ये मी सभापती असताना विविध विषयांवर ठराव झालेले आहेत. व विकास कामांकरीता संबंधिल खात्यांना विनंती वजा सुचना केलेल्या आहेत. परंतु प्रभाग समितीमध्ये झालेल्या ठरावांवर व सुचनांवर प्रशासकडून कोणत्याही प्रकारची कार्यवाही व दखल घेण्यात आलेली नाही. या सर्व बाबींकरीता कोणास जबाबदार धरावे? किंवा प्रभाग समिती मध्ये झालेल्या ठराव व सुचनांवर प्रशासनाकडून अंमलबजावणी केली जाणार आहे किंवा काय ही बाब प्रश्नांकित राहत आहे. तसेच मा. महासभेमध्ये झालेले ठराव, सुचना, लक्षवेधी या बाबींवर प्रशासनाकडून वेळीत कार्यवाही केली जात नाही. प्रशासनाने ठराव, सुचना, लक्षवेधी यांच्याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे. व सदर प्रत्येक कामाची वेळ व मुदत ठरवावी.

# मदन उदितनारायण सिंह
## नगरसेवक
मिरा भाईंदर महानगरपालिका
विशेष कार्यकारी अधिकारी - महाराष्ट्र शासन

मिरा भाईंदर महानगरपालिका
मुख्य कार्यालय,
छत्रपति शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता. जि. ठाणे - ४०१ १०१.

ऑफिस : शॉप नं. १०, राजपूत पॅलेस, आर. एन. पी. पार्क, भाईंदर (पूर्व), ता. जि. ठाणे - ४०१ १०५.
दूरध्वनी : 28151461 मोबाईल : 9322598737

जावक क्र.______________ दिनांक : 17/03/15



महानगरपालिका क्षेत्रातील नागरीक विविध कामांकरीता प्रत्येक प्रभाग समिती कार्यालयात प्रभाग अधिकारी व त्यांच्या हाती खाली असलेले कर्मचारी सामान्य नागरीकांकडून महानगरपालिकेतील काम करणेकरीता पैश्यांची मागणी करत असतात. ही मागणी पूर्ण करत नाही तोपर्यंत सामान्य नागरीकांना विविध प्रकारच्या कायदेशीर अडचणी दाखवून एकाच कामाकरीता अनेक वेळा कार्यालयात बोलावत असतात. अशा प्रकारच्या तक्रारी माझ्याकडे तसेच या सभागृहामध्ये उपस्थित असलेल्या सर्व सदस्यांकडे येत असतात. ही बाब अतिशय निंदनीय व खेदाची आहे. यासाठी मला तसेच सर्व सदस्यांना तक्रारदार नागरीकाला बरोबर घेवून मनपा कार्यालयाकडे जावून प्रत्यक्ष नागरीकांचे काम करावे लागते. महानगरपालिकेने प्रत्येक कामाकरीता नागरीकांचा जाहीरनामा प्रसिध्द केला असून या जाहीरनाम्यामध्ये प्रत्येक कामाची मुदत ठरविण्यात आलेली आहे. या जाहीरनाम्याप्रमाणे कोणताही कर्मचारी मुदतीत काम न केल्यास अश्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करावी.

तसेच आम्ही सर्व सदस्य ठराव, सुचना, लक्षवेधीच्या अनुषंगाने आयुक्त, उपायुक्त व सर्व अधिकारी व कर्मचारी यांना विनंती करतो की, ठरावातील प्रत्येक काम तत्परतेने व निश्चित केलेल्या मुदतीत करावे. अन्यथा वेळेत न काम करणाऱ्या जबाबदार अधिकाऱ्यांवर महानगरपालिका अधिनियमा अंतर्गत कलम ५६ प्रमाणे कारवाई करावी अशी विनंती आहे.

सुचक - श्री. मदन उदितनारायण सिंह अनुमोदक - श्री. यशवंत कांगणे

# मिरा भाईंदर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- ११/०३/२०१५.

## मा. महासभा

**मा. महासभा सूचना क्र. :- ०८, दिनांक ११/०३/२०१५**

**प्रति,**
**सन्मा. श्री./श्रीमती.** ______________________

नगरसेवक/नगरसेविका,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सोमवार दि. २३/०३/२०१५ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०८, दि. ११/०३/२०१५ रोजी सोबतच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

(हरेश ल. पाटील)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. महापौर सो. यांच्या मान्यतेने.**

E/Backup- 2/D/MD/Nagarsachiv/Vishaypatrika/Vishaypatrika-Mahasabha 12-17

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)**

**मा. महासभा सुचना क्रमांक ०८, दि. ११/०३/२०१५ सोबतची सुधारीत विषय पत्रिका**

**सभा सोमवार दि. २३/०३/२०१५**

| प्र.क्र. | विषय |
|---|---|
| --- | **प्रश्नोत्तरे –** |
| --- | **मागील सभांचे इतिवृत्तांत –** |
| ६९ | दि. १५/११/२०१४, दि. २५/११/२०१४ (दि. १५/११/२०१४ रोजीची तहकूब सभा) रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे. |
| --- | **सर्व निवडणुका –** |
| ७० | मिरा भाईंदर महानगरपालिकेवर ५ व्या नामनिर्देशित पालिका सदस्याची नेमणूक करणेबाबत. |
| --- | **सर्व नियुक्त्या** - निरंक |
| --- | **मध्यप्रश्न (इंटरप्रिलेशन्स)** - निरंक |
| --- | **विनंती अर्ज** - निरंक |
| --- | **स्थायी, परिवहन व विशेष समित्यांचे ठराव** – निरंक |
| --- | **शिक्षण मंडळाची पत्रे** - निरंक |
| --- | **आयुक्तांकडील पत्रे व कामकाज –** |
| ७१ | मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील इमारतींना वापर परवाना देणेबाबत विशेष सवलत मोहिम राबविणेकरीता मंजूरी मिळणेबाबत. |
| ७२ | अपंग व्यक्तींना स्वयं रोजगारासाठी बँकेमार्फत आर्थिक मदत देणेबाबत. |
| ७३ | मिरा भाईंदर प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना गणवेश व शैक्षणिक साहित्य खरेदी करणेसाठी प्रशासकीय व आर्थिक मंजूरी मिळणेबाबत. |
| ७४ | टेंबा इस्पितळासाठी नियुक्त केलेल्या वैद्यकिय अधिकारी / कर्मचारी यांच्या नियुक्ती बाबत. |
| ७५ | श्री. स्वप्नील सावंत (सहा. आयुक्त) प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र. १ निलंबन कायम करणेबाबत. |
| ७६ | शहरातील पावसाळ्या पूर्वी कच्चे पक्के नाले सफाई करणे व इतर आरोग्य विभागाच्या कामास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत. |
| ७७ | मोबाईल टॉवर्सना अग्निशमन दलाचा नाहरकत दाखला देणेकामी फी ची आकारणी निश्चित करणेबाबत. |
| ७८ | वाहने वाहन चालकासह भाडे तत्वावर इंधनासह (संपूर्ण सेवा) ठेक्याने घेणेकामी निविदा मागविणेकरीता आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत. |
| ७९ | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मालमत्तांचे भाडे ठरविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव फेरसादर करणे. |
| ८० | छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर विविध ठिकाणी उड्डाणपुल बांधणे व पादचारी पुल बांधणेच्या सुधारीत खर्चास मान्यता देणेबाबत. |
| ८१ | भाईंदर (पूर्व) खारीगाव मासळी मार्केट इमारतीच्या जागेचा मोबदला देणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे. |
| ८२ | मौजे महाजनवाडी स.क्र. १०७/१पै,१०८/१,२,३/१०९/२३,२४,२७,२८,११०/५पै. या जागेमधील नागरी सुविधा क्षेत्राच्या भुखंडावर तरणतलाव व आर्ट गॅलरी बांधणे कामास मान्यता देणे. |
| ८३ | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत मंजुर झालेल्या पर्जन्य जलवाहिन्या प्रकल्पाअंतर्गत (टप्पा १) अतिरीक्त निधी शासनाकडून प्राप्त करुन घेणेबाबत. |
| ८४ | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत तयार करण्यात आलेल्या पर्जन्य जलवाहिन्या व रस्ते बांधणे कामाच्या सविस्तर प्रकल्प अहवालास मान्यता देणेबाबत. |
| ८५ | पाणीपट्टी दरात वाढ करणेबाबत. |
| ८६ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील आ.क्र. ९६ (खेळाचे मैदान) व आ.क्र. १९१ (प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान) या आरक्षणाचे करारनाम्याबाबत. (फेरसादर) |
| ८७ | आ.क्र. ३२६अ टी. टर्मिनल विकसित करणेचे कामास प्रशासकीय व आर्थिक मंजूरी मिळणेबाबत. |
| ८८ | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ३७ अन्वये फेरबदलाची कारवाई करणेबाबत. |
| -- | **शासनाकडील किंवा शासकीय अधिकाऱ्यांकडील पत्रे –** |
| --- | **समित्यांचे किंवा उप समित्यांचे अहवाल** – निरंक |

**(हरेश ल. पाटील)**
**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**महानगरपालिका सचिव कार्यालय,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**दिनांक :- ११ मार्च २०१५**

E/Backup- 2/D/MD/Nagarsachiv/Vishaypatrika/Vishaypatrika-Mahasabha 12-17

92/3/209 Y

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

**मा. महासभा सुचना क्रमांक ०८, दि. ११/०३/२०१५ सोबतची विषय पत्रिका**

**सभा सोमवार दि. २३/०३/२०१५**

| प्र.क्र. | विषय |
|---|---|
| --- | **प्रश्नोत्तरे –** |
| --- | **मागील सभांचे इतिवृत्तांत –** |
| ६९ | दि. १५/११/२०१४, दि. २५/११/२०१४ (दि. १५/११/२०१४ रोजीची तहकूब सभा) रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे. |
| --- | **सर्व निवडणुका –** |
| ७० | मिरा भाईंदर महानगरपालिकेवर ५ व्या नामनिर्देशित पालिका सदस्याची नेमणूक करणेबाबत. |
| --- | **सर्व नियुक्त्या** - निरंक |
| --- | **मध्यप्रश्न (इंटरप्रिलेशन्स)** - निरंक |
| --- | **विनंती अर्ज** - निरंक |
| --- | **स्थायी, परिवहन व विशेष समित्यांचे ठराव –** निरंक |
| --- | **शिक्षण मंडळाची पत्रे** - निरंक |
| --- | **आयुक्तांकडील पत्रे व कामकाज –** |
| ७१ | मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील इमारतींना वापर परवाना देणेबाबत विशेष सवलत मोहिम राबविणेकरीता मंजूरी मिळणेबाबत. |
| ७२ | अपंग व्यक्तींना स्वयं रोजगारासाठी बँकेमार्फत आर्थिक मदत देणेबाबत. |
| ७३ | मिरा भाईंदर प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना गणवेश व शैक्षणिक साहित्य खरेदी करणेसाठी प्रशासकीय व आर्थिक मंजूरी मिळणेबाबत. |
| ७४ | टेंबा इस्पितळासाठी नियुक्त केलेल्या वैद्यकिय अधिकारी / कर्मचारी यांच्या नियुक्ती बाबत. |
| ७५ | श्री. स्वप्नील सावंत (सहा. आयुक्त) प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र. १ निलंबन कायम करणेबाबत. |
| ७६ | शहरातील पावसाळ्या पूर्वी कच्चे पक्के नाले सफाई करणे व इतर आरोग्य विभागाच्या कामास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत. |
| ७७ | मोबाईल टॉवर्सना अग्निशमन दलाचा नाहरकत दाखला देणेकामी फी ची आकारणी निश्चित करणेबाबत. |
| ७८ | वाहने वाहन चालकासह भाडे तत्वावर इंधनासह (संपूर्ण सेवा) ठेक्याने घेणेकामी निविदा मागविणेकरीता आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत. |
| ७९ | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मालमत्तांचे भाडे ठरविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव फेरसादर करणे. |
| ८० | छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर विविध ठिकाणी उड्डाणपुल बांधणे व पादचारी पुल बांधणेच्या सुधारीत खर्चास मान्यता देणेबाबत. |
| ८१ | भाईंदर (पूर्व) खारीगाव मासळी मार्केट इमारतीच्या जागेचा मोबदला देणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे. |
| ८२ | मौजे महाजनवाडी स.क्र. १०७/१पै,१०८/१,२,३/१०९/२३,२४,२७,२८,११०/५पै. या जागेमधील नागरी सुविधा क्षेत्राच्या भुखंडावर तरणतलाव व आर्ट गॅलरी बांधणे कामास मान्यता देणे. |
| ८३ | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत मंजुर झालेल्या पर्जन्य जलवाहिन्या प्रकल्पाअंतर्गत (टप्पा १) अतिरीक्त निधी शासनाकडून प्राप्त करुन घेणेबाबत. |
| ८४ | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत तयार करण्यात आलेल्या पर्जन्य जलवाहिन्या व रस्ते बांधणे कामाच्या सविस्तर प्रकल्प अहवालास मान्यता देणेबाबत. |
| ८५ | पाणीपट्टी दरात वाढ करणेबाबत. |
| ८६ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील आ.क्र. ९६ (खेळाचे मैदान) व आ.क्र. १९१ (प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान) या आरक्षणाचे करारनाम्याबाबत. (फेरसादर) |
| ८७ | आ.क्र. ३२६अ टी. टर्मिनल विकसित करणेचे कामास प्रशासकीय व आर्थिक मंजूरी मिळणेबाबत. |
| ८८ | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ३७ अन्वये फेरबदलाची कारवाई करणेबाबत. |
| -- | **शासनाकडील किंवा शासकीय अधिकाऱ्यांकडील पत्रे –** |
| --- | **समित्यांचे किंवा उप समित्यांचे अहवाल** – निरंक |

**महानगरपालिका सचिव कार्यालय,**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**दिनांक :- ११ मार्च २०१५**

(हरेश ल. पाटील)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

E/Backup- 2/D/MD/Nagarsachiv/Vishaypatrika/Vishaypatrika-Mahasabha 12-17

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा दि. २३/०३/२०१५ रोजी आयोजित केली आहे.**
**सदर सभेकरिता मा. सदस्यांचे खालीलप्रमाणे प्रश्न आलेले आहेत.**

| प्रश्न |
|---|
| **३० सौ. निलम हरिश्चंद्र ढवण मा. सदस्या यांनी दि. २८/०७/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) बाजार फी वसुली करणाऱ्या ठेकेदारांना फेरीवाल्यांकडून बाजार फी म्हणून किती फी वसुल करण्याची परवानगी आहे? |
| अ) महापालिकेने ठरवून दिलेल्या दरापेक्षा ठेकेदाराने जास्ती फी वसुल केल्यास महापालिका प्रशासनाला कसे कळते? |
| ब) ज्या ठिकाणाहून किंवा बाजारातून ठेकेदार बाजार फी वसुल करत आहेत, तेथे महापालिकेने दराबाबत सुचना फलक लावला आहे का? नसल्यास कधी लावणार? |
| क) ना फेरीवाला क्षेत्रामधून ठेकेदार बाजार फी वसुल करत आहेत, मात्र महापालिकेने फक्त फेरीवाला क्षेत्र गृहीत धरुन परवानगी दिली आहे. यामुळे महापालिकेच्या महसुलाचे नुकसान होते किंवा नाही? |
| ड) ना फेरीवाला क्षेत्रामधून बाजार फी वसुल करु नये या अटीवर ठेकेदाराला ठेका देण्यात आला आहे. मग ना फेरीवाला क्षेत्रामधून बाजार फी वसुल करणाऱ्या ठेकेदारांवर आजपर्यंत कोणती कारवाई करण्यात आली आहे किंवा भविष्यात कोणती कारवाई करण्यात येईल? |
| **३१ श्रीम. गिता भरत जैन मा. सदस्या यांनी दि. २९/१०/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) ज्या सफाई कामगारांची सेवा २५ वर्ष झालेली आहे अश्या कर्मचाऱ्यांना मोफत घरे देण्याचा मा. महासभेत ठराव पारीत झालेला आहे काय? |
| अ) या ठरावाची तारीख, तसेच ठराव मंजूर झाला असल्यास सदर ठरावाची काय अंमलबजावणी करण्यात आलेली आहे? |
| ब) आतापर्यंत सफाई कामगारांकरीता किती घरे बांधण्यात आली व कोणत्या ठिकाणी? |
| क) मनपा मध्ये २५ वर्ष सेवा झाली आहे असे किती सफाई कामगार आहेत? त्यांचे नाव व पत्ते द्यावेत? |
| ड) आतापर्यंत किती कामगारांना घरे देण्यात आली? |
| इ) मा. महासभेत महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान राबविणेचे ठराव सहमत झाले आहे का? |
| ई) सुवर्णजयंती नगरोत्थान म्हणजे काय या अंतर्गत काय सुविधा देण्यात आलेल्या आहेत याची संपूर्ण माहिती द्यावी? |
| **३२ श्रीम. मिरादेवी रामलाल यादव मा. सदस्या यांनी दि. ०८/११/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) बी.एस.यू.पी. योजना अंमलबजावणी करण्याकरीता २.५ वाढीव चटई क्षेत्र निर्देशांक करणेकामी फेरबदलाचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला आहे. प्रस्ताव पाठविण्याची तारीख काय? |
| अ) सदर प्रस्तावाबाबत शासनाकडून कोणती कारवाई करण्यात आली? |
| ब) वाढीव चटई क्षेत्राबाबत शासनाने पाठवलेली उत्तरांची माहिती देणे? |
| क) वाढीव क्षेत्र शासनाकडून मंजूरी मिळाल्यास बी.एस.यू.पी. योजना अंतर्गत चालू असलेल्या कामांमध्ये बदल होण्याची शक्यता आहे का? |
| **३३ श्रीम. मिरादेवी रामलाल यादव मा. सदस्या यांनी दि. ०८/११/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) शांतता क्षेत्राचे लावलेल्या फलकाची साईज किती चौरस मीटर आहे? |
| अ) एकूण लावलेल्या प्रत्येकी साईजप्रमाणे किंमत किती? |
| ब) एकूण किती खर्च आलेला आहे? |
| क) शांतता क्षेत्र लावलेल्या फलकाच्या ठिकाणी योग्यतेने पालन होते का आणि सदरची जबाबदारी कोणाची? |
| ड) आतापर्यंत शांतता क्षेत्राचे उल्लंघन करणाऱ्या लोकांवर कारवाई करण्यात आली? नाव व त्यांची एकूण दंडात्मक कारवाई केली त्याची माहिती? |
| **३४ डॉ. नयना मनोज वसाणी मा. सदस्या यांनी दि. १३/११/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) राशनिंग कार्यालयाकरीता भाड्याने जागा उपलब्ध करुन देणे तसेच सदर ठिकाणी पाणी मीटर कार्यशाळेचेही बांधकाम करुन घेणे असा ठराव पारित झाला होता का? |
| अ) सदर ठरावाच्या अनुषंगाने राशनिंग कार्यलय उभारण्यात येऊन भाड्याने देण्यात आले आहे. तरी पाणी मीटर कार्यशाळेचे बांधकाम का झाले नाही? |

| |
|---|
| ब) बांधकाम झाल्यास त्या ठिकाणी पाणी मीटर तपासणी कार्यालयाचे विधिवत काम का सुरु झाले नाही? |
| क) या विषयावर संबंधित अधिकाऱ्याने काय कारवाई केली त्याचा संपूर्ण तपशिल द्यावा? |
| **३५ डॉ. राजेंद्र जैन मा. सदस्य यांनी दि. १६/११/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) ५० मायक्रॉन पेक्षा कमी जाडी प्लास्टीक पिशव्या जप्त करणेबाबत महाराष्ट्र शासनाने काढलेल्या जी.आर. कॉपी देणे. |
| अ) ५० मायक्रॉन पेक्षा कमी जाडीच्या प्लास्टीक पिशव्या जप्ती करणेबाबत देण्यात आलेल्या आदेश प्रती. |
| ब) महानगरपालिका क्षेत्रात आजपर्यंत ५० मायक्रॉन पेक्षा कमी जाडीच्या प्लास्टीक पिशव्या एकूण किती जप्त केल्या आहेत? |
| क) महापालिकेने ५० मायक्रॉन पेक्षा कमी जाडीच्या प्लास्टीक पिशव्या जप्त केलेल्या दंडाची माहिती देणे. |
| **३६ डॉ. राजेंद्र जैन मा. सदस्य यांनी दि. २५/११/२०१३ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) मा. महासभा दि. १६/०५/२०१३ मध्ये घेतलेला माझ्या प्रश्ना (रिलायन्स) संबंधीत जे काही आश्वासन मला देण्यात आले होते त्याबाबत आतापर्यंत काय कारवाई केली आहे? |
| अ) मा. महासभा दि. ०५/०६/२०१३ मध्ये घेतलेला माझा प्रश्न ओ.एल.टी. बाबत दिलेल्या आश्वासनबाबत आजपर्यंत काय कारवाई केली आहे? |
| ब) प्रॉपर्टी रजिस्टर बनविण्यासाठी नियमानुसार बनविण्यासाठी आतापर्यंत काय केले आहे. याबाबतची माहिती त्वरीत देण्यात यावी. प्रॉपर्टी रजिस्टर बनविण्यासाठी बी.पी.एम.सी. ॲक्टमध्ये काय कायदा आहे? |
| **३७ श्रीम. दिप्ती शेखर भट्ट मा. सदस्या यांनी दि. १०/११/२०१४ रोजी विचारलेला प्रश्न** |
| मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मिरारोड (पूर्व) शांतीनगर येथील आर.जी. च्या जागांबाबत खालील प्रश्न चर्चेसाठी सादर करण्यांत येत आहेत. |
| १) आर.जी.च्या कोणकोणत्या जागा महापालिकेतील संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने हस्तांतरीत झालेल्या आहेत? जर असेल तर त्या कोणत्या? कोणत्या आर.जी. जागेवर महापालिकेमार्फत काम सुरु करण्यात आलेले आहे. |
| अ) आर.जी. मध्ये फेरबदल करण्यांत येऊ शकतो का? तसेच या अनुषंगाने पत्र क्र.मनपा/नर/३१४९/२००७-०८,दि.१२/१२/२००७ व पत्र क्र. एस.एस.बी.-२००७/३१३, दि. १८/१२/२००७ या पत्रांचा खुलासा देण्यात यावा. |
| ब) फेरबदल करण्यांत आला असेल तर तो कोणत्या नियमाने करण्यांत आला? |
| क) विकासकर्तांने मंजुर नकाशाचे उल्लंघन केले असेल तर अशा विकासकर्तावर आपण कोणती कार्यवाही करतो? |
| ड) मिरा भाईंदर महानगरपरलिका आरक्षित जागेच्या मंजूर नकरशाच्या अटीशर्तीचे उल्लंघन केल्याचे दिसून आल्यावर त्याच्यावर गुन्हा दाखल केलेला असताना आपण त्याच्या दुसऱ्या प्लॅनला मंजूरी देऊ शकतो का? |
| इ) आर.जी. आरक्षित जागेवर प्लॅन व्यतिरिक्त काम मंजूर करु शकतो का? मंजूर केलयास कोणतया अधिनियमाने करु शकतो? ह्याचा खुलासा करावा. |
| ई) मी दिलेल्या दि. १०/०५/२०१३ च्या पत्रान्वये मिरारोड (पूर्व) मधील कोणत्या आरक्षित आर.जी. जागा व मोकळी जागा (ओपन स्पेस) कोठे कोठे वापरण्यात आलेल्या आहेत त्याचा सविस्तर खुलासा करावा. |
| **३८ श्री. जुबेर इनामदार मा. सदस्य यांनी दि. १०/११/२०१४ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) मिरा भाईंदर महानगरपालिका मा. स्थायी समिती सभा दि. २१/०८/२०१४ प्रकरण क्र. ७४, ठराव क्र. ७१ अन्वये महानगरपालिका अधिकारी व प्रतिनियुक्तीवर असलेल्या अधिकाऱ्यांच्या कामकाजाबाबत विचार विनीमय करुन निर्णय घेणे या बहुमताने मंजूर झालेल्या ठरावाच्या अनुषंगाने महापालिकेने सदर विषयाबाबत काय कारवाई केलेली आहे? |

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

मा. महासभा सुचना क्रमांक ०८, दि.    /०३/२०१५ सोबतची विषय पत्रिका

सभा      वार दि.    /०३/२०१५


| प्र.क्र. | विषय |
|---|---|
| --- | **प्रश्नोत्तरे** – |
| --- | **मागील सभांचे इतिवृत्तांत** – |
| ६९ | दि. १५/११/२०१४, दि. २५/११/२०१४ (दि. १५/११/२०१४ रोजीची तहकूब सभा) रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे. |
| --- | **सर्व निवडणुका** – |
| ७० | मिरा भाईंदर महानगरपालिकेवर ५ व्या नामनिर्देशित पालिका सदस्याची नेमणूक करणेबाबत. |
| --- | **सर्व नियुक्त्या** - निरंक |
| --- | **मध्यप्रश्न (इंटरप्रिलेशन्स)** - निरंक |
| --- | **विनंती अर्ज** - निरंक |
| --- | **स्थायी, परिवहन व विशेष समित्यांचे ठराव** – निरंक |
| --- | **शिक्षण मंडळाची पत्रे** - निरंक |
| --- | **आयुक्तांकडील पत्रे व कामकाज** – |
| ७१ | मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील इमारतींना वापर परवाना देणेबाबत विशेष सवलत मोहिम राबविणेकरीता मंजूरी मिळणेबाबत. |
| ७२ | अपंग व्यक्तींना स्वयं रोजगारासाठी बँकेमार्फत आर्थिक मदत देणेबाबत. |
| ७३ | मिरा भाईंदर प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना गणवेश व शैक्षणिक साहित्य खरेदी करणेसाठी प्रशासकीय व आर्थिक मंजूरी मिळणेबाबत. |
| ७४ | टेंबा इस्पितळासाठी नियुक्त केलेल्या वैद्यकिय अधिकारी / कर्मचारी यांच्या नियुक्ती बाबत. |
| ७५ | श्री. स्वप्नील सावंत (सहा. आयुक्त) प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र. १ निलंबन कायम करणेबाबत. |
| ७६ | शहरातील पावसाळ्या पूर्वी कच्चे पक्के नाले सफाई करणे व इतर आरोग्य विभागाच्या कामास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत. |
| ७७ | मोबाईल टॉवर्सना अग्निशमन दलाचा नाहरकत दाखला देणेकामी फी ची आकारणी निश्चित करणेबाबत. |
| ७८ | वाहने वाहन चालकासह भाडे तत्वावर इंधनासह (संपूर्ण सेवा) ठेक्याने घेणेकामी निविदा मागविणेकरीता आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेबाबत. |
| ७९ | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मालमत्तांचे भाडे ठरविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव फेरसादर करणे. |
| ८० | छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर विविध ठिकाणी उड्डाणपुल बांधणे व पादचारी पुल बांधणेच्या सुधारीत खर्चास मान्यता देणेबाबत. |
| ८१ | भाईंदर (पूर्व) खारीगाव मासळी मार्केट इमारतीच्या जागेचा मोबदला देणेबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे. |
| ८२ | मौजे महाजनवाडी स.क्र. १०७/१पै,१०८/१,२,३/१०९/२३,२४,२७,२८,११०/५पै. या जागेमधील नागरी सुविधा क्षेत्राच्या भुखंडावर तरणतलाव व आर्ट गॅलरी बांधणे कामास मान्यता देणे. |
| ८३ | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत तयार करण्यात आलेल्या पर्जन्य जलवाहिन्या व रस्ते बांधणे कामाच्या सविस्तर प्रकल्प अहवालास मान्यता देणेबाबत. |
| ८४ | आ.क्र. ३२६अ टी. टर्मिनल विकसित करणेचे कामास प्रशासकीय व आर्थिक मंजूरी मिळणेबाबत. |
| ८५ | पाणीपट्टी दरात वाढ करणेबाबत. |
| ८६ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील आ.क्र. ९६ (खेळाचे मैदान) व आ.क्र. १९१ (प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान) या आरक्षणाचे करारनाम्याबाबत. (फेरसादर) |
| ८७ | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ३७ अन्वये फेरबदलाची कारवाई करणेबाबत. |
| --- | **शासनाकडील किंवा शासकीय अधिकाऱ्यांकडील पत्रे** – |
| --- | **समित्यांचे किंवा उप समित्यांचे अहवाल** – निरंक |

*महानगरपालिका सचिव कार्यालय,*
मिरा भाईंदर महानगरपालिका
दिनांक :-    मार्च २०१५

(हरेश ल. पाटील)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

E/Backup- 2/D/MD/Nagarsachiv/Vishaypatrika/Vishaypatrika-Mahasabha 12-17



मा. महासभा

दि. १५/११/२०१४

रोजीचे इतिवृत्तांत

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

**मा. महासभा दि. १५/११/२०१४**

आज शनिवार दि. १५/११/२०१४ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सकाळी ११.०० वाजता सभा सुचना क्र. ३ दि. ०३/११/२०१४ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचार विनिमय करणेकरिता महापालिका सभागृह, ३ रा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली भरली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | कॅटलीन ॲन्थोनी परेरा | महापौर |
| २) | सय्यद नुरजहाँ नझर हुसेन | उपमहापौर |
| ३) | शरद केशव पाटील | सभापती, स्थायी समिती |
| ४) | पाटील ध्रुवकिशोर मन्साराम | सभागृह नेता |
| ५) | मेहता नरेंद्र लालचंद | विरोधी पक्षनेता |
| ६) | सँन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | सदस्या |
| ७) | असेन्ला मेंडोन्सा परेरा | सदस्या |
| ८) | कोठारी सुमन रमेश | सदस्या |
| ९) | कांगणे यशवंत ठकाजी | सदस्य |
| १०) | सिंग मदन उदितनारायण | सदस्य |
| ११) | पाटील रोहिदास शंकर | सदस्य |
| १२) | म्हात्रे कल्पना महेश | सदस्या |
| १३) | निलम हरिश्चंद्र ढवण | गटनेता, शिवसेना |
| १४) | जाधव मोहन महादेव | सदस्य |
| १५) | पाटील सुनिता कैलास | सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| १६) | वेतोसकर राजेश शंकर | सदस्य |
| १७) | अरविंद दत्ताराम ठाकुर | गटनेता, महाराष्ट्र नवनिर्माण सेना |
| १८) | प्रभात प्रकाश पाटील | सदस्या |
| १९) | प्रेमनाथ गजानन पाटील | सदस्य |
| २०) | शर्मा सुनिला सत्येंद्र | सदस्या |
| २१) | मेहता डिंपल विनोद | सदस्या |
| २२) | जयंतीलाल गुरुनाथ पाटील | सदस्य |
| २३) | संध्या प्रफुल्ल पाटील | सदस्या |
| २४) | पाटील वंदना विकास | उप-सभापती, महिला व बालकल्याण समिती |
| २५) | प्रविण मोरेश्वर पाटील | सदस्य |
| २६) | घरत तारा विनायक | सदस्या |
| २७) | आमगावकर हरिश्चंद्र रामचंद्र | सदस्य |
| २८) | केळुसकर प्रशांत नारायण | सदस्य |
| २९) | भानुशाली वर्षा गिरीधर | सदस्या |
| ३०) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| ३१) | मुन्ना सिंग | गटनेता, अपक्ष |
| ३२) | रावल भगवती जयशंकर | सदस्या |
| ३३) | शाह राकेश रतिशचंद्र | सदस्य |
| ३४) | मेघना दिपक रावल | सदस्या |
| ३५) | जैन गिता भरत | सदस्या |
| ३६) | डॉ. जैन रमेश धरमचंद | सदस्य |
| ३७) | शुभांगी महिन कोटियन | सदस्या |
| ३८) | डॉ. राजेंद्र जैन | सदस्य |
| ३९) | बाबरा डॉनल्ड रॉड्रीक्स | सदस्या |
| ४०) | मेन्डोंसा स्टिवन जॉन | सदस्य |
| ४१) | प्रतिभा प्रकाश तांगडे-पाटील | सदस्या |
| ४२) | रॉड्रीक्स मॉरस जोसेफ | सदस्य |
| ४३) | ग्रिटा स्टिफन फॅरो | सदस्या |

| | | |
|---|---|---|
| ४४) | डॉ. आसिफ गुलाब शेख | सदस्य |
| ४५) | जयमाला किशोर पाटील | सदस्या |
| ४६) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| ४७) | डिमेलो बर्नड अल्बर्ट | गटनेता, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |
| ४८) | बगाजी शर्मिला विन्सन | सदस्या |
| ४९) | लियाकत ग. शेख | सदस्य |
| ५०) | परमार अनिता भरत | सदस्या |
| ५१) | पाटील प्रणाली संदिप | सदस्या |
| ५२) | रकवी सुहास माधवराव | सदस्य |
| ५३) | झिनत रऊफ कुरेशी | सदस्या |
| ५४) | खण्डेलवाल सुरेश | सदस्य |
| ५५) | पाटील नरेश तुकाराम | सदस्य |
| ५६) | शेख शबनम लियाकत | सदस्या |
| ५७) | सुजाता रविकांत शिंदे | सदस्या |
| ५८) | मोहम्मद फरिद सिद्दीक कुरेशी | सदस्य |
| ५९) | पुजारी कांचना शेखर | सदस्या |
| ६०) | काझी रशीदा जमील | सदस्या |
| ६१) | इनामदार जुबेर | गटनेता, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस |
| ६२) | शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम | सदस्य |
| ६३) | म्हात्रे सुर्यकांत खंडोजी | सदस्य |
| ६४) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |
| ६५) | शाह सिमा कमलेश | सदस्या |
| ६६) | कासोदरिया अश्विन श्यामजी | सदस्य |
| ६७) | डॉ. नयना मनोज वसानी | सदस्या |
| ६८) | जैन दिनेश तेजराज | सदस्य |
| ६९) | दळवी प्रशांत ज्ञानदेव | सदस्य |
| ७०) | विराणी रेखा अनिल | सदस्या |
| ७१) | सामंत प्रमोद जयराम | सदस्य |
| ७२) | अनिता जयवंत पाटील | सदस्या |
| ७३) | म्हात्रे परशुराम पद्माकर | सदस्य |
| ७४) | भोईर भावना राजू | सदस्या |
| ७५) | भोईर राजू यशवंत | सदस्य |
| ७६) | वेंचर गिल्बर्ट मेंन्डोंसा | सदस्य |
| ७७) | अरोरा दिपिका पंकज | सदस्या |
| ७८) | भावसार शिल्पा कमलेश | सदस्या |
| ७९) | वंदना रामदास चक्रे | सदस्या |
| ८०) | कमलेश यशवंत भोईर | सदस्य |
| ८१) | सुमबंड महरून्नीसा हारूनरशीद | सदस्या |
| ८२) | गावंड मंदाकिनी आत्माराम | सदस्या |
| ८३) | प्रभाकर पद्माकर म्हात्रे | सदस्य |
| ८४) | मीरादेवी रामलाल यादव | सदस्या |
| ८५) | अनिल बाबुराव भोसले | सदस्य |
| ८६) | दक्षता राजेंद्र ठाकूर | सदस्या |
| ८७) | भगवती शर्मा | नामनिर्देशित सदस्य |
| ८८) | दिनेश दगडू नलावडे | नामनिर्देशित सदस्य |
| ८९) | धनेश परशुराम पाटील | नामनिर्देशित सदस्य |
| ९०) | डॉ. सुशिल अग्रवाल | नामनिर्देशित सदस्य |

**गैरहजर सदस्य –**

| | | |
|---|---|---|
| १) | अशोक सुर्यदेव तिवारी | सदस्य |
| २) | संदिप मोहन पाटील | सदस्य |
| ३) | रविंद्र भिमदेव माळी | सदस्य |

**रजेचा अर्ज – निरंक**

| | | |
|---|---|---|
| १) | पिसाळ मनिषा नामदेव | सदस्या |
| २) | पांडे हंसूकुमार कमलकुमार | सदस्य |

३)    भट्ट दिप्ती शेखर    सदस्या

**मा. महापौर :-**

आजच्या सभेकरीता उपस्थित सर्व सन्मा.सदस्य, अधिकारी व पत्रकार बंधु यांचे स्वागत करीत आहे. आजची सभा ही खेळीमेळीच्या वातावरणात पार पाडावी ही विनंती. मा. सचिवांनी सभेला सुरुवात करावी.

**नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा शनिवार दि. १५/११/२०१४ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०३, दि. ०३/११/२०१४ रोजी सोबतच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. प्रश्नोत्तर तासाला सुरूवात होते. ११.२० मिनीटे झालेली आहेत. दिप्ती भट्ट ह्यांचा पहिला प्रश्न आहे. त्या गैरहजर आहेत. कोणाला परवानगी दिलेली आहे का? दुसरा प्रश्न डॉ.राजेंद्र जैन ह्यांचा प्रश्न आहे.

**राजेंद्र जैन :-**

मेहता साहब सभा के मा. सन्मा.सदस्य रहे हुए है। उन्होने विरोधी पक्षनेता पद से इस्तीफा दिया हुआ है.............

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो. सभेचे कामकाज चालू झालेले आहे. आपल्या सर्वांना आनंद आहे की महाराष्ट्रामध्ये नविन सरकार आलेले आहे. नविन सरकारबद्दल लोकांच्या विविध आशा आकांक्षा आहेत. भारतीय जनता पार्टीचे स्वबळावर आलेले हे सरकार ह्या सरकारामध्ये अत्यंत अभ्यासू जिज्ञासू लोकप्रिय सुशिक्षीत कार्यक्षम सक्षम असे मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीसची नियुक्ती झालेली आहे. त्यांच्या मंत्रीमंडळात अनुभवी म्हणून एकनाथजी खडसे, विनोदजी तावडे, विष्णू सावराजी, चंद्रकांत पाटील, विद्या ठाकूर, प्रकाश मेहताजी हे मंत्री म्हणून त्यांच्याकडे जबाबदारी दिलेली आहे.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सचिव साहेब, प्रश्नोत्तर तास सुरू झाला ना मग प्रश्नोत्तर तास संपल्यावर हे करा.

**रोहिदास पाटील :-**

अभिनंदन अगोदर असते. ह्याच्यावर चर्चा न होता अभिनंदन झालेले चांगले आहे. आम्ही अभिनंदनाचा ठराव मांडतो. तुम्हीही त्याला सहानुभूती द्यायला पाहिजे, अशी आमची अपेक्षा आहे. ह्याच्यात काही मागेपुढे झाले त्याला काही महत्व नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

काका अर्धा तासाची वेळ दिलेली आहे. वेळ संपला तर तुम्ही बोलणार आमचा प्रश्नोत्तर तास बाकी आहे.

**रोहिदास पाटील :-**

हे झाल्यावर चालू होईल ना. थांबायचे आहे. तुम्ही सांगाल तसे.

**मा. महापौर :-**

काका प्रश्नोत्तराचा तास चालु झालेला आहे. राजेंद्रजी उभे राहीले तर मला वाटल तेच बोलतात.

**शरद पाटील :-**

मा.महापौरांच्या परवानगीने बोलतो. नवनिर्वाचित झालेल्या आमदाराचा अभिनंदनाचा ठराव मांडत आहे.

**मा. महापौर :-**

तुम्ही उशिरा आले. प्रश्नोत्तराचा तास सुरू झालेला आहे. त्याच्यापूर्वी अभिनंदन होते ना. तास सुरू झालेले आहे. नंतर करा ना, तुम्हाला जो ठराव मांडायचा आहे तो नंतर मांडा.

**शरद पाटील :-**

दोन मिनीटात ठराव मांडतो.

**मा. महापौर :-**

प्रश्नोत्तराचा तास सुरू झाला आहे.

**शरद पाटील :-**

अभिनंदनाच्या ठरावानंतर प्रश्नोत्तराचा तास घेऊ शकता ना.

**मा. महापौर :-**

त्यांना टाईम कमी दिले जाईल.

**राजेंद्र जैन :-**

मॅडम चलेगा।

**शरद पाटील :-**

महाराष्ट्र राज्याच्या विधानसभेच्या झालेल्या सार्वत्रिक निवडणूकामध्ये भारतीय जनता पार्टीने मित्र पक्षांच्या सहाय्याने सर्वाधिक १२२ जागा जिंकलेल्या आहेत. तसेच मा. श्री. नरेंद्र मोदी व भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय श्री. अमित शहा यांच्या मार्गदर्शाने महाराष्ट्रामध्ये प्रथमच भारतीय जनता पार्टीचे सरकार

मा.देवेंद्र फाडवणीस, मुख्यमंत्री यांच्या नेतृत्वाखाली सरकार स्थापन करण्यात आली. त्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन हे सभागृह करीत आहे. तसेच आपल्या महानगरपालिकेतील सन्मा. नगरसेवक, विरोधी पक्षनेते श्री. नरेंद्र एल. मेहता हे १४५ विधानसभा मतदार संघातून ३३ हजार मताधिक्क्याने भारतीय जनता पार्टीमधून निवडून आल्याबद्दल हे सभागृह त्यांचे अभिनंदन करीत आहे. श्री. नरेंद्र एल. मेहता यांना या राजकिय प्रवासाकरीता सर्व सभागृहाकडून शुभेच्छा देण्यात येत आहे.

तसेच विद्यमान आमदार श्री. प्रताप सरनाईक हे पुनःश्च १४६ ओवळा-माजीवडा, विधानसभाम मतदार संघातून निवडून आल्याने त्याचप्रमाणे बहुजन विकास आघाडीचे लोकनेते मा. श्री.हितेंद्र ठाकूर निवडून आल्याने त्यांचे देखील हार्दिक अभिनंदन करण्यात येत आहे.

**सुमन कोठारी :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजूर.

**अभिनंदन ठराव क्र. ३० :-**

महाराष्ट्र राज्याच्या विधानसभेच्या झालेल्या सार्वत्रिक निवडणूकामध्ये भारतीय जनता पार्टीने मित्र पक्षांच्या सहाय्याने सर्वाधिक १२२ जागा जिंकलेल्या आहेत. तसेच मा. श्री. नरेंद्र मोदी व भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय श्री. अमित शहा यांच्या मार्गदर्शाने महाराष्ट्रामध्ये प्रथमच भारतीय जनता पार्टीचे सरकार मा.देवेंद्र फाडवणीस, मुख्यमंत्री यांच्या नेतृत्वाखाली सरकार स्थापन करण्यात आली. त्याबद्दल त्यांचे हार्दिक अभिनंदन हे सभागृह करीत आहे. तसेच आपल्या महानगरपालिकेतील सन्मा. नगरसेवक, विरोधी पक्षनेते श्री. नरेंद्र एल. मेहता हे १४५ विधानसभा मतदार संघातून ३३ हजार मताधिक्क्याने भारतीय जनता पार्टीमधून निवडून आल्याबद्दल हे सभागृह त्यांचे अभिनंदन करीत आहे. श्री. नरेंद्र एल. मेहता यांना या राजकिय प्रवासाकरीता सर्व सभागृहाकडून शुभेच्छा देण्यात येत आहे.

तसेच विद्यमान आमदार श्री. प्रताप सरनाईक हे पुनःश्च १४६ ओवळा-माजीवडा, विधानसभाम मतदार संघातून निवडून आल्याने त्याचप्रमाणे बहुजन विकास आघाडीचे लोकनेते मा. श्री.हितेंद्र ठाकूर निवडून आल्याने त्यांचे देखील हार्दिक अभिनंदन करण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. शरद पाटील** **अनुमोदन :- सौ. सुमन कोठारी**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रशांत दळवी :-**

महाराष्ट्र राज्याच्या विधानसभेच्या झालेल्या सार्वत्रिक निवडणूकांमध्ये शिवसेना पक्षप्रमुख मा. श्री. उध्दवजी ठाकरे साहेब यांच्या मार्गदर्शनाने महाराष्ट्रात शिवसेना पक्षाने स्वबळावर स्वतःचे ६३ आमदार निवडून आणले आहेत. त्याबदद्ल त्यांचे हार्दिक अभिनंदन हे सभागृह करीत आहे. तसेच ठाणे जिल्ह्याचे संपर्क प्रमुख मा. आमदार श्री. एकनाथजी शिंदे साहेब यांचे विधानसभेचे विरोधी पक्षनेते पदी नियुक्ती झाल्याबद्दल तसेच विद्यमान आमदार श्री. प्रतापजी सरनाईक हे पुनःश्च १४६ ओवळा- माजीवडा विधानसभा मतदार संघातून निवडून आल्याने त्यांना त्यांच्या राजकीय प्रवासाकरीता सर्व सभागृहाकडून शुभेच्छा देण्यात येत आहेत.

तसेच आपल्या महानगरपालिकेतील सन्मानीय नगरसेवक, विरोधी पक्षनेते श्री. नरेंद्र एल. मेहता हे १४५ मिरा भाईंदर विधानसभा मतदार संघातुन भारतीय जनता पार्टी तसेच मा. श्री. हितेंद्रजी ठाकूर हे बहुजन विकास आघाडी मधून निवडून आल्याबद्दल हे सभागृह त्यांचे अभिनंदन करीत आहे. तसेच त्यांच्या राजकीय प्रवासाकरीता सर्व सभागृहाकडून शुभेच्छा देवून त्यांचेही अभिनंदन करीत आहे.

**निलम ढवण :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजूर

**अभिनंदन ठराव क्र. ३१ :-**

महाराष्ट्र राज्याच्या विधानसभेच्या झालेल्या सार्वत्रिक निवडणूकांमध्ये शिवसेना पक्षप्रमुख मा. श्री. उध्दवजी ठाकरे साहेब यांच्या मार्गदर्शनाने महाराष्ट्रात शिवसेना पक्षाने स्वबळावर स्वतःचे ६३ आमदार निवडून आणले आहेत. त्याबदद्ल त्यांचे हार्दिक अभिनंदन हे सभागृह करीत आहे. तसेच ठाणे जिल्ह्याचे संपर्क प्रमुख मा. आमदार श्री. एकनाथजी शिंदे साहेब यांचे विधानसभेचे विरोधी पक्षनेते पदी नियुक्ती झाल्याबद्दल तसेच विद्यमान आमदार श्री. प्रतापजी सरनाईक हे पुनःश्च १४६ ओवळा- माजीवडा विधानसभा मतदार संघातून निवडून आल्याने त्यांना त्यांच्या राजकीय प्रवासाकरीता सर्व सभागृहाकडून शुभेच्छा देण्यात येत आहेत.

तसेच आपल्या महानगरपालिकेतील सन्मानीय नगरसेवक, विरोधी पक्षनेते श्री. नरेंद्र एल. मेहता हे १४५ मिरा भाईंदर विधानसभा मतदार संघातुन भारतीय जनता पार्टी तसेच मा. श्री. हितेंद्रजी ठाकूर हे बहुजन

विकास आघाडी मधून निवडून आल्याबद्दल हे सभागृह त्यांचे अभिनंदन करीत आहे. तसेच त्यांच्या राजकीय प्रवासाकरीता सर्व सभागृहाकडून शुभेच्छा देवून त्यांचेही अभिनंदन करीत आहे.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी        अनुमोदन :- सौ. निलम ढवण**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**जुबेर इनामदार :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका मधले नगरसेवक आज ह्या शहराचे आमदार निवडून आलेले आहेत. त्यांना काँग्रेस पक्षाच्या वतीने मी अभिनंदनाचा ठराव मांडत आहे. त्यांनी राज्यशासनाकडून ह्या शहरासाठी लाभदायक योजना आणाव्यात. ह्या शहराचे हितामध्ये त्यांनी चांगले काम करावे, विकासाच्या दृष्टीने त्यांनी चांगले काम करावे. ह्या शहराच्या विकाससाठी चांगली चळवळ चालवावी. माझा विश्वास आहे ते करतीलच. त्यांना मी माझ्या पक्षाच्या वतीने शुभेच्छा देतो व ते आमदार झाल्याबद्दल मी अभिनंदनाचा ठराव मांडत आहे.

**अशरफ शेख :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजूर.

**अभिनंदन ठराव क्र. ३२ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका मधले नगरसेवक आज ह्या शहराचे आमदार निवडून आलेले आहेत. त्यांना काँग्रेस पक्षाच्या वतीने मी अभिनंदनाचा ठराव मांडत आहे. त्यांनी राज्यशासनाकडून ह्या शहरासाठी लाभदायक योजना आणाव्यात. ह्या शहराचे हितामध्ये त्यांनी चांगले काम करावे, विकासाच्या दृष्टीने त्यांनी चांगले काम करावे. ह्या शहराच्या विकाससाठी चांगली चळवळ चालवावी. माझा विश्वास आहे ते करतीलच. त्यांना मी माझ्या पक्षाच्या वतीने शुभेच्छा देतो व ते आमदार झाल्याबद्दल मी अभिनंदनाचा ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. जुबेर इनामदार        अनुमोदन :- श्री. अशरफ शेख**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**डॉ. राजेंद्र जैन :-**

मा. महापौर मॅडम हमारे बीच मे से हमारे विरोधी पक्षनेता विधानसभा में विधायक बनकर गए है। हमे यहाँ जो उनका मनोबल मिलता था। और शहर के विकास के लिए उनको जो जानकारी थी। सभी नगरसेवको को उन्होने साथ दिया। विषयो की जानकारी दी। समाज के लिए अच्छा करने का सोचने की शिक्षा दी। उनके जाने से हमे दुःख होगा लेकिन आगे जाके अपने साथियो को आनंदित करे। मिरा भाईंदर के लिए अच्छी अच्छी योजना लाए और ऐसा काम करे की, उनसे सब प्रभावित हो ऐसी में शुभकामना करता हूँ।

**अनिल भोसले :-**

मा. महापौर मॅडम आपल्या परवानगीने बोलतो, आपल्या मधून सन्मा. सदस्य नरेंद्र मेहताजी आज महाराष्ट्र विधानसभेवर आमदार म्हणून गेले आहेत. नरेंद्र मेहताजी ह्यांनी आपल्या राजकीय कार्यकिर्दीमध्ये भाजपाच्या कार्यकर्त्यांना घेऊन नगरसेवकांना घेऊन आणि विरोधी पक्षनेता म्हणून या मिरा भाईंदर महानगरपालिकेमध्ये आपल्या सगळ्यांच्या सोबत चांगल्या खेळीमेळीच्या वातावरणात काम केलेले आहे. ह्या दोन वर्षामध्ये शहराच्या समस्येसाठी अनेक विषयासाठी त्यांनी खेळीमेळीच्या वातावरणात काम केलेले आहे आणि आज आमदार झाल्यानंतर ह्या शहराला नविन आमदार मिळाला ह्याचा देखील आनंद आहे. पण आमच्यामधून एक सदस्य कमी होणार आहे ह्याची आम्हाला खंत आहे. कारण विरोधी पक्षनेता असल्यामुळे बऱ्याच गोष्टी आम्हाला शिकायला मिळाल्या. ह्यापुढे ही मनपाचे सर्व सन्मा. सदस्य आमदारांना माझी विनंती आहे कारण आमदार झाल्यानंतर, महापौर झाल्यानंतर आमदार किंवा महापौर हा सर्व पक्षाचा असतो आपण आमदार झालेले आहात ह्याची जाणीव ठेवून विरोधी पक्ष सत्ता पक्ष ह्यांनी आपल्या पालिकेतील सर्व सदस्यांच्या समस्या आणि ह्या शहराच्या विकासासाठी आपण निश्चित काम कराल अशी आपल्याकडून सभागृहातील सर्व पक्षाचे सन्मा. सदस्य अपेक्षा करत आहेत आणि त्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी सहकार्य कराल. मिरा भाईंदर शहराच्या विकासाला गती देण्यासाठी आपण पूर्ण ताकदीने काम कराल अशा सर्व सदस्यांच्या वतीने मी आपल्याला विनंती करतो आणि आपल्या राजकीय भविष्याला शुभेच्छा देतो. धन्यवाद.

**गिता जैन :-**

महापौर मॅडम, तुमच्या परवानगीने बोलते बर वाटल तुम्ही अभिनंदन ठराव करायला वेळ दिला. पण आपण प्रथम शहराचे नागरिक म्हणून मला वाटते आपल्या सभागृहात एखाद्या सभ्य आमदार सारख्या पोस्टवर जातो तेव्हा आपण प्रथम नागरिक म्हणून त्यांचा सत्कार करावा अशी माझी विनंती आहे.

**मा. महापौर :-**

ह्याच्यापूर्वी इकडे आमदार मा. मुजफ्फरजी हुसैन झालेले, मा.गिल्बर्ट मेंन्डोसाजी झाले गेल्यावर्षी मुजफ्फर हुसैन झाले त्यांचा कोणी सत्कार केला नाही.

**गिता जैन :-**

ते सभागृहाचे सदस्य नव्हते.

**मा. महापौर :-**

सन्मा. मुजफ्फर हुसैन उपमहापौर होते.

**गिता जैन :-**

तेव्हा आपल्याकडून एक चूक झाली असेल. ती चूक परत करायची का?

**मा. महापौर :-**

तशी प्रथा इकडे नव्हती म्हणून मी पण नाही केले.

**राजेंद्र जैन :-**

मॅडम पहले गलती की होगी लेकीन इसका मतलब यह नहीं की गलती दोहराई जाए। हम गलती को सुधार भी सकते है।

**गिता जैन :-**

मॅडम आम्ही सगळे विनंती करतो.

***प्रशांत दळवी :-***

मा. महापौराच्या परवानगीने बोलतो, मा. नरेंद्र मेहताजी विरोधी पक्षनेते पदाचा राजीनामा दिला आहे. खरतर महानगरपालिकेच्या इतिहासात असा अभ्यासू आणि विचारवंत विरोधी पक्षनेता स्वतःची ह्या प्रशासनावर एक मोड बसविणारा विरोधी पक्षनेता ह्या सभागृहाला लाभला होता आणि म्हणूनच मिरा भाईंदरच्या विकासाच्या दृष्टीने जे त्यांनी परिश्रम घेतले आणि त्यातूनच त्यांची मिरा भाईंदर १४५ विधानसभेतून आज विधीमंडळ सदस्यामध्ये त्यांची निवड झाली. त्यांच्याविषयी फार अभिमान वाटतो. त्याचा ह्या सभागृहातील बुलंद आवाज आणि त्यांनी ज्या-ज्या प्रश्नावर अचूक विधान केली. ज्या वेळेला ह्या प्रशासनाला ज्या-ज्या अडचणी निर्माण झाल्या ह्या मिरा भाईंदर विकासासाठी त्याच्यावर मात करुन त्यांना योग्य ती भुमिका मांडण्याची व योग्य तो निर्णय घेण्यास भाग पाडले. विरोधी पक्षनेता म्हणून जी जबाबदारी त्यांनी ह्या ठिकाणी पार पाडली. तसेच त्यांनी विधी मंडळात जाऊन ह्या मिरा भाईंदरच्या नागरिकांच्या हिताचे प्रश्न तेथेही आपला ठसा उमटवावा अशा प्रकारे मी त्यांना शिवसेनेच्या वतीने शुभेच्छा देतो. व त्यांचे अभिनंदन करतो. धन्यवाद।

**नयना वसाणी :-**

मा. महापौराच्या परवानगीने बोलते, मॅडम आपल्यामधले मा. सदस्य, विरोधी पक्षनेता आदरणीय नरेंद्र मेहताजी आज आमदार म्हणून विधी मंडळात गेले आहेत. आपण ह्या शहराच्या प्रथम नागरिक आहात. जन सामान्यांच्या भावना आपल्याशी जोडल्या गेल्या आहेत. माझी अशी आपल्याला विनंती आहे की आपण आधीच्या प्रथांवर लक्ष न देता ह्या सभागृहाच्या सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन मोठेपण ठेवून जर आमदार साहेबांचे स्वागताला परवानगी दिली तर चांगले होईल.

**मा. महापौर :-**

तुम्ही खालती तिकडे स्वागत करु शकता. कारण मला तुम्ही काल कळवायला पाहिजे होते की, तुम्ही एवढे ह्याच्यानी येणार आहेत. मला काल किंवा आज सकाळी तरी कळवायला पाहिजे होते.

**राजेंद्र जैन :-**

मा. महापौर मॅडम, यह विषयपत्रिका का सवाल नहीं। यह भावनाओं का सवाल है।

**मा. महापौर :-**

विषयपत्रिका का नही सभागृह मेरे को भी मालूम है। कल कोई भी आके सबजन बोलेंगे हमारा सत्कार करो।

**गिता जैन :-**

मॅडम आप ऐसा कैसे बोल सकते है।

**मदन उदित नारायण सिंग :-**

मा. महापौर मॅडम, कोई भी और किसी भी का सवाल नहीं है। भावना का सवाल है। सम्मान का सवाल है।

**नयना वसाणी :-**

इसके पहले अपने सदस्य का सम्मान किया है। एम.एम.आर.डी.ए. से आए तो उनका सम्मान किया है।

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

सदन का नियम आपको मालूम है। तुम्ही माझ्यापेक्षा सिनिअर नगरसेवक आहात. तुम्ही गटनेते आहात, तुम्ही एक फोन किंवा एक लेटर तरी पाठवायला पाहिजे होते की, आम्हाला सत्कार करायचा आहे. मी अलाव्ह केले असते.

**अनिल भोसले :-**

मा. महापौर मॅडम, आपणाला आमच्या सर्व सदस्याकडून विनंती आहे. ह्या शहराच्या आपण प्रथम व्यक्ति आहात. आतापर्यंत बऱ्याच काही गोष्टी झाल्या आहेत. शहरामध्ये बऱ्याच घडामोडी झाल्या आहेत. आपणाला आमची कळकळीची विनंती आहे.

**मा. महापौर :-**

तुम्ही ह्या वेळेला निवडून आलेले सदस्य आहेत. तुम्हाला सदस्याचे माहित नाही मला सभागृहाचे किती माहित आहे. तुमच्या गटनेत्याच कर्तव्य होते की, मला फक्त एका शब्दांनी सांगायचे होते की, मॅडम आपल्याला असे करायचे आहे मी पण केले असते. आमच्या राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेसनी सगळ्यांनी केले असते.

**नयना वसाणी :-**

मॅडम आता कन्सीडर करायला काय हरकत आहे.

**अनिल भोसले :-**

मॅडम आम्ही सदस्य आहोत, आपण महापौर आहात. आपण या शहराच्या प्रमुख व्यक्ती आहात आपण परवानगी द्यावी अशी आमची विनंती आहे.

**मा. महापौर :-**

मी सभागृहाचा नियम तोडणार नाही.

**राजेंद्र जैन :-**

आप महासभा का अजेंडा भेजते है उसमें विषय से होते है।

**मा. महापौर :-**

आप यह सब मुझे मत बोलो नियम के हिसाब से लेते है।

(सभागृहात गोंधळ)

**नयना वसाणी :-**

इसके पहले भी हमने सदस्य का सम्मान किया है।

**मा. महापौर :-**

जब तक मुझे सचिव बोलते नही है, सचिव के पास लेटर नहीं जाता और सचिव मेरे पास आते नहीं तब तक हम करते नहीं। आप मुझे नियम मत सिखाओ। नियम के हिसाब से यह सभागृह चलाया।

(सभागृहात गोंधळ)

**नयना वसाणी :-**

आज हम मिलकर रिक्वेस्ट कर रहे है।

**शरद पाटील :-**

मा. महापौराच्या परवानगीने बोलतो. मॅडम आपण आपल्या जागी बरोबर आहात. सचिव साहेब आपण महापौराना सांगायला पाहिजे होते. नविन सदस्य येतात जेव्हा एम.एम.आर.डी.ए.चे सदस्य आले ठाणा कमिटीवर आले तेव्हा आपण इथे सत्कार केला ना. आपण महापौराना सांगायला पाहिजे होते. आपण तसे का नाही सांगितले.

**नगरसचिव :-**

सांगितले.

**मा. महापौर :-**

जेव्हा आम्ही एम.एम.आर.डी.ए. चे घेतलेले तेव्हा सन्मा. सदस्य बर्नड डिमेलोनी मला पत्र पाठवले. त्यांनी मला सांगितले तेव्हा आम्ही लियाकत शेख साहेबांचा सत्कार केलेला मला माहित आहे.

**शरद पाटील :-**

मॅडम ठिक आहे आम्ही मान्य करतो ना.

**मा. महापौर :-**

मला हे सांगू नका ह्याच कस केले त्याचे कसे केले. मी इथे कामकाज नियमानी केलेले आहे.

**शरद पाटील :-**

मॅडम सभागृहात एक न्याय व्हायला पाहिजे. दोन वेगवेगळे न्याय नाही व्हायला पाहिजे.

**मा. महापौर :-**

इथे दोन न्याय होतच नाही. मी सभागृहाचे नियम पाळत आहे.

**अनिल भोसले :-**

मॅडम आम्ही तुम्हाला रिक्वेस्ट करतो.

**भगवती शर्मा :-**

सदन में इसके पहले भी विधायक बने है। आप परवानगी लिजीए आगे स्वागत करेंगे महापौर मॅडमने मना कहाँ किया है।

**मा. महापौर :-**

कुछ प्रॉब्लेम नहीं है जो नियम है वो नियम है।

**अनिल भोसले :-**

हम महापौर को रिक्वेस्ट कर रहे है। हम उनसे विनंती कर रहे है। हम जिद नहीं कर रहे, हम विनंती कर रहे है। महापौर से विनंती करना हमारा हक है।

**भगवती शर्मा :-**

विनंती करने के बाद उन्होंने उत्तर दिया समय की क्यों बरबादी कर रहे है।

**अनिल भोसले :-**

मा. महापौर मॅडम, सदस्य म्हणून विनंती करण्याचा आमचा हक्क आहे की नाही.

**राजेंद्र जैन :-**

महापौर का कर्तव्य है ना।

**मा. महापौर :-**

महापौर का क्या कर्तव्य है। जब गिल्बर्ट मेंडोन्सा आमदार बने तब वो महापौर थे। तब आप की इस सदन में थे, उनका कर्तव्य नहीं था। किसी को कर्तव्य मत सिखाओ। आप नियम मत सिखाओ।

**अनिल भोसले :-**

मा. महापौर म्हणून आम्ही आपणाला विनंती करतो.

**भगवती शर्मा :-**

मॅडम प्रश्न तास सुरु करा.

**मा. महापौर :-**

प्रश्नोत्तराच्या तासात त्यांना बोलायचे नसेल तर तिथपर्यंत हे करा.

**राजू भोईर :-**

मा. महापौराच्या परवानगीने बोलतो, बहुजन विकास आघाडीचे लोकनेते मा. हितेंद्र ठाकूर साहेब हे देखील विधानसभेवर निवडून आले. त्यांचा मी अभिनंदनाचा ठराव सुचनेमध्ये घ्यावा अशी मी सुचना करतो.

**शरद पाटील :-**

आजची सभा दि. २५ नोव्हेंबर सकाळी ११.०० वाजेपर्यंत तहकुब करण्यात येत आहे, असा ठराव मी मांडत आहे.

**अनिल भोसले :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

सभा रद्द कशी होणार प्रश्नोत्तराचा तास आहे. तुम्हाला बसायचे नसेल तर तुम्ही बाहेर जाऊ शकता. रद्द कशी करणार. तुम्हाला अभिनंदनाचा ठराव मांडायला दिला तर त्याचे मतलब हे नाही की तुम्ही आता रद्दचा ठराव करणार.

**भगवती शर्मा :-**

सभेचे कामकाज सुरू झालेले आहे.

**मा. महापौर :-**

तुम्हाला नियम माहित आहे. अभिनंदन ठराव पहिला होते नंतर प्रश्नोत्तराचा तास होता.

**शरद पाटील :-**

सचिव साहेब तुम्ही नियम सांगा. रद्द करता येते की नाही.

**भगवती शर्मा :-**

मा.महापौर मॅडम, सभेचे कामकाज एकदा सुरू केलेले आहे. प्रश्न तास सुरू आहे. कसे करता येईल. सचिवांनी परवानगी घेऊन सभा सुरू केली आहे.

**प्रविण पाटील :-**

मा.महापौर मॅडम आपल्या परवानगीने बोलतो मिरा भाईंदर शहरामध्ये जसे नरेंद्र मेहता आमदार झाले. त्याचप्रमाणे प्रताप सरनाईक ही आमदार झाले आहेत. डायसवर बोलवून आमदाराचा सत्कार करायचा. मा.नरेंद्र मेहताचा सत्कार होत असेल तर मा.प्रताप सरनाईकांचाही सत्कार व्हायला पाहिजे. अशी माझी सभागृहाला विनंती आहे.

**मा. महापौर :-**

सभा रद्द होऊ शकते का? तुम्ही सांगा ना सभा रद्द होऊ शकत नाही.

**नगरसचिव :-**

सभागृहाने ठराव मांडलेला आहे. त्याच्यावर बहुमताने निर्णय घ्यावा.

**भगवती शर्मा :-**

सभेचे कामकाज एकदा सुरू झाले ना. मग ठराव कसा करता येईल. मध्ये ठराव होऊ शकत नाही.

**शरद पाटील :-**

ठराव होऊ शकतो का?

**नगरसचिव :-**

सभागृह जे ठरवेल तर ठराव होऊ शकतो. बहुमताने होतो ना.

(सभागृहात गोंधळ)

**भगवती शर्मा :-**

प्रश्न तास सुरू आहे ना.

**नगरसचिव :-**

सभा कामकाज चालू असतानाच ठराव होणार.

**डॉ.आसिफ शेख :-**

महापौरानंतर सचिवांना जास्त महत्व असते. तुम्ही नियमाला धरून बोला.

**भगवती शर्मा :-**

तुम्ही सांगितलेले ना सभा कामकाज सुरू आहे.

**नगरसचिव :-**

सभा कामकाज सुरू झाल्यावर ठराव होणार ना.

**भगवती शर्मा :-**

सभा कामकाज पहिले होणार की पहले ठराव होणार. प्रश्नतास सुरू आहे की नाही.

**नगरसचिव :-**

प्रश्नाचा तास सुरू झाला आहे. मा.महापौरांच्या परवानगीने कामकाज चालु आहे.

**भगवती शर्मा :-**

परवानगी दिली ना. मग प्रश्न तास थांबता येईल का?

**नगरसचिव :-**

सभा कामकाज थांबावायचा सर्व अधिकार महापौरांचा आहे.

**मा. महापौर :-**

प्रश्न तासामध्ये त्यांनी अभिनंदनाचा ठराव केला. ते मी मान्य केले. आता रद्द करायचे बोलतात. तुम्हांला निघायचे तर निघा. मी सभा रद्द करणार नाही.

**जुबेर इनामदार :-**

सचिव साहेब सभा बहुमताने तहकूब करता येते? रद्द करता येते का?

**नगरसचिव :-**

रद्द करता येते असेही कायद्यात नाही.

**जुबेर इनामदार :-**

रद्द करता येत नाही असे नसतांना तुम्ही करता येतो असाही ठराव आहे ना. सभा तहकूब करता येते हा नियम आहे.

**नगरसचिव :-**

सभा रद्द करण्याबाबत काही नाही.

**मा. महापौर :-**

सभा तहकूब होते. रद्द करूच शकत नाही. तुम्ही रद्द बोलले आहेत. तुम्हांला बसायचे नसेल तर तुम्ही जाऊ शकता. मी महासभा चालवणार आहे.

**शरद पाटील :-**

सचिव साहेब आम्ही ठराव मांडलेला आहे.

**मा. महापौर :-**

प्रश्नोत्तराचा तास आहे ना त्यांना बोलायचे नसेल तर लक्षवेधी घ्या.

**भगवती शर्मा :-**

सचिव साहेब आदेश कोण देणार.

**मा. महापौर :-**

महापौरांच्या आदेशाचे पालन करा.

**नगरसचिव :-**

वेळ होऊ द्या.

**राजेंद्र जैन :-**

सचिव महोदय, आप पहले साफ किजिए आप प्रस्ताव पे काम करेंगे या आप ठराव को मानेंगे। या नही मानेंगे। नही मानेंगे तो मेरा प्रश्नकाल बाकी है। आपको ठराव पे स्थिती स्पष्ट करनी पडेगी।

**मा. महापौर :-**

आपका प्रश्न तास जितना टाईम है हम वेट करेंगे बाद में मैं लक्षवेधी लुगी।

**दिनेश जैन :-**

मा. महापौर मॅडम आपने प्रश्न तास सुरू किया फिर अभिनंदन का ठराव देने के लिए परमिशन दिया तो प्रश्न तास का मतलब क्या रहा। मतलब आप नियम बदलते हो वह चलता है।

**मा. महापौर :-**

मैने नियम बदली नही किया। शरद पाटील साहब बोले दो मिनिट तो मैने उनको दो मिनिट का टाईम दिया है। मैने कुछ बदली नही किया। नही तो मैं उनको बोलती ना प्रश्नोत्तर स्टार्ट करो। आप मुझे नियम मत सिखाओ।

**नरेंद्र मेहता :-**

मा.महापौर मॅडम सन्मा सदस्य शरद पाटीलजी ह्यांनी अभिनंदनाचा ठराव मांडला. सभागृहाच्या अनेक सदस्यांनी शुभेच्छा दिल्या. मी सर्वप्रथम सर्व पक्षाचे मनःपूर्वक आभार व्यक्त करतो. सत्कार व्हावा नाही व्हावा ह्याच्यातली बाब नाही आहे. सन्मा. सदस्याची भावना जी होती ती भावना आपल्याकडे व्यक्त केली आहे. सत्कार करा नाही करा हा नंतरचा विषय आहे. सचिव साहेब सभा कामकाज नियमाप्रमाणे कुठलीही सभा कुठल्याही वेळी एखादा बहुसंख्य सदस्यांना वाटले तर रद्द करता येते आणि तहकूब करता येते. जिथपर्यंत ठरावावर निर्णय होत नाही तिथपर्यंत सचिव साहेब तुम्हांला पुढील कामकाज करता येत नाही. अशी कायद्यातील स्पष्ट तरतूद आहे. आपल्याला योग्य वाटेल तो निर्णय घ्या. पण सभेचे कामकाज ज्याप्रमाणे चालायला पाहिजे त्याचप्रमाणे चालायला पाहिजे. सदस्यांनी ठराव मांडलेला आहे. त्याच्यावर आपल्याला योग्य वाटेल तो निर्णय घ्यावा लागेल. त्यानंतरच पुढील सभेचे कामकाज चालू होईल. तिथपर्यंत सभेचे कामकाज चालू होऊ शकत नाही. ह्याची आपण दखल घ्यावी. पुन्हा एकदा सर्व सदस्यांचे मनःपूर्वक धन्यवाद करतो की आपण सर्वांनी शुभेच्छा दिली. नक्कीच आपल्याला आश्वासन देतो ह्या शहराच्या विकासासाठी दिवस रात्र एक करू. चांगल्या प्रकारच्या योजना ह्या शहरात आणू मोठ्या प्रमाणात विकास करण्याचा प्रयत्न करू. सचिवसाहेब आणि महापौरांनी निर्णय घ्यावा अथवा सचिवांनी खुलासा करावा.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

ठराव जो पर्यंत पास होत नाही तो पर्यंत प्रश्नोत्तराचा तास चालू होऊ शकत नाही.

**राजेंद्र जैन :-**

सचिव साहेब आपके इसी भ्रम निती के कारण से पहले भी आपके ऊपर आरोप लगे है। विक्रम कुमार के समय में आपको दिक्कत का सामना करना पडा यही कारण था। आप सही निर्णय क्यो नही ले पा रहे है। सचिव सभा चलाते है सचिव बोलेगे इस ठराव पर क्या निर्णय रहेगा। महापौर का अधिकार नही है। आप ठराव पर निर्णय दो।

**शरद पाटील :-**

मा. महापौर मॅडम आपण ठरावावर निर्णय द्या.

**मा. महापौर :-**

प्रश्नोत्तराची वेळ आता संपली निर्णय देते. विधी मॅडम तुम्ही सांगा की महासभा रद्द होते की तहकूब होते.

**भगवती शर्मा :-**

मा. महापौर मॅडम आपने महासभा का कामकाज शुरू करने का निर्देश सचिव साहब को दिया था। उसके बाद उन्होने पहला प्रश्नतास था उसका कामकाज चालू किया था। उसी बिच में आपसे परवानगी लेके इन्होने अभिनंदन ठराव के लिए आपसे रिक्वेस्ट किया था। उस समय आपने निवेदन किया था की यह सभा कामकाज का समय उसी प्रश्नतास में करेगा यह उन्होने मान्य किया। उसके बिच में दुसरा ठराव हो सकता है क्या?

**मा. महापौर :-**

महासभा रद्द होऊ शकत नाही. तहकूब होऊ शकते. असा नियम आहे. आणि हा जो ठराव आला आहे तो मी फेटाळत आहे.

**नरेंद्र मेहता :-**

सचिव मला सांगा ह्या सभागृहात आजपर्यंत एकही सभा बहुमताने रद्द झाली नाही का? आणि रद्द होऊ शकत नाही असे कुठे म्हटले आहे ते आम्हाला दाखवा.

**नगरसचिव :-**

मी माझा मघाशी खुलासा केला आहें.

**मा. महापौर :-**

लक्षवेधी वाचा.

**नरेंद्र मेहता :-**

सभा कामकाज नियमाप्रमाणे आम्ही ठराव मांडलेला आहे. त्या ठरावाच्या अनुषंगाने कारवाई झाली पाहिजे. मा.महापौर मॅडमनी सांगितले असेल तरी आपल्याला कायद्याचे पालन करायचे आहे. कायद्याच्या

पालन प्रमाणे असा ठराव फेटाळता येत नाही. बहुमताने फेटाळावा लागेल. महापौरांना ठराव फेटाळता येत नाही.

(सभागृहात गोंधळ)

**भगवती शर्मा :-**

सचिव महोदय चालू विषय में बिच मे ठराव हो सकता है क्या? ठराव हो सकता है की नही वह अलग बात है। पहले यह बताइए सभा के चालु कामकाज बीच में ठराव का प्रस्ताव हो सकता है क्या?

**नगरसचिव :-**

महापौर ने परमिशन दिया।

**भगवती शर्मा :-**

सचिव साहब मैने आपसे जानकारी मांगी है। सदन में विषय चालू रहने के समय बिच में ठराव हो सकता है क्या?

**नगरसचिव :-**

मा. महापौरांच्या परवानगीने ठराव होऊ शकतो.

**भगवती शर्मा :-**

परवानगी घेतल्या नंतर ना त्याच्या अगोदर नाही ना.

**नगरसचिव :-**

महापौरांनी परवानगी दिली.

**भगवती शर्मा :-**

सचिव साहेब तुम्ही सगळ्या गोष्टी सांगणार का? काय परवानगी दिली.

**नगरसचिव :-**

महापौरांनी परवानगी दिली.

**भगवती शर्मा :-**

त्यांना अभिनंदन ठराव करण्याकरीता परवानगी दिली होती.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

मी ह्या विषयासाठी परवानगी दिली नाही अभिनंदनासाठी परवानगी दिली अभिनंदनाचा ठराव स्विकारत आहे.

(सभागृहात गोंधळ)

**मा. महापौर :-**

तुम्ही लक्षवेधी वाचा.

**गिता जैन :-**

सचिव साहेब पहिला नियम सांगा.

**मा. महापौर :-**

तुम्ही अभिनंदनाची परवानगी मागितली मी दिली. तुम्ही ह्या ठरावासाठी मला काय बोलले.

**नरेंद्र मेहता :-**

ठरावासाठी परवानगी नसते. उभ राहून बोलण्यासाठी परवानगी असते.

**मा. महापौर :-**

मग कोणीही सदस्य उठून बोलेल सभा रद्द करा. मी ठराव देते. तुम्ही लक्षवेधी वाचा.

**गिता जैन :-**

सचिव साहेब तुम्ही कायद्याने चालवा.

**मा. महापौर :-**

मॅडम मी कायद्याने बोलत आहे. ठरावामध्ये करुच शकत नाही. त्यांनी अभिनंदनासाठी परवानगी मागितली. मी नियम वाचून बोलत आहे.

**जुबेर इनामदार :-**

सभा तहकुब होऊ शकते, रद्द होऊ शकत नाही.

(सभागृहात गोंधळ)

**बर्नड डिमेलो :-**

मा. महापौर मॅडम, आपले नवनिर्वाचित आमदार ह्यांचा सत्कार केला पाहिजे. पण भारतीय जनता पार्टीकडून काही छोट्याशा चूका झाल्या आहेत. त्या छोट्याशा चूकामुळे इथे सत्कार करता येत नाही. म्हणून आपण पुढच्या महासभेत मोठ्या जोमाने सत्कार करुया. फक्त सत्कार होत नाही म्हणून शहराची कामे बाजूला टाकायची हे काही बरे नाही. सन्मा. शरद पाटील साहेब आपण गटनेते ह्या नात्याने एक रितसर पत्र दिले असते तर सत्कार झाला असता पण आता सत्कार होत नाही. म्हणून शहराची कामे बाजूला टाकून असा लहानपणा दाखवू नका.

**गिता जैन :-**

बर्नड साहेब लहानपणा तुम्ही दाखवता.

**बर्नड डिमेलो :-**

दोन्ही आमदारांना बोलावून सत्कार करुया.

**गिता जैन :-**

मा. महापौरांनी आठवण करुन घ्यायची होती.

**सुहास रकवी :-**

मॅडम, नरेंद्र मेहताजी आताच म्हणाले की, अभिनंदनाचा ठराव झालेला आहे. अभिनंदन केले, सत्कार केला त्यांचा त्यांना काही कौतूक नाही. विषय असा आहे खूप महिन्यांनी सभा लागते, लोकांचे प्रश्न ह्या विषयानुसार मांडत असतो. लोकांना ह्या सभेची फार आवश्यकता लागते. त्यांचे सहा-सहा महिने विषय झालेले नाहीत. माझे भाजपाच्या सगळ्या नेत्यांना विनंती आहे की त्यांनी सुध्दा अभिनंदनाचा ठराव जसा आपले श्री. प्रताप सरनाईक सुध्दा निवडून आलेले आहेत. श्री. नरेंद्र मेहताजी आलेले आहेत. तर पुढच्या वेळेला ह्यांचा जाहिर सत्कार करुया आणि हे कामकाज सुरळीत चालू ठेवण्यास मदत करावी अशी मी भाजप सदस्यांना विनंती करतो आणि महापौरानी त्यांना सहकार्य करावे.

**नरेंद्र मेहता :-**

मी पहिल्यांदाच सांगितले माझा सत्कार व्हावा, नाही व्हावा हा विषयच नाही आहे. सत्कार केल्याने काय फार मोठा बदल होणार आहे. कारण नागरिकांनी जे ऐक्याने मतदान केले आहे त्याच्यापेक्षा अजून मोठा सत्कार काय होऊ शकतो. ते ऋण माझ्यावर आहेत. त्या सत्कारासाठी नाही पण विषय आहे सदस्यांनी जी भावना व्यक्त केली नियमाप्रमाणे सचिव साहेब एका लाईनमध्ये सभागृहाला स्पष्ट करा उभे रहायला परवानगी लागते ठराव कुठला मांडायची ह्याच्यासाठी परवानगी लागत नाही. बहुसंख्य सदस्यांना कधीही कुठल्याही प्रकारचे सभागृहामध्ये ठराव मांडता येईल रद्दचाही ठराव मांडता येईल. तहकुबीचा मांडता येईल की नाही ह्याच्यावर आपण स्पष्ट करावे. आपल्याला असे वाटत असेल रद्दचा मांडता येत नाही तर अशा प्रकारची स्पष्ट भुमिका द्या. नंतर आम्हाला काय निर्णय घ्यायचा तो आम्ही घेऊ. तुम्ही भुमिका स्पष्ट करा.

**गिता जैन :-**

मा. महापौर मॅडम, जब यह सवाल सचिवजी को पूछा जा रहा है, तो हर बार भगवतीजी क्यों खडे हो जाते है?

**भगवती शर्मा :-**

मैं परवानगी लेकर बात करना चाहता हूँ।

(सभागृहात गोंधळ)

**नगरसचिव :-**

सभागृहात सदस्यांना मा. महापौराच्या परवानगीने उभे रहायला लागते.

**मा. महापौर :-**

लक्षवेधी सुरु करा.

**राजेंद्र जैन :-**

सचिव साहेब मेरा प्रश्न अगली सभा में आएगा की नहीं आएगा क्योंकी यह स्थगित हुआ है।

**मा. महापौर :-**

नहीं आएगा।

**राजेंद्र जैन :-**

कैसे नहीं आएगा?

**मा. महापौर :-**

क्योंकी आप हजर हो और आपने किया नहीं।

**राजेंद्र जैन :-**

आपने मौका नहीं दिया।

**मा. महापौर :-**

यह प्रश्न अगले महासभा में नही आएगा। २८ नंबर नहीं आएगा, २९ नंबर आएगा।

**गिता जैन :-**

सचिव साहेब ठरावाचे काय झाले ते सांगा.

**नगरसचिव :-**

सभागृहात उभ राहायला महापौराची परवानगी घ्यायला लागते.

**नरेंद्र मेहता :-**

उभ रहायला ना ठराव मांडायला नाही ना. सन्मा. सदस्य शरद पाटील उभे राहूनच परवानगी घेऊनच ठराव मांडलेला आहे. काय ठराव मांडायचा तो सभागृहाचा निर्णय आहे.

**नगरसचिव :-**

कधीही कोणताही ठराव मांडता येतो.

**जुबेर इनादार :-**

आमदार महोदय विषयपत्रिकेवरील विषय खरोखरच महत्वाचे आहेत. सभेचे कामकाज हे व्यवस्थित चालले पाहिजे ह्या भूमिकेचे आम्ही आहोत.

**मा. महापौर :-**

तुमची पण वेळ संपेल.

**जुबेर इनामदार :-**

लक्षवेधीला वेळेची सिमा नसते.

**नरेंद्र मेहता :-**

सभा कामकाज नियमाप्रमाणे चालले पाहिजे. आता सरकार बदलले आहे.

(सभागृहात गोंधळ)

**नरेंद्र मेहता :-**

इकडे जरी नसले तरी तिकडे राष्ट्रवादी सोबत आहे.

**मा. महापौर :-**

इकडे पण राष्ट्रवादीला सोबत घेतले असते तर आम्ही सत्कार केला असता. एक वर्ड सांगायला पाहिजे होता की मॅडम आपल्याला करायचे आहे.

**भगवती शर्मा :-**

सदन की मानमर्यादा होती है धमकियो से सदन नहीं चलता है।

**दिनेश जैन :-**

यह धमकी नहीं इन्होंने बताया की, जो पहले गलत तरीके से चल रहा था वो नही चलेगा। अच्छी सरकार आयी है।

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर मॅडम एक महत्वाचा विषय प्रशासनासमोर शहरातला ज्वलंत विषय फक्त शहराचाच नाही.........

**नरेंद्र मेहता :-**

मॅडम हे सगळे प्रोसेडिंगला येणार. सन्मा. सचिव साहेब जोपर्यंत एक निर्णय होत नाही दुसरा तुम्ही घेणार कसे ते क्लिअर करा. ऑन रेकॉर्ड येणार कसे. एखादा ठराव सदस्यांनी मांडल्यावर त्याचा निर्णय आल्याशिवाय दुसरा तुम्ही स्विकारु शकतात का?

**भगवती शर्मा :-**

मा. महापौरांच्या परवानगी से आपने सभा कामकाज के नियमसे सभागृह को चलाया है।

**मा. महापौर :-**

इनको परमिशन दिया वह बहोत बडी गलती किया।

**जुबेर इनामदार :-**

हा शहराचा ज्वलंत विषय आहे. मिरा भाईंदरचाच नाही तर मुंबई आणि उपनगर.

(सभागृहात गोंधळ)

**राजेंद्र जैन :-**

कभी भी राज्य सरकार और केंद्र सरकार का अधिवेशन चल रहा हो और किसी बडे नेता की मृत्यु की खबर आए तो शोक प्रस्ताव आ सकता है। कौन बोला आ नही सकता है।

**मा. महापौर :-**

तुम्ही स्टार्ट करा.

**जुबेर इनामदार :-**

अशा आरडा ओरडामध्ये लक्षवेधी मांडली जाऊ शकत नाही. ठराव मांडला जाऊ शकतो. सन्मा.सदस्य आप मेरी लक्षवेधी के बिच में बात कर रहे है। यह नियम बाह्य है।

**राजेंद्र जैन :-**

हमारा ठराव है आप बिच में आ गए।

**मा. महापौर :-**

सभा का नियम ही इनको पता नही है। आप बैठ जाइए।

**जुबेर इनामदार :-**

त्यांना विषय समजायला पाहिजे. आमच्या घरामध्ये दिवे लावण्यासाठी लक्षवेधी आणली नाही. शहराचा ज्वलंत विषय आहे. सभागृह चाललेच पाहिजे.

**गिता जैन :-**

नियमसे चलिए।

**मा. महापौर :-**

नियम से ही चल रहा है।

**गिता जैन :-**

भगवतीजी इनको बार-बार सलाह देते हे।

**फरिद कुरेशी :-**

लक्षवेधी इम्पोटन्ट सब्जेक्ट है। ठराव मांडके सभा रद्द करने का किसी के जान का इंतजार करने का क्या यह लक्षवेधी चलनी चाहिए यह महत्व का विषय है।

**जुबेर इनामदार :-**

मुंबई आणि उपनगरामध्ये रोज आपण माध्यमामध्ये वाचतो. डेंग्यु, मलेरिया, चिकन गुनीया, हिवताप त्याच बरोबर क्षयरोग.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

कमिशनर साहेब आपल्याला माहित असेल आपण कधीही बहुमताने मिटींग तहकूब करू शकतो.

**मा. आयुक्त :-**

मघाशी हा प्रश्न उपस्थित झाला होता विधी अधिकाऱ्यांनी आपले स्वतःचे ओपिनीयन मघाशी दिलेले आहे. सभा तहकूब होते रद्द होऊ शकत नाही.

**मॉरस रॉड्रीक्स :-**

तहकूब होऊ शकते ना. रद्द होऊ शकत नाही, मग आम्ही बहुमताने तहकूबच करतो.

**मा. महापौर :-**

तहकूबसाठी काही रिझन पाहिजे.

**फरीद कुरेशी :-**

प्रत्येक १० मिनीटांनी नविन प्रस्ताव आणा.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम मा. आयुक्तांनी खुलासा केला. विधी मॅडमनी खुलासा करावा.

**मा. महापौर :-**

तुम्ही कमिश्नरकडे मागितले त्यांनी सांगितले. सचिवांनी सांगितले.

(सभागृहात गोंधळ)

**नरेंद्र मेहता :-**

आयुक्त महोदय आपण आता सांगितले विधी मॅडमनी मा.महापौरकडे खुलासा केला. आपण जरी सांगितले अशी रद्द करता येत नाही. आम्ही बॅकफुट होतो ना काही प्रॉब्लेम नाही. आपण क्लिअर तरी सांगावे. सभागृहाला असा अधिकार नाही.

**मा. आयुक्त :-**

सभा तहकूब होऊ शकते रद्द होऊ शकत नाही. हा अभिप्राय ह्यापूर्वीच मी दिलेला आहे.

**नरेंद्र मेहता :-**

बहुमताने रद्द होऊ शकते का? मला माहित आहे कोणत्या सभा ह्या पाच वर्षात रद्द झाल्या मी उद्या काढून दाखवतो.

**जुबेर इनामदार :-**

आता आपण अभिनंदनाचा ठराव मांडला. नविन आमदारांनी शहराच्या हितासाठी काम करावे. आम्ही देखील ठराव मांडला. आजच्या सभेसाठी बरेच विषय विषय पत्रिकेवर आहेज. ज्यांच्यामुळे शहराचा विकास होणार आहे. आपल्याला विकास हवा की नको.

**नरेंद्र मेहता :-**

मा. आयुक्त महोदयांनी क्लीयर करावे.

**मा. महापौर :-**

ते आता बोलले ना.

**नरेंद्र मेहता :-**

नाही बोलले. आयुक्त महोदय सभा बहुमताने रद्द होऊ शकते की नाही ह्याच्याबद्दल सांगा.

**मा. आयुक्त :-**

Any meeting may with the consunt of the major consiler present we adjust from time to time to a lator our on the same day or any other day but no business as transiseed and expet as iss here under provided ह्याचा अर्थ असा होतो, मिटींग रद्द होऊ शकत नाही तहकूब होऊ शकते.

**जुबेर इनामदार :-**

आरोग्याच्या लक्षवेधीच्या माध्यमातून मी प्रशासनाकडून काही आकडे प्राप्त केले होते. हे आकडे कितपत खरे आहेत मी सांगू शकत नाही. त्याच्यावर मी भाष्य करणार नाही. लक्षवेधीतून मी काही आरोपपत्र दाखल करत नाही. जे गरजेचे आहे ते केले पाहिजे. प्रशासनाला लोकप्रतिनीधीनी साथ द्यायला पाहिजे. *वारंवार प्रशासनाला आपण दोषी ठरवतो. काही असे विषय आहेत. ज्याच्यामध्ये लोकप्रतिनीधींना शहराच्या* लोकांनी त्यांना साथ द्यायला पाहिजे. एका ५ वर्षांचे आकडे मला प्राप्त झाले आहेत. मलेरिया २०१० मध्ये १२००, डेंग्यु ३७० मधले आकडे वाढत गेले. त्याच्यात क्षयरोग मनपाकडे अंदाजे आकडा ८०० होता. आपण डेंग्यु, मलेरिया बाकीच्या रोगावर बोलत असतो. क्षयरोग शहरामध्ये पसरत चालला आहे. त्यालाही कारण

आरोग्य किंवा त्याची साफसफाई शहरातली साफसफाई हे मुख्य कारण आहे. २०१४ ऑक्टोबर पर्यंत मलेरिया लागण झालेले ५५० त्यातून मृत्यु २, मनपा आरोग्य केंद्रात १७० मृत्यु १, डेंग्यु १५० मृत्यु ५ हे खाजगी मधले मनपा मधले १५ चिकन गुणिया लेप्टो हा एक प्रकार आहे. क्षयरोग मधले खाजगीमध्ये २४० आणि मनपामध्ये ७८० रूग्ण आढळले आहेत. कदाचित खाजगी रूग्णालयात क्षयरोगाचे आणि डेंग्युचे पेशन्ट रोज येत असतील किंवा त्यांचा मृत्यु होत असेल आणि पालिकेपर्यंत पोहोचत नसेल त्याच्यासाठी बरीच कारण असू शकतात. डेंग्युचा शोध १९५० मध्ये थायलँड आणि फिलीपाईन्समध्ये लागला. हा आजार ह्याच्या आधी नव्हता असे नाही हा आजार विश्वयुध्द २ मध्ये बरीच लोक मृत्युमुखी पडले. तेव्हा ह्याचा शोध सुरू झाला. १९६० मध्ये चेन्नईमध्ये ह्याचे रूग्ण आढळले. ह्याच्यामुळे लोक मृत्युमुखी पडले. त्याचप्रमाणे क्षयरोग ह्यालाही कारण तेच घाणीचे साम्राज्य साफसफाई होत नाही. होत नाही किंवा त्याला व्यवस्थित दिशा नसेल. मनपा अर्थसंकल्पामध्ये ५० कोटी एवढी तरतूद करतो. नाले सफाईसाठी वर्ष भरात दीड कोटी देतो. डास नियंत्रण हा एक वेगळाच भागच तयार केलेला आहे. डास नियंत्रणासाठी दीड कोटी त्याच्या औषधफवारणीसाठी खर्च करतो. हे सगळं करत असताना हा प्रकार वाढत का चालला आहे. आधी चार प्रभाग होते. आता ६ प्रभाग झाले. जेव्हा निविदा निघाल्या तेव्हा ४ प्रभाग अंतर्गत विभागणी झाली. कर्मचारी विभागणी झाली. त्याच वेळेला डास नियंत्रण हा वेगळा विभाग आम्ही तयार केला. त्या डास नियंत्रणामध्ये २४९ कर्मचारी दिले. आज मी काही माहिती उपलब्ध करून घेतली. जी माहिती घेतली त्याच्यामध्ये हा प्रकार कशामुळे त्याची माहिती प्रशासनाच्या माध्यमातून लागेलच. त्याच्यात फक्त ११७ कर्मचारी काम करतात. आपण मंजुर केले २४९ काम करतात. ११७ पूर्वी ४ प्रभाग होते आता ६ प्रभाग झाले आहेत. लोकसंख्या अंदाजे १२ लाखावर पोहोचली आहे. शहर वेगाने वाढत आहे. स्प्रेईंग, किटक नाशके फवारणी, धूर फवारणी, साफसफाई हा विषय अशा प्रकारे शहर वाढल्यानंतर कर्मचाऱ्याची पूर्तता नसली तर कसे शक्य होईल. ह्याला आटोक्यात कसे आणणार म्हणजे आपण प्रयत्न करू शकतो. लोकप्रतिनिधी वारंवार ह्या विषयावर तक्रार करतच असतात. या शहरामध्ये साफसफाई झाली पाहिजे. साफसफाई होत नाही ह्याला बरीच कारणे आहेत. आपण नगरभवनमध्ये चांगली कार्यशाळा घेतली होती. तेथे उपसचिव, आमदार साहेबही उपस्थित होते. ह्या कार्यशाळामध्ये प्रशासनाने नेहमीप्रमाणे एक उत्तर दिलेले आहे की, डेंग्युचे मच्छर स्वच्छ पाण्यामध्ये होतात. म्हणजे आम्ही आमच्यावर काय घेत नाही. तुम्ही तुमच्या घरामधल्या फ्रिज, ए.सी. तुमच्या घरामधल्या कुंड्या स्वच्छ पाण्यात होतात म्हणजे आमचे कर्तव्य संपले. ते तुम्ही कुठे आहेत. ते शोधा साहेब मला सांगा डेंग्युचा मच्छर पाण्यामध्ये काय प्रकट होतो का? त्याच्यामध्ये येऊन अंडी देतो. मच्छरची उत्पत्ती कुठून आहे ते महत्वाचे आहे. लोक बोलतात फिश टँकनी काहीच होत नाही. फिश टँकमुळे काही फरक पडत नाही. उत्पत्ती कुठून आहे. उघडे नाले, उघडे भूखंड ह्याच्यामध्ये पावसाचे पाणी साचलेले आहे. ह्या विषयावर आम्ही सुचना केली होती. अशाप्रकारे उघडे भूखंड किंवा उघडे नाले आहेत. त्याच्यामध्ये मच्छराची उत्पत्ती होते. त्याच्यावर काय उपाययोजना करू शकतो. ते महत्वाचे आहे. शहरामध्ये बरेच उघडे भूखंड आहेत. विकासक प्रस्ताव मांडेल तो इमारत बांधेल तोपर्यंत ५-५० लोकांचा त्या मच्छरामुळे बळी जातो. जे मालक आहेत त्यांच्याकडून आपण ओपन लॅन्ड टॅक्स वसूल करतो. किती पटीने वसूल होते मला माहित आहे. त्याचे आकडे माझ्याकडे उपलब्ध नाही. अशा उघड्या भूखंडावर पालिकेने कारवाई करावी. उघड्या भूखंडावर मातीचा भराव फुकट होऊ शकतो. आपल्याकडे माती टाकायला जागा नाही. माती टाकायला पैसे घेतात. आपल्याला भूखंड अॅव्हेलेबल करून दिला तरी पैसे घेतात. अशा भूखंडांना पालिकेने बंदीस्त करावे. पत्र लावावे बंद करा. कोट्यावधी रूपये ह्याच्यामागे खर्च करतो. मेन जो रूप क्लॉज आहे. त्याच्यावर दुर्लक्ष करतो. असा माझा आरोप आहे. हे आपल्याला केले पाहिजे बऱ्याच प्रमाणात फरक पडेल उघडे नाले जे आपल्या नगरोत्थान अंतर्गत करून घेतले आहेत आणि जे केले पाहिजेत उघड्या नाल्याचे नॅचरल जे कच्चे नाले आहेत जे नाले आम्ही पक्के बांधले आहेत त्याच्यावर स्लॅब नसला तरी पाण्याचा प्रवाह व्यवस्थीत असला तर पाणी थांबणार नाही आणि मच्छराची उत्पत्ती होणार नाही. शहरामध्ये मोठ्या प्रमाणात जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत भुयारी गटार योजनेचे काम चालू आहे. भुयारी गटाराचे काम होताना त्याच्यामध्ये ज्या चुका आहे त्या ठेकेदारांनी करायला पाहिजे पण ते करत नाही. खड्डे खणून ठेवतो त्याच्यात पाणी असतो. तो खड्डा तसा राहीला नाही पाहिजे. त्याच्यासाठी त्यांनी दक्षता घेतली एवढच नाही. तर आपल्याकडे प्रॉपर्टी कनेक्शन चालू आहे. ह्या सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो तुमच्याही प्रभागामध्ये प्रॉपर्टी कनेक्शनची काम होणार आहेत. होत असतील. प्रॉपर्टी कनेक्शन हा स्ट्रॉमोटर ड्रेनेज म्हणजे बिल्डींगच्या बाजूला असलेल्या नाल्याच्या खालून गेला पाहिजे. ह्याची दक्षता घ्या. त्या नाल्याच्या आतमध्ये आले तर पाण्याचा प्रवाह पावसामध्ये थांबेल किंवा दररोज वाहून नेणारा पाऊस थांबेल त्याच्यामध्ये देखील डासाची उत्पत्ती होऊ शकते. आज प्रशासनाचे कौतुक करू इच्छितो की ह्यावर्षी पावसाळ्यात कुठेही एक थेंब पाणी भरलं नाही. कारण आपल्याकडे नाल्याचे काम व्यवस्थीत झाले होते. तशा नाल्यामध्ये आपण अडथळा निर्माण केला तर ते पाण्याचा प्रवाह थांबेल आणि परत ह्या शहराला पुन्हा आरोग्याचा विषय निर्माण होईल. वाकोडे साहेबांनी त्याची दक्षता घ्यावी. व आरोग्य विभागांनी त्याचा पाठपुरावा करावा. डेंग्युच्या तापामुळे शरीराच्या व्हाईट पेशी कमी होतात. ५०,००० पेक्षा कमी झाल्या की त्याला बाहेरून व्हाईट पेशी चढवायला लागतात.

**राजेंद्र जैन :-**

यह गलत इन्फोमेशन है।

जास्तीत जास्त देण्याचा प्रयत्न करण्याकरिता आरोग्य विभागाला सुचना द्याव्यात आणि डेंग्युवर निराकारण करावे ही मी विनंती करतो.

**जुबेर इनामदार :-**

विषय आरोग्याचा म्हणून डेंग्यू आणि क्षयरोग. क्षयरोगावर जेवढे जमेल तेवढे बोलायचा प्रयत्न करतो. आरोग्यामुळे साफसफाईमुळे साचलेला कचरा ह्याच्यामुळे जे बॅक्टेरिया क्रिएट होतात त्याच्यामध्ये अशक्त लोक ज्याच्यामध्ये इम्यूयल सिस्टम कमी असतो त्यांना ह्याचा प्रभाव होतो त्यामुळे ते जास्त आजारी पडतात. साहेब त्याच्यामध्ये ९ ते १० महिने औषध घ्यावे लागते. बरेच पेशन्ट त्याच्यात डिप्रेशनमध्ये जातात. शहर स्वच्छ राहीले आपल्या माध्यमातून जे जास्तीत जास्त करता आले ते केल. शहर निरोगी राहीले तर त्याचे श्रेय प्रशासनालाच जाणार आहे. आपण ठेकेदार नेमले आहेत त्यांच्याकडून काम करूनच घ्यायची आहेत. अर्थ संकल्यामध्ये कुठे जास्त पैसा देत असू तर तो आरोग्याला देतो. त्याला कारण एकच आहे की शहर स्वच्छ दिसावे. सकाळी उठल्यावर आमचा मतदार जेव्हा खाली उतरतो तो सर्व प्रथम हेच बघतो की रस्त्यावर कचरा किती आहे. शहरामध्ये घाण किती आहे. आमचा मतदार ह्या शहराचा करदाता आहे. त्याचा आम्हाला तोच एक प्रश्न असतो की आम्ही तुम्हाला कर देऊन सुध्दा शहर स्वच्छ का नाही. माझी लक्षवेधी ह्या सभागृहात मांडलेली आहे. ह्याच्यात बरेच प्रश्न मी उपस्थित केले आहेत. कर्मचाऱ्याचा विषय स्पष्ट होत नाही की २४९ कर्मचारी दिले होते त्याचे ११७ का झाले. आरोग्य विभागाची अशी कोणती अडचण आहे की त्यांनी ही संख्या कमी केली. शहरामधला हा आरोग्याचा ज्वलंत विषय असतांना असे बदल का घडवण्यात आले. त्याबद्दल निवेदन करावे अशी ही विनंती करतो आमचे सन्मा.सदस्य फरीद कुरेशी त्यांनी एस.आय.च्या एक्झाम दिल्या आहेत त्यांच्या सुचना ऐकून घ्याव्या.

**मा. महापौर :-**

मा. सन्मा. सदस्य रकवी साहेबांनी सांगितले की फॉगींग चालू करायचे ते आपण चालू करणार मी त्यांना आदेश दिलेला आहे.

**फरीद कुरेशी :-**

इस लक्षवेधी के माध्यम से जुबेर इनामदारांनी अपने सारे विषय रखे। बिमारीयों के कारण और किस तरह कि बिमारी शहर में पसर रही है यह सारी बाते रखी। मैं आप सबका ध्यान आकर्षित करना चाहता हूँ हमारा मेन मकसद यह है की मच्छर मारना मच्छर से जितनी बिमारी होती है उसपे कंट्रोल लाना। स्टेट गव्हरमेन्ट, सेट्रल गव्हरमेन्टकी कुछ गाईड लाईन्स है, इसके उपर वल्ड हेल्थ ऑर्गोनायझेशनके गाईड लाईन्स है बहोत अच्छा मेथड है। नॅशनल व्हेक्टर बॉम डिसीस कंट्रोल प्रोग्रॅम है। त्या विषयावर पानपट्टे साहेब तुम्हाला माहित असेल. इंडोर रेसिडीअल स्प्रेइंग सिस्टम आहे. ह्या पध्दतीने आपल्याला भरपूर काम करता येतात. २४९ स्टाफ आहे. हा स्टाफ यूट्रीलाईज आहे. मच्छरचे रिप्रोडक्शनचे टाईम असायला पाहिजे. मे स्पेसिफिक बोलके चलता हूँ आयदर इट हॅज टू बी रिप्रोडक्टीव्ह टाईम सुबह है या ज्यादा दीन के वक्त में फैल रहा है। श्याम के वक्त में फैल रहा है उस टाईम हमारी कारवाई नही होती है। उसके लिए हम लोगो ने यह प्रोग्राम को जो नॅशनल व्हेक्टर बॉन डिझीस प्रोग्राम है इन्डोर रेसिडेन्स प्रोग्राम है उसको लेना जरुरी है। मा. महापौर मॅडम फॉगीग करने से इसपे असर होगा यह जरुरी नहीं है। अनेक किसम की किटाणूओं की बिमारी है, मच्छरो की बिमारीया है। घर पे आज डेंग्यू पहुचा है लेकिन इसके पहले डायरिया से लेके ऐसे और सारी चिजे घरो पे है। हम प्रोग्राम कर सकते है। इन्डोर रेसिडेन्स प्रोग्राम पे काम करना शुरु किया। पानपट्टे साहब हम लोग हमारे स्टाफ को कितना एम.एल. स्प्रे करने के लिए दवाई देते है। उसमें कितना बडा झोन कव्हर किया जा सकता है। यह एक महत्व का विषय है। मेरा ऐसा कहना है जो स्प्रेईंग का मेथड है इसको और ज्यादा इफेक्टीव करने के लिए २-३ शिफ्ट में स्प्रेईंग का सिस्टम बढाया तो इस वजह से ज्यादा तर इस्क्रोनिक बिमारी के जडतक पहुँच पाऐंगे। ओपन प्लॉट की जगह है जहाँ पे गंदगी हो रही है इसपे हम कारवाई करके हम टाऊन प्लानिंग के मार्फत ॲडीशनल जो भी लिंक चढा के हमारे लेंथ चढाके आज नहीं तो कल मनपा के पास वो परमिशन के लिए आनेवाला है। आज वो व्यावसायिक के लिए आने वाला है। आज वो व्यावसायिक मिल नही रहा है तो वहाँ पे मच्छरो की पैदावार होने के लिए उसको आजादी दे दी है। इस तरह से काम करेंगे तो प्रॉब्लेम सॉल्व्ह होनेवाला नहीं है। जो स्प्रेईंग टेम्पो है उसकी अप्रोक्सीमेट लागत ९ लाख रु. आती है। आज हम शहर के लिए करोडो रु. खर्च कर रहे है। शहर के दुसरे प्रोजेक्ट वे अगर एक प्रभाग समिति के हिसाब से दो टेम्पो दिया गया आप ३ शिफ्ट में उसपे काम कर सकोगे आप पुरे झोन मे दोन वॉर्ड तीन वॉर्ड एकसाथ में उसपे कॉन्सट्रेट करके उसपे कारवाई करके मच्छरो को कंट्रोल में लाया जा सकता है। आज एक टेम्पो सुबह में जाके मारके आता है। दवाई खत्म हो गई शाम को पता नही अगला काम अगले विक में आएगा। साहब इस तरीके का हालत रहा तो आप उसके क्लॉनिक प्रॉब्लेम पे कैसे पहोच पायेगे। हमारे लिए बजेट बढाना जरूरी है। देढ करोड इज नॉट सफिशियन्ट हर प्रभाग के हिसाब से दो टेम्पो का प्रोव्हिजन किया तो शहर के लिए बहोत बडी लागत नही है। इससे आप बेसीक प्रॉब्लेम तक जा सकोगे। आपके शहर में मस्केटो कंट्रोलिंग ऑफिसर आपके शहर में है वह पुरे मिरा भाईंदर क्षेत्रो को अटेन्ड नही कर सकता। पानपट्टे साहब हर प्रभाग ऑफिस में एक असिस्टंट सॅनिटरी इन्स्पेक्टर होता है। उसके हाथ के निचे एम.पी.डब्ल्यु होते है। हमारा बजेट थोडा बढेगा लेकिन मेरे को ऐसा नही लगता उसका महासभा में विरोध होगा। रिझन यह है की यह शहर मच्छरों का शहर था। यहाँ पर दलदली थी। यहाँ पर जंगल था।

जिसमे रहने के लिए हम आए है। डेंग्यु, मलेरिया हुआ और हमने प्रोग्राम लिया मारा ऐसा नही है। हम लोगो को बारीकीसे देखना पडेगा। हम लोगो को ॲन्युअल लेव्हल बेसीस पे हमको कारवाई करनी होगी। तभी ही जाकर होगा। मेडीसीन ग्रॅन्डेड नही आ रही। कम कॉन्टेटी में आ रही है। आप आपके आदमी को ३०० एमएल देते हो उसका स्प्रे करके दो घंटे में खतम होता है वह घर पे जाता है। उसके पास ऑप्शन नही। साहब उस चीजों के लिए मेरा आप लोगो से अनुरोध है आप उसको बजेटींग किजिए। अगले महासभा में लाईए सको ताके बढाने के कोशिश किजीए। इस पॅटर्न से आप काम करोगे तो मच्छर से फैलने वाले दुसरे किटानुसे फैलनेवाले इन्डोर स्प्रेईंगसे जो इफेक्टिव्ह नेस आएगा तो घरो के अंदर जो बिमारीया है उसपे काफी हदतक कंट्रोल कर सकते है।

**दिनेश नलावडे :-**

मा. महापौर मॅडम कॉंग्रेस पक्षाचे गटनेते जुबेर इनामदार ह्यांनी आरोग्यविषयी चांगला विषय ह्याठिकाणी आणला आहे. आमच्या नवघर रोडवरती विभागामध्ये आम्हांला डेंग्युचे ५-६ पेशंन्ट मिळाले त्याच्यानंतर आम्ही अधिकाऱ्यांना घेऊन गेलो सोसायटीमध्ये पाण्याचे ड्रम खुले करून पाहिले ५०-५० अळ्या आम्हाला बिसलेरी बाटल्यांमध्ये मिळाल्या. आम्ही त्या बॉटलला होल करून आमच्या जनसंपर्क कार्यालयात ठेवली आणि ६ दिवसांमध्ये त्या अळ्याचे मच्छर तयार झाले. ते उडु लागले आम्ही त्या बॉटल नागरीकांना कार्यालयामध्ये दाखवत होतो. साहेब मी आपल्याला सुचना करू इच्छितो की, मुंबईमध्ये महाराष्ट्रामध्ये आणि खास करून मिरा भाईंदरमध्ये डेंग्युच्या पेशन्टमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ झाली आहे. मिरा भाईंदर शहराचे आरोग्याचे एस.आय, प्रभाग अधिकारी ह्यांना बोलवून त्या वॉर्डमधली घाण दाखवत असतो. आमच्या बाजूला एक सोसायटी आहे त्या सोसायटीच्या खाली ड्रेनेजच्या टाक्या फुटल्या आहेत. पाणी १२ महिने बाहेर असते. आम्ही एस.आय. ला बोललो ह्या सोसायटीला नोटीस द्या. पण २-३ महिने झाले नोटीस गेली नाही. आम्ही प्रभाग अधिकाऱ्यांना बोलावतो. लाखे साहेब आम्ही ह्या ठिकाणी ३-४ वेळेला ठराव घेतले कुठल्या रस्त्यावर मच्छीवाले बसतात. पण एकाही प्रभाग अधिकाऱ्याने त्याच्यावर कारवाई केली नाही. साहेब आरोग्याकडे लक्ष दिलेच पाहिजे. परंतू खास करून आम्हाला इकडे लक्ष दिले पाहिजे की ज्या-ज्या सोसायटीमध्ये आमचे अधिकारी, कर्मचारी वॉर्डातले नगरसेवक नागरीक घेऊन प्रत्येक ५-६ बिल्डींगमध्ये जाऊन त्यांचे पाणी चेक करणे आवश्यक आहे. ज्याच्या घरामध्ये अळ्या मिळतील त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे. महापौर मॅडम ह्यांच्यावर लक्ष देऊन सगळ्यांच्या मिटींग घेऊन ह्याची मोहिम घरोघरी राबवली. सर्वांच्या घरी जाता येणार नाही. पण ३-४ घरामध्ये गेलो तर नागरीकांवर परिणाम होईल ह्याच्यावर लक्ष द्यावे ही विनंती.

**अनिल भोसले :-**

मा. महापौराच्या परवानगीने बोलतो २-३ दिवसांपूर्वी मनपाने नगरभवनमध्ये कार्यशाळा लावली होती. कार्यशाळेमध्ये आपले बरेच सदस्य उपस्थित होते. ह्या ठिकाणी सदस्यांनी अशी मागणी केली आणि अनेकांच्या तक्रारी होत्या. मच्छरांवर नियंत्रण करणारे जे अधिकारी आहेत ते अधिकारी असे आहेत की त्यांना आज फोन केला तर डेंग्यूचा पेशन्ट मरेपर्यंत ते घरी पोहोचत नाहीत. माझ्या वॉर्डमध्ये मनाली व्हिलेज ह्या सोसायटीमध्ये एक व्यक्ती एक्सपायर झाली त्याठिकाणी औषध फवारणी करण्यासाठी अनेक वेळा विनंती केली. ते फोनच उचलत नाही ही सत्यपरिस्थिती आहे. साईकृपा कॉम्पलेक्समध्ये डेंग्यूचा पेशन्ट आढळला म्हणून कालपासून फोन करतात ते सिरियस नाहीत. मॅडम ह्या शहरात डेंग्यू आणि मलेरियाने जी लोक मेली आहेत त्याच्या मी घरी जाऊन आलो. आयुक्त साहेब त्यांची परिस्थिती अशी आहे ह्या शहरामध्ये मिडल क्लासची बरीच लोक आहेत. जुबेर इनामदार चांगला विषय ह्या महासभेत घेऊन आले. त्यांना मी धन्यवाद देतो. ज्या कुटुंबाचा कमावता माणूस मरतो तेव्हा त्याच्या घरची परिस्थिती अशी होते की मुलांना एकतर शिक्षणापासून वंचित राहायला लागते आणि त्या महिलेला भांडी घासायची वेळ येते. ह्या सदनामध्ये सर्व सदस्य आहेत ज्याची गरीबीची परिस्थिती आहे. ज्या महिलेचा नवरा जोपर्यंत जिवंत आहे तोपर्यंत नातेवाईक मित्र सगळे त्यांच्याबरोबर असतात पण एखाद्याचे घर बिघडल तर त्यांच्याबरोबर कोणी नसते. ह्या शहरातली जी लोक डेंग्यूने एक्सपायर झाली आहेत त्यांना मनपाने नुकसान भरपाई द्यावी अशी माझी मागणी आहे. अन्यथा ज्या अधिकाऱ्यांच्या लापरवाईमुळे लोक मेली आहेत. त्या अधिकाऱ्यावर ३०४ प्रमाणे गुन्हा दाखल व्हावा अशी माझी मागणी आहे. अनेकांची घर उध्वस्थ झाली आहेत. राठोड जे अधिकारी आहेत ह्यांची जबाबदारी पानपट्टे साहेबांनी घ्यावी किंवा राठोडनी जबाबदारी घ्यावी ह्याच्या लापरवाईमुळे अनेक लोक डेंग्यूने बळी गेले आहेत. मला खुलासा करावा की ह्याची जबाबदारी कोण घेणार? मला उत्तर द्या मी बसणार नाही. माझ्या वॉर्डात दोन लोकांचा बळी गेला आहे मी खाली बसणार नाही. एक पेशन्ट ॲडमीट आहे. दोन बळी गेले आहेत. त्याच्या शाळेची फी भरायची परिस्थिती नाही ह्याला जबाबदार कोण. चेना, दाचकुल पाडा, मिनाक्षी नगर, ग्रिन व्हिलेज, जनता नगर एवढा मोठा परिसर आहे. माझा एवढा मोठा वॉर्ड आहे त्याच्यासाठी दोनच माणस आहेत. मॅडम आज जर फवारणी केली तर ८ दिवस तिकडे कोण पोहचत नाही. एवढा मोठा झापेडपट्टीचा परिसर आहे. दोनच कर्मचारी आहे. कमिशनर साहेब कर्मचारी वाढवून द्या. डेंग्यू हा आजचा विषय नाही. डेंग्यू मलेरीया हा विषयासाठी आरोग्य डिपार्टमेंट सिरियस नाही. मा. महापौर मॅडम माझी विनंती आहे. अशा बेजबाबदार अधिकाऱ्यांवर ३०४ प्रमाणे गुन्हा दाखल व्हावा अशी माझी विनंती आहे.

**सुहास रकवी :-**

मा. महापौर मॅडम, मी सांगू इच्छितो की, डेंग्यूचे थैमान मिरा भाईंदरमध्ये सगळीकडे आहे. नागरिकांनी देखील काळजी घ्यायची आहे. प्रशासनावर ढकलून फायदा नाही. आर्युवेदिक उपाय म्हणून पपईची जी पान असतात त्यांचा ज्यूस घेतल्याने प्लेटलेट्स डबल होतात. आयुक्त साहेब ड्रममधील जे पाणी असते ते ओतण्यासाठी अधिकाऱ्यांना अधिकार द्यावे. कारण जे एम.पी.डब्ल्यू आले ते म्हणतात लारवा दिसला तर पाणी खाली ओतायचे नाही. त्याच्यासाठी त्यांना अधिकार द्यावे अशी विनंती करतो.

**निलम ढवण :-**

मा. महापौर मॅडम आपल्या परवानगीने बोलतो, डेंग्यू ही अत्यंत गंभीर समस्या आहे. त्याच्यावर उपाय योजना मनपामध्ये चालू आहेत. लोकांकडून जनजागृती झाली तर प्रत्येक घराघरातून त्यांना ह्या गोष्टीची जनजागृती होण गरजेचे आहे. कारण मागच्यावेळी आम्ही एम.पी.डब्ल्यू घेऊन वॉर्डात कॅम्प लावला होता. त्यावेळी घरोघरी जाऊन त्याची कल्पना लोकांना दिली होती. त्यामुळे आमच्या वॉर्डात डेंग्यूची एकही घटना घडली नव्हती परंतु ह्या वर्षी घरोघरी एम.पी.डब्ल्यू न गेल्यामुळे ह्यावर्षी बरेच रुग्ण आमच्या प्रभागात आढळून आले. त्यानुसार एम.पी.डब्ल्यूनी जाऊन तिथे चौकशी केली. आणि त्यानुसार तिथले पाणी आणि त्याच्या घरात असलेले डेंग्यूचे अळी नष्ट केले. घरामध्ये ड्रममध्ये साठलेले पाणी जे ओतावे लागते. नवघर पट्टयाला पाण्याचा मोठा प्रश्न आहे त्यामुळे लोक ते पाणी ओतून दयायला तयार नसतात त्यामुळे त्यांना रिलेटेड जे जे विषय आहेत रस्त्यामधले खड्डे पाण्याची समस्या हे जेव्हा दूर होईल तेव्हा त्या विषयाकडे लक्ष देणे फार गरजेचे आहे. त्याचप्रमाणे औषध फवारणी साठी टेम्पोची कमतरता असल्याचे आपल्याला दिसून येते. प्रभाग निधी, नगरसेवक निधी वापरून अशा गाडया घेण्यात याव्या असे प्रस्ताव ह्यापूर्वी दिले होते. ह्यापूढे देखील आमच्या निधीमधून सुविधा करून द्यावी आणि लोकांना औषध फवारणीमध्ये जास्त समाधान वाटते . आपण सांगितल्याप्रमाणे ह्यापूढे औषध फवारणी देखील होणार आहे ती देखील जास्तीत जास्त प्रमाणात करावी घरोघरी पाहणी करण्यासाठी एम.पी. डब्लू वाढवून ती मोहिम राबवावी ह्याच्यामूळे डेग्यूवर नियंत्रण ठेवता येईल अशी मी आपणास सर्वांना विनंती करते.

**मर्लिन डिसा :-**

मॅडम. तुमच्या परवानगीने माझ्या वॉर्डात देखील लहान मूल डेग्यूंचे शिकार झाले होते. दे वर हॉस्पीटलाईज दोन तीन ठिकाणी आणि मी प्रत्यक्ष पाणपट्टे साहेबांना येवून भेटली. शिंदे साहेबांना सांगितले मेसेज पाठवले पण मि. राठोड मला मिळाले नाहीत. ३-४ वेळा सांगितल्यानंतर तिकडे स्प्रेईग केले. आणि सोसायटीच्या लोकांना जाऊन आपण भेटलो फार दुर्लक्ष होत आहे त्यांना मी रिक्वेस्ट केली की शाळेच्या मुलांना खूप प्रोजेक्ट वर्क असते ६,७,८,९ वी च्या मुलांना प्रोजेक्ट दिले तर पेरेन्टस पण शिकतात त्यांना मी बोलवल होत . तुम्ही या मला भेटा सीडी द्या शाळेमध्ये आपण दाखवू या. मुलांना एज्यूकेट करू या मुलांन एज्यूकेट केले म्हणजे घरोघरी नॉलेज पोहोचते. परंतू आजपर्यत तो राठोड भेटायला आला नाही. आय ॲम रिक्वेस्टिंग इन टाईम इन अगेन बट ही इज ऑलवेज निग्लेटींग.

**फरीद कुरेशी :-**

यह विषय पे निलम मॅडमने भी बताया की नगरसेवक निधी या प्रभाग निधी का इस्तेमाल होना चाहिए। हमारे ट्री प्लान्टेशन की जब मिटींग थी उसमे हमारा एक अभ्यास दौरा था उसमे काफी पैसे थे १५-१६ लाख का अभ्यास दौरा था। हमने एक मत से डिसाईड किया था की हमारा जो अभ्यास दौरे का पैसा है उसपे टेम्पो खरीदी किया जाए चार महिने वो ट्री प्लान्टेशन के इस्तेमाल मे आ सकता है। बचे आठ महिने हमारे आरोग्य डिपार्टमेन्ट या बाकी चिजो मे काम आयेगा तो फंड का जो शॉटेज है वह खतम हो जाएगा।

**मा. महापौर :-**

यह वृक्ष प्राधिकरण का विषय नही है।

**फरीद कुरेशी :-**

हमने यह फंड दिया है ऐसा ठराव प्राप्त करके प्रोसेस में डाला था। तो आपको ऐसा अनुरोध है की इसका इस्तेमाल किजिए। दुसरा यह है की, व्यक्ती विशेष या ऑफिसर मिलने न मिलने से डेंग्यू, मलेरिया फैल रहा है ऐसा इश्यू नही है। इट इज इन औन होल्ड सायकल एक डिपार्टमेन्टल सायकल पूरा होंना चाहिए। यह पूरा नही होगा कोई एक इन्डीव्हयूजवल आदमी उसके उपर पूरी तरहसे कारवाई करके १०० मेम्बर को सॅटीसफाईड नही कर पाऐगा।

**दिपीका अरोरा :-**

मॅडम, फॉगीग के लिए आपने भी बहोत बार प्रशासनसे आग्रह किया है। की शूरू किया जाए पर क्यू शुरु नही किया यह पता नही है। प्रायव्हेट सोसायटीने फॉगीग अपने आप शूरू किया है। अगर यह अन हायजेनिक है या सेहत के लिए खराब है या मच्छरो को नही मारना चाहते तो उन्हे भी रोका जाए। बहोत सारे प्रायव्हेट सोसायटी है जिन्होने अपने आप यह स्टेप लिया है। प्रायव्हेट सिलींडर खरीदी करके उनका वॉचमन शाम को मारते है। यह चल रहा है। व्हेन एव्हरीबडी कॅन डू इट क्यू प्रशासन यह स्टेप नही उठाना चाहता।

**शिल्पा भावसार :-**

मा. महापौर मॅडम, आपल्या परवानगीने माझ्या वॉर्डातपण तसाच डेंग्यूचा प्रकार झालेला आहे. चंद्रेश ॲकॉर्ड कॉम्पलेक्समध्ये डेंग्यूचे ३० पेशंन्ट आहेत त्याच्यात १७ वर्षाचा मुलगा ह्या आजाराने मेलेला आहे. चंद्रेश मध्ये घाण पाण्यात ते अंडे सापडले होते. मी सगळयांना फोन केलेला स्टॅन्डिग कमिटीची मिटींग पण होती त्यावेळेस साफसफाई कमिटीची त्यांची ड्यूटी नसताना देखील त्यांनी मला योग्य सहकार्य दिले त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करते. परंतु राठोड साहेबांनी कधीच कोणाला रिप्लाय दिलेला नाही. कधीच कोणाचे फोन उचलत नाही. कमिशनर साहेब आपणांस नम्र विनंती आहे की, आपली कोणतीही कमिटी असू द्या. जेव्हा नगरसेवक कर्मचाऱ्याला किंवा अधिकाऱ्याला फोन करतो तेव्हा त्यांनी फोन उचलायला पाहिजे. जर ते बिझी असतील तर त्यांनी नंतर रिप्लाय द्यायला पाहिजे. कारण आमच्या बरोबर २००-३०० माणस असतात त्यांना आम्ही काय उत्तर द्यायचे. नगरसेवकांना प्रतिउत्तर लगेच मिळायला पाहिजे. कारण नगरसेवक जनप्रतिनिधी असतो त्यांना योग्य उत्तरासाठी त्याच वेळेला मार्गदर्शन पाहिजे असते. म्हणून आपणास विनंती.

**जुबेर इनामदार :-**

पानपट्टे साहेब घरामध्ये जाऊन स्प्रेईंग करण्याची पध्दत ठेवली आहे. ते कर्मचारी जाऊन स्प्रे करतात. घरामध्ये छोटे बाळ जन्माला आला असेल तर अशा घरात करणे योग्य आहे का? त्याचे उत्तर द्या.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम ह्या ज्वलंत विषयावर ही लक्षवेधी असून सगळी लोक आपली मत मांडत आहेत. डेंग्यूचा विषय ज्या दिवसापासून सुरु झाला नागरिकाना, नगरसेवकांनी आणि प्रशासनानी काय करण माझा असा प्रश्न आहे की एवढी चर्चा झाल्यावर आणखी चर्चा व्हायला पाहिजे असे काही नाही. मनपानी, प्रशासनाने त्याच्यावर हाय अर्लट किंवा आपत्कालीन व्यवस्था युध्दपातळीवर काम करणे अशी आपली काही रचना झाली आहे की आपण फक्त पोस्टर्स लावली आपण दरवाज्यावर चिकटवले. शहरातले हे नक्की कारण आहे की अनेक ठिकाणी अशी गटार आहेत की, त्याठिकाणी पाणी हलतच नाही. पाण्याचा प्रवाह कुठे आहे तो कोणाला दिसतच नाही. पाणी पुर्वेला जाते की पश्चिमेला जाते. ती गटार ३-४ फूट भरलेली आहेत. त्याच्यावर आपत्कालीन व्यवस्था म्हणून मा. आयुक्तांनी त्यांना काय निर्देश दिले का? ही परिस्थिती पानपट्टे साहेबांच्या लक्षात नाही असे नाही. त्यांनी खुलासा करणे गरजेचे आहे. ह्या ठिकाणी ह्या दिवशी कार्यशाळा झाली कार्यशाळेत तुम्ही निवेदन केले. अनेकांना समजले त्याप्रमाणे वागण्याचा प्रयत्न केला. गैरहजर होते त्यांनीही तो प्रयत्न केला. प्रशासनानी काय केले दोन वर्ष स्टॅंडिंगमध्ये फॉगींग मशीनचा आग्रह धरुन सुध्दा एकमेव व्यक्ति पानपट्टे साहेब त्याला एकही कारण देत नव्हते. टेक्नीकल मेडिकल कोणतेही कारण देत नव्हते. काही सांगत नव्हते. फॉगींग मशिन नाही पाहिजे. अन्य मनपामध्ये फॉगींग मशिन वापरल्या जातात ते चूक आहे की बरोबर आहे. त्याचे उत्तर देत नव्हते ते आता तयार झाले. ते टेक्नीकली मेडीकल तयार झाले की आमचे प्रेशर आहे म्हणून जर अन्य मनपा वापरते हे जर असते तर अन्य मनपापेक्षा आपल्याकडे प्रमाण कमी राहिले असते. आपल्याकडे इंडस्ट्रीयल एरिया आहे त्यातून वेगवेगळी केमीकल बाहेर पडतात. त्याचे कुठेही डिस्पोझल नाही. आता जर आयुक्त साहेबांनी सांगितले की तुमच्या वॉर्डमध्ये आदेश देतो जमिनिच्या लेवललाच गटर भरलेल असेल तर जमिनित पूर्ण पाणी भरलेल आहे. कागद फेकल तरी कागद चिकटून राहते. जर ते गटर तीन फूट खाली असेल तर जमिनितल पाणी निघून जाते. जमिन ड्राय राहील पडलेल पाणी मुरुन जाईल. पण हे पाणी मूरतच नाही. कामगार वर्ग जो हात-पाय धुतो, बाहेर पाणी पडते, गटार तुंबते, पाणी जमिनित जातच नाही, मच्छर कुठे मारणार तुम्ही. मा. आयुक्त साहेब, आता एक-दोन मच्छर नाही. मोठमोठी चावतात ही तर आहेतच. आपण संध्याकाळी बाहेर पडा, तुम्ही कोणत्याही एरियात जा. ज्या एरियात जाल त्या एरियात तुमच्या डोक्यावर मच्छर फिरताना दिसेल ही मच्छर कुठून आले. डेंग्यू ही एक जात वेगळी आहे. त्याच्यामध्ये अनेक मच्छर असतील पण ह्याकडे आपण इमरजन्सी म्हणून बघत नसाल आणि आमच्या सारख्या अनेक नगरसेवकांनी पोटतिडकीने विषय मांडला तरी काय उपयोग होणार नाही. मा. आयुक्त साहेब तुम्ही पानपट्टे साहेबांना निर्देश द्यायला पाहिजेत. आम्हाला आनंद आहे चांगले काम केले तर धन्यवाद देतो. साहेब आज तुम्हाला देखील धन्यवाद दिले. पानपट्टे साहेबांना देतो. आम्हाला पूर्वेला अग्निशमन दल पाहिजे होते ते काल चालू झाले. कारखानदारानी, नागरिकांनी, दुकानदारांनी धन्यवाद दिले. धन्यवादाला पात्र होण्यासाठी काम तर दाखवायला पाहिजे. आज जर सांगितले की ते गटार ८ दिवसात साफ करतो. आमचाच नाही तर ७ वॉर्ड त्याच्यावर डिपेंड आहेत. दिनेश नलावडे, प्रेमनाथ पाटील मी आहे, शरद पाटील, मुन्ना सिंग, यशवंत कांगणे, मदन सिंग सगळे त्याच्यावर डिपेंड आहेत. तिकडची गटार साफ होत नाही. कॉलेज समोरचे गटर ५ फूट भरलेल होत. आताही ३-४ फूट भरलेले आहे. गटर साफ झाले तर मच्छर कुठून तयार होईल. पाण्याला करंट असेल तर मच्छर तयार होत नाही. उघडे असले तर मच्छर तयार होत नाही. आपण सगळे गटर बंद करत चालले आहोत. त्याला औषध फवारणी होत नाही. आम्ही कितीही बोललो तरी तुमची मानसिकता तुमचे निवेदन तयार करा. नियोजन करा की युध्दपातळीवर आपल्याला हे काम करायचे आहे. चेना ते उत्तन तिकडे विषय वेगळे आहेत खाडी किनारी मच्छर येतेच. खाडी किनारीची काय व्यवस्था आहे. मासळी कुजणारच त्याच्यावर काय व्यवस्था आहे. असे स्पॉट ठरवायला पाहिजे आणि औषध फवारणीची कारवाई व्हायला पाहिजे.

[illegible]

**सुमन कोठारी :-**

सभी सन्मा. सदस्य ने मच्छर पे बोला है। जैसल पार्क चौपाटी और जैसल पार्क प्रभाग में इतने मच्छर है। औषध फवारणी का समय सुबह ८ से १२ रखा है। लेकिन शाम के समय मच्छर निकलते है। मैंने बहोत बार पत्रव्यवहार किया की धुवा फवारणी आप नहीं कर सकते तो कमसे कम औषध फवारणी का समय बदलीए ताकी जिस समय मच्छर बाहर निकले उस समय दवा फवारणी हो। लेकिन उसके उपर कभी ध्यान नहीं दिया गया। चौपाटी शाम को इतना मच्छर होता है की, सारी कम्पलेंट हमारे पास आती है।

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौराच्या परवानगीने बोलतो सभागृहामध्ये सर्वांनी डेंग्यूवर भरपूर चर्चा केली. राठोड साहेबांना घेऊन आम्ही आमच्या वॉर्डमध्ये फवारणी केली. पाण्याचे ड्रम रिकामे केले. मला मॅडम असे विचारायचे आहे की, एकात्मिक डास नियंत्रण अधिकारी आपल्याकडे किती आहेत. ९४ नगरसेवकांकडे एक माणूस जाऊ शकतो का? माझी अशी विनंती आहे की डास नियंत्रण अधिकारी एक आहे आणि मागणी करणारे ९४ नगरसेवक आहेत. माझी अशी विनंती आहे ६ प्रभाग आहेत तर ६ डास नियंत्रण अधिकारी ठेवायला पाहिजे.

**शिल्पा भावसार :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलू इच्छिते, डेंग्यूचा विषय जसा ज्वलंत आहे तसेच मिरा भाईंदर शहरात काल एक हादसा झाला सेव्हन इलेवन शाळेच्या बाजूला एक नाला आहे. त्या नाल्यात साफसफाई करताना निबांळकर म्हणून एक मूलगा आतमध्ये लोखंडाचे जे सामान आहे ते चोरुन विकून ते त्यांचे घर चालवतात. तो चार दिवस आधी खाली गेला होता. चार दिवसानंतर त्याची बॉडी काढण्यात आली त्याची नोंद घ्यावी.

**दिनेश जैन :-**

मा. महापौर मॅडम, पिछले टाईम एक विषय आया था की, टेम्पो कितने है। मिरारोड प्रभाग ५ में २ टेम्पो आने के लिए २-४ महिने पहले सभा में परमिशन दिया था। अभी तक एक भी टेम्पो आया नही। मैंने राठोड से पूछा तो वो बोला की, टेम्पो अभी तक आया नहीं। आएगा तब देखेंगे। मेरा ऐसा कहना है की, जैसे वृक्ष समिती है अपने वृक्ष के लिए करते है की वृक्ष समिती उसकी देखरेख करे। वृक्ष जादा लगे। बालकल्याण समिती है बालकल्याण समिती इसके लिए रखी है की महिला और बच्चों का कल्याण हो स्वास्थ अच्छा रहेगा तो सब होगा मेरा लक्षवेधी में एक सुचना है। मिरा भाईंदर में वरिष्ठ नागरिक या सन्मा. नागरिको का आरोग्य के लिए एक समिती बनाए जाए। यह विषय बार-बार महासभा में नही आएगा। समिती इसके उपर नियंत्रण रख सके। यह सभी के स्वास्थ से जूडा विषय है। उसमे जो मिरा भाईंदर के सन्मा. व्यक्ति है नगरपालिका के सदस्य है वह एक समिती बनाकर उसपे नियंत्रण रखेंगे तो काफी हद तक वह पानपट्टे साहब के कॉन्टॅक्ट में रहेंगे और आरोग्य के बारे में कुछ अच्छा कर सकते है। महासभा में विषय आता है तो सभी नगरसेवक आधा एक घंटा बोलते है पानपट्टे साहब एक कान से सूनते है दुसरे कानसे निकाल देते है। वो भी क्या करेंगे उनके पास एकही राठोड है। ऐसे ४-५ राठोड मिरा भाईंदर में मिलेंगे तो यह डेंग्यू मलेरिया का खात्मा होगा। आज ऐसा एक भी प्रभाग नही की उसके प्रभाग में डेंग्यू की मौत ना हुई हो।

**अनिल भोसले :-**

मा. महापौर मॅडम, अनेक वर्षापासून मनपामध्ये हेच अधिकारी हेच कर्मचारी काम करतात. माझी लक्षवेधीत सूचना आहे की, हे अधिकारी सिरियस नाहीत हे आपल्या लक्षात आले आहे. अधिकाऱ्यांची बदली करा. अधिकाऱ्यांवर कुठे दबाव असायला पाहिजे. ह्याच्यात बदल झाला की शहरात बदल होईल.

**मर्लिन डिसा :-**

मॅडम रेल्वे स्टेशन पण खूप मच्छरांनी भरलेले आहे. तिकडे दोन मिनिट पण थांबू शकत नाही. रिक्वेस्ट टू सी वॉट कॅन बी डन देर. आपल्या पालिकेने चांगली सीडी काढली आहे. राठोडनी मला दाखवली. प्लीस यूज दॅट फॉर अॅट लिस्ट इज्यूकेटींग स्कूल स्टूडंट्स अॅन्ड वन मोर सजेशन निम ट्री बेस्ट पेस्टीसाईड्स, नॅचरल पेस्टीसाईड. वी कूल्ड प्लान्ट मॅक्झीमम निम ट्रीज व्हेनएवर पॉसिबल.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मा. महापौराच्या परवानगीने बोलतो जुबेर इनामदारांनी लक्षवेधी उपस्थित केलेली आहे. बऱ्याच सदस्यांनी त्याच्यावर सुचना केल्या आहेत. त्याचे मी उत्तर देतो. मिरा भाईंदर महानगरपालिके मध्ये एकूण २५० कर्मचारी होते. त्यापैकी १३० कर्मचारी नाले सफाईला छोटी गटार आहेत. त्यासाठी वापरतो. १२० कर्मचारी प्रत्येक वॉर्डमध्ये आपण टाईम टेबल बनवले आहे. ४७ वॉर्डमध्ये आपण २-२ कर्मचारी नेमणूक केले आहेत. त्याचे रजिस्टर केले आहे. रजिस्टरमध्ये तो कोणत्या गल्लीत गेला आहे कुठले गटर साफ केले आहे. संबंधित पदाधिकाऱ्याच्या सह्या पण आहेत.

**जुबेर इनामदार :-**

विषय राहील म्हणून मला मध्ये उठावं लागले.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

२५० कर्मचाऱ्यांपैकी १३० तिकडे घेतले १२० फवारणीसाठी आहेत.

**जुबेर इनामदार :-**

डास निर्मुलनासाठी २५० कर्मचारी नेमलेले.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

गटार साफ केले तर डास उत्पत्ती होत नाही.

**जुबेर इनामदार :-**

त्याच्यासाठी आपण नाले सफाई, सफाई कामगार.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मोठे नाले ते वर्षातून एकदाच करतो.

**रोहिदास पाटील :-**

ते वर्षातून दोनदा करा ना.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

साहेब पैसे लागतात.

**अनिल भोसले :-**

मॅडम ह्यांचे कंट्रोल नाही आहे. औषध फवारणीला जातात त्यांच्यावर ह्यांचे काही कंट्रोल नाही.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

४७ वॉर्डचे आपल्याकडे रजिस्टर आहेत.

**जुबेर इनामदार :-**

पानपट्टे साहेब ज्याचा इष्टांक आपण ठरवलेला होता की नालेसफाईला किती लोक लागतील, रस्ते सफाईसाठी किती त्याचप्रमाणे पूर्ण टेंडर आणि ठेका काढण्यात आलेला आहे. हे कर्मचारी तुम्हाला फक्त स्प्रेईंगसाठी, डास निर्मुलनासाठी दिलेले होते. त्या कर्मचाऱ्यांना त्या कामासाठी वर्ग का केले.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

अशा टोटल साफसफाईला साडेचार हजार कर्मचारी लागतील. त्यावेळी तेवढे बजेट होते. त्या बजेटनुसार फवारणीला किती गटाराला किती आणि दैनंदिन साफसफाईला किती त्याचे वर्गीकरण केले त्यानुसार आपल्याकडे कर्मचारी आहेत. १५०० कर्मचारी आहेत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

१२० आणि १३० आहे. १२० कशाला आणि १३० कशाला आहेत.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

१२० दैनंदिन फवारणी आणि १३० गटारासाठी.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

तुम्ही चुकीचे बोलता की १३० कर्मचारी पालिकेमध्ये गटर साफ करतच नाही.

(सभागृहात गोंधळ)

**ध्रुवकिशोर पाटील :-**

माझी सभागृहाला विनंती आहे की, प्रशासन मिस गाईड करते. साहेब पहिले तुम्ही बोला मग तुमच्या चूका सांगतो.

**राजेंद्र जैन :-**

पानपट्टे साहेब मैं पाटील साहब के बात का समर्थन करता हूँ। ३-४ महिने पहले मैने इन्स्ट्रक्शन दिए थे। मच्छर का जो भी आदमी साईन करता है मेरे पास लाके मेरे साईन कराए। इन्होंने ६ दिन तक कारवाई शुरु रखी। ७ वे दिन से कायम कर दी। वापिस कमिशनर ने मिटींग लिया तभी उन्होने मेरे से साईन कराया। बिच में मुकादम को पूछाँ कहाँ था साहब यह हो गया आदमी आया नहीं। याने की आपकी योजना सहीं है। आपकी दवाई जा रहीं है, आपके आदमी जा रहे है। आपके तरफ से कामकाज ठिक चल रहा है। लेकिन काम ठीक से कर रहा है यह आपको किधर मालूम पडता है। तो आने नगरसेवक के पास साईन करने का रसीद चेक करने का ....................

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

अपना रजिस्टर है।

**राजेंद्र जैन :-**

मैंने मुकादम से पूछा मेरा साईन क्यों नही है। तो उसने कहाँ गलती हो गया राठोड को पूछाँ राठोड भी रजिस्टर नहीं देख रहा है। जो काम चेकींग का होना चाहिए वो किसीको मालूम नहीं पड रहा है। क्रॉस चेकींग का सिस्टम होना चाहिए।

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

महानगरपालिकेमध्ये जनजागृती मोहिम सुरु केली. डेंग्यूचे अळी स्वच्छ पाण्यात होतो त्याची कार्यशाळा ५ तारखेला घेतली होती. त्याचे डिटेल प्रेझेन्टेशन महाराष्ट्र शासनाचे अधिकारी होते व मी पण दिलेले आहे. डेंग्यूचे मच्छर स्वच्छ पाण्यात तसेच डेंग्यूचे मच्छर ५०० मीटरच्या बाहेर जाऊ शकत नाही. डेंग्यू घरातीलच माणसाला चावतो आजूबाजूच्याला चावतो डेग्यूची पैदास स्वच्छ पाण्यामध्ये होते. फ्रीजमध्ये, फुलदाणी तुळशीच्या झाडाखाली, मनीप्लान्ट, छतावरचे प्लास्टीक त्याच्यामध्ये मच्छरची पैदास होते. कार्यशाळा झाली त्याच्यात त्याच सुचना दिल्या. मलेरिया डेंग्यूच्या केसेस स्वच्छ पाण्यात आहेत. त्यासाठी जनजागृती महत्वाची आहे. मनपानी जनजागृती मोहिम सुरु केली आहे.

**सुहास रकवी :-**

पानपट्टे साहेब तुम्ही रिर्सच कुठे केले की ते डेंग्यूचे मच्छर घरातच चावतात.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

ते शासनाचे रिर्सच आहे.

**सुहास रकवी :-**

घरातल्यानाच चावतात रिर्सच कोणी केले.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

रेक्टर बॉन्ड डिसीज त्याच्याबद्दल पॉलिसी आहे.

**सुहास रकवी :-**

खोटी माहिती देऊ नका.

(सभागृहात गोंधळ)

**फरीद कुरेशी :-**

रेक्टर बॉडचे करत असाल तर त्याचे इम्पलिमेंटेशन कुठे आहे. इनडोअर रेसिडिअल करा ना.

(सभागृहात गोंधळ)

**अनिल भोसले :-**

प्रशासन दिशाभूल करते.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

काय दिशाभूल केली सांगा.

**अनिल भोसले :-**

तुम्ही स्वतःहून जातीने कोणती मोहिम राबवली आहे का सांगा? एका वॉर्डामध्ये सांगा ह्या ठिकाणी जाऊन जातीने मोहिम राबवली आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

माझ्याकडे रेकॉर्ड आहे.

**अनिल भोसले :-**

आपण स्वतः आणि आपली टीम आपल्याकडे पूर्ण शहराची जबाबदारी आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मी जबाबदारीनेच बोलतो. २५-३० वॉर्डामध्ये मोहिम सुरु केली आहे. प्रेमनाथ पाटील, डिंपल मेहता, मनिषा पिसाळ, हंसू पांडे, निलम ढवण, मोहन जाधव, सुनिता पाटील, राजेश वेतोसकर, अरविंद ठाकूर, प्रभात पाटील, वंदना पाटील, प्रविण पाटील, तारा घरत, आमगावकर, केळूसकर, भानुशाली, शरद पाटील, मेघना रावल, ध्रुवकिशोर पाटील अशी माझ्याकडे यादी आहे. सगळ्या वॉर्डामध्ये सुरु केले आहे. जनजागृती स्प्रेईंग मोठा कार्यक्रम हाती घेतला आहे. माणस कमी आहेत. मॅन पावर जेवढे आहे बजेट आहे त्या प्रोव्हिजनमध्ये करणार आहोत. भविष्यात प्रोव्हिजन वाढवून घेणार आहोत.

**अनिल भोसले :-**

कधी वाढवून घेणार? किती लोक बळी गेल्यावर. आपण वाढवून घेणार ह्या शहरामध्ये किती लोक मरायला पाहिजे. अशी आपली अपेक्षा आहे का कधी करणार?

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

मिरा भाईंदर क्षेत्रामध्ये दोन लाख घर आहेत. प्रत्येक ठिकाणी मनपा जाऊ शकत नाही. त्यासाठी जनजागृती करणे महत्वाचे आहे. केबलच्या माध्यमातून तसेच मोठी होर्डिंग्ज लावली, दोन फ्रीडी नंबर केला आहे. मनपा सर्व एस.आय ना मुकादमना कुठे सोसायटीच्या आवारात पाणी साचले असेल, भंगार साचले असेल त्याठिकाणी लारवा सापडले असतील. ती सुध्दा मोहिम घेतली आहे. सर्व सदस्यांसाठी एक कार्यशाळा आयोजित केली. काही सदस्यांनी मोठी होर्डिंग्ज लावून त्याच्या माध्यमातून जनजागृती सुरुवात केली आहे. इतर मनपापेक्षा ह्या मनपामध्ये घाबरण्यासारखी परिस्थिती नाही. आपण मोठ्या प्रमाणात कार्यशाळा आयोजित केली होती. त्या माध्यमातून तसेच वॉर्ड लेवलवर मोठे शिबीर ...............

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम, डेंग्यूच्या संदर्भात त्यांची लक्षवेधी होती. डेंग्यूचा सगळ्याचा अभ्यास आणि तुम्ही डायसवरुन दिलेले उत्तर की, तो स्वच्छ पाण्यात होतो. म्हणजे तो डास घरात पैदास होतो. म्हणजे संपूर्ण जबाबदारी नागरिकांची आहे. त्यासाठी तुम्ही प्रयोगशाळा घेतली, बोर्ड लावले, टोल फ्री नंबर दिला सगळ्या गोष्टी खऱ्या आहेत. लोकांवर जबाबदारी टाकली की आपण मोकळे होतो असा भाग नाही. ही जबाबदारी तुमची आहे. म्हणून कोणीतरी म्हटले प्रत्येक घरात जाऊन पर्टीक्युलर स्लम एरियामध्ये जा. जिथे घरात येणारे पाणी कमी आहे. कोणतरी म्हणाले कमी पाणी पुरवठा हा सुध्दा फॅक्टर आहे. माणूस त्या ड्रममध्ये दिसलेल्या अळ्या ते पाणी सांडायला तयार होते नाही. कारण माझ्या घरात उद्या पाणी येईल ह्याची खात्री नाही म्हणून ते पाणी फेकून देत नाही. आणि त्याच्यात २० अळ्या असतील तर त्याच्या ४०० अळ्या होतात ह्याच्याकडे गांर्भियाने पाहिले पाहिजे. घरात डांसांची पैदास होते. ह्याच्यामध्ये तुमचे मार्गदर्शन म्हणण्यापेक्षा तुमचा तिथे सर्व्हे पाहिजे की, तो स्लममध्ये होतो की चांगल्या पॉश वस्तीमध्ये होतो किंवा कसे. सगळ्यात महत्वाची गोष्ट

डेंग्यूची साथ आली किंवा डेंग्यू वाढतो परंतु ह्या शहरामध्ये वर्षानुवर्षे असलेला डासांचा प्रश्न निकाली निघत नाही. डास ह्या शहरातून कधी सुध्दा कमी झालेला नाही. नुसत्या डेंग्यूनेच माणसे मरतात असे नाही. साध्या डासाने हिवताप, मलेरिया सारखे रोग नेहमी वाढत आहेत. डॉक्टराचे फावते आणि लोक आजारी पडत आहेत. काका म्हणाले ना इथे किती मच्छर फिरत असतात. तुमच्या घराच्या बाहेर खुर्ची टाकून ५ मिनिटासाठी बसू म्हटले तर इथे बसू शकत नाही. आम्ही आमच्या घराच्या ओट्याचा वापर करु शकत नाही. ह्याच्यावर नियंत्रण कोणाचे मलेरिया आला डेंग्यू आला तो भाग वेगळा आहे. परंतु हा रोजचा प्रश्न आहे. मी तर म्हणेण हे आरोग्य विभागात जेवढे कर्मचारी काम करतात त्यांना भाईंदरला राहायला सांगा. ह्यांना डास चावतील तेव्हा ह्यांना कळेल की डास चावतात आणि त्याचे परिणाम काय होतात. डेंग्यू, डेंग्यू म्हणून बोंबा न मारता पूर्ण शहरामध्ये डास निर्मूलन झाले पाहिजे. ही माझी ह्या माध्यमातून मागणी आहे. त्याचे कसे नियोजन करायचे त्याची संपूर्ण जबाबदारी तुम्ही घ्यायची आहे.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

त्याला लिमिटेशन आहे. आपली तीन ठिकाणी खाडी आहे. ७० टक्के नाले पक्के केले आहेत.

(सभागृहात गोंधळ)

**शरद पाटील :-**

काही उत्तर देऊ नका.

**अनिल भोसले :-**

सदस्याची दिशाभूल करतात. मॅडम माझी विनंती आहे ह्याचा बदलाव करा.

**निलम ढवण :-**

साहेब ह्याच्यासाठी मुबलक लोक नाहीत तर स्टाफ वाढवा. पावरफूल औषध घ्या आणि त्यानुसार आणखीही मॅनपावर वापरली तर हे सगळे प्रॉब्लेम जास्तीत जास्त कमी होण्याची शक्यता आहे. जे झाले ते झाले ह्या पुढे देखील सामान्य नागरिक बळी जात आहे. त्यामुळे एम.पी.डब्ल्यू जास्त वाढवा. मागेही मी मागणी केली होती. घरोघरी जाऊन बाहेरची जी फवारणी आहे. जी धूर फवारणी आहे बाकी ज्या-ज्या गोष्टी आपल्याला करता येतील त्या जास्तीत जास्त प्रमाणावर आणि प्रभावी औषध वापरुन ही कार्यवाही करावी अशी मी विनंती करते.

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर मॅडम, खरतर साहेब आम्ही सॉलीड वेस्ट मॅनेजमेंट हा विषय ह्याच्या अंतर्गत ह्याला लागणारे जे नियम आहेत त्याप्रमाणे साफसफाई टेंडर काढला होता. लागणारा इष्टांक सॉलीड वेस्ट मॅनेजमेंटच्या आधारावर तेव्हा करताना आम्हाला कुठल्या प्रकारची अडचण नव्हती आम्ही २२ कोटी रु. आरोग्य विभागाला साफसफाईसाठी वर्षाला देत होतो. आज आम्ही ५० कोटीवर आणलेले आहे. त्याला एक कारण होते की त्यांनी कॉन्ट्रॅक्टर विकत घ्यावे. कर्मचाऱ्यांची संख्या त्यांनी वाढवावी. शहरामधली साफसफाई झाली पाहिजे. ह्या सगळ्या विषयावर चर्चा करुन ह्या विषयाची मागणी बघुन तेवढी तरतुद करुन ५० कोटी निधी आरोग्य विभागाला उपलब्ध करुन देत आहोत. विषय एकच आहे. २५० कर्मचारी डास निर्मुलन पथक तयार केले होते. त्याच्यासाठी ते वेगळे केले होते. २५० च्या जागेवर ११७ कसे केले.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

बऱ्याच सदस्यांची सुचना आहे की, फॉगींग करा. ओपन रस्त्यावर फवारणी केली तर त्याचा काही उपयोग होत नाही. त्याच्यासाठी बंदीस्त गटारामध्ये फॉगींग करणार आहोत. घरामध्ये फवारणी करणार आहोत.

**राजेंद्र जैन :-**

जो रजिस्टर एरिया है उसमें आप फॉगींग किजीए। पहले भी मैंने सुझाव किया था अभी आप बोलते हो फॉगींग नही करेंगे तो कोई साइंटीफिक रिजन नहीं दिया गया। सोसायटी का कम्पलेन्ट है ए.सी. के अंदर पानी है।

**जुबेर इनामदार :-**

फॉगींग मशीन उपलब्ध करुन देता असे ठरले आहे. संख्याबळ का कमी केले त्याची काय अडचण आहे ते मा. आयुक्ताना सांगा. कर्मचारी कमी पडत असेल.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

सॅनेटरी इन्स्पेक्टर आम्हाला कमी पडतात. फॉगींग, स्प्रेईंगसाठी माणस कमी पडतात.

**रोहिदास पाटील :-**

मॅडम ह्यांनी थंब सिस्टम केले आहे. ह्यांची हनुमान सेना पूर्व ते पश्चिम फिरतच असते. ७.३० चे थंब ड्यूटीवर यायला ९.०० वाजतात दुपारी पुन्हा थंब पुन्हा तिकडे जातात. परत इकडे येणार कायतरी डेव्हलप कराल की नाही. तुम्ही उपायुक्त आहेत. पूर्वेचा माणूस पश्चिमेला जायला किती वेळ लागतो. मनपाचा कर्मचारी प्रामाणिक जाईल का? तो इकडे तिकडे थांबत थांबत जातो.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

जवळ-जवळ ३५ ठिकाणी हजेरी घेतो. सकाळी हजेरी घेतो आणि दुपारी २ वाजता घेतो.

[illegible]

**रोहिदास पाटील :-**

तुम्ही आता असे म्हणा की पूर्वेचे पूर्वेला आणि पश्चिमेचे पश्चिमेला हजेरी लावतील. त्यामुळे फरक मिळेल आम्ही हे पोटतिडकीने बोलतो.

**बर्नड डिमेलो :-**

मा. महापौर मॅडम, मला एक सुचना मांडायची आहे. मगाशी सांगितले की, आपल्या तीन बाजूला खाड्या आहेत. मेन मुद्दा शहरातली गटार ही खाडी आणि नाल्याला मिळालेली आहेत. ज्या ठिकाणी मँग्रोजची झाड वाढलेली आहेत. फांद्या खाली गेलेल्या आहेत. त्यामुळे त्याच्यात कचरा अटकला आहे. काकांनी सांगितले त्याप्रमाणे पाण्याचा प्रवाह संथ राहतो. जर आपल्याला मँग्रोजची झाड कापण्याची बंदी असेल तर शासनाकडून परवानगी घ्यायला पाहिजे. जोपर्यंत फांद्या कापून नाले मोकळे होत नाही. मला तरी वाटते माणसे मरतील.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

कारवाई सुरु केली आहे.

**बर्नड डिमेलो :-**

आता तुम्ही फॉग मशीन लावणार सगळ करणार. मागच्या सभेमध्ये पण मी विषय काढला होता की, त्यांना कि.मी. च्या मानाने जसा परिसर असेल १ किंवा २ व्यक्तिला तसा परिसर हा दिला पाहिजे. ज्या व्यक्तिला दिलेली एरिया साफ झाली नाही तर त्याला तिकडून काढण्यात यावे किंवा कामावरुन काढण्यात यावे. हे तुमचे अधिकार आहेत. मी सांगत नाही की, तुम्ही एकटे करा. पण तुम्ही त्या पध्दतीची सिस्टम जर बनवली त्याला दिलेला परिसर तुम्ही कधी गेले किंवा नगरसेवक जाऊन तिकडे दिसले की स्वच्छता नाही तर त्या व्यक्तिला जबाबदार धरले पाहिजे. ह्या पध्दतीची योजना झाली तरच सफाई होईल.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

बऱ्याच लोकांना काढले होते. काम बंद झाले की, सर्वांचे फोन येतात. त्यांना जरा काही ओरडले की काम बंद करतात.

**बर्नड डिमेलो :-**

त्यांना ठराविक एरिया द्या. कि.मी. प्रमाणे अर्धा कि.मी. १ व्यक्तिला द्या किंवा जोडीला द्या.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

आपण सगळ्यांना यादी पण दिली आहे.

**बर्नड डिमेलो :-**

त्यांना सही करायला उत्तनला जायला लागते. मी माझ्या एरियातले बोलतो. शांतीनगर चौकच्या भागातून सही करायला उत्तनला जातील ते चालत येतात.

**संभाजी पानपट्टे (मा. उपायुक्त) :-**

तिकडे रेंज येत नाही.

**बर्नड डिमेलो :-**

सिस्टममध्ये चेंज करा. तुम्ही ते करायला पाहिजे.

**हेलन जॉर्जी :-**

मा.महापौराच्या परवानगीने बोलते. सन्मा. पानपट्टे साहेब चौकवरुन डोंगरीत हजेरी लावायला त्याचे २-३ तास जातात. चौकची माणस पालीला हजेरी लावायला जातात. हे बऱ्याच वेळेला सांगितले आमच्या वॉर्डात कर्मचारी कमी आहेत. आमचा वॉर्ड विखूरलेला आहे. आम्ही किती वेळा बोलले आम्हाला कामगार वाढवून द्या. त्यांचा वेळ वाचवण्यासाठी सांगा चौकची लोक डोंगरी आणि चौकची लोक पालीला हजेरी द्यायला नाही जायला पाहिजे. ह्याच्यावर तुम्ही लक्ष ठेवा.

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर मॅडम, मी आपल्याला विनंती केली तशी सुचना आपण मा. आयुक्तांना करावी. माझी लक्षवेधी स्विकारल्या बद्दल तुमचे आणि सभागृहाचे मी आभार मानतो.

**प्रेमनाथ पाटील :-**

मॅडम, ह्याच्यावर निष्कर्ष काय काढला. डास नियंत्रणावर राठोड हा एकटाच माणूस आहे. तर त्याच्यावर माणस वाढवणार की नाही.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर महोदया, अर्ध्या पाऊण तासापासून गंभीर विषयावर चर्चा चालू होती. जेवढे गांर्भिय आपल्याला आहे तेवढेच प्रशासनाला देखील आहे. हा सेन्सेटिव्ह इश्यू आहे. ही चर्चा चालू असताना माझ्या असे निदर्शनास आले की आपण काही आर्ग्यूमेंट करतो वेयर नॉट ट्राईंग टू फाइंड आऊट द कॉल. आपण ज्या काही विधायक सुचना केल्या आहेत. त्याची प्रशासनानी नोंद घेतली आहे. ह्या सर्व सुचनांवर कालबध्द पध्दतीने गांर्भियपूर्वक विचार करुन ज्या-ज्या उपाययोजना करणे शक्य आहे त्या सगळ्या उपाययोजना करण्यासाठी प्रशासन कटीबध्द आहे. एवढी मी या सभागृहाला ग्वाही देऊ शकतो.

**नगरसचिव :-**

आजच्या सभेसाठी प्रशासनाकडून २ के खाली दोन प्रस्ताव आले आहेत ते घ्यायचे का?

**नरेंद्र मेहता :-**

नंतर घेण्यात यावा.

**नगरसचिव :-**

अजेंड्याच्या शेवटी घेतो.

**मा. महापौर :-**

मी विषय स्विकारले आहेत.

**नरेंद्र मेहता :-**

नंतर चर्चा करुन आता मांडू नका. आता करायची असेल तर आमचे मत आहे घेऊ नका. क चे प्रस्ताव सभागृह म्हणून आम्ही स्विकारत नाही तुम्ही नंतर चर्चेला आणा. बाकी विषय संपल्यानंतर...........

**मा. महापौर :-**

चर्चेला आणा पण मी या महासभेत स्विकारते.

**नरेंद्र मेहता :-**

तो तुम्हाला नाही सभागृहाला अधिकार आहे.

**भगवती शर्मा :-**

सचिव साहब विषय क्या है वह विस्तृत रुप से बताओ।

**नगरसचिव :-**

के विषय वाचन केले.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम क खाली आला आहे म्हणजे प्रशासनाकडून आलेला आहे.

**मा. महापौर :-**

मा. आयुक्तांनी पाठवला आहे.

**नरेंद्र मेहता :-**

मा. आयुक्त महोदय सभागृहानी ह्या अगोदर निर्णय केलेला आहे आणि ह्या निर्णयानी आपण समाधानी नाही म्हणून शासनाला विखंडीत करायला पाठवले आहे. हा बजेटचा विषय आहे. ह्याच्या वर शासनाचा निर्णय देखील प्रलंबित आहे स्थगिती नाही काही नाही. एखादा निर्णय शासनाला प्रलंबित असताना आपण त्याला ओव्हर रुल करुन हा विषय पुन्हा आणणार योग्य आहे का? कारण ते बजेट मंजूर होणार की नाही ते आपल्याला अजून माहितच नाही. त्याच्या अगोदरच आपण निर्णय बदलायला घेतलेला आहे. बजेटचा विषय आहे तर रितसर आणायचा ना. कूठला फंड तुम्ही कुठे वापरणार हे आम्हाला अजून नक्कीच माहित नाही. जे महासभेने ठरवले ते मंजूर होणार की स्थायीने ठरवले ते मंजूर होणार की मा. आयुक्तांनी ठरवलेले ते मंजूर होणार. अजून ह्याच्यात काही ठरलेच नाही आणि आपण असे बोलता की मॅटर इज सब्जेटाईज म्हणजे शासनाकडे प्रलंबित आहे आणि ह्याच्यावर निर्णय घेणे कितपर्यंत योग्य आहे आणि आपण आता प्रस्ताव देणे कितपर्यंत योग्य आहे. प्रशासनाने एका बाजूला विखंडीतला पाठवला. निर्णय झाला नाही आणि तुम्ही त्याला ओव्हर रुल करता म्हणजे सभागृहाच्या वरती आपला निर्णय हे योग्य नाही अशा चूका पुन्हा होऊ नये. शासनाचा निर्णय प्रलंबित आहे. निर्णय लागल्यावर सांगा ना. आम्ही कूठल्यावर काम करायचे महासभा, स्टँडींग की आयुक्तांवर निर्णय अजून झालेला नाही. म्हणून तो विषय घेता येणार नाही.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. आयुक्त साहेब, ह्या विषयाची खूप गरज आहे. संपूर्ण नगरसेवक, नगरसेविका, नगरसेवक निधी आणि प्रभाग निधीबद्दल फॉलोअप करतात आणि त्याच्यावर हा प्रस्ताव आणलेला आहे. त्याच्यामुळे ह्याची गरज आहे आणि ज्यावेळी शासन निर्णय घेईल की हा ठराव विखंडीत करायचा की नाही करायचा तोपर्यंत नोव्हेंबर डिसेंबर, फेब्रुवारीमध्ये नविन बजेट येईल.

**शरद पाटील :-**

मा. महापौर मॅडम, सभागृह नेते फार चांगले बोलले आनंद वाटला. पण जेव्हा हा ठराव विखंडीतला जात होता तेव्हा त्यांना त्याची कल्पना नव्हती का?

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मला कल्पना होती.

**शरद पाटील :-**

मग त्यावेळेला का सांगितले नाही त्यावेळेला महासभेचा निर्णय का घेतला नाही. महासभेत निर्णय झाल्यानंतर विखंडीत करण्यासाठी पाठवला होता. ह्याच्यावर उद्या विशेष सभा लावा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

साहेब, हा विषय अत्यंत गरजेचा म्हणून जशी तुम्ही तुमची भुमिका मांडली तशी आम्ही आमची भुमिका मांडली की, हा विषय अत्यंत गरजेचा आहे. तुम्ही आणलेला आहे म्हणून झाला पाहिजे. हा एका पार्टीशी सलग्न नाही हा संपूर्ण सभागृहाचा विषय आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

मा. महापौर मॅडम, त्या दिवशी आम्ही आयुक्तांना भेटलो होतो. मा. आयुक्तांनी सर्व नगरसेवकांना पत्र दिले आहे की, तुमच्या नगरसेवक निधी आणि प्रभागनिधीची लवकरात लवकर काम द्या. कारण मार्च आला की निधी लॅब्स होईल. आम्ही आयुक्तांना असे विचारले की, आमचा १० लाख नगरसेवक निधी आणि १५ लाख प्रभागनिधी आहे. तर मा. आयुक्त साहेबांनी आम्हाला असे उत्तर दिले की ठिक आहे ८ दिवसांनी हे होणार आहे. तुम्ही तुमची पत्र २५ लाखात देऊन ठेवा. आता ६ लाख हे चूकीचे आहे ना.

**भगवती शर्मा :-**

मा. महापौर मॅडम, इन्होने जो विषय बताया विखंडीत का वह ठराव अलग था। जिसमे इन्होने अपना मनमानी कारोबार सदन के माध्यम से करने की इच्छा जताई थी। उसीको विखंडीत करने के लिए आपको उस समय भी निवेदन किया। हमने दुसरा भी ठराव किया था। लेकिन आज परिस्थिति अलग है। सन्मा. आयुक्त ने बजेट का प्रोव्हीजन अलग किया। सन्मा. स्थायी समिती ने बजेट का प्रोव्हिजन अलग किया। कुछ कारण से यह महासभा लग नहीं पाई इसके लिए बजेट को मंजूरी नही मिली। मंजूरी न मिलने के कारण से नगरसेवक निधी बाकी खर्चे में कोई प्रॉब्लेम नही आ रहा है। जनता के तरफ से कोई समस्या उत्पन्न हो रही है। नगरसेवक निधी और प्रभाग निधी के सभी सन्मा. सदस्या ने मा. महापौर मॅडम को बार बार निवेदन किया। मा. आयुक्त के पास भी निवेदन किया। खाली पुर्नःनियोजन के माध्यम से उसी रक्कम के लिए एक निवेदन दिया जा रहा है। इस सदन के माध्यम से प्रशासनने की नगरसेवक निधी, प्रभाग निधी बढाए जाए। ताकि सदस्य अपने क्षेत्र में विकास का काम कर सके। इसके अंदर उस विखंडीत के प्रस्ताव का संबंध नहीं है। विषय जो लाया है उसमें पूर्ण वैध्यता है। मेरा सभी सदस्य से निवेदन है इस विषय को लेकर नगरसेवक निधी और प्रभाग निधी बढाया जाने के लिए पुर्नःनियोजन के प्रस्ताव को मंजूरी दे।

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर मॅडम, मा. आयुक्तांनी अर्थसंकल्प स्थायी समितीला प्रस्तावित करायचा असतो. स्थायी समितीने त्याच्यात काही बदल घडवल्यानंतर मा. महासभेपूढे सादर करायचे असते. काही कारणास्तव महासभा नाही लागली तर स्थायी समितीने जो बजेट प्रस्तावित केलेला आहे तो अंतिम असतो असा नियम आहे. ह्या विषयावर मी मा. आयुक्तांबरोबर पत्रव्यवहार केलेला आहे. पाहिजे तर त्याच्यावर चर्चा करता येईल. मा. आयुक्तांकडे पत्रव्यवहार केला त्याचे उत्तर मला प्राप्त झाले की त्यांनी त्या विषयावर अभिप्राय राज्य शासनाकडून घेतला आहे का? ते केले असते. तर हा विषय पुन्हा महासभेपूढे आणायची गरजच नव्हती. क च्या माध्यमातून प्रशासनाला द्यायची गरजच नव्हती किंवा तो ठराव विखंडीत करायला पाठवला तो आपल्या जागेवर पाठवला आहे तो विखंडीत करुन आल्यानंतर त्याच्यावर जे काही उत्तर येईल त्याच्यावर तुम्हाला कारवाई करता आली असती स्थायी समिती वैधानिक समिती आहे. त्यांनी तुम्हाला एकदा अर्थसंकल्प तयार करुन दिल्यानंतर बहुमताने महासभेसमोर तुमच्यासमोर दिलेला आहे. फक्त मान्य करायला दिला जातो. त्याच्यामध्ये कोणता रद्द बदल करायचा असेल तर ज च्या माध्यमातून तो आणावा लागेल. मी ती फाईल मागवली आहे. मला माहित नव्हते हा विषय चर्चेला येणार मला वाटलेले कोण विरोध करणार नाही कारण माझ्याकडे तो इतिहास आहे. कलम १०० आणि १०० अ ह्या विषयावर स्पष्ट आहे. अधिनियमाचे कलम १०० ज्या अंतीम परिषदेत मनपाने मार्च महिन्याच्या ३१ तारखेस किंवा त्या पूर्वी अर्थसंकल्पीय अंदाज अंतिमरित्या स्विकारला नाही तर स्पष्टीकरण मा. महासभा मार्च महिन्याच्या ३१ तारखेस किंवा ह्यापूर्वी विशेष महासभा आयोजित करुन अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक ठरावाद्वारे मंजूर केले पाहिजे. ते नाही केले तर सद्यस्थितीत स्थायी समितीने किंवा परिवहन समितीने शिफारस केलेले अर्थसंकल्पीय अंदाज अशारितीने अंदाज स्विकारण्यात येईपर्यंत मनपाने अंतिमरित्या स्विकारला आहे असे मानले जाईल. त्याचे स्पष्टीकरण आहे तेही तुम्हाला दिले. अशा स्थितीत काही कारणास्तव मा. विशेष महासभा आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकावर चर्चा विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यासाठी झाली नसेल तेव्हा मा. आयुक्तांनी परिवहन समितीने, स्थायी समितीने पूढे सादर केलेले अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकामध्ये योग्य सुधारणा करुन ठरावाच्या माध्यमातून मान्य करुन तेच अंदाजपत्रक अंतिमरित्या आहे असे मानले जाईल. त्याचे स्पष्टीकरण १०० "अ" मध्ये दिलेले आहे. आम्ही ह्या विषयावर शिष्टमंडळ घेऊन आलो होतो. ह्याच्यावर चर्चा झाली. तुम्ही तो मान्य केला असता तर हा विषय पुन्हा सभागृहासमोर आला नसता. त्यामध्ये स्थायी समिती, प्रभाग निधी आणि नगरसेवक निधी जी वाढीव करायची होती ती करुन प्रस्ताव पाठवला आहे. साहेब हे व्यक्तिगत तुमचे उत्तर असेल मी पत्र दिले होते त्याचा अभिप्राय शासनाकडून मागून घेतले पाहिजे होते. मी तुम्हाला ऑगस्ट महिन्यात पत्र दिलेले आहे. त्याचे उत्तर आजपर्यंत दिलेले नाही. १०० "अ" त्याचप्रमाणे ह्या अधिनियमात काही अंतर्भूत केलेले असेल हा १०० "अ" आता आला. आधी फक्त १०० च होता. मुंबईचा महाराष्ट्र प्रांतिक अधिनियम झाला तेव्हा आला. ह्या अधिनियमात काही अंतर्भूत केले असेल तर अर्थसंकल्पीय अंदाज ह्या आर्थिक वर्षाच्या संबंधीत असेल त्या वर्षाच्या प्रारंभापूर्वी स्थायी समितीने ते अर्थसंकल्पीय अंदाज कोणत्या कारणास्तव मनपा समोर सादर केलेले नसतील इथे सादर केलेले आहे. करुन सुध्दा तुम्ही मान्य करत नाही. केलच पाहिजे स्थायी समिती वैधानिक समिती आहे. तुम्ही त्याला कसे नाकारु शकता. त्यामुळे किंवा तो महानगरपालिका ते अर्थसंकल्पीय अंदाज अंतिमरित्या स्विकृत केले नसतील म्हणजे महासभेने सादर केले नसतील तर महानगरपालिका अधिनियमाच्या तरतूदीने अर्थसंकल्पीय अंदाज स्विकृत करेपर्यंत अधिनियम कलम ९५ अन्वये आयुक्तांनी तयार केलेले उत्पन्न

खर्च ह्याचे अंदाज ह्या वर्षाच्या अर्थसंकल्पीय अंदाज असले पाहिजे. साहेब इथे स्थायी समितीने केलेले आहे. स्थायी समितीने सर्वानुमते ठराव पाठवलेला आहे. प्रशासनानी ती पध्दत राखली आहे की संख्याबळानुसार प्रत्येक पक्षाचा सदस्य स्थायी सभेमध्ये असतो. स्पष्ट धोरण असताना त्याच्यावर काही कारवाई केलेली नाही म्हणून हा विषय "क" च्या माध्यमातून प्रशासनाला आणावा लागला म्हणजे आपली किती वाईट परिस्थिती आहे बघा ह्याचे उत्तर द्या.

**मा. आयुक्त :-**

महापौर महोदय, ह्या विषयावर मी निवेदन करु इच्छितो १९ जुलै २०१४ रोजी ह्यापूर्वी महासभा झाली होती. त्या महासभेमध्ये आपण सांगता त्या पध्दतीने अर्थसंकल्पाच्या बाबतीत विधिवत ठराव झालेला नाही. केवळ ह्या तांत्रिक कारणास्तव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ४ कलम ४५१ अन्वये तो ठराव महाराष्ट्र शासनाकडे विखंडीत करण्यासाठी सादर केला आहे. अशा परिस्थितीमध्ये प्रशासन थांबू शकत नाही. ज्या खर्चाच्या बाबी आहेत त्याची अंमलबजावणी करणे तेवढेच गरजेचे असते. म्हणून विधी मंडळाने २०११ साली ह्या कायद्याला दुरुस्ती केली आणि त्यामध्ये कलम १०० अ ह्याचा अंतर्भाव केला. कलम १०० "अ" च्या तरतूदी अतिशय स्पष्ट आहेत. त्यामध्ये असे म्हटले आहे की, जोपर्यंत अर्थसंकल्प अंतिम स्वरुपात पारित होत नाही. तोपर्यंत मा. आयुक्तांनी केलेले बजेट हे अंतिम समजून त्याप्रमाणे मनपाने खर्च करावा. सध्या ह्या तरतूदी अन्वये मनपामध्ये खर्चाच्या बाबी हाताळल्या जातात. दरम्यानच्या काळात माझ्याकडे विविध सन्मा. सदस्य आले आणि त्यांनी नगरसेवक निधी, प्रभाग निधीमध्ये कपात झाली आहे त्याच्यात वाढ करावी. अनुक्रमे १० आणि १५ लाखाचा निधी आम्हाला द्यावा अशी सातत्याने माझ्याकडे मागणी केली. दरम्यानच्या काळात महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणूका लागल्या त्यामुळे महासभा होऊ शकली नाही म्हणून आज जेव्हा ही बैठक आयोजित केली त्यामुळे प्रशासनाला "क" खाली रि-ॲप्रोप्रिएशनचा प्रस्ताव आणायला लागला. हा प्रस्ताव आणत असताना इतर ज्या तातडीच्या बाबी आहेत आपल्याला कल्पना आहे. देशाचे सन्मा. पंतप्रधान ह्यांनी भारत स्वच्छता अभियान सारखा कार्यक्रम हाती घेतला आहे. तो कार्यक्रम देखील मनपामध्ये विविध विभागात राबवत आहोत. राबवायचा आहे त्यासाठी काही खर्च लागणार आहे. विशेषतः टॉयलेटची दुरुस्ती शाळामध्ये असेल किंवा पब्लिक टॉयलेटमध्ये असेल त्यासाठी निधीची आवश्यकता आहे. ह्या सोबत रेल्वेच्या लाईन खालून भाईंदर पूर्व आणि पश्चिम जोडण्यासाठी एक सबवेचे काम चालू आहे. रेल्वे ऑथोरीटीनी आम्हाला नुकतेच एक पत्र दिले आहे. सुरुवातीला साधारणतः २१ कोटीची मागणी केली होती. नंतर त्यांच्या अधिकाऱ्यांसोबत बैठका घेतल्या तेव्हा ती मागणी सोळा सव्वा सोळा कोटीच्या आसपास केलेली आहे. त्यांनी सांगितले किमान एवढी रक्कम भरणे शक्य नसेल तर काहीतरी रक्कम भरा तेव्हाच आम्ही तुम्हाला काम करण्याची परमिशन देऊ त्याचे कोडल चार्जेस असे त्याचे हेड आहे त्याखाली त्यांनी आम्हाला तातडीने ३.५० कोटी भरण्याची मागणी केली. अशा ह्या ३-४ बाबीसाठी निधीची आवश्यकता आहे. म्हणून माझी सन्मा. सभागृहाला विनंती आहे. नगरसेवक निधी, प्रभाग निधी, सबवेचे काम, शाळेची दुरुस्ती, पब्लिक टॉयलेटची दुरुस्ती, शाळामधील टॉयलेटची दुरुस्ती ह्या ज्या ४-५ महत्वाच्या बाबी आहेत ह्या सर्व बाबींवर जर आपल्याला काम करायचे असेल त्याला निधीची आवश्यकता आहे. सध्या त्या-त्या बजेट हेडमध्ये निधी शिल्लक नाही म्हणून आपण रि-ॲप्रोप्रिएशनसाठी मान्यता द्यावी धन्यवाद.

**जुबेर इनामदार :-**

मा. आयुक्त महोदय विकासाची चांगली काम करायला तुम्ही सुचवली आहेत. शहराच्या हितात विकासाठी काम आहेत. स्थायी समितीने मंजूर करुन दिलेले आहे मी इंग्लिशमध्ये वाचून दाखवतो मला तुमच्या माध्यमातून उत्तर पाहिजे. तुमचे स्पष्टीकरण पाहिजे की हे चूकीचे आहे की आम्ही बालतो ते चूकीचे आहे. की तुम्ही समजून घेता ते चूकीचे आहे. १०० अ नॉट बी स्टँडींग ऐनीथिंग कनटेन इन धिस ॲक्ट. इफ फॉर एनी रिजन द स्टँडींग कमिटी हॅज नॉट मेड बजेट इस्टीमेट बिफोर द कॉर्पोरेशन. कॉर्पोरेशनला स्टँडींग कमिटीला बजेट ले केलेला आहे. कॉर्पोरेशन म्हणजे महासभा होते. ड्यू टू विच ऑर अदरवाईज दॅट कॉर्पोरेशन हॅज नॉट फायनली ॲट द एक्सेप्ट म्हणजे ह्याचा अर्थ महासभेने ते एक्सेप्ट केलेले नाही. कारण स्थायी समितीने केलच नाही. इथे स्थायी समितीने बजेट तयार करुन सर्वानुमते सादर केलेले आहे. आयुक्तांच्या पध्दतीप्रमाणे तुमच्याकडे ह्या विषयाचा स्पष्ट अधिकार आहे मग तुम्ही त्याचा वापर का नाही करत. तुम्हाला महासभेच्या मंजुरीची गरज कुठे आहे. महासभेमध्ये विषय आल्यानंतर त्याच्यावर चर्चा होते त्याच्या आकड्यामध्ये कुठे लेखाशिर्षामध्ये बदल घडवायचा असेल तर त्याला "ज" च्या प्रस्तावाच्या माध्यमातून आणावा लागेल. मोघमपणे कोणी उठून काही बोलू शकत नाही. सगळे अधिकार तुम्हाला दिलेले आहेत. मग त्याचा वापर का केला जात नाही.

**नरेंद्र मेहता :-**

जुबेरजी हमने बहुत बार यह बात कमिशनर साहबसे चर्चा की शहर के हित का विषय है। लेकिन प्रशासन का मत नही पटा इसलिए अंतिम निर्णय गर्व्हमेंट को भेजो। आता "क" खाली प्रस्ताव आणलेला आहे. आता आम्ही बजेटवर जो पाहिजे तो निर्णय घेऊ शकतो. कुठे कमी कुठे जास्त की नाही करु शकत. मा. आयुक्तांनी सांगितले १० लाख आम्हाला पटला आम्ही १२ करणार ९ करणार ८ करणार अधिकार आहेत की नाही. आता आम्हाला वाटल की हा "क" खाली आला आहे. पूर्ण बजेट इकडे तिकडे करुन तुम्ही मान्य

करणार का की, पुन्हा विखंडीतला पाठवणार ते सांगाव. पूर्ण बजेट पुर्नःविनियोजन आज करतो ना आपण सांगा ते मान्य असणार का? हे जरुरी नाही की आपण म्हटली तीच फीगर करायला पाहिजे. सभागृहाने निर्णय घ्यायचा आहे. सभागृहाने घेतलेला निर्णय मान्य असेल का?

**भगवती शर्मा :-**

प्रशासनाने गोषवाऱ्यात काय दिले ते पण तुम्ही विचार करा.

**नरेंद्र मेहता :-**

हेडींग रि-ॲप्रोप्रिएशनचे आहे. आपण पूर्ण बजेट रि-ॲप्रोप्रिएशन करु शकतो. कायदा अधिकार सभागृहाला दिला आहे. प्रश्न तेवढाच आहे "क" खाली आम्ही पूर्ण बजेट तुम्हाला रि-ॲप्रोप्रिएशन दिलेला आहे. तुम्हाला मान्य असेल का? "क" खाली मान्य असेल तर "ज" खाली मान्य करावा लागेल. आम्ही "ज" खाली केले तुम्हाला पटले नाही तुम्ही गर्व्हमेंटकडे पाठवले आता आम्ही "क" खाली करतो. मग मान्य असेल का हे तरी सांगा. "ज" खाली पटले नाही तर "क" खाली कसे पटणार.

(सभागृहात गोंधळ)

**ध्रुवकिशोर पाटील :-**

मा. महापौर मॅडम, मेहता साहेबांनी सांगितले की, आता आम्ही रि-ॲप्रोप्रिएशन करतात त्यावेळी तुम्ही केलेला ठराव प्रशासनाला पटला नाही म्हणून त्यांनी विखंडीतला पाठवला. जर तुम्ही चूकीचे रि-ॲप्रोप्रिएशन केले तर विखंडीतला पाठवणार ना.

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम, मला सभागृहाला एवढेच विचारायचे आहे की, रि-ॲप्रोप्रिएशनचा विषय आपल्याकडे प्राप्त झालेला आहे. ह्या रि-ॲप्रोप्रिएशनमध्ये जिथपर्यंत माझा अनुभव आहे की जे आपण दिलेले तेच मान्य करावे असे नाही. आपण ते सादर केलेले आहे. आम्हाला त्यामध्ये कमी जास्त इकडचे तिकडे, तिकडचे इकडे सभागृहाला पूर्ण अधिकार आहे. जो सभागृहाला वाटेल तो निर्णय घेऊ शकतात. मग आम्ही हे बजेटचे पूर्ण करुन दिल्यावर आपल्याला हे पटेल का? किंवा मा. महापौर पिठासीन अधिकाऱ्यात पटेल का? कारण "ज" मध्ये आम्ही तोच केला होता ठीक आहे. आपल्याला नाही पटले ते टेक्नीकल कारण होते ह्यासाठी नाही की फीगर आपल्याला पटली नाही. कारण फीगरवर विरोध करायचा काही अधिकार नाही. आपले असे म्हणणे आहे सभागृहामध्ये रितसर आले नाही. "ज" खाली आले आहे म्हणून करता येणार नाही. आता "क" खाली आले आहे.

**भगवती शर्मा :-**

उस समय बजेट को अंतिम मंजूरी नही मिली थी। उन्होंने पुर्नःविनियोजन के माध्यम से उस समय स्टँडिंग में भी बजेट की चर्चा चल रही थी। लेकिन आपने "ज" के माध्यम से पुर्नःनियोजन का प्रस्ताव रखा था इसको प्रशासन ने विखंडीत के लिए भेजा है। बजेट तो उस समय अंतिम मंजूरी के लिए आना बाकी था। आप उसके पहले उसमें पुर्नःनियोजन करके उसके अंदर मनमानी कारोबार कर रहे थे। उसको प्रशासन ने नही चलने दिया।

**नरेंद्र मेहता :-**

सभागृहाने एक निर्णय किया है उसके उपर दुसरा निर्णय हो नही सकता। इसका सिम्पल यही है आप बजेट की रितसर ३ दिन बाद बैठक बूलाइए। सब विषय पूरे हो जाएगे। महापौर निधी, आमदार निधी, खासदार निधी, नगरसेवक निधी, प्रभाग निधी सब पुरे हो जाएगें। विशेष सभा लावा.

**भगवती शर्मा :-**

विषय क्या है आप अलग से लेके जा रहे हो यह बजेट से संबंधीत नहीं है। जब तक वो बजेट माना नही जाता आयुक्त महोदय ने दिया हुआ बजेट को मंजूरी समजके उसके अंदर में बजेट इन्होंने मंजूर समझ करके उसपे आगे पुर्नःनियोजन की कारवाई करने के लिए इसके अंदर हेड के ट्रली दिया है। आप बजेट-बजेट में रुपांतर करके फिर दिशाभूल कर रहे है।

**नरेंद्र मेहता :-**

माझे असे म्हणणे आहे प्रशासनाने मा. महापौर मॅडमला विषय द्यायला पाहिजे होता आणि रितसर आला पाहिजे होता. त्यावेळी मा. महापौर मॅडमचे असे म्हणणे होते की, सचिव साहेबांनी दिले नाही कारण आपण स्टँडिंगचे बजेट गृहित धरले आणि त्याप्रमाणे आपण कामकाजसुध्दा केले. ठिक आहे आता प्रशासनानी द्यावे आणि महापौर मॅडमनी घ्यावे. काय फरक पडणार आहे.

**भगवती शर्मा :-**

वो यहाँ पे नहीं होगा अभी जो विषय है उसके विषय पे चर्चा करके उसपे निर्णय लेना चाहिए।

**नरेंद्र मेहता :-**

विशेष सभा लावा.

**भगवती शर्मा :-**

विषय क्या लेना है क्या नहीं लेना उसके लिए महासभा नहीं चल रही है। महासभा इसलिए चल रही है की, २ के के अंतर्गत प्रशासन जो विषय दिया है, उसको आपको लेना है की नहीं लेना है। लेना है तो किजीए नहीं लेना तो उसका रिझन दिजीए।

**नरेंद्र मेहता :-**

मा. महापौर मॅडम, असे आहे की सभागृहाने एक निर्णय घेतला आहे. त्याच्यावर निर्णय झालेला नाही. आणि त्यावर ठराव करणे योग्य होणार नाही. "क" खाली प्रस्ताव आलेला आहे. त्यामध्ये ह्याला आम्ही सहमती देत नाही. मा. मुख्यमंत्र्याबरोबर चार दिवस अगोदर ह्या विषयावर शरद पाटीलजी आम्ही सर्व गेलो होतो. ह्याचा निर्णय द्या. प्रधान सचिवांबरोबर बैठक झाली त्यांनी आम्हाला आश्वासन दिले आहे की आठ दिवसात कसाही निर्णय देणार. त्यांना हे ही सांगितले विखंडीत करायचे तर विखंडीत करा मान्य करायचे तर मान्य करा आम्ही दोघाला तयार आहोत. विखंडीत केले तर आम्ही पुन्हा सभागृहापुढे जाऊ आणि मान्य केले तर त्याप्रमाणे कामकाज होईल. तसा पण आठ दिवसात निर्णय येणार. त्यानंतर आपण निर्णय घेऊया. तरीही सभागृहाला वाटत असेल तर आमची मानसिकता आहे की हा जो बजेटचा विषय असेल विशेष सभा लावा सादर करा आम्ही तयार आहोत.

**भगवती शर्मा :-**

बजेट शब्द नही आना चाहिए। फिर दिशाभूल हो रही है। बजेट बोल कर क्यों विषय कर रहे हो। यहाँ पे नगरसेवक निधी, प्रभाग निधी, जेसल पार्क सबवे और प्रधानमंत्री ने दि हुई एक योजना है उसपे चार विषय पे मंजूरी मांगी है।

**नरेंद्र मेहता :-**

जे आयुक्त आज मागतात ते बजेटमध्ये दिलेले आहे. त्यावेळी आयुक्ताना पटले नाही.

(सभागृहात गोंधळ)

**नरेंद्र मेहता :-**

आयुक्तांनी ज्या सबवेसाठी मागितले त्यासाठी रि-ॲप्रोप्रिएशन केले आहे. नगरसेवक निधी, प्रभाग निधी त्या बजेटमध्ये केले आहे.

**भगवती शर्मा :-**

जो ठराव विखंडीत के लिए भेजा है उस ठराव में क्या है। उसके अंदर यह विषय नहीं थे।

**शरद पाटील :-**

मा. महापौर मॅडम, भगवती शर्माजी बोलत असतील त्याच्यात ते विषय नाहीत तर नगरसेवक निधी आणि प्रभागनिधीचा प्रश्न आलाच कूठुन.

**भगवती शर्मा :-**

यह बजेट के अंदर है ना।

**शरद पाटील :-**

वही बजेट विखंडीत के लिए जा रहा है। मा. महापौर मॅडम एक विशेष सभा लावा. विषय संपवून टाका.

**मा. आयुक्त :-**

मा. महापौर महोदय, प्राप्त परिस्थितीमध्ये मघाशी मी सांगितलेल्या पध्दतीने जोपर्यंत विधीवत अर्थसंकल्पाला मान्यता मिळत नाही. तोपर्यंत मा. आयुक्ताचे बजेट हे अंतिम असेल. ह्यापूर्वी जे बजेट पारित करण्यात आले आहे ते विखंडीत करण्यासाठी आपण राज्यशासनाकडे पाठवले आहे. मी स्वतः त्या विषयावर लवकर निर्णय करण्यासाठी पाठपुरावा करत आहे. अपेक्षा आहे शासन त्यावर लवकरच निर्णय करेल. दरम्यानच्या कालावधीत ह्या तातडीच्या बाबीवर खर्च करण्यासाठी आयुक्तांनी जे बजेट सादर केलेले आहे किंवा आयुक्तांचे जे बजेट आपण वापरत आहोत विदीन दॅट लिमीट रि-ॲप्रोप्रिएशनला आम्ही मान्यता मागितली आहे. त्याला कृपया मान्यता द्यावी.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

हा विषय रितसर आला आहे की चूकीचा आला आहे त्याचा खुलासा करा.

**नगरसचिव :-**

रितसर अजेंड्यावर येणार २ के असा फरक आहे. २ के च्या नियमानुसार आलेला आहे. २ के च्या नियमानुसार रितसर आहे.

**नरेंद्र मेहता :-**

आता तुम्ही विषय वाचला. सभागृहाचे मत पाहिजे. आम्ही दिले विषयपत्रिकेवर येऊ द्या.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, हा "क" खाली जो आपण विषय आणतो हे निट लक्षात येत नाही आमच्या माहितीनुसार "क" खाली येणारे विषय तेवढे आपत्कालीन व्यवस्था म्हणून मान्यता घ्यायची असते. तेवढेच विषय "क" खाली येत असतात, गेल्या वेळी पाईप लाईन टाकायचा विषय आला तेव्हा आम्ही जीव तोडून

सांगत होतो की, हा "क" खालचा विषय नाही ही रितसर पाईप लाईन टाकणे हा विषय "क" खाली न घेता रितसर आणा. आता परत आज "क" खाली आणला. सार्व. कामासाठी कोणत्याही पक्षाचा कोणत्याही नगरसेवकाचा विरोध असायचे कारण नसते. पण ह्याच्यात कन्फ्यूजन वाढत चालले आहे. "क" चा वापर रितसर होतो लोकांसाठी होतो. गैरसोय होते. आमच्या सारख्यांना त्याच्यात समाधान मिळत नाही. हा जर १० करायचे आणि १५ करायचे हा फरक होत चालले. अजेंड्यावर हा विषय घेऊ शकलो असतो. जेसलपार्कच्या निधीसाठी आपण तरतूद केलेली आहे. तरी कमी पडले तर तो ही घेऊ शकतो. मग तो "ज" खालीच आणायला पाहिजे होता का? जर प्रशासन जागृत आहे, नगरसेवक, सभागृह जागृत आहे तर मग असे विषय येतात का? "ज" खालचे विषय आपत्कालीन म्हणून आहेत. ही आपत्कालीन व्यवस्था नाही. स्टँडिंगमध्ये ठराव केला होता कोणाच्या प्रतिष्ठेचा विषय करुन नका हे १० हे १५ काम घ्या त्यांच्या सुचना घ्या. तुमचाच पैसा तुम्हीच वापरता फक्त त्याला हेड दिला आहे की, हा नगरसेवक निधी हा प्रभाग निधी आमच्या परवानगीने तुम्ही वापरत नाही तुमचीच परवानगी आहे. आम्ही कोणतेही काम सुचवले तुम्हीच मंजूरी देतात. तरी तो अशा पध्दतीने येतो. बघा कसा मार्ग काढायचा. आमचा सहमत आहे हे सभागृह निर्विवाद खूशीखूशीने चालले पाहिजे.

**मा. आयुक्त :-**

प्रशासन आणि आपण वेगळे नाहीत. मी आपल्या सोबतच आहे. सातत्याने माझ्याकडे विविध नगरसेवकानी मागणी केली की आम्हाला नगरसेवक निधी, प्रभाग निधीमध्ये रकमा फार कमी आहेत त्यामध्ये वाढ करुन द्या आणि त्यासोबत इतर २-३ बाबी ज्या आहे ज्या मी मघाशी सांगितल्या त्याची मला तातडी वाटली म्हणून मी हा प्रस्ताव सभागृहामध्ये रि-ॲप्रोप्रिएशनमध्ये सादर केला ह्यावर सभागृहाने योग्य तो निर्णय घ्यावा.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

हा जो "ज" खालचा प्रस्ताव आहे हा तुम्ही घ्या अशी आमची मागणी आहे. रितसर असेल तर मतदान घ्या.

**नगरसचिव :-**

प्रशासनाकडून २ "क" खाली प्रस्ताव आले आहेत. एक बसेस पार्किंगसाठी आणि पूर्नःविनियोजनाचा प्रस्ताव असे दोन्ही प्रस्ताव घ्यायचे त्यासाठी सभागृहाने ३/४ मान्यता दिली तरच घेता येतील.

**नरेंद्र मेहता :-**

मा. आयुक्त महोदय, दुसरा प्रश्न होता शासनाकडे प्रलंबित आहे. शासन निर्णय देत नाही त्याच्यापूढे जाऊन आपण हा विषय देतात. हे तुम्हाला मान्य आहे का? आयुक्त महोदय आपण तो गांभियाने विचार करावा. सभागृहाचा अधिकार आहे हे सत्य आहे. आयुक्तांनी घेणे योग्य वाटत असेल तर आमची काय हरकत नाही.

**फरिद कुरेशी :-**

मा. आयुक्त साहेब जर ह्याच्यावर महासभेत चर्चा करुन डिसीजन घेतले तर हे इनलिगल होईल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

हा जो प्रस्ताव आहे हा नगरसेवक स्वेच्छा निधी, प्रभाग निधी, मिरा भाईंदर मनपातील शाळा दुरुस्तीसाठी तसेच मा. पंतप्रधान ह्यांनी सुचविलेल्या भारत स्वच्छ अभियानासाठी भाईंदर पूर्व, पश्चिम रेल्वेखालील जेसलपार्क सबवेसाठी ह्या चारही गोष्टी अत्यंत आवश्यक आणि गरजेच्या आहेत म्हणून राष्ट्रवादी असेल काँग्रेस पक्ष ह्याच्या फेवरला आहे आणि काँग्रेस पक्ष असेल आणि भारतीय जनता पार्टीने जर विरोध केला तर स्वतः मा. पंतप्रधान ह्यांच्या सुचविलेल्या भारत स्वच्छ अभियानाखाली विरोध करता असे जाहिर होते.

**नरेंद्र मेहता :-**

पंतप्रधानाच्या काळजीची गरज नाही. आम्ही काळजी घेतलेली आहे.

**शरद पाटील :-**

मा. सभागृह नेत्यांनी पक्षाचे बळावर सांगितले हाच विषय जेव्हा पहिला "ज" खाली आला तेव्हा तुम्ही विरोध केला आणि आज तुम्ही सांगता आम्ही ह्यांच्या जोडीला आहोत.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

चूकीचा आला होता म्हणून विरोध केला होता.

**फरिद कुरेशी :-**

मा. आयुक्त साहेब ह्या ठरावाला सभागृहाने मान्यता दिली तर इनलिगल ठरेल का? नियमाच्या बाहेर जात नाही तर शहराच्या उपयोगी आहे. आणि तो विषय घेण्यासारखा आहे. मा. आयुक्तांनी आणलेला विषय शहराच्या हिताचा विषय आहे तो सभागृहाने घेतलाच पाहिजे.

**जुबेर इनामदार :-**

आम्हाला ह्या विषयाच्या बाजूने मतदान करायचे आहे. कारण नियमबाह्य नसायला पाहिजे.

रसचिव :-

हे विषय घ्यायचे २ के च्या दोन्ही प्रस्तावाचे वाचन केले. अजेंड्यावर घ्यायचे असतील तर त्यांनी करायचे आहेत.

सफ शेख :-

सुचक अनुमोदक कोण आहेत.

**नगरसचिव :-**

सुचक अनुमोदक येणार नाही. हे विषय घ्यायचे असतील त्यांनी हात वर करायचे आहेत. हे प्रकरण अजेंड्यावर घ्यायचे नसतील त्यांनी हात वर करायचे आहेत. कोणी तटस्थ आहेत का?

**मा. महापौर :-**

हा विषय न घेण्याच्या बाजूने ४३ आणि घेण्याच्या बाजूने ३८ आहेत.

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २८, दि. ११/०६/२०१४, दि. २३/०६/२०१४ (दि. ११/०६/२०१४ रोजीची तहकुब सभा) रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**राजेंद्र जैन :-**

पान क्र. ८ पर मेरा पूरा एक पॅरेग्राफ है। जिसमें कर आकारणी पूस्तीका तयार करने के बारे में चर्चा की गई थी। उसपे तत्कालीन आयुक्त काकाणी साहबने यह बोला है की, कॉम्प्युटर सॉफ्टवेअर तयार किया है। उसमें आपने जो मुद्दा लिया था कर आकारणी पुस्तीका का वह पहले मॅन्युअली काम करते थे हर चीज का हार्डकॉपी रखना पडता था। अभी कम्प्युटराज कर रहे है तो कम्प्युटर प्रिंट लेके बाईंड करेंगे और उसको सर्टिफाय करेंगे तो आपके मुद्दे का निराकरण हो जाएगा। इसमें एल.बी.टी. का जो इश्यू था उसमें मिरा भाईंदर मनपा को यह मालूम नही मा. आयुक्त महोदय ने जो आश्वासन दिया था उसका निराकरण हुआ नहीं। महासभा द्वारा जो आश्वासन दिया जाता है वह कैसे पेंडींग रहता है उसका यह एक्झाम्पल है। यह करोडो रुपयो की बात है। नगरपालिका का कितना इन्कम होना चाहिए एल.बी.टी. से या किसी और चीज से वह टोटल आपके पर कर आकारणी पुस्तीका तयार नहीं है। यह बाय रुल है। स्टँडिंग कमिटी में आना चाहिए। नगरपालिका प्रशासन का काम है की कर आकारणी पुस्तीका तयार करे और उसको फायनल करे अभी मैंने जो सवाल किया की आपने कितने बिल्डर को छोडा है। उनसे एल.बी.टी. नहीं लिया है। आप कम्प्युटराईज न करे तब तक आ नहीं सकता। मैं नई टॅक्सवाली मॅडम से मिलने गया था। मैंने उनसे पूछा कितना ड्यूज है। मॅडम बोली मूझे मालूम नहीं किसको छोडा गया है। व मालूम नहीं हर काम मॅन्यूअली करेंगे जिसको चाहे उसको ले लेगे याने भ्रष्टाचार का पूरा पूरा ठिकाना मौजूद है काम करने का मंजूरी कैसे दे। मा. आयुक्त ने भाषण दिया उसका मालूम हुआ नही बात तो करनी पडेगी। मा. आयुक्त महोदय आपसे चर्चा करके मुझे अच्छा लगा। इसमें आश्वासन दिया गया है। आश्वासन की बात नही है अगर यह कम्प्यूटराइज नही हुआ तो करप्शन का लेवल कहाँ तक जाएगा। किसको कितना छूट देना नहीं देगा। आप डिमांड करेंगे की किससे नहीं लिया गया है। जो मेरा सवाल था। किस बिल्डर का आप छोडा है।

**मा. आयुक्त :-**

ह्या संदर्भात मी आपल्याशी एक मिटींग घेतो आणि आपले जे विचार असतील त्याच्यावर प्रशासन विचार करुन कारवाई करेल.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

दि. ११/०६/२०१४, दि. २३/०६/२०१४ (दि. ११/०६/२०१४ रोजीची तहकुब सभा) रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**जुबेर इनामदार :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**प्रकरण क्र. २८ :-**

दि. ११/०६/२०१४, दि. २३/०६/२०१४ (दि. ११/०६/२०१४ रोजीची तहकुब सभा) रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे.

**ठराव क्र. ३३ :-**

दि. ११/०६/२०१४, दि. २३/०६/२०१४ (दि. ११/०६/२०१४ रोजीची तहकुब सभा) रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांतामध्ये मा. सदस्य यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यांसह इतिवृत्तांत कायम करण्यांत येत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील अनुमोदक :- श्री. जुबेर इनामदार**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही /-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. २९, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २०(३) अन्वये मा. स्थायी समितीच्या रिक्त होणाया निम्मे आठ (८) सदस्यांच्या जागी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २०(५) अन्वये नविन आठ (८) सदस्यांची नेमणूक करणे. निवृत्त होणाऱ्या सदस्यांची नावे खालीलप्रमाणे १) श्रीम. अनिता जयवंत पाटील २) श्री. राजु यशवंत भोईर ३) श्री. मुन्नासिंग ४) श्री. रोहिदास शंकर पाटील ५) श्री. शरद केशव पाटील ६) श्रीम. मिरादेवी रामलाल यादव ७) श्री. प्रशांत ज्ञानदेव दळवी ८) श्री. शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम

**मा. महापौर :-**

शिवसेनेच्या गटनेत्या सौ. निलम ढवण यांनी स्थायी समितीसाठी जयंतीलाल पाटील यांचे नाव दिले. गटनेते भारतीय कॉंग्रेस पक्ष जुबेर इनामदार यांनी स्थायी समितीसाठी श्री. रकवी सुहास माधवराव यांचे नाव दिले, गटनेते भारतीय जनता पार्टी श्री. शरद केशव पाटील यांनी स्थायी समितीसाठी प्रशांत केळूसकर, नयना वसानी, मोहन जाधव यांचे नाव दिले, गटनेते राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी श्री. बर्नड डिमेलो ह्यांनी स्थायी समितीसाठी स्टिवन जॉन मेंन्डोंसा, मुन्ना सिंग, नरेश पाटील यांचे नाव दिले. मी ह्या सर्व सदस्यांचे हार्दिक अभिनंदन करत आहे.

**प्रकरण क्र. २९ :-**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २०(३) अन्वये मा. स्थायी समितीच्या रिक्त होणाया निम्मे आठ (८) सदस्यांच्या जागी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २०(५) अन्वये नविंन आठ (८) सदस्यांची नेमणूक करणे. निवृत्त होणाऱ्या सदस्यांची नावे खालीलप्रमाणे १) श्रीम. अनिता जयवंत पाटील २) श्री. राजु यशवंत भोईर ३) श्री. मुन्नासिंग ४) श्री. रोहिदास शंकर पाटील ५) श्री. शरद केशव पाटील ६) श्रीम. मिरादेवी रामलाल यादव ७) श्री. प्रशांत ज्ञानदेव दळवी ८) श्री. शेख अशरफ मोहम्मद इब्राहिम

**ठराव क्र. ३४ :-**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २० (३) अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या स्थायी समितीवरील सदस्यांपैकी निम्मे आठ सदस्य माहे नोव्हेंबर २०१४ च्या पहिल्या तारखेस निवृत्त झालेले आहेत.

निम्मे आठ सदस्य निवृत्त करताना भारतीय जनता पार्टी ३, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी ३, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस १ व शिवसेना १ असे एकुण आठ सदस्य निवृत्त होणार आहेत. मा. उपसचिव, नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र. संकीर्ण २००८/४३४/प्र.क्र.१५१/२००८/नवी-२५, दि. २० ऑक्टोबर २००८ अन्वये निवृत्त होणाऱ्या आठ सदस्यांच्या जागी त्याच मान्यताप्राप्त पक्षाचे, नोंदणीकृत पक्षाचे, गटाचे, आघाडीचे किंवा फ्रंटचे नवीन सदस्य स्थायी समितीवर नेमणे अध्यारुत आहे.

निवृत्त होणाऱ्या आठ सदस्यांच्या जागी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ कलम २० (५) अन्वये नविन आठ सदस्यांची नेमणूक दोन वर्षाकरीता करण्यात येत आहे.

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | फ्रंट / आघाडी |
|---|---|---|
| १. | श्री. स्टीवन जॉन मेंडोंसा | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |
| २. | श्री. मुन्ना सिंग | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |
| ३. | श्री. नरेश पाटील | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |
| ४. | श्री. प्रशांत केळूसकर | भारतीय जनता पार्टी |
| ५. | सौ. नयना वसाणी | भारतीय जनता पार्टी |
| ६. | श्री. मोहन जाधव | भारतीय जनता पार्टी |
| ७. | श्री. सुहास रकवी | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस |
| ८. | श्री. जयंतीलाल पाटील | शिवसेना |

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ३०, महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे आरक्षण व जतन (सुधारणा) अधिनियम १९७५ अन्वये वृक्ष प्राधिकरण समितीच्या सदस्य पदासाठी नियुक्ती करणे.

**नरेंद्र मेहता :-**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ मधील प्रकरण २ नियम ३(१) अन्वये संबंधित नागरी स्थानिक प्राधिकरणाने त्या प्राधिकरणास ठरवता येईल अशा रितीने आणि मुदतीसाठी नेमण्यात आलेल्या अध्यक्ष व इतर यासह कमीत कमी ५ आणि जास्तीत जास्त १५ व्यक्तींची मिळून बनलेल्या एका वृक्षप्राधिकरणाची रचना करता येईल अशी तरतुद महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ प्रमाणे कलम

३०(७) मध्ये आहे. त्याप्रमाणे प्रथम अस्तित्वात असलेली समिती विसर्जित करण्यात येत आहे. व उपरोक्त कलमांन्वये समितीमध्ये समितीच्या रचनेत फेरफार करता येईल. त्याप्रमाणे १५ सदस्यांची समिती गठीत करण्यात यावी.

तसेच सदस्य संख्याबळा प्रमाणे तौलानिक संख्या नुसार प्रत्येक पक्षांनी त्या-त्या सदस्यांची नावे द्यावीत असा ठराव मांडण्यात येत आहे.

**शरद पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**भगवती शर्मा :-**

सचिव साहेब विषय वृक्षप्राधिकरण सदस्य को नेमणूक करने का था की, कमिटी नवि गठीत करने का था।

**नगरसचिव :-**

सदस्य नेमणूकीचा विषय होता. त्यांनी त्यांच्या कलमात ५/१५ असे म्हटले आहे. कमीत कमी ५ आणि जास्तीत जास्त १५ ठेवण्याचे सभेचा अधिकार आहे.

**नरेंद्र मेहता :-**

सचिव साहेब, कोणाचे किती किती सदस्य याची माहिती द्यावी.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

सचिव साहेब विषय क्लियर आहे. प्रशासनानी जो अजेंडा दिलेला आहे. त्याच्यामध्ये तुम्ही सांगितले आहे आणि आता ह्यांनी ठराव मांडलेला आहे. हा विसंगत आहे. ह्याचा तुम्ही खुलासा करावा.

**भगवती शर्मा :-**

इसके पहले चली आ रही थी उसमें कभी भी विषय नहीं आया की उसको विखंडीत करके १५ किया है की क्या है कलम को आपने आज यूज किया है उस कलम को यूज करके समिति बनाई है।

**नरेंद्र मेहता :-**

सभागृहाच्या माहितीसाठी सांगतो की, प्रथम मी जेव्हा महापौर म्हणून निवडून आलो. त्यावेळी आपण एकत्र होतो. आपण जे संख्याबळ दिले होते त्यावेळी सन्मा. सदस्य स्व. प्रफुल्ल पाटील साहेबांनी त्या संख्याबळाला विचारात न घेता ती समिती विर्सजीत करुन नविन गठीत केली होती. त्यावेळची माहिती घ्या. आम्ही संख्याबळाप्रमाणे दिले आहे की एवढे सदस्य घ्या. जेणेकरुन आपला सभापती येईल त्यावेळी तस बदल करुन त्यावेळी नविन दिले होते.

**यशवंत कांगणे :-**

मा. महापौर मॅडम, वृक्ष प्राधिकरण जो कमिटी आप नियुक्त करते हो त्या कमिटिचे काम काय असते. वर्षामध्ये किती मिटींग होतात. सदस्याचे काम काय? मागच्या समितीत मी मेंबर होतो त्यामध्ये एकही मिटींग झाली नाही. अशा कमिटीचा फायदा काय?

**सुहास रकवी :-**

वृक्ष प्राधिकरणच्या तीन मिटींग झाल्या. पहिली मिटींग झाली तुम्ही आलात म्हणून दुसरी तुम्ही गेलात म्हणून. अभ्यास दौऱ्याचे पैसे आपण न वापरता त्याचे टेम्पोसाठी हा निधी दिलेला आहे.

**यशवंत कांगणे :-**

वर्षातून दोनच मिटींग झाल्या पाहिजे का?

**सुहास रकवी :-**

काय करणार विधानसभा, लोकसभा............

**निलम ढवण :-**

सन्मा. सदस्यांनी उचललेला मुद्दा एकदम बरोबर आहे. वृक्ष प्राधिकरणसाठी समिती नेमून जर त्याचे इम्प्लीमेन्टेशन होत नसेल तर त्या समितींना काय अर्थ नाही. कारण वृक्ष प्राधिकरणाचा कारभार एकदम अंधाधूंद कारभार आहे. जसे पाहिजे तसे त्याचे कार्य दिसून येत नाही. मा. आयुक्त साहेबांनी वृक्ष प्राधिकरणमध्ये लक्ष घालावे. पाहिजे त्या पध्दतीची झाड नसतात. ती लावल्यानंतर झाड जगतात की मरतात त्याच्याकडे लक्ष नसते. बऱ्याच गोष्टी आहेत त्याच्यावर नियंत्रण असणे फार गरजेचे आहे. मा. आयुक्त महोदय आपण त्यात लक्ष घालावे अशी मी विनंती करते.

**नगरसचिव :-**

सुचक श्री. नरेंद्र मेहता ह्यांनी मांडलेल्या ठरावाप्रमाणे दिलेल्या सदस्यांच्या १५ संख्येप्रमाणे तौलानिक संख्या अशी येते भारतीय जनता पार्टीचे ५ सदस्य, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे ४, कॉंग्रेसचे ३, शिवसेना २ व ब.वि.आ १ अशी १५ संख्या होते. समिती गठीत करायची असेल तर ह्याप्रमाणे नावे द्यावी लागतील.

**मा. महापौर :-**

शिवसेना गटनेत्या निलम ढवण ह्यांनी वृक्ष प्राधिकरण सदस्यांची नाव प्रशांत दळवी व प्रविण पाटील, राष्ट्रीय कॉंग्रेस गटनेते जुबेर इनामदार ह्यांनी वृक्ष प्राधिकरण सदस्यांची नाव रेखा विराणी, पिसाळ मनिषा, प्रमोद सामंत, ब.वि.आ राजू भोईर ह्यांनी वृक्ष प्राधिकरण सदस्याचे नाव राजू भोईर, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी गटनेते बर्नड डिमेलो ह्यांनी वृक्ष प्राधिकरण सदस्यांची नाव रविंद्र माळी, सुरेश खंडेलवाल, आसिफ शेख,

वंदना चक्रे. भारतीय जनता पार्टीचे गटनेते शरद पाटील ह्यांनी वृक्ष प्राधिकरण सदस्यांची नाव मिरादेवी यादव, डिंपल मेहता, मदन सिंग, दिनेश जैन, सुनिला शर्मा मी ह्या सर्व सदस्यांचे अभिनंदन करत आहे.

**प्रकरण क्र. ३० :-**

प्रकरण क्र. ३०, महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडाचे आरक्षण व जतन (सुधारणा) अधिनियम १९७५ अन्वये वृक्ष प्राधिकरण समितीच्या सदस्य पदासाठी नियुक्ती करणे.

**ठराव क्र. ३५ :-**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ मधील प्रकरण २ नियम ३(१) अन्वये संबंधित नागरी स्थानिक प्राधिकरणाने त्या प्राधिकरणास ठरवता येईल अशा रितीने आणि मुदतीसाठी नेमण्यात आलेल्या अध्यक्ष व इतर यासह कमीत कमी ५ आणि जास्तीत जास्त १५ व्यक्तींची मिळून बनलेल्या एका वृक्षप्राधिकरणाची रचना करता येईल अशी तरतुद महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ प्रमाणे कलम ३०(७) मध्ये आहे. त्याप्रमाणे प्रथम अस्तित्वात असलेली समिती विसर्जित करण्यात येत आहे. व उपरोक्त कलमांन्वये समितीमध्ये समितीच्या रचनेत फेरफार करता येईल. त्याप्रमाणे १५ सदस्यांची समिती गठीत करण्यात यावी.

तसेच सदस्य संख्याबळा प्रमाणे तौलानिक संख्या नुसार प्रत्येक पक्षांनी त्या-त्या सदस्यांची नावे द्यावीत असा ठराव मांडण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. नरेंद्र मेहता अनुमोदन :- शरद पाटील**

**पक्ष/आघाडी यांच्यामार्फत वृक्षप्राधिकरण समितीवर देण्यात आलेली सदस्यांची नावे**

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | फ्रंट / आघाडी |
|---|---|---|
| १. | सौ. मिरादेवी रामलाल यादव | भारतीय जनता पार्टी |
| २. | श्रीम. डिम्पल मेहता | भारतीय जनता पार्टी |
| ३. | श्री. सिंग मदन उदितनारायण | भारतीय जनता पार्टी |
| ४. | श्री. जैन दिनेश तेजराज | भारतीय जनता पार्टी |
| ५. | श्रीम. शर्मा सुनिला सत्येंद्र | भारतीय जनता पार्टी |
| ६. | श्री. रविंद्र भिमदेव माळी | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |
| ७. | श्री. सुरेश खंडेलवाल | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |
| ८. | डॉ. आसिफ गुलाब शेख | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |
| ९. | सौ. वंदना रामदास चक्रे | राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी |
| १०. | श्री. राजू यशवंत भोईर | बहुजन विकास आघाडी |
| ११. | श्री. प्रशांत ज्ञानदेव दळवी | शिवसेना |
| १२. | श्री. प्रविण मोरेश्वर पाटील | शिवसेना |
| १३. | श्रीम. विराणी रेखा अनिल | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस |
| १४. | श्रीम. पिसाळ मनिषा नामदेव | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस |
| १५. | श्री. प्रमोद जयराम सावंत | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस |

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ३१, महिला व बालकल्याण समितीवर नऊ सदस्यांची नेमणूक करणे.

**नरेंद्र मेहता :-**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३०(१) व ३१(अ) चे तरतुदीनुसार महिला व बालकल्याण समिती गठीत करण्याची तरतुद आहे. मनपा मध्ये महिला व बालकल्याण समिती ९ सदस्यांची गठीत करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ प्रमाणे कलम ३०(७) अन्वये समितीमध्ये रचना करता येते. त्याप्रमाणे प्रथम अस्तित्वात असलेली समिती विसर्जित करण्यात येत आहे. व उपरोक्त कलमांन्वये समितीमध्ये समितीच्या रचनेत फेरफार करता येईल. त्याप्रमाणे १५ सदस्यांची समिती गठीत करण्यात यावी.

तसेच सदस्य संख्याबळा प्रमाणे तौलानिक संख्या नुसार प्रत्येक पक्षांनी त्या-त्या सदस्यांची नावे द्यावीत असा ठराव मांडण्यात येत आहे.

**शरद पाटील :-**

माझे अनुमोदन आहे.

**नगरसचिव :-**

तौलानिक संख्या भाजपा ५, रा.काँ.प. ४, काँ.आय ३, शिवसेना २, ब.वि.आ. १

**मा. महापौर :-**

महिला बालकल्याण समितीसाठी गटनेता शिवसेना निलम ढवण ह्यांनी दिलेली सदस्यांची नाव शुभांगी कोटियन, अनिता परमार, गटनेता भारतीय राष्ट्रीय काँग्रेस. जुबेर इनामदार यांनी दिलेली सदस्यांची नाव मर्लिन डिसा, भट्ट दिप्ती शेखर, शर्मिला विन्सन बगाजी, गटनेता बहुजन विकास आघाडी राजु भोईर यांनी दिलेले सदस्यांचे नाव भावना भोईर, गटनेता राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी यांनी दिलेली सदस्यांची नावे दक्षता ठाकूर, शिल्पा भावसार, सॅन्ड्रा रॉड्रीक्स, मेहरुन्नीसा सुमबंड, गटनेता भारतीय जनता पार्टी श्री. शरद पाटील यांनी दिलेली सदस्यांची नावे वर्षा भानुशाली, भगवतीबेन रावल, सुजाता शिंदे, सिमा शाह, कल्पना म्हात्रे मी ह्या सर्व सदस्यांचे अभिनंदन करते.

**प्रकरण क्र. ३१ :-**

महिला व बालकल्याण समितीवर नऊ सदस्यांची नेमणूक करणे.

**ठराव क्र. ३६:-**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३०(१) व ३१(अ) चे तरतुदीनुसार महिला व बालकल्याण समिती गठीत करण्याची तरतुद आहे. मनपा मध्ये महिला व बालकल्याण समिती ९ सदस्यांची गठीत करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ प्रमाणे कलम ३०(७) अन्वये समितीमध्ये रचना करता येते. त्याप्रमाणे प्रथम अस्तित्वात असलेली समिती विसर्जित करण्यात येत आहे. व उपरोक्त कलमांन्वये समितीमध्ये समितीच्या रचनेत फेरफार करता येईल. त्याप्रमाणे १५ सदस्यांची समिती गठीत करण्यात यावी.

तसेच सदस्य संख्याबळा प्रमाणे तौलानिक संख्या नुसार प्रत्येक पक्षांनी त्या-त्या सदस्यांची नावे द्यावीत असा ठराव मांडण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. नरेंद्र मेहता** **अनुमोदन :- शरद पाटील**

**पक्ष/आघाडी यांच्यामार्फत महिला व बालकल्याण समितीवर देण्यात आलेली सदस्यांची नावे**

| अ.क्र. | सदस्यांचे नाव | फ्रंट / आघाडी |
|---|---|---|
| १. | सौ. वर्षा गिरधर भानुशाली | भारतीय जनता पार्टी |
| २. | श्रीम. भगवतीबेन रावल | भारतीय जनता पार्टी |
| ३. | श्रीम. सुजाता रविकांत शिंदे | भारतीय जनता पार्टी |
| ४. | श्रीम. सिमा कमलेश शहा | भारतीय जनता पार्टी |
| ५. | श्रीम. कल्पना महेश म्हात्रे | भारतीय जनता पार्टी |
| ६. | सौ. भावना राजु भोईर | बहुजन विकास आघाडी |
| ७. | श्रीम. शुभांगी महिन कोटीयन | शिवसेना |
| ८. | श्रीम. अनिता भरत परमार | शिवसेना |
| ९. | श्रीम. डिसा मर्लिन मर्विन | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस |
| १०. | श्रीम. भट्ट दिप्ती शेखर | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस |
| ११. | सौ. शर्मिला विन्सन बगाजी | भारतीय राष्ट्रीय काँग्रेस |
| १२. | श्रीम. दक्षता राजेंद्र ठाकूर | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |
| १३. | श्रीम. शिल्पा कमलेश भावसार | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |
| १४. | श्रीम. सॅन्ड्रा जेफ्री रॉड्रीक्स | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |
| १५. | श्रीम. सुमबंड महरून्नीसा हारूनरशीद | राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी |

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**शरद पाटील :-**

आजची सभा २५ नोव्हेंबर सकाळी ११ वाजेपर्यंत तहकूब करण्यांत येत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**सुमन कोठारी :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

बहुमताने सभा तहकुब करीत आहे. परंतु दिनांक व वेळ मी देणार.

**नरेंद्र मेहता :-**

ठरावामध्ये बदल करण्याचा अधिकार पिठासीन अधिकाऱ्यांना नाही ह्याची दक्षता घ्यावी. मागच्या वेळेसारखे होता कामा नये. आम्ही टाईम आणि वेळ ठरवली आहे.

**मा. महापौर :-**

तहकूब सभेत जे विषय शिल्लक राहिले आहेत तेच घेणार. त्याच्यात नविन विषय घेणार नाही.

**सभा तहकुबी ठराव क्र. ३७ :-**

आजची सभा २५ नोव्हेंबर सकाळी ११ वाजेपर्यंत तहकूब करण्यांत येत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. शरद पाटील** **अनुमोदन :- सौ. सुमन कोठारी**

**ठराव बहुमताने मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**(सभा तहकुबीची वेळ दु. २.४५)**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

मा. महासभा

दि. २५/११/२०१४

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने साकेत पंपीग स्टेशनचा पाणी पुरवठा तात्पुरत्या स्वरुपाचा दिला असल्यामुळे तेथे केवळ एकच् पंप बसविण्यांत आला. परंतु सदरची यंत्रणा सुरळीत कार्यान्वीत असल्याने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने पाणी पुरवठा अखंडीत सुरु ठेवलेला आहे. हा पंप २४x७ तास चालतो. त्यामुळे या पंपात काही बिघाड झाल्यास महानगरपालिकेस दररोज २० द.ल.ली. पाणी पुरवठा कमी होऊन पाणी पुरवठयाचे तास वाढून नागरीकांच्या तक्रारी वाढण्याची शक्यता आहे. करीता साकेत पंप गृहात एक नवीन Stand by पंप बसविणे अत्यंत आवश्यक आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने दि.१२/०९/२०१४ रोजीच्या पत्राद्वारे मिरा भाईंदर महनगरपालिकेकरिता अतिरिक्त ५० द.ल.ली. पाणी पुरवठा करण्याचे मान्य केले आहे वाढीव पाणी पुरवठा लक्षात घेता साकेत येथील Stand by पंप २० द.ल.ली. ऐवजी ४० द.ल.ली. एवढया क्षमतेचा प्रस्तावीत केला आहे, जेणे करुन वाढीव पाणी पुरवठा देखील या पंपाद्वारे केला जाऊ शकेल.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजीत खर्च |
|---|---|---|
| १ | मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या साकेत पंपगृहात ४० द.ल.ली. प्रतिदिन क्षमतेचा Stand by VFD Operated In line Booster पंपाचा पुरवठा करणे, बसविणे, चाचणी देणे व कार्यान्वीत करणे या कामास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत | रु. ३,२४,७०,०३३/- |

ब) **१३५० मि.मी. व्यासाची जलवाहिनी पुरविणे व अंथरणे.**

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने दि. १२/०९/२०१४ रोजीच्या पत्राद्वारे मिरा भाईंदर महनगरपालिकेकरिता अतिरिक्त ५० द.ल.ली. पाणी पुरवठा करण्याचे मान्य केले आहे. मिरा भाईंदर शहरास सद्यस्थितीत होत असलेल्या पाणी पुरवठा जलवाहिनीची अतिरिक्त पाणी वाहून नेण्याची क्षमता नाही. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून उपलब्ध होणारे १०० द.ल.ली. पाणी मिरा भाईंदर शहरापर्यंत आणणेकरिता पाटलीपाडा ते हटकेश पर्यंत सद्याच्या जलवाहिनीस समांतर १३५० मि.मी. व्यासाची नवीन जलवाहिनी अंथरावी लागणार आहे व या अगोदर टप्पा १ मध्ये २० द.ल.ली. पाणी शहरात आणणेकरिता ओवळे ते काजूपाडा दरम्यान १३५० मि.मी. व्यासाची जलवाहिनी अंथरण्यात आली असून ऑगस्ट २०१४ मध्ये कार्यान्वीत करण्यात येऊन मिरा भाईंदर शहराच्या पाणी पुरवठयात २० द.ल.ली. वाढ झालेली आहे. परिणामी मिरा भाईंदर शहराच्या पाणी वितरण व्यवस्थेत सुधारणा झालेली आहे. सद्या टप्पा २ मध्ये अतिरिक्त पाणी पुरवठा मिरा भाईंदर शहरात आणण्याकरिता खालीलप्रमाणे जलवाहिनी टाकावी लागणार आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजीत खर्च |
|---|---|---|
| १ | पाटलीपाडा ते ओवळेगाव पर्यंत १३५० मि.मी. व्यासाची मृदुपोलादी जलवाहिनी पुरविणे व अंथरणे. | रु. १८,३८,२६,०६४/- |

वरील वस्तुस्थिती पाहता अतिरिक्त ५० द.ल.ली. पाणी घेणेकरिता वरील दोन्ही कामे हाती घेणे आवश्यक असून त्याकरिता एकूण रु. २१,६२,९६,०९७/- इतका खर्च अपेक्षीत असून सदर खर्चास व काम करुन घेण्यास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी ही सभा देत आहे.

तसेच उपरोक्त कामांकरिता संबंधीत विभागाच्या आवश्यकत्या परवानगी घेणे व त्याअनुषंगीक पुढील कार्यवाही करण्यास तसेच निविदा मागविण्यास मा. आयुक्त यांना प्राधिकृत करण्यास ही सभा मंजुरी देत आहे.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून अतिरिक्त १०० द.ल.ली. पाणी पुरवठा करण्यासाठी आवश्यक असलेली साकेत ते पाटलीपाडा व काजूपाडा ते हटकेश दरम्यान पाईप लाईन टाकणे, जलकुंभ बांधणे, जलकुंभाची पाईप लाईन टाकणे व वितरण व्यवस्था टाकणे इत्यादी कामी सविस्तर प्रकल्प अहवालास आर्थिक व प्रशासकिय मान्यता ही सभा देत आहे. तसेच राज्यशासनाच्या नगरोत्थान अभियाना अंतर्गत निधी उपलब्ध होणेकरीता हा प्रस्ताव शासनास सादर करण्यास ही सभा अनुमती देत आहे.

महानगरपालिका क्षेत्रामध्ये एकूण नळ जोडणी किती आहेत. नागरीकांना किती पाणी पुरवठा केला जातो याची माहिती मिळावी. २० द.ल.ली. पाणी वाढल्याने नागरीकांना किती प्रमाणात वाढीव पाणी पुरवठा करण्यात आला याची सविस्तर विवरण देण्यात यावे. तसेच दुसऱ्या टप्प्यामध्ये अतिरिक्त पाणी पुरवठा मिरा

भाईंदर शहरात प्राप्त होणार आहे. अतिरिक्त पाणी पुरवठा आल्यानंतर नविन नळ जोडणी देणेबाबत काय धोरण असावे याचाही अहवाल प्रशासनाने तयार करावा.

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी** **अनुमोदक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ३८, ॲन्टी करप्शन ब्युरो कार्यालयाकडून लाचलुचपत प्रकरणी अटक करण्यात आलेले महानगरपालिकेतील अधिकारी / कर्मचारी यांच्यावर मा. न्यायालयात अभियोग दाखल करणेकरीता मा. आयुक्त यांनी दिलेल्या मंजुरी प्रकरणाचे अवलोकन करणे.

**प्रविण पाटील :-**

मा. महापौर मॅडम भाईंदर पूर्व इथे अग्निशमन दलाचे काम झालेले आहे. ते मनपातर्फे केले आहे की कोणी केले आहे.

**मा. महापौर :-**

प्रकरण क्र. ३८ चे अवलोकन झालेले आहे. पुढचे विषय घ्या.

**शरद पाटील :-**

आम्ही अवलोकन कुठे मान्य करतो. आम्ही त्याच्यावर ठराव करतो.

**जुबेर इनामदार :-**

सचिव महोदय अवलोकनला ठराव कधी होतो.

**नगरसचिव :-**

अवलोकन मा. आयुक्तांनी दिलेल्या प्रस्तावाच्या विरोधात असेल तर आणा. नाहीतर अवलोकनाला मान्यता दिलेली आहे.

(सदर विषयाचे अवलोकन करण्यात आले.)

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ३९, सन्मा. सदस्या सौ. प्रभात प्रकाश पाटील यांचा दिनांक ०५/११/२०१४ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. --- अंध, अपंग, कर्णबधिर बालकांसाठी / महिलांसाठी वैद्यकिय उपचारास आर्थिक सहाय्य देणेबाबत.

**प्रभात पाटील :-**

प्रकरण क्र. ३९ च्या ठरावाचे वाचन करण्यात आले.

**जुबेर इनामदार :-**

माझे अनुमोदन आहे.

**प्रभात पाटील :-**

मा. महापौर मॅडम, मला ह्याच्यात बोलायचे आहे. मा. आयुक्त साहेब मी आपल्याशी बोलले की ह्या शहरामध्ये जी सर्वसामान्य मुल ज्या शाळामध्ये शिकतात अपंग मुलांना देखील त्याच्याबरोबर शिकता यावे म्हणून शासनाने एक प्रस्ताव तयार केला होता की अपंगाना कमी लेखले जाऊ नये व त्याच्यामध्ये न्यूनगंडत्व निर्माण होऊ नये म्हणून सर्वसामान्य मुलांबरोबर त्यांचे शिक्षण व्हावे. मात्र ते अपंग असल्यामुळे त्यांना फिजीओथेरपी देण्यात यावी. जेणेकरुन त्यांना उपचारासाठी मदत होईल. त्या अनुषंगाने फिजीओथेरपी सेंटर नवघरला काढले होते. सर्वसामान्य आणले होते ती शासनाची स्किम होती. आता त्यांना काय झाले माहित नाही. फिजीओथेरपी सेंटर बंद आहे. ते सर्व शिक्षक झेड.पी. कडे वर्ग करण्यात आले. त्यामुळे गेले चार महिने झाले फिजीओथेरपीस्ट पण नाहीत आणि सेंटर सुध्दा बंद आहे. ह्या विषयाच्या अनुषंगाने माझी विनंती आहे की, तो सुध्दा अपंग व्यक्तिचा भाग होता. मा. आयुक्तांना विनंती आहे की ती शासनाची स्किम होती. त्यांनी ती नेली किंवा त्यांचे शिक्षक ते घेऊन गेले किंवा ते सेंटर बंद केले. सेंटर आणि सामान तसेच आहे. आपण जसे संगणक चालक मानधनावर घेतले आहेत. शहरासाठी अपंग विद्यार्थ्यांच्या शारीरीकदृष्ट्या सक्षमतेसाठी ज्या गोष्टी आवश्यक आहेत. त्या आपण ठोक मानधनावर करु शकतो म्हणून मी ह्याच्यामध्ये आणखी एक गोष्ट इन्क्लूड करते की त्या विद्यार्थ्यांसाठी फिजिओथेरपीस्ट नेमण्यात यावे. आणि तो प्रकल्प पुढे चालवण्यात यावा अशी मी सुचना करते.

**प्रेमनाथ पाटील :-**

महानगरपालिका क्षेत्राचा विचार करता सन २०११-१२ या सर्व्हेक्षणानुसार शहरामध्ये अंदाजीत २,५००/- अपंग व्यक्ती आहेत. तसेच शहरामधील बालकांमध्ये कर्णबधीर असल्याचे प्रमाण वाढत आहे. व शस्त्रक्रियेचा खर्च मोठा असतो. कर्णबधीर व्यक्तींना शस्त्रक्रिया करणेकरीता सेवाभावी संस्था त्यांना आर्थिक मदत करत असतात. अंध, अपंग,कर्णबधीर यांना मदत करणेकरीता महिला व बालकल्याण समिती असून या

समितीकडून यांना आर्थिक मदत म्हणून रू.२० लाखाची तरतुद करण्यात आलेली आहे. महानगरपालिकेने ठरविलेली तरतुद ही इतर कामांसाठी असून उपचारांसाठी नाही. याकरीता मा. आयुक्त सो., यांनी प्रथम दारिद्रय रेषेखाली असलेल्या अंतर्गत अंध अपंग, कर्णबधीर व्यक्तींचे सर्वेक्षण करून त्यांच्या आर्थिक निकषाची माहिती घ्यावी. त्यांना चांगली आर्थिक मदत कशा प्रकारे देता येईल किंवा मेडिक्लेम व्दारे त्यांना उपचारार्थ लाभ देता येईल याचा परिपूर्ण अहवाल तयार करावा व याकामी गटनेत्यांची बैठक बोलवून या बैठकीमध्ये या विषयाबाबत चर्चा घेवून निर्णय घेण्यात यावा.

सदर विषय हा चांगला असल्याने हा विषय घाईघाईने सभागृहाने मंजुरी देऊ नये. उपरोक्त नमूद केलेल्या बाबींवर चर्चा होवून गटनेत्यांचे विचार व मत घेऊन सदर विषय सविस्तर अहवालासह पुढील सभेमध्ये फेरसादर करावा असा ठराव मांडण्यात यावा.

**अश्विन कासोदरीया :-**

माझे अनुमोदन आहे.

**प्रेमनाथ पाटील :-**

अंध, अपंग असे २५०० लोक आहेत. त्याच्यात कर्णबधीराचे प्रमाण जास्त आहे. त्यांना आर्थिक मदत करण्यापेक्षा जे कर्णबधीर व्यक्ती आहेत त्यांचा आपण एल.आय.सी. तर्फे मेडीक्लेम करु म्हणजे जो पैसा आहे मेडीक्लेम त्यांच्या नावावर करायचा. त्यानंतर जो खर्च लागेल तो मेडीक्लम त्यांना देऊ शकतो. त्यांना डायरेक्ट कॅश देण्यापेक्षा पॉलिसी काढून त्यांच्या नावावर ..............

**प्रभात पाटील :-**

तुम्ही म्हणता ना त्याच्यात आर्थिक दुर्बल घटकाच म्हणजे दारिद्रय रेषेखालील करायचे म्हणता त्याच्यात एक सुचना आहे मी अजून ठराव मांडला नव्हता की, शारीरीक दृष्ट्या दुर्बल व्यक्तिंना स्वयःरोजगारासाठी २० टक्के रक्कम देण्यात यावी. ठराव परिपूर्ण आहे तुम्ही लक्षात घ्या तुम्ही ह्याला उगीचच वाढवू नका. आणि ह्याच्यात असेही म्हटले आहे. दुर्बल घटक जे दारीद्रय रेषेखालील त्याच्यात मी म्हटले आहे ज्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न एक लाखापर्यंत असलेल्या तहसीलदराच दाखला इन्क्लूड आहे म्हणजे तुम्हाला असे म्हणता येणार नाही की ती लोक सक्षम आहेत. तहसीलदाराचा दाखला एक लाखापर्यंतचा किंवा राष्ट्रीयकृत किंवा सहकारी बँकाकडून त्यांनी कर्ज मंजूर केले असेल तर ते देखील त्याच्यात घेता येईल. मा. आयुक्तांना देखील अधिकार दिलेले आहेत. त्याच्यामुळे मला असे वाटते एवढी चांगली योजना आपल्या स्वतःसाठी नाही करत. एखाद्या व्याधीने ग्रस्त असलेल्या लोकांसाठी करतो आणि त्याला आज मान्यता न देता गटनेत्याच्या बैठका मला असे वाटते शहरामध्ये नाहक संभ्रम निर्माण करतो की कोणाला करायचे आहे कोणाला करायचे नाही किंवा ह्याच्यामध्ये वेळ काढूपणाचे धोरण आहे. माझी सभागृहाला विनंती आहे की, सदरचा ठराव एखाद्या व्यक्ति किंवा पक्षासाठी नसून तो संपूर्ण शहरासाठी आहे. त्याच्यामुळे तो पारीत व्हावा अशी मी विनंती करते.

**शरद पाटील :-**

मा. महापौर मॅडम, ताई आपला विषय चांगला आहे. ह्याच्यात न देण्याबद्दल कोणाचे मतही नसेल पण आपली तरतूद फार कमी आहे. ज्या तरतूदीनुसार आपण सगळ्यांना पूरे पडू शकत नाही. त्याच्यातून आपण मेडीक्लेमचा पर्याय काढला आहे. आपल्याला ह्याच्यावर विचार करायचा आहे. घाईघाईने मंजूर केला तर त्याचा दुष्परिणाम नंतर होऊ शकतो. ह्या शहरामध्ये २५०० सर्व्हे झालेला आहे. २० लाखामध्ये आपण २५०० लोकांना न्याय देऊ शकत नाही. त्यामुळे हा विषय सविस्तररित्या आणा. त्याच्यावर चर्चा होऊ द्या. मेडीक्लेमच्या माध्यमातून गेला तर सगळ्यांना फायदा होऊ शकतो. ह्याच्यात विरोध करण्यासारखा विषय नाही. ह्याच्यावर सविस्तर चर्चा करा. सल्ला मसलत करुन निर्णय घ्यावा अशी सभागृहाला आणि मा. महापौराना विनंती आहे.

**गिता जैन :-**

मी त्यांच्या मताशी सहमत आहे. फक्त एक सुचना देऊ इच्छिते एका स्टार मेडीकल कंपनीने मेडीक्लेम दिला आहे. १८०० पर इयर त्या मेडीक्लेमची रक्कम आहे दोन लाख अशा एखाद्या मेडीक्लेम संस्थेबरोबर क्लब अप करुन अपंगाना मेडीक्लेम करुन दिला नक्कीच त्यांना परहेड दोन लाख रु. भेटतील एखाद्याचा खर्च पाच लाखांचा आहे मग १५ मध्ये उरलेल्यांना करायच तर आपण सगळ्यांनाच द्यावे अशा मताची मी आहे.

**जुबेर इनामदार :-**

मा. आयुक्त महोदय ह्या विषयावर चौकशी गरजेची आहे की राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना पुऱ्या महाराष्ट्रामध्ये चालूच आहे. ती एक मेडीक्लमच आहे. दारिद्रय रेषेखालील लोकांना किंवा एक लाख पर्यंतचे जे लाभार्थी आहेत त्यांना दीड लाखापर्यंत फायदा उचलता येऊ शकतो. ह्याची शहानिशा करावी ह्यातून काही त्यांना फायदा घेता येईल.

**डॉ. सुशील अग्रवाल :-**

कर्णबधीर लोगों का विषय है और मेरे को बोलने का मौका दिया इसके लिए धन्यवाद। मेरी जानकारी है मेडीक्लेम के अंदर किस तरीके की फ्री एक्झीस्टिंग डीसीज का कव्हर अप नही होता है। फ्री एक्झीस्टिंग डीसीजन है पेन्डीयमका मेडीक्लेम नही करते है वह बिमारी के लिए सभी मुकबधीर पेशंट ऑपरेशन से ठीक

होनेवाले नही रहते। उनका जो कॅपीसीटी वह ५ टक्का १० टक्का बढाया जाता है। जो मुकबधीर लोगो की चर्चा हो रही है। उनको फिजिओथेरपी की स्पीच थेरपी का हेअरिंग हेड इनकी आवश्यकता जादा रहती है। तो मेरे हिसाब से उन लोगो के लिए मनपाने रि-अॅडमिटेशन सेंटर चालू करना चाहिए। इसके अंदर बिलो पॉवर्टी लाईन अबव पॉवर्टी लाईन का भेदभाव ना करते हुए जितने मुकबधीर पेशंट मिरा भाईंदर शहर के हद्द में आते है सभी को इन्हॉल्व करके उनके लिए रि-अॅडमिटेशन सेंटर चालू करना चाहिए। उसके बाद जो मुकबधीर आदमी इलाज से ठीक होता है तो महाराष्ट्र शासन के तरफ से ऐसे कई सेंटर चलाए जाते है। जहाँ पे कम खर्चे में उनका इलाज किया जा सकता है और उनका इलाज वहाँ जाके करवाने की जबाबदारी मनपा के आरोग्य विभाग को देनी चाहिए ऐसा मेरा प्रस्ताव है।

**प्रभात पाटील :-**

वही हम करना चाहते है।

**डॉ. सुशील अग्रवाल :-**

आपला प्रस्ताव आहे खाजगी दवाखान्यात त्यांना २५ टक्के पैसा द्यायचा सर्वच रुग्णांचा इलाज खाजगी दवाखान्यात होऊ शकत नाही. २० लाखामध्ये काय इलाज होणार आहे. खाजगी दवाखान्यात तुम्ही गेले १० लाख एका व्यक्तीचा खर्च आला. २५ टक्के दिले ५ लाख उरले. १५ लाखात तुम्ही किती लोकांना न्याय देणार? २० लाखाच्या तरतुदीत काही होणार नाही २५०० पैकी २००० लोकांचा इलाज ऑपरेशननी होणार नाही. २५०० पैकी २००० लोकांना रि-अॅडमीटेशनची गरज आहे. समाजामध्ये आणि घरामध्ये अशा लोकांची काळजी घेतली जात नाही. जर आपण वेगळे सेंटर उघडले.

**मा. महापौर :-**

प्रभात मॅडम तेच बोलल्या की एक फिजिओथेरपिस्ट ठेऊन त्यांनी कुठेतरी वी व्हिल गिफ्ट देम फिजिओथेरपी.

**प्रभात पाटील :-**

आर्थिक मदतही बोललो.

**शरद पाटील :-**

मा. महापौर मॅडम, डॉक्टरांनी दोन्ही बाजू समजावून सांगितल्या. म्हणून हा विषय एकदा चर्चा करुन पूर्ण सहमत आणि पूर्ण चर्चा करुन घेतल्यावर बरे होईल. डॉक्टर साहेबांनी सांगितले की मेडीक्लेम होत नाही आणि त्याच्यात पूर सुध्दा पडत नाही असे सांगितले.

**मा. आयुक्त सो. :-**

मा. महापौर महोदया, सन्मा. सदस्यांनी हा जो प्रस्ताव आणलेला आहे खरोखर चांगला आहे. परंतु चांगल्या प्रस्तावाचे समर्थन करताना त्यामधील बाबी नियमात बसतात की नाही हे पाहणे प्रशासनाचे कर्तव्य आहे. अंध, अपंग, कर्णबधीर बालकांना अर्थसहाय्य देणे ह्याच्याबद्दल कोणाचे दुमत असण्याचे कारण नाही. परंतु माझ्या माहितीप्रमाणे वैयक्तिक लाभाच्या योजना ज्याला आपण अर्थसहाय्य करतो त्यासाठी आपल्याकडे कुठल्याही नियमात स्पष्टपणे तरतूद नाही. त्यासाठी आपण अपंग आयुक्तालय ह्यांचे मार्गदर्शन मागू. दरम्यानच्या काळामध्ये सन्मा. सदस्यांनी जी सुचना केली राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेमध्ये ह्याचे काही लाभ घेता येईल का? मनपाच्या हॉस्पीटलमधून अशा अपंगाना कर्णबधीर आणि अंध बालकांना काही रुग्ण सेवा आणि आर्थिक सेवा देता येईल का? त्याचा आपण विचार करु.

**मा. महापौर :-**

सविस्तर माहिती घेऊन हा विषय पुढच्या सभेत घेऊ या.

(मा. महापौरांच्या आदेशाने सदरचा विषय पुढच्या सभेत घेण्याचे ठरले.)

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४०, सन्मा. सदस्या सौ. निलम हरिश्चंद्र ढवण यांचा दिनांक १०/११/२०१४ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. ---- मिरा भाईंदर शहरामध्ये होणारी अनधिकृत बांधकामे यावर कारवाई करण्यासंदर्भात.

**निलम ढवण :-**

मा. महापौर मॅडम, आपल्या मिरा भाईंदर शहराच्या अंतर्गत आपण चारच्या सहा समित्या केल्या. त्या समित्यांमध्ये त्या-त्या प्रभागातील विकास किंवा चांगल्या गोष्टी करण्यासाठी आपण समित्या देखील वाढविल्या. परंतु चांगल्या गोष्टी करत असताना तिथे काही चुकीच्या गोष्टी चाललेल्या असतील तर त्यावेळी त्या तिथल्या अधिकाऱ्यांनी त्यावर लक्ष ठेवण अधिकाऱ्यांचे काम आहे. आणि त्यानुसार आज अनधिकृत बांधकाम हा वेळोवेळी सभागृहात आलेला आहे. स्थायी समितीला आलेला आहे. परंतु त्याकडे गांभीर्यपूर्वक का लक्ष दिले जात नाही याचे उत्तर आपण जे विभागप्रमुख असतील त्यांना बोलावून घ्यावे आणि त्याप्रमाणे आज जी मिरा भाईंदरची बकाल अवस्था आहे ती अनधिकृत बांधकामामुळे होते. आधी असलेल्या लोकांना आपण आवश्यक त्या सोयी पुरवू शकत नाही असे असताना देखील मोठमोठाल्या चाळी बांधणे, मोठमोठाल्या बिल्डींग उभारण हे कितपत योग्य आहे अशा पध्दतीने जर त्या-त्या प्रभागातील अधिकारी ह्या सगळ्या गोष्टींना आणि सगळ्या अधिकाऱ्यांना माहित आहे की त्या-त्या विभागात काय चालले आहे. मग अशावेळी ते दुर्लक्ष का करतात हे अधिकारी आणि त्याच्यावर प्रभाग अधिकारी द्वितीय श्रेणीचे अधिकारी आहे आणि अशा अधिकाऱ्यावर देखरेख

करण्यासाठी अशा अधिकाऱ्यावर त्याच्यावर तृतीय श्रेणीच्या व्यक्तिचा आस्थापनात पद नसताना देखील ते पद निर्माण करुन विभागीय स्थरावर श्रीकृष्ण मोहिते ह्यांना ते पद देण्यात आले ह्या महासभेतील सर्व सदस्य माझ्या मताशी सहमत असतील जेथे जेथे हे बांधकाम केले जाते त्या संदर्भात ह्या प्रतिनिधीची देखील तक्रार असते. नागरिकांच्या देखील तक्रारी असतात परंतु त्यावर का कारवाई केली जात नाही त्याचे उत्तर विभागीय प्रमुख ह्यांनी इथे येवून द्यावे अशी मा. महापौरांना विनंती करते.

**सुहास रकवी :-**

मा. महापौर मॅडम, ह्या विषयाशी संबंधीत मी बोलतो ज्याप्रमाणे अनधिकृत बांधकाम आहेत त्याप्रमाणे धोकादायक इमारतीही ह्या शहरामध्ये आहेत. मी आयुक्तांना पत्रदेखील दिले आहे. त्या धोकादायक इमारती प्रभाग अधिकाऱ्यांमार्फत ज्या काही तोडायच्या असतील ज्या रिकामी करायच्या आहेत त्या लवकरात लवकर करा जेणेकरुन मनुष्य हानी होणार नाही. मुंबई मनपामध्ये त्याप्रमाणे झाले होते. त्यानंतर मा. आयुक्तावर ३०४ चा मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा असे काही प्रकार घडण्याच्या आधीच हा जो धोकादायक इमारती पाडण्याकरीता हे जे प्रभाग अधिकारी आहेत त्यांना सुचना द्याव्या. आम्ही सांगितल्यावर ते कारवाई करत नाही. जे चालढकल करतात किंवा स्टे येण्याची वाट बघत असतात.

**निलम ढवण :-**

मॅडम ह्या संदर्भात जे अनधिकृत बांधकाम करतात हे दलाल एवढे माजलेले आहेत ते बोलतात कोणी काय करु शकत नाही. विभागीय अधिकाऱ्याची आमची पूर्ण सेटलमेंट झालेली आहे. प्रत्येक स्क्वेअर फूटमागे २५० ते ३०० रु. चा त्यांचा रेट लागलेला असतो. अशा प्रकारची सेटलमेंट होऊन जर अनधिकृत बांधकाम वाढलेली असतील तर ती फार चूकीची आहेत. जी आतापर्यंत झालेली आहेत ती पूर्णतः तोडण्यात यावी.

**मा. महापौर :-**

मॅडम जे तुम्हाला अनधिकृत वाटत आहे ते तुम्ही पूर्ण लिस्ट कमिशनर साहेबांकडे द्या. जेव्हा पण लोकांच्या निदर्शनास येते तेव्हा ते पाठवतात किंवा माझ्याकडे येते. आम्ही कमिशनर साहेबांकडे देतो. साहेब त्याच्यावर कारवाई करतात. तुम्ही खुलासा करा की कोणते तुमच्या नजरेस आहे. तुम्ही साहेबांना द्या ह्याच्यावर १०० टक्के कारवाई होईल.

**निलम ढवण :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात ६ प्रभाग समित्या अस्तित्वात आहेत. शहरामध्ये होणारे अतिक्रमण व अनधिकृत बांधकामावर नियंत्रण ठेवण्याची व निष्काशीत करण्याची जबाबदारी पदनिश्चित अधिकाऱ्यांवर सोपविण्यात आलेली आहे. प्रभाग अधिकाऱ्यांचे प्रशासकीय कर्तव्य आहे की त्यांनी आपली जबाबदारी काटेकोरपणे व इमानेइतबाराने पार पाडावी. त्यांच्या कामकाजावर देखरेख व पत्रव्यवहार करण्यासाठी अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग आस्थापनेवर मंजूर नसतानाही मा. आयुक्तांनी सदरचा विभाग स्थापित करुन द्वितीय श्रेणीच्या अधिकाऱ्याच्या कामकाजाची जबाबदारी तृतीय श्रेणीतील कर्मचाऱ्यांवर सोपवली. या धर्तीवर शहरामधील अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम आटोक्यात येणे गरजेचे होते. लोकप्रतिनिधी, जागरुक नागरिक सातत्याने या विभागाकडे तसेच प्रभाग कार्यालयावर तक्रार करुनही कुठल्याच प्रकारची ठोक कारवाई करण्यात येत नसल्याचे प्रथमदशर्नी दिसून येत आहे. कोणतेही अनधिकृत बांधकाम व अतिक्रमण निदर्शनास आणुन दिल्याच्यानंतर विभागीय अधिकाऱ्यांनी त्यावर कारवाई करणे अपेक्षित आहे मात्र असे न करता अशा नियमबाह्य कृतींना संरक्षण देण्याचे काम विभागीय अधिकारी करत असतात.

महापालिका आरक्षण क्र. १२२ दावा क्र.आर.सी.एस. क्र. १०५/२०१० श्री. रंगबहादूर यादव विरुध्द मिरा भाईंदर महानगरपालिका याचा निकाल महानगरपालिकेच्या बाजुने लागल्याचे असूनही जा.क्र.मनपा/विधी/९६४/२०१३-१४ दि. २९/११/२०१३ रोजी विभाग प्रमुख अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम नियंत्रण यांना पत्राद्वारे विधी विभागामार्फत सुचित केलेले होते. त्याला अनुसरुन विभागीय प्रमुखांनी त्यावर कारवाई करणे अनिवार्य होते. विभागीय प्रमुख व प्रभाग अधिकारी सदरच्या भुखंडावर आजुबाजुच्या क्षेत्रामधील गोर-गरिबांच्या झोपड्या हटविण्यासाठी नमूद ठिकाणी जात असतानाही सदरचा भूखंड ज्याचा दावा महापालिकेच्या बाजुने निकाल लागलेला असतानाही कारवाई जाणीवपुर्वक केलेली नाही व याची जाणीव वेळोवेळी पदाधिकाऱ्यांनी मा. आयुक्तांना लेखी व मा. महासभा सभागृहातही सुचित केलेले होते. अशा अनेक प्रभागांतर्गत विविध ठिकाणी अनधिकृत चाळी बांधणे, इंडस्ट्रीयल गाळे बांधणे व इमारती बांधणे व वाढीव बांधकाम करण्याचे कामदेखील सुरु आहे. सध्या झालेली भाईंदर (पुर्व) विभागातील जय अंबे इंडस्ट्रियल इस्टेट, प्रभाग ५ धनलक्ष्मी इस्टेट, आर.एन.पी. पार्क ओस्तवाल बगीच्या समोर, जैन नगर, शिवशक्ती नगर, आझाद नगर, गोडदेव गाव, हनुमान नगर, मिरा गावठण, काशी गाव, माशाचा पाडा, मांडवी पाडा, चेना ब्रिज चाळी बांधलेल्या आहेत या सर्वांवर कारवाई करणे व त्या संदर्भात विविध तक्रारी असतानाही त्यावर तोडक कारवाई केली जात नाही. या सर्व तक्रारींच्या आधारे दि. १९/०८/२०१४ मा. स्थायी समितीमध्ये प्रकरण क्र. ७४ ठराव क्र. ७१ अन्वये अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाचे प्रमुख श्री. श्रीकृष्ण मोहिते यांना निलंबन करण्याचा ठराव बहुमताने करण्यात आला. शहराचे हीत लक्षात घेता, ठरावाची अंमलबजावणी करणे मा. आयुक्तांकडे अपेक्षित होते मात्र आज दिनांकापर्यंत त्यावर कारवाई करण्यांत आलेली नाही. जेणेकरुन दोषी अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांचे मनोबल वाढत चाललेले आहे. यामुळे दिवसेंदिवस मिरा भाईंदर शहर हे

[illegible]

बकाल होत चाललेले असून नागरीकांच्या समस्यादेखील तितक्याच वाढलेल्या आहे परिणामी गोर-गरिब, असुशिक्षित जनतेची फसवणुक होऊन बळी जाते.

मिरा भाईंदर शहरामध्ये वाढत असलेल्या व अस्तित्वात असलेल्या अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम यांना संरक्षण देणाऱ्या व कर्तव्यामध्ये हयगय, कसुर करणाऱ्या प्रमुख अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग श्री. श्रीकृष्ण मोहिते तसेच सर्व प्रभाग अधिकाऱ्यांवर महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६(२फ) अन्वये निलंबनाची कारवाई करण्यात यावी तसचे ३९७ अ (२) या अधिनियमाच्या तरतुदीच्या विरोधात सुरु असलेले अनधिकृत बांधकामाविरुध्द या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी असा मी ठराव मांडत आहे. सोबत अनधिकृत बांधकामाची यादी जोडली आहे. ती पूर्णतः तोडक कारवाई करावी.

**तारा घरत :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**शिल्पा भावसार :-**

मा. महापौर मॅडम, आपल्या परवानगीने माझे असे मत आहे की मिरा भाईंदर शहरामध्ये अनधिकृत बांधकामावर कारवाई करण्यात यावी. आम्ही २६/११/२०१२ आणि १८/०१/२०१३ अशी तीन पत्र आम्ही पण दिलेली आहेत. त्याच्यावर काही कारवाई केली गेली नाही ह्याच्यावर कारवाई करण्यात यावी. माझ्या वॉर्डात पण इनलिगल बांधकाम आहे. त्याच्यासाठी आम्ही नेहमी भांडण करतो. पण आम्हाला न्याय मिळत नाही. आपणास नम्र विनंती की आम्हाला न्याय मिळावा.

**सुहास रकवी :-**

मॅडम ह्या विषयाला संबंधीत धोकादायक इमारती आहेत त्यावरसुध्दा कारवाई करावी.

**फरिद कुरेशी :-**

मा. महापौर मॅडम, ह्या विषयावर मला पण आपल्या निदर्शनास आणायचे आहे मॅडम हा इनलिगल कन्स्ट्रक्शन बाबत मुद्दा आहे. पण अशा इमारती आपल्या शहरात माझ्या वॉर्डात आहेत त्याच्यावर मनपानी ऑलरेडी कारवाई केलेली आहे. पण ज्या पध्दतीने त्याच्यावर कारवाई झालेली आहे. अर्धवट तोडून सोडून दिलेले आहे. तो कोर्टाचा विषय आहे किंवा मनपाचे त्याच्यावर कंट्रोल आहे किंवा नाही हा प्रश्न निर्माण झालेला आहे. अशा इमारतीच्या कारणाने जे लिगल आणि आजूबाजूचे स्ट्रक्चर आहेत त्यांना धोका निर्माण झालेला आहे. त्याच्यावर कारवाई करण्यात यावी. ही सुचना ह्याच्यात घ्यावी ही विनंती.

**दिनेश जैन :-**

मा. महापौर मॅडम, मैंने नगररचना विभाग को एक माहिती के लिए लेटर दिया था उसमें मैंने चार सवाल पूछे थे। शांतीनगर पूरा एक लेआऊट है। उसके अंदर किधर आर.जी. किधर डेव्हलप करना है, कितना परसेंट छोडना है। मैंने बोला था यहाँ पे कितना एरिया है। उसके अंदर कितना डेव्हलप होगा कितना आर.जी. छूटेगा। उसका मुझे आजतक जवाब नही मिला। मुझे एक नकाशा दिया है की, ऐसा ऐसा है। इसके अलावा जो बिल्डींग बने है उसके बाजू में कितना फूट छोडके दूसरे कन्स्ट्रक्शन को परमिशन देना चाहिए वह माहिती मुझे अभी तक नहीं मिली। माहिती नही मिलेगी हम विषय को कैसे लेके आऐंगे। नगररचना विभाग माहिती बराबर नही देगी तो हमारे यहाँ जो इनलिगल काम हो रहे है वह विषय हम कैसे लेके आयेंगे। वह माहिती मुझे जल्दी से जल्दी मिले।

**प्रशांत दळवी :-**

मा. महापौराच्या परवानगीने बोलतो महापौर मॅडम आपल्या निदर्शनास आणू इच्छितो की, शांतीनगर वसाहत जी आहे त्यामध्ये ११ सेक्टर आहेत. चार माळ्याच्या टोटल ७५० इमारती आहेत. आज वस्तूस्थिती अशी आहे ज्या-ज्या सोसायटी झालेल्या आहेत त्या सोसायटी होण्यापूर्वी ज्या बिल्डरकडे होत्या त्या हस्तांतरीत करण्यात आल्या आणि त्या सोसायटी झाल्या आहेत. त्या सोसायटी बिल्डरकडे असताना काही अंतर्गत फेरबदल करण्यात आलेले आहेत. महापौर मॅडम हा फार गंभीर विषय आहे. ज्यांची बाल्कनी आहे तिकडे शेड टाकली आहे. काहीनी अंतर्गत बदल म्हणजे कॉलमला हात नाही लावला परंतु त्यांची जी गॅलरी आहे त्या गॅलरीचा भाग थोडा पूढे घेण्यात आला आहे. काही सोसायटीने आपल्या प्रिमायसेसमध्ये वॉचमनसाठी कॅबीन बनवली आहे. पंपरुम बनवले आहे इथेही शेड टाकून बांधकाम केले आहे तेही अनधिकृत आहे. प्रत्येक वेळेला असे वाटते की सेक्रेटरी चेअरमन दोन वर्षासाठी तीन वर्षासाठी असतात. परंतु सेक्रेटरी चेअरमन बदली झाले. त्यावेळी त्यांच्यावर परत कारवाई करावी. अशा प्रकारची किती पत्र प्रभागामार्फत प्रभाग अधिकाऱ्याला दिली जातात. नगरसेवकांना दिली जातात. सहसा नगरसेवक कॉ.ऑप. सोसायटीमध्ये इन्टरफेअर करत नाही. परंतु असे काही अनधिकृत बांधकाम करतात त्याच धोरण निश्चित करणे गरजेचे आहे असे प्रत्येक वॉर्डात असतील असे नाही. परंतु शांतीनगर वसाहतीत हा प्रॉब्लेम नेहमीच दिसूनयेतो. ग्राऊंड फ्लोर असला की तिथे भिंत तोडून तिथे शटर घालायचे तिथे कर्मशियल बिझनेस चालू ठेवायचे जे कोण मानधन देतात ती सोसायटी त्यांच्या विरोधात तक्रार करत नाही. परंतु सोसायटीचे चेअरमन, सेक्रेटरी स्वतःचा पर्सनल रोष दाखवण्यासाठी त्या ठिकाणी अनधिकृत बांधकामावर कारवाई करावी अशा प्रकारची पत्र त्या प्रभारी अधिकारीला देण्यात येतात. मा. महापौर मॅडम माझ्याकडे सेक्टर एकची फाईल आहे.

**मा. महापौर :-**

दळवी साहेब तुमच्याकडे जे आहे ते कमिशनर साहेबाकडे घेऊन या निश्चितच त्याच्यावर कारवाई होईल.

**प्रशांत दळवी :-**

मॅडम मी समजू शकतो परंतु ह्या ज्या इमारती आहेत माझ्या म्हणण्याचा उद्देश एवढाच आहे की प्रत्येक वेळेला जो कोणी स्टे टाकेन पत्रा टाकेल त्यांच्या बाल्कनीवरती अशी हजारो पत्र प्रभाग अधिकारीना येत असतात. काही तरी धोरण निश्चित करा. आपले धोरण महासभेत ठरवले जाते की दुकानदारांनी ३ फुट पत्राची शेड लावावी. धोरण किती कालावधीसाठी असते की दोन महिने झाले की येरे माझ्या मागल्या. त्यानी ६-६ फुट १०-१० फुट पत्रे पूढे वाढवले आहेत. त्या गटारावर पत्रे टाकून अनधिकृतपणे आपला व्यवसाय राजरोसपणे सुरु करतात यावर कुठेतरी नियंत्रण आणावे अशी माझी तुम्हाला विनंती आहे.

**मा. महापौर :-**

ठिक आहे.

**निलम ढवण :-**

जेव्हा ती बांधकाम चालू असतात त्यावेळी तक्रारी आल्यावर ताबडतोब तोडल तर ती कारवाई म्हटली जाईल. परंतु तक्रारी करुन त्यांना वेळ दिला जातो. त्यावर स्टे घेतला जातो आणि राजरोसपणे ती लोक फिरत असतात एवढ अनधिकृत बांधकाम करुन देखील स्टे घेण्याची वेळ जो कोणी देईल त्या अधिकाऱ्यावर देखील कारवाई करत जा. आयुक्त साहेब ह्यावर गांभिर्यपूर्वक कारवाई करावी अशी अपेक्षा आहे. ह्यापूढे अनधिकृत बांधकाम करण्याची कोणाची हिंमत होणार नाही ह्याची आपण काळजी घ्या.

**मर्लिन डिसा :-**

मॅडम ज्या अनधिकृत इमारती तोडलेल्या आहेत. त्या अर्धवट तिथेच आहेत. ॲन्टी सोशल एलिमेन्टस आणि बायग्रेन्ट वर्कस तिकडे येऊन सांगतात. रात्रीच्या वेळी लॉटस ऑफ इट ईज ॲन्ड अल्कोहोलिक ड्रग्ज ॲडीक्शन ऑन गोईंग ऑन तर तिकडे लक्ष ठेवावे. तसेच कितीतरी गॅरेजेस आहेत सोसायटीच्या बाहेर बिकॉज इन ट्रॅफिक जाम खूप गॅरेजेस आहेत. शितल नगर ले आउटमध्ये आम्ही सांगितलेले आहे. २५ वर्षापासून ते लेआऊट आर.जी. प्लॉट ओपन आहेत. काय केलेले नव्हते २००९-१० मध्ये खूप प्रयास करुन ७३२ आर.जी. प्लॉट मनपाद्वारे डेव्हलप करुन घेतले होते. दुसरे जे रिक्वेस्ट केले आहे ते करुन घ्या.

**तारा घरत :-**

मा. महापौर मॅडम मी मा. आयुक्तांचे अभिनंदन करते. माझ्या इथे इंडस्ट्रीमध्ये अनधिकृत पावर स्टेशन होत ते तोडल्याबद्दल तसेच दुसरी जी तोडक कारवाई बद्दल दिलेले आहे तरी लवकरच करावी अशी विनंती.

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.)) :-**

सन्मा. महापौर महोदया, सन्मा. सदस्यांनी जो ठराव मांडला. त्याला अनुसरुन मी उत्तर देऊ इच्छितो सन्मा. सदस्यांनी जो विषय मांडला तो निश्चितपणे जिव्हाळ्याचा आणि प्रशासकीयदृष्ट्या चालू असलेली अनियमितता गावात जे काही अनधिकृत बांधकाम सुरु आहेत ती प्रशासनाला जाणीव करुन देण्याबाबत आहेत. ह्याबद्दल इथपर्यंत आम्ही आपल्या भावनाशी ठरावाशी सहमत आहोत. अनधिकृत बांधकाम हा विषय मग सभेमध्ये असेल विविध पदाधिकारी महोदयाच्या सभेमध्ये असेल मा. लोकायुक्ताकडून मनपाला प्राप्त होणाऱ्या तक्रारीद्वारे असेल मा. शासनाकडून मनपाला प्राप्त होणाऱ्या विविध निवेदन किंवा तक्रारीच्या कम्पलायन्सच्या स्वरुपात असेल विविध प्रभाग समित्यामध्ये असेल, लोकशाही दिन किंवा आठवड्यातील सोमवार किंवा गुरुवार मा. आयुक्तांनी ठेवलेल्या नागरिकांच्या दिवशी असेल येणाऱ्या एकूण तक्रारी पैकी ५० टक्के तक्रारी ह्या अनधिकृत बांधकाम आणि अतिक्रमण संदर्भात असतात ह्याची दखल प्रशासनाला नाही असे मुळीच नाही. काही अपुरेपणा निश्चित आहे. वेळोवेळी शासन स्तरावरील आणि त्या अनुषंगाने मनपाद्वारे हा अपुरेपणा दूर करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. सुरुवातीला शासनानी अशी ओरड आमच्या तर्फे झाली. अधिकाऱ्यांनी राज्य शासनाबरोबर ज्या वेळेस ह्या बैठका झाल्या त्यावेळेस असे सांगितले गेले की, अतिक्रमण काढणे हे फार जिकरीचे काम आहे. अतिक्रमण काढायला गेले तर सर्वप्रथम कोण विरोध करत असेल तर संबंधीत प्रभागाचे नगरसेवक मग शासनाने तो ॲक्टमध्ये अमेन्टमेन्ट केली की प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष जे सदस्य अतिक्रमण निर्मुलनाला मदत करतील त्याच सदस्यत्व त्या दिवसापासून निष्काशीत झाल्याचे समजण्यात येईल. म्हणजे डीम्ड प्रोव्हजन कायद्यात आली. तरी सुध्दा अनधिकृत बांधकाम कंट्रोल झाला नाही. २००९ साली राज्य शासनानी एक उपायुक्तांपेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा अधिकाऱ्यांच्या अधिनस्थ ठेवा जेणेकरुन त्याचे कोऑर्डिनेशन प्रॉपर होईल. त्यानंतर २००९ ते २०११-१२ मध्ये मोठ्या प्रमाणावर निर्मुलन त्या विभगामार्फत होऊ शकले नाही. त्यानंतर राज्य शासनाने पदनिर्देशीत अधिकारी करण्याबाबत एक आदेश काढला आणि आपण आता कायद्यात हे काम करण्याला पात्र कोण आहे आणि ही जबाबदारी कोणाची आहे. ह्याबद्दल जबाबदारी निश्चित केली. आता विद्यमान कायदा किंवा ज्याप्रमाणे आपण जबाबदारी निश्चित केली ह्यासाठी प्रत्येक प्रभागाचे प्रभाग क्षेत्र अधिकारी आपण पदनिर्देशित अधिकारी म्हणून डेझीग्नेट केले अशा अधिकाऱ्याची नाव राजपत्रात प्रसिध्द केली आणि राजपत्रात प्रसिध्द झाल्या दिवसापासून त्या भागातील अनधिकृत बांधकाम अतिक्रमण निष्काशित करण्याचे कायद्याने जबाबदारी ह्या संबंधीत प्रभाग क्षेत्र अधिकाऱ्याची निश्चित झाली. नंतर मा. आयुक्तांच्या असे लक्षात आले की प्रभाग क्षेत्र अधिकारी ६ ठिकाणी ६ उपायुक्त १ हे मनपात ह्या

[illegible]

दोघामध्ये कुठेतरी कोऑडीनेशन असले पाहिजे किंवा आयुक्ताकडे पदाधिकारी सन्मा. सदस्य नागरिक किंवा शासनाकडून आलेल्या तक्रारी ह्याची गंभीर दखल घ्यायची आणि ह्याचा निपटारा करायचा तर ह्याच्यामधला दूवा कोणीतरी अधिकारी असणे अपेक्षित आहे. म्हणून तत्कालीन आयुक्तानी अतिक्रमण विभागाला एक मधला मार्ग म्हणून उपायुक्तांच्या अधिनस्थ आणि प्रभाग क्षेत्र अधिकाऱ्याच्या वर असा एक अतिक्रमण विभाग प्रमुख हे पद निर्माण करुन काम करण्याचा प्रयत्न केला जेणेकरुन सन्मा. सदस्याच्या नागरिकांच्या तक्रारी कमी होतील. आता ज्या काही तक्रारी प्राप्त झाल्या आहेत किंवा ज्या अनुषंगाने ठराव झाले आहेत ज्या अनुषंगाने मा. महापौर महोदया आमचे एवढेच म्हणणे आहे ह्या विभागात काय उणिवा आहेत ह्या विभागातील कामकाजामध्ये दुर्लक्षितपणे राहत आहे. काही ठिकाणी दुजाभाव केला जातो असा सुध्दा आरोप आहे. सन्मा. सदस्यांनी मेरीट टू मेरीट यादी सांगितले ह्या कामात हे बांधकाम झाले आहे. आणि ह्यामध्ये हा अधिकारी सामिल आहे तर निश्चितपणे त्या अधिकाऱ्यावर कारवाई करु आणि अनधिकृत बांधकाम निष्काशित करु. ह्याचबरोबर एखाद्या केसमध्ये अनधिकृत बांधकाम निष्काशित केले पाहिजे ही भावना सदस्यांची नागरिकांची प्रशासनापर्यंत पोहोचते निष्काशित करण्याचा प्रोग्राम सुध्दा लावला जातो. परंतु ह्या प्रोग्रामची परिपूर्ण अंमलबजावणी होण्यासाठी आपल्याला पोलिस बंदोबस्ताची गरज असते. सदस्यांनी आरक्षण क्र. १२२ बद्दल उल्लेख केलेला आहे. आरक्षण क्र. १२२ मधले आरक्षण काढण्यासाठी माझ्याजवळ पत्रव्यवहार आहे. ९ पत्र आम्ही पोलिस स्टेशनला दिली आहेत. पोलिस स्टेशनमधून लेखी कम्पलायन्स आला की आता इलेक्शनचा पिरेड चालू आहे. इलेक्शनच्या पिरेडमध्ये मॅन ऑर्डरचा प्रश्न उपस्थित होऊ शकतो. त्यामुळे आम्ही तुम्हाला आता बंदोबस्त देऊ शकत नाही. इलेक्शन संपल्यानंतर निश्चितपणे १२२ असेल, १२४ असेल जेवढ्या कम्पलेंट आल्या तेवढेच नव्हे तर प्रत्येक प्रभागातील अनधिकृत बांधकाम निष्काशित होणे गरजेचे आहे. मा. आयुक्तांनी एच.ओ.डी. च्या मिटींगमध्ये अशा प्रकारचे स्पष्ट निर्देश सर्व प्रभाग क्षेत्र अधिकारी, विभाग प्रमुख उपायुक्त, अतिरिक्त आयुक्त आणि श्री. मोहित ह्यांना सुध्दा अशा प्रकारचे निर्देश दिले आहेत. ह्यानंतर लक्षात आले की काही प्रभाग क्षेत्रिय अधिकारी एखादी कारवाई ठेवल्यानंतर ती बातमी आदल्या दिवशी लीक करतात किंवा कुठेतरी प्रशासकीय स्वरुपातील सहभाग त्यात अप्रत्यक्षरित्या असल्याचा संशय निर्माण झाला. काही बाबीमध्ये पडताळणी केली एका प्रभाग अधिकाऱ्यावर कारवाई केली. एकावर कारवाई केली म्हणज सगळीकडे ऑल व्हेल झाले असे नाही. काही प्रभाग अधिकारी बद्दल मा. महापौर महोदय, मा. सदस्य त्यांनी प्रशासनाला तक्रारी केल्या. मा. आयुक्त महोदयानी सर्व प्रभाग अधिकाऱ्यांच्या चार दिवसापूर्वी बदल्या केल्या. हे सर्व चालू केल्यामुळे गावात अनधिकृत बांधकाम वाढणार नाही असे नाही. सदस्यांनी इंटरनल चेजेंसचा एक विषय काढलेला आहे. निश्चितपणे तो सुध्दा अनधिकृत बांधकामाचा एक भाग आहे. परंतु आपण कोणतीही कारवाई करत असताना प्राधान्य ठरवणे आपल्याला आवश्यक आहे. अनधिकृत बांधकाम अतिक्रमण पाडणे ह्याचबरोबर इंटरनल चेजेंस आपण स्वतःहून शोधण्याची मोहिम किंवा पध्दत निर्माण करत नाही. आपल्याकडे तक्रार आली तर ती येणार तक्रार त्या संबंधीत सोसायटीतील सदस्याच्या आपसी वादामुळे आपल्या जवळ पोहोचते किंवा तिथे शेजाऱ्याचे माझे पटत नाही मग मी कार्यालयात पोहोचतो आणि शेजाऱ्याची भिंत पाडायला लावतो. त्या इंटरनल तक्रारीवर १०० टक्के कारवाई करायची झाली तर बऱ्यापैकी ९० टक्के सोसायटीमध्ये कुठेतरी शेड बांधले आहे किंवा दोन बालकनीच्यामध्ये चार फुटाची भिंत उभी केली आहे ह्याचा अर्थ त्याला प्रशासनाचे प्रोटेक्शन निश्चित नाही. त्याचे सुध्दा वेळोवेळी निश्काषित केलेच पाहिजे करण्यात येईल परंतु प्राधान्याने आता सध्या वॉर्ड ऑफिसमध्ये असलेली अनधिकृत बांधकाम आणि अतिक्रमण निष्कासन करण्याचा कार्यक्रम हाती घेतलेला आहे त्यामुळे कुठल्या अधिकाऱ्याला टार्गेट न करता किंवा एखाद्या विशिष्ट अधिकाऱ्याच्या विरुध्द ठराव न देता आपण जर ह्या अधिकाऱ्याने ह्या बांधकामाला प्रोटेक्शन दिले तर अशा प्रकारची विशिष्ट तक्रार दिली तर त्याची निश्चित चौकशी करु चौकशीमध्ये जे काही निष्पन्न होईल ते आपल्यासमोर ठेऊ.

(सभागृहात गोंधळ)

**निलम ढवण :-**

प्रशासन संरक्षण करते.

**जुबेर इनामदार :-**

तुम्ही निवेदन देत नाही तुम्ही त्यांचे संरक्षण करता.

**ध्रुवकिशोर पाटील :-**

असे होऊच शकत नाही.

**निलम ढवण :-**

घराची शेड एखाद्या घराच्या साईडने टाकणे किंवा बचत गटाचे स्टॉल असतात हे कसे पटकन उचलले जातात. ह्याच्यावर कशी कारवाई होते आणि अशी मोठमोठी बांधकाम आम्ही निदर्शनास आणून द्यायची मग अधिकारी कशाला बसवले आहेत. प्रभागव्हाईज जर अधिकारी त्याच्याबरोबर इंजिनिअर पण काम करतात एवढे असताना बाकीच्या नागरिकांनी ते निदर्शनास आणावे का? पोलिस बंदोबस्ताचा जो प्रॉब्लेम सांगितला जातो. बांधकाम चालू असताना देखील वेळोवेळी तक्रार करुन त्याचवेळी ते बांधकाम तोडल गेले असे प्रॉब्लेम नंतर क्रिएट होणार नाही. मग पोलिस बंदोबस्ताची काय गरज लागणार आहे. पण ते केल जात नाही नंतर त्या चाळी बांधल्या जातात. चाळीमध्ये गोरगरिब जनता कमी पैशात मिळते म्हणून वास्तव्यास येते आणि नंतर त्या चाळी आपण पाडायला जातो ती लोक कुठे जाणार? अनधिकृत बांधकामामुळे वेळोवेळी

समस्या वाढल्या आहेत. वेळोवेळी ह्यांचे दुर्लक्ष झाले आहे कारण ह्यांच्या केबीनमध्ये कायम दलाल बसलेले असतात. साहेब ह्याच्यावर दुर्लक्ष करुन चालणार नाही. वेळोवेळी ह्या विषयावर आवाज उठवून देखील का कारवाई केली जात नाही.

**वंदना चक्रे :-**

मा. महापौराच्या परवानगीने बोलते. आताच अतिक्रमण विभागाचे वरिष्ठ आहेत त्यांनी सांगितले आणि आपल्या मॅडमनी ठराव मांडला त्याच्यावर बऱ्याच लोकांनी चर्चा पण केली. विषय अतिशय गंभीर आहे. सगळ्यांना माहित आहे आम्ही सुध्दा ह्यांच्या तक्रारी करुन कंटाळलो. श्रीकृष्ण मोहिते क्लास ३ चा इंजिनियर त्याला क्लास १ क्लास २ च्या जागेवर ठेवले आहे. ह्या तक्रारी पाठीशी घालण्याचे काम श्रीकृष्ण मोहितेनी केलेले आहे. ह्या इनलिगल बांधकामाची मी अनेक पत्र दिलेली आहेत. आयुक्त साहेब आपल्याला माहित नाही आपण नविन आहात. साहेब आपण पण नविन आहात. मी पाठचा इतिहास काढला ना तर तुम्ही म्हणाल काय सगळ दाबल गेल. मी परत सभागृहाला सांगते मी हे परत काढणार आहे. पत्र देणार आहे. ह्यांनी हा ठराव मांडला साहेब आपण पाठीशी घालत आहात हे चूकीचे आहे. आपल्या मनपामध्ये त्या लेवलचा कोणी कर्मचारी नाही का? हा प्रश्न कितीवेळा उचलला. तुम्ही महापौर सत्ताधारी पक्षाच्या असताना देखील तुमच्या विरोधात मी सभागृहात बोलली आहे. हे सभागृहाला माहित आहे. मा. आयुक्त साहेब ऐकून घ्या त्यांनी जे केलेले आहे. त्यांचा पाठिंबा आहे. मी तुम्हाला पाठीमागची मोठी लिस्ट देते. मी लोकआयुक्ताला, मुख्य मंत्र्यांना, नगरसचिवाना, मंत्रालयात पत्र दिले आहे. ह्याच्यावर कारवाई करुन चौकशी करा. एवढ्या कामाची यादी दिली. इनलिगल १०० मोठ्या कामाची यादी दिली आहे. त्याचे काही झालेले नाही. हे सगळे मागच्या आयुक्तांनी पाठीशी घातले आहे. आपण काम करता आपले मी अभिनंदन करते. अशी मी तुम्हाला सुचना करते. मा. महापौर मॅडम हे झालेले आहे. उपायुक्त साहेब आपण पाठीशी घालू नका ह्याच्यावर कारवाई झालीच पाहिजे ही आमची मागणी आहे. जर होत नसेल तर त्यांनी मांडलेला ठराव सुचक आणि अनुमोदक त्याला मी सुध्दा पुढच्या महासभेमध्ये किंवा ह्याच्यावर कारवाई झाली नाही तर आम्ही सुध्दा रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाही. ही नोंद घ्यावी. ह्याचे उत्तर द्यावे. का पाठीशी घालता ह्याला कारण आहे हे सगळे मिळालेले आहेत. हे चालणार नाही. आतापर्यंत आम्ही ऐकल. जाऊ दे. जाऊ द्यायचे नाही. आम्हाला दाबल जाते. आयुक्त महोदय आपल्याकडून अपेक्षा आहे. श्रीकृष्ण मोहितेना ह्या पदावरुन कधी काढणार ह्याचे उत्तर द्या.

**मा. महापौर :-**

मी साहेबांना सांगितले आहे. सर्व वॉर्ड ऑफिसरच्या बदल्या झालेल्या आहेत. असे दुसऱ्या अधिकाऱ्याचे पण होणार आहे. साहेब आले तेव्हा आचारसंहिता लागली त्या पिरेडमध्ये बदली होत नाही. म्हणून ते थांबवले सर्व स्टाफ, अधिकारी ड्यूटीवर होते. आता सर्व संपले आहे आणि साहेब पण आले आहेत.

**वंदना चक्रे :-**

जे इंजिनिअर वॉर्ड ऑफिसरच्या खाली काम करतात त्यांच्या देखील बदल्या व्हाव्याअशी माझी सुचना आहे.

**मा. महापौर :-**

ऑलरेडी सांगितले आहे.

**प्रमोद सामंत :-**

मा. महापौर मॅडम प्रशासनाला असे अपेक्षित आहे का की, आम्ही तक्रार केल्यावर ते कारवाई करणार.

**मा. महापौर :-**

सामंत साहेब काकाणी साहेबाची बदली झाली आता लाखे साहेब आले. लाखे साहेब जुलैमध्ये आले त्या लोकांनी सांगितले गीव अ सम टाईम. त्याच्यानंतर आचारसंहिता लागली त्यांनी हाती घेतले आणि चांगले काम चालू आहे. आणि ते करणार आहेत.

**प्रमोद सामंत :-**

आम्हाला मान्य आहे पण आता सांगितले की, स्पेसिफिक तक्रार द्या. प्रशासनाला असे अपेक्षित आहे का की आम्हीच तक्रारी करायच्या मगच ते अनधिकृत बांधकामावर कारवाई करणार असे कुठे अपेक्षित आहे का? प्रशासनाला जे अनधिकृत बांधकाम चालले आहे डाचकूल पाडा, माशाचा पाडा, काशीगाव ह्या भागात जे अनधिकृत बांधकाम चालले आहे. जर चुकून कुठे आलेलो आता कुठे जातो रस्ता सुध्दा मिळत नाही. एवढे बांधकाम तिकडे झालेले आहेत. बांधकाम आम्ही जाऊन दाखवायला पाहिजे. एखाद्या बिल्डींगमध्ये ऑफिस बनवतात वेगळी गोष्ट आहे. पण एवढे वेगाने बांधकाम चालले आहे ते आम्ही दाखवायला पाहिजे मग तुम्ही कारवाई करणार असे आहे का?

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.))**

असे अपेक्षित नाही.

**प्रमोद सामंत :-**

मग त्याच्यावर कारवाई करावी. कृपया कोणत्याही सदस्याकडून स्पेसिफिक तक्रार मागू नका. तुम्ही सर्व्हे करा. गेल्या दोन वर्षात कुठे बांधकाम झाले आहे. आणि त्यावर सरळ कारवाई करा.

**जुबेर इनामदार :-**

मा. महापौर मॅडम, अती महत्वाचा विषय ठरावाच्या बाजूने बोलणार आहे. हा विषय अतिक्रमण अनधिकृत बांधकाम हा शहराचा मोठा कर्करोग. करुन जाणारे करतात नागरिकांना भोगावे लागते. हे शहर आम्ही घडवला इथे राहणाऱ्या लोकांनी घडवला. प्रशासन आज आहे उद्या त्याची बदली होईल. २-३ वर्ष एका पदावर राहतो मग तो दुसरीकडे जाऊन त्याचा कार्यकाल संपवतो. त्याच्या कार्यकालात तो ज्या शहरात राहतो त्यांनी केलेल्या कामाचा मोठा परिणाम ह्या शहरावर होतो. चांगल केल तर त्याच आम्ही अभिनंदन करु. वाईट केल तर त्याचा दुष्परिणाम ह्या शहराला भोगावा लागेल. ह्या सभागृहात अर्ध्या तासापूर्वी आम्ही अभिनंदन केले. वाईट काम केले तर त्याची गचांडी पकडणारच. मा. आयुक्त महोदय निलम ढवणनी जो ठराव मांडला आहे. त्याच्यामध्ये स्पष्ट उल्लेख केलेला आहे. काय कारणामुळे श्रीकृष्ण मोहिते ह्यांचे निलंबन करावे. ५६ अन्वये त्याच्यावर कारवाई करावी. नाव एवढ चांगल त्याच्यापुढे लागलेले साहेबांनी सांगितले धुव्वा त्यानी शहराचा पूर्ण धुव्वाच उडवला आहे. धुव्वा कशाला प्रभाग अधिकारी आणि मध्ये सेटटमेंट करुन देण्यासाठी ठरावामध्ये उल्लेख केलेला आहे. २०१२ मध्ये विधी विभागाने एक पत्र पाठवले होते की सदरच्या भुखंडावरचा न्यायालयाचा दावा संपुष्टात आलेला आहे. तुम्ही त्यावर कारवाई करा. २०१३ पर्यंत त्याच्यावर कारवाई झाली नाही. रोज जाऊन त्याच परिसरामध्ये आजूबाजूचे क्षेत्र मनपाचे आरक्षण झोपडपट्टी तोडण्यासाठी हा व्यक्ति जाऊ शकतो. प्रभाग अधिकारी जाऊ शकतो. प्रभाग अधिकाऱ्यांची रोज बदली होते. ह्याची होत नाही. जो अतिक्रमण हटवायला पाहिजे हे न्यायप्रविष्ठ होता. पालिकेने त्याच्या मागे खर्च केला. वकिलाचा खर्च केला, ताकद लागली, टाईम लागला, पैसे लागले. परंतु तो अतिक्रमण त्यांनी हटवला नाही. शेवटपर्यंत तुमच्याकडे वारंवार तक्रार करुनही तुमचे तत्कालीन आयुक्त, तुमच्या आधी असणारे त्यानंतर तुम्ही साहेब हा विषय इथे संपत नाही. आम्ही वारंवार प्रभाग अधिकाऱ्यांवर तक्रारी करत असतो की त्याच्या प्रभागामध्ये होणारे अतिक्रमण प्रभाग अधिकारी हटवत नाही. निष्काशीत करत नाही. फेरिवाल्याचे अतिक्रमण संपत नाही. साहेब लोकप्रतिनिधी आपली भुमिका मनापासून मांडतात. आता साहेबांनी सांगितले शासनानी नियम काढले लोकप्रतिनिधीमध्ये आले तर त्यांचे पद निलंबित होऊ शकते. अनधिकृत बांधकाम किंवा अतिक्रमण हटवण्याच्यामध्ये आले तर त्याचे पद निलंबित करु शकता. पदाधिकारी मध्ये येत नाहीत आणि ते आले तर तुम्हाला त्याचा अधिकार आहे. ह्या महाशयानी पत्र दिलेले की मला मोठमोठ्या नेत्यांचे फोन येतात मग त्यानी तसे स्पष्टीकरण करावे की, अनधिकृत बांधकाम थांबवण्यासाठी कोणत्या अधिकाऱ्याचे फोन येतात कारण अनधिकृत बांधकाम करुन जाणारे करतात. नागरिकांना भोगावे लागते. साहेब ह्या विषयासाठी स्थायीमध्ये ठराव करुन देण्यात आला की सदर व्यक्तिचे निलंबन करण्यात यावे. ठरावाला ६५१ खाली विखंडीत करायला पाठवले. त्या पत्रामध्ये उल्लेख केला मला त्याच्यामध्ये काय कारणामुळे हा ठराव करण्यात आला त्याची माहिती अपुरी आहे. साहेब उपमहापौरांनी तुम्हाला पत्र दिले ह्या शहराचे प्रथम नागरिक मा. महापौर मॅडमनी पत्र दिले. तरीही ह्या पत्रात जवाब किंवा उल्लेख आम्हाला मिळाला की तसे करण्यात आलेले नाही. साहेब त्याचे तुम्हाला प्रत्युत्तर दिलेले आहे की आम्ही तुम्हाला सुचित केल होत. आमची भुमिका स्पष्ट आहे की अशा अधिकाऱ्याच्या पाठीशी तुम्ही उभे राहू नका. तुम्ही प्रशासनाचे प्रमुख आहात. अशा अधिकाऱ्याच्या पाठीशी उभे राहीलात तर पूर्ण प्रशासन कोलॅप्स होईल जो तो ज्याला जसे वाटेल तसे करेल. म्हणून मी आपल्याला विनंती करु इच्छितो महासभेने ठरावाच्या माध्यमातून तुमच्या समोर तो विषय आणलेला आहे. हा विषय तुमच्या दालनामध्ये मांडला होता. आणि त्या दिवशी मला पत्र प्राप्त झाले हा व्यक्ति ५ तारखेला एक असा पत्रकार ज्याच्यावर ॲन्टीकरप्शनची केस चालू आहे. जो बेलवर बाहेर आहे त्या व्यक्तिला घेऊन उत्तन परिसरात फोटो काढत फिरत होता. त्या विषयावर सदरच्या व्यक्तिने पोलिस स्टेशनला तक्रार नोंदवली आहे. अशा व्यक्तिबरोबर सुट्टीच्या दिवशी त्याला तुम्ही काम सोपवले तर त्यांनी करावे परंतु असा व्यक्ति त्याच्या बरोबर का? ज्याच्यावर ॲन्टीकरप्शनची केस आहे आणि तो ॲन्टी सेफेस्ट्री बेलवर जो बाहेर आहे. अशा व्यक्तिला घेऊन त्या परिसरात जाण्याचे काम कारण आहे. त्यांना विचारल्यावर त्यांनी होकार दिला मी घेऊन गेलो होतो. त्याचे काय कारण आहे. अशी टोकाची भुमिका घेण्याचे कारण काय? विषय स्पष्ट आहे. कोणाची तरी सुपारी घ्यायची आणि ही काम करायची अशा व्यक्तिला प्रशासनापासून चांगल्या कामापासून दूर ठेवा. नाहीतर प्रशासनावर डाग लागेल तुम्ही प्रशासनाचे हेड आहेत तर तुमच्यावर लागेल. केलेल्या ठरावावर सर्व सभागृह त्यांच्या बरोबर आहे. त्या विषयाची अंमलबजावणी व्हावी अशा अधिकाऱ्यावर सक्तीची कारवाई करावी.

**मा. महापौर :-**

ठराव सुचनेसहीत मंजूर करण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. ४० :-**

सन्मा. सदस्या सौ. निलम हरिश्चंद्र ढवण यांचा दिनांक १०/११/२०१४ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. -- मिरा भाईंदर शहरामध्ये होणारी अनधिकृत बांधकामे याबर कारवाई करण्यासंदर्भात.

**ठराव क्र. ४४ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात ६ प्रभाग समित्या अस्तित्वात आहेत. शहरामध्ये होणारे अतिक्रमण व अनधिकृत बांधकामावर नियंत्रण ठेवण्याची व निष्काशीत करण्याची जबाबदारी पदनिश्चित अधिकाऱ्यांवर सोपविण्यात आलेली आहे. प्रभाग अधिकाऱ्यांचे प्रशासकीय कर्तव्य आहे की त्यांनी आपली

जबाबदारी काटेकोरपणे व इमानेइतबाराने पार पाडावी. त्यांच्या कामकाजावर देखरेख व पत्रव्यवहार करण्यासाठी अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग आस्थापनेवर मंजूर नसतानाही मा. आयुक्तांनी सदरचा विभाग स्थापित करुन द्वितीय श्रेणीच्या अधिकाऱ्याच्या कामकाजाची जबाबदारी तृतीय श्रेणीतील कर्मचाऱ्यांवर सोपवली. या धर्तीवर शहरामधील अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम आटोक्यात येणे गरजेचे होते. लोकप्रतिनिधी, जागरुक नागरिक सातत्याने या विभागाकडे तसेच प्रभाग कार्यालयावर तक्रार करुनही कुठल्याच प्रकारची ठोक कारवाई करण्यात येत नसल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. कोणतेही अनधिकृत बांधकाम व अतिक्रमण निदर्शनास आणुन दिल्याच्यानंतर विभागीय अधिकाऱ्यांनी त्यावर कारवाई करणे अपेक्षित आहे मात्र असे न करता अशा नियमबाह्य कृतींना संरक्षण देण्याचे काम विभागीय अधिकारी करत असतात.

महापालिका आरक्षण क्र. १२२ दावा क्र.आर.सी.एस. क्र. १०५/२०१० श्री. रंगबहादूर यादव विरुध्द मिरा भाईंदर महानगरपालिका याचा निकाल महानगरपालिकेच्या बाजुने लागल्याचे असूनही जा.क्र.मनपा/विधी/९६४/२०१३-१४ दि. २९/११/२०१३ रोजी विभाग प्रमुख अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम नियंत्रण यांना पत्राद्वारे विधी विभागामार्फत सुचित केलेले होते. त्याला अनुसरुन विभागीय प्रमुखांनी त्यावर कारवाई करणे अनिवार्य होते. विभागीय प्रमुख व प्रभाग अधिकारी सदरच्या भुखंडावर आजुबाजुच्या क्षेत्रामधील गोर-गरिबांच्या झोपड्या हटविण्यासाठी नमूद ठिकाणी जात असतानाही सदरचा भूखंड ज्याचा दावा महापालिकेच्या बाजुने निकाल लागलेला असतानाही कारवाई जाणीवपुर्वक केलेली नाही व याची जाणीव वेळोवेळी पदाधिकाऱ्यांनी मा. आयुक्तांना लेखी व मा. महासभा सभागृहातही सुचित केलेले होते. अशा अनेक प्रभागांतर्गत विविध ठिकाणी अनधिकृत चाळी बांधणे, इंडस्ट्रीयल गाळे बांधणे व इमारती बांधणे व वाढीव बांधकाम करण्याचे कामदेखील सुरु आहे. सध्या झालेली भाईंदर (पुर्व) विभागातील जय अंबे इंडस्ट्रियल इस्टेट, प्रभाग ५ धनलक्ष्मी इस्टेट, आर.एन.पी. पार्क ओस्तवाल बगीच्या समोर, जैन नगर, शिवशक्ती नगर, आझाद नगर, गोडदेव गाव, हनुमान नगर, मिरा गावठण, काशी गाव, माशाचा पाडा, मांडवी पाडा, चेना ब्रिज चाळी बांधलेल्या आहेत या सर्वांवर कारवाई करणे व त्या संदर्भात विविध तक्रारी असतानाही त्यावर तोडक कारवाई केली जात नाही. या सर्व तक्रारींच्या आधारे दि. १९/०८/२०१४ मा. स्थायी समितीमध्ये प्रकरण क्र. ७४ ठराव क्र. ७१ अन्वये अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभागाचे प्रमुख श्री. श्रीकृष्ण मोहिते यांना निलंबन करण्याचा ठराव बहुमताने करण्यात आला. शहराचे हीत लक्षात घेता, ठरावाची अंमलबजावणी करणे मा. आयुक्तांकडे अपेक्षित होते मात्र आज दिनांकापर्यंत त्यावर कारवाई करण्यांत आलेली नाही. जेणेकरुन दोषी अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांचे मनोबल वाढत चाललेले आहे. यामुळे दिवसेंदिवस मिरा भाईंदर शहर हे बकाल होत चाललेले असून नागरीकांच्या समस्यादेखील तितक्याच वाढलेल्या आहे परिणामी गोर-गरिब, असुशिक्षित जनतेची फसवणुक होऊन बळी जाते.

मिरा भाईंदर शहरामध्ये वाढत असलेल्या व अस्तित्वात असलेल्या अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम यांना संरक्षण देणाऱ्या व कर्तव्यामध्ये हयगय, कसुर करणाऱ्या प्रमुख अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग श्री. श्रीकृष्ण मोहिते तसेच सर्व प्रभाग अधिकाऱ्यांवर महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६(२फ) अन्वये निलंबनाची कारवाई करण्यात यावी तसचे ३९७ अ (२) या अधिनियमाच्या तरतुदीच्या विरोधात सुरु असलेले अनधिकृत बांधकामाविरुध्द या अधिकाऱ्यांवर कारवाई करावी असा मी ठराव मांडत आहे.

मागील चार महिन्यातील अनधिकृत बांधकामाची यादी खालीलप्रमाणे आहे. ती पूर्णतः तोडक कारवाई करावी.

**प्रभाग समिती क्र. ०४**

**वॉर्ड क्र. १०**

१) जय अंबे बालाजी इंडस्ट्रीज, दौलतसिंग भाटी रोड, बजरंग हॉटेलजवळ, गोडदेव नाका, भाईंदर पूर्व. २० ते २२ फूटाचे बांधकाम ४ गाळे बनवले आहेत.

**वॉर्ड क्र. १३**

१) गॅलेक्सी थरमोलेक्सच्या बाजूला, ज्योती हॉटेलच्या समोरील गल्ली, फाटक रोड, भाईंदर पूर्व. २२ ते २४ फूटाचे बांधकाम केले आहे.
२) शितल इंडस्ट्रीयल इस्टेट, फाटक रोड, श्री. रामनगरच्या समोरील गल्ली, भाईंदर (पूर्व) २२ ते २४ फूटाचे बांधकाम केले आहे.
३) एच.पी. गोडाऊनच्या बाजूला भाईंदर पूर्व २२ ते २४ फूटाचे बांधकाम केले आहे.

**वॉर्ड क्र. ४**

१) ओसवाल बागेसमोर गाला ४, आरंभी पार्क, भाईंदर पूर्व व बाजूला २

**वॉर्ड क्र. ५**

१) दळवी चाळीच्या मागे, पुष्पक इंडस्ट्रीज, नवघर रोड, युनीयन बँकेच्या समोर, भाईंदर पूर्व
२) धनलक्ष्मी इस्टेट, दळवी चाळीच्या मागे.

**प्रभाग क्र. ८ (जैन नगर)**

१) शिवशक्ती नगर आजूबाजूला चाळी बांधण्याचे काम चालू आहे.
२) गुरुद्वारा हॉल लागून त्यांचेच अनधिकृत बांधकाम १ अ १

**प्रभाग समिती ६**

१) मिरागाव, मिरा गावठण, साईबाबा मंदिर डाचकूल पाडा, काशीगाव, माशाचा पाडा, मांडवी पाडा, चेना ब्रीज, एक्सप्रेस इन हॉटेलच्या मागे मोठ्या प्रमाणावर चाळी बांधलेल्या असून कामही चालू आहे.

**सुचक :- सौ. निलम ढवण** **अनुमोदक :- सौ. तारा घरत**

**सदर ठरावात सन्मा. सदस्या सौ. शिल्पा भावसार यांनी खालीलप्रमाणे सुचना मांडली.**

मिरा भाईंदर महानगरपालिका प्रभाग क्र. ०३ चे अधिकारी (नविन प्रभाग क्र. ६) यांनी खालील दिलेल्या आदेशपत्रान्वये, अनधिकृत बांधकामावर त्वरीत कार्यवाही करण्यात यावी अशी मी सुचना मांडत आहे.

१) मिभा/मनपा/प्र.क्र.०३/अवि/८५६/२०१२-१३ दि. २६/११/२०१२
२) मिभा/मनपा/प्र.क्र.०३/अवि/८५४/२०१२-१३ दि. २६/११/२०१२
३) मिभा/मनपा/प्र.क्र.०३/अवि/१०७५/२०१२-१३ दि. १८/०१/२०१३

**ठराव सुचनेसह सर्वानुमते मंजुर**
**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही /-**
**महापौर**
**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४१, सन्मा. सदस्य श्री. शरद केशव पाटील यांचा दिनांक १०/११/२०१४ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. --- मा. पंतप्रधान यांनी घोषित केलेले स्वच्छ भारत अभियान राबविण्याकरिता निधी उपलब्ध करणेबाबत.

**शरद पाटील :-**

मा. महापौराच्या परवानगीने बोलतो. सध्या देशामध्ये स्वच्छता अभियान फार मोठ्या प्रमाणात चालू आहे. त्याच्या प्रचार माध्यमातून बऱ्याच गोष्टी चालू आहे. मा. पंतप्रधान महोदय ह्यांनी १५ ऑगस्ट २०१४ रोजी ६८ व्या स्वातंत्र्य दिवसानिमित्त औचित्य साधून आपल्या भाषणात सहकारी अजेंड्यामध्ये संपूर्ण भारतामध्ये स्वच्छता अभियान सुरु करण्याचे सुचित केले होते. भारत सप्ताह १५ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर पर्यंत राबवण्यात आली. सदर अभियान मनपा क्षेत्रामध्ये उत्तमरित्या राबविण्यात आल्यास ह्या अभियानास निधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने सदर विषय आम्ही "ज" च्या प्रस्तावाने या माध्यमाने सभागृहाच्या समोर ठेवला आहे. मा. पंतप्रधान महोदयानी स्वच्छतेचे महत्व काय असावे ह्या करिता भारतीय नागरिकांना प्रसार माध्यमातून महत्व पटवून दिलेले आहे. सभागृहामध्ये प्रत्येक सदस्य नगरसेवक ह्या स्वच्छता अभियानाखाली कोणती कामे करायची आहेत ह्याची माहिती देणे योग्य आहे ह्या शहरातील नागरिकांना सुध्दा ह्याची माहिती देण्यात यावी असे मनपानी आपल्या प्रसार माध्यमातून कराव. मा. पंतप्रधान महोदयानी घोषित केल्याप्रमाणे स्वच्छ भारत अभियानाकरिता केंद्र शासनाच्या मार्गदर्शन सुचना राज्याकडून मनपास प्राप्त झालेल्या आहेत. ह्या अभियानामध्ये नागरिकांनी कोणत्या-कोणत्या स्वच्छतेवर लक्ष घालावे ह्या सर्व गोष्टी प्रचार माध्यमातून आपल्याला माहित पडत आहेत. स्वच्छतेच महत्व फार आहे. नागरिकांना जागृत करावे अशी मी सभागृहास विनंती करतो.

मा. पंतप्रधान यांनी घोषित केलेल्या स्वच्छ भारत अभियान अंतर्गत केंद्रशासनाच्या मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने सदर अभियान राज्यात पर्यायाने महापालिकेमध्ये प्रभावीपणे राबावयाचे आहे. स्वच्छ भारत अभियान अंतर्गत शासनाने कार्यनिती कशी असावी याबाबतच्या मार्गदर्शक सुचना महानगरपालिकेस दिलेल्या आहेत. त्याप्रमाणे महानगरपालिका प्रशासन स्वच्छता अभियान राबवत आहे.

स्वच्छ भारत अभियान महानगरपालिका क्षेत्रात राबविण्याचे असल्याने या कामी पुरेसा निधी उपलब्ध असणे आवश्यक आहे. मा. पंतप्रधान यांनी घोषित केलेले स्वच्छ भारत अभियान मनपा क्षेत्रामध्ये प्रभाविपणे राबविण्याचे असल्यास निधीची सोय असणे आवश्यक आहे.

स्वच्छता अभियान राबविण्याकरिता मा. पंतप्रधान यांच्या बरोबर विविध क्षेत्रातील सामाजिक संस्था, अभिनेते, खेळाडू, राजकीय व्यक्ती यांचा सहभाग आहे. अभियान योग्य दिशेने व प्रभाविपणे राबविण्याचे असल्यास नागरिकांचा प्रत्यक्ष सहभाग अभियानात असणे आवश्यक आहे.

या अभियानाकरिता रु. ५०.०० लाखाचा निधी सन २०१४-१५ च्या अर्थसंकल्पातील शहर स्वच्छता आराखडा या लेखाशिर्षात असलेल्या तरतुदी मधून खर्च करण्यात यावा. स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत येणाऱ्या खर्चाचे सर्व अधिकार मा. आयुक्त सो, यांना या ठरावान्वये प्रदान करण्यास मंजुरी देण्यात येत आहे असा ठराव मांडण्यात येत आहे.

**प्रशांत केळूसकर :-**

माझे अनुमोदन आहे.

**भगवती शर्मा :-**

मा. आयुक्त महोदय इन्होंने जो ठराव किया है स्वच्छता का जो हेड मांडा है। वह पुराना हेड है की नया क्रिएट करना २०१४-१५ अर्थसंकल्प का हेड है। त्याच्यात तरतूद काय आहे.

**शरद बेलवटे :-**

मा. महापौराच्या परवानगीने बोलतो शहर स्वच्छता आराखड्यासाठी ५ कोटी ९५ लाख इतकी तरतूद ठेवली आहे.

**भगवती शर्मा :-**

२ के खाली तुमची काय मागणी होती. आप बढाना चाहते थे। आपने २ के खाली अंदर के अंदर में यह पंतप्रतधान की योजना समाविष्ट कर रहे थे तो वो इसमें नही बैठती है क्या?

**मा. महापौर :-**

ठराव सर्वानुमते मंजूर करत आहे.

**प्रकरण क्र. ४१ :-**

सन्मा. सदस्य श्री. शरद केशव पाटील यांचा दिनांक १०/११/२०१४ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. --- मा. पंतप्रधान यांनी घोषित केलेले स्वच्छ भारत अभियान राबविण्याकरिता निधी उपलब्ध करणेबाबत.

**ठराव क्र. ४५ :-**

मा. पंतप्रधान यांनी घोषित केलेल्या स्वच्छ भारत अभियान अंतर्गत केंद्रशासनाच्या मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने सदर अभियान राज्यात पर्यायाने महापालिकेमध्ये प्रभावीपणे राबावयाचे आहे. स्वच्छ भारत अभियान अंतर्गत शासनाने कार्यनिती कशी असावी याबाबतच्या मार्गदर्शक सुचना महानगरपालिकेस दिलेल्या आहेत. त्याप्रमाणे महानगरपालिका प्रशासन स्वच्छता अभियान राबवत आहे.

स्वच्छ भारत अभियान महानगरपालिका क्षेत्रात राबविण्याचे असल्याने या कामी पुरेसा निधी उपलब्ध असणे आवश्यक आहे. मा. पंतप्रधान यांनी घोषित केलेले स्वच्छ भारत अभियान मनपा क्षेत्रामध्ये प्रभाविपणे राबविण्याचे असल्यास निधीची सोय असणे आवश्यक आहे.

स्वच्छता अभियान राबविण्याकरिता मा. पंतप्रधान यांच्या बरोबर विविध क्षेत्रातील सामाजिक संस्था, अभिनेते, खेळाडू, राजकीय व्यक्ती यांचा सहभाग आहे. अभियान योग्य दिशेने व प्रभाविपणे राबविण्याचे असल्यास नागरिकांचा प्रत्यक्ष सहभाग अभियानात असणे आवश्यक आहे.

या अभियानाकरिता रु. ५०.०० लाखाचा निधी सन २०१४-१५ च्या अर्थसंकल्पातील शहर स्वच्छता आराखडा या लेखाशिर्षात असलेल्या तरतुदी मधून खर्च करण्यात यावा. स्वच्छ भारत अभियाना अंतर्गत येणाऱ्या खर्चाचे सर्व अधिकार मा. आयुक्त सो, यांना या ठरावान्वये प्रदान करण्यास मंजुरी देण्यात येत आहे असा ठराव मांडण्यात येत आहे.

**सुचक :- श्री. शरद पाटील** **अनुमोदक :- श्री. प्रशांत केळुसकर**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४२, सन्मा. सदस्य श्री. बर्नट डिमेलो यांचा दिनांक १०/११/२०१४ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. --- मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रम ठेकेदाराने लागू केलेली अन्यायकारक तिकीट दरवाढ रद्द करुन ती कमी करणेबाबत.

**बर्नड डिमेलो :-**

मिरा भाईंदर महापालिकेने पी.पी.पी. तत्वावर बस पुरवठा करण्याचा ठेका मे. केस्ट्रेल इन्फ्रा.प्रा.लि. या कंपनीस दि. ०९/१०/२०१० पासुन दिलेला आहे. सदर ठेकेदाराच्या कंपनीसोबत मिरा भाईंदर परिवहन उपक्रमाचा करारनामा झालेला असुन गेल्या अनेक वर्षापासुन करारनाम्याच्या कोणत्याही अटीशर्तीचे पालन सदर ठेकेदार करीत नसल्याचे निदर्शनास येत आहे. त्या गंभीर बाबी खालीलप्रमाणे आहेत.

१) करारनाम्याच्या अटीशर्तीनुसार परिवहन ठेकेदाराने महापालिकेस पी.पी.पी. तत्वावर बस सेवा चालवताना १ रु. प्रति कि.मी. प्रमाणे प्रति बस प्रति दिवस १८०/- रु. प्रमाणे जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत ५० बसेसची नियमित रॉयल्टी स्वरुपात पैसे भरणे बंधनकारक असताना सदरच्या ठेकेदाराने महापालिकेची सन २०१० ते २०१४ पर्यंत लाखो रुपये रॉयल्टी थकवलेली आहे. त्याचा भरणा ठेकेदाराकडून महापालिकेने प्रथम दंड व व्याजासहित सदरची थकीत रक्कम वसुल करावी व त्यानंतरच काही अंशी तिकिट दरवाढ लागू करण्यास परवानगी द्यावी. परंतु, जोपर्यंत ठेकेदार मनपाची थकित रॉयल्टी भरणा करीत नाही तिकिट वाढ प्रशासनाने स्थगीत ठेवावी.

२) ठेकेदाराने बस सेवा देताना प्रत्येक बसचे इन्शुरन्स, आर.टी.ओ. टॅक्स, फिटनेस तपासणी इ. कागदपत्र चालु स्थितीत ठेवणे बंधनकारक असताना सुध्दा ठेकेदार हा बसेसचे इन्शुरन्स, फिटनेस व आर.टी.ओ. टॅक्स तसेच शासनाचा प्रवासीकर अधिभार भरीत नाही त्यामुळे ठेकेदाराने वरील सर्व रक्कमेचा भरणा करुन ती सर्व कागदपत्र महापालिकेस चालु स्थितीत असल्याचे सादर करावे व तद्नंतरच तिकीट दरवाढीस मनपाने मान्यता द्यावी तोपर्यंत दरवाढ रद्द करावी.

३) ठेकेदाराने परिवहन उपक्रमाच्या बसेसचे मेन्टेनन्स दररोज चांगल्या प्रकारे देखभाल करणे बंधनकारक असताना बऱ्याच बसेस यांत्रिक बिघाडामुळे तसेच अस्वच्छ सिट फाटलेल्या, काचा फुटलेल्या अशा स्थितीत बसेस सुरु आहेत त्या सर्व बसेसचे मेन्टनन्स व वरील नमुद कामे सुस्थितीत असल्याचे मनपास लेखी कळवावे व मनपाच्या संबंधित उपायुक्ताने प्रत्यक्ष बसेसची तपासणी करुन तसा सविस्तर अहवाल मा. आयुक्त व मा. महापौर यांना सादर करावा व समाधानकारक काम न आढळल्यास सदरची तिकिट दरवाढ रद्द करावी.

४) ठेकेदाराकडे बसेसवर कार्यरत असलेले वाहन चालक यांच्याकडे वैध स्वरुपाचे बस चालविण्याचे लायसन्स बऱ्याच चालकांकडे नाही तसेच बऱ्याच वाहकाकडे वैध स्वरुपाचा कंडक्टर बॅच नाही तरी मनपाने या सर्व आवश्यक गोष्टी तपासाव्या अन्यथा एखादा दुर्देवी अपघात घडल्यास मनपा या सर्व घटनांना दोष्टी राहील याची प्रशासनाने गंभीर नोंद घ्यावी.

५) करारनाम्याच्या अटीशर्तीनुसार ठेकेदाराने त्यांच्याकडे कार्यरत असलेल्या प्रत्येक कर्मचाऱ्याचा पी.एफ. व ई.एस.आय.सी. प्रत्येक महिन्यात शासनाच्या संबंधित खात्याकडे भरणा करावयाचा आहे. परंतु, सदर ठेकेदाराने कोणत्याही कर्मचाऱ्याचा पी.एफ. अथवा ई.एस.आय.सी. भरलेला दिसून येत नाही तरी मनपाने ठेकेदाराकडून वरील सर्व थकीत रक्कम भरणा करण्यास ठेकेदारास व पी.एफ.ई.एस.आय.सी. विभागास लेखी स्वरुपात नोटीस द्यावी व सदरची कर्मचाऱ्यांची रक्कम शासनास दंड व व्याजासहित भरणा केल्याचे प्रमाणपत्र ठेकेदाराने मनपास सादर केल्यानंतरच प्रशासनाने परिवहन उपक्रमाची तिकिट भाडेवाढ लागु करणेस परवानगी द्यावी तोपर्यंत सदरची बस भाडेवाढ त्वरीत रद्द करावी.

६) आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाचे दर घसरल्याने मागील महिन्यात दोन टप्प्यात डिझेलचे दर कमी करुन साधारणतः ६ रुपये ५० पैसे दरवाढ कमी केलेली आहे. ही बाब लक्षात घेऊन सदर ठेकेदाराने लागु केलेली अन्यायकारक तिकिट दरवाढ रद्द करावी.

वरील सर्व महत्वाच्या बाबी लक्षात घेता प्रशासनाने सदर ठेकेदारास थकबाकीदार असुनही पाठीशी घालण्याचे काम करित असल्याचे सिध्द होत आहे. तरी आजच्या महासभेमध्ये ठेकेदाराने प्रवाशावर लादलेली अन्यायकारक बस तिकिट भाडेवाढ त्वरीत रद्द करावी असा मी ठराव मांडत आहे.

**जुबेर इनामदार :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**नयना वसाणी :-**

मिरा भाईंदर महापालिकेने पी.पी.पी. तत्वावर बस पुरवठा करण्याचा ठेका मे. केस्ट्रल इन्फ्रा.प्रा.लि. या कंपनीस दि. ०९/१०/२०१० पासुन दिलेला आहे. सदर ठेकेदाराच्या कंपनीसोबत मिरा भाईंदर परिवहन उपक्रमाचा करारनामा झालेला आहे. आता परिवहन उपक्रमाचा विचार करता ठेकेदाराकडून मिळणारी सेवा ही अत्यंत हलक्या दर्जाची आहे. याची कारणे अशी की, ठेकेदार चालवीत असलेल्या बसेसचे मेन्टेनन्स वेळेवर करीत नाही. यामुळे परिवहन विभागाच्या बसेस रस्त्याच्या कडेला नादुरुस्त अवस्थेत बऱ्याच वेळा उभ्या असतात.

महानगरपालिकेने परिवहन ठेका पी.पी.पी. तत्वावर चालविण्यास दिलेला आहे. करारनाम्यातील अटी शर्ती प्रमाणे बस ठेकेदाराने महानगरपालिकेची रॉयल्टीची रक्कम थकवली असुन प्रशासनाने त्याच्या विरोधात कोणत्याही प्रकारची कारवाई प्रस्तावित केलेली नाही.

तसेच मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्व खाली एन.डी.ए. सरकारने पेट्रोल व डिझेलच्या भावामध्ये साधारणपणे ६ रुपये ५० पैसेने दरवाढ कमी केलेली आहे. ही बाब लक्षात ठेवणे आवश्यक आहे. तसेच दरवाढीचा प्रस्ताव मा. महासभेमध्ये मंजूरी घेणे आवश्यक होते. सदर दरवाढीचा प्रस्ताव महासभेमध्ये मंजूर न करता परिवहन विभागाने परस्पर दरवाढ केलेली आहे. ही बाब नियमबाह्य आहे. त्याच प्रमाणे सदर ठेकेदार हा कर्मचाऱ्यांना वेतनवाढ देत नाही. तसेच पी.एफ. व ई.एस.आय.सी. ह्या रकमा शासनाकडे भरत नाही, असे निदर्शनास आले आहे.

तरी या सर्व बाबी लक्षात घेता ठेकेदाराने लागु केलेली अन्यायकारक तिकीट दरवाढ रद्द करुन ती कमी करावी असा ठराव मांडत आहे.

**अनिल भोसले :-**

ठरावाला माझे अनुमोदन आहे.

**दिपीका अरोरा :-**

मिरा भाईंदर परिवहन विभागाची बस क्र. ९०४२, बस चालकाचे नाव सागर, वेळ सकाळी १०.५० ते ११.०० च्या दरम्यान मिरारोड स्टेशनहून रामदेव पार्ककडे जाणाऱ्या बस मध्ये श्रीम. अनिता एम. डावरा या

प्रवाशी प्रवास करत होत्या. या बस मधील ड्रायव्हरच्या बाजूचा टायर फुटून श्रीम. डावरा या गंभीर जखमी झालेल्या आहेत. त्यांच्या दोनही पायाचे ऑपरेशन होवून दोन्ही पायामध्ये स्ट्रेनलेस स्ट्रील रॉड टाकण्यात आलेले आहे. ही बाब अत्यंत खर्चीक असून आता पर्यंत श्रीम. डावरा यांचा या उपचारा पोटी ८०,०००/- खर्च झालेला आहे. परिवहन उपक्रमाने त्यांना फक्त रू.२५ हजार खर्च उपचाराकरीता दिलेला आहे. श्रीम. डावरा यांना दररोज ड्रेसिंग करावे लागते. तसेच दररोजचा औषधाचा खर्च रू.५००/- आहे. श्रीम. डावरा या बरे होण्याकरीता रू. १ लाख खर्च अपेक्षित आहे. परिवहन विभाग या जखमी महिलेस जादाचा खर्च देण्यास नकार देत आहे. याबाबत त्यांचा मुलगा श्री. अश्विन डावरा सातत्याने प्रयत्न करीत असून ठेकेदार त्यांना नकार देत आहे. तरी पालिका प्रशासनाने याबाबत जातीने लक्ष घालून श्रीम. डावरा यांना रू. १ लाख रक्कम द्यावी आणि नंतर ठेकेदाराकडून घ्यावी.

**गणेश देशमुख (मा. उपायुक्त (मु.)) :-**

मा. महापौर महोदया, मांडलेल्या ठरावास अनुसरुन मी काही माहिती देऊ इच्छितो सन्मा. सदस्यांनी जो काही प्रश्न उपस्थित केलेला आहे. तो कॉन्ट्रॅक्टर रॉयल्टी भरत नाही ते बरोबर आहे. रॉयल्टी बऱ्याच कालावधी पासून प्रलंबित होती जुलै ऑगस्टची रॉयल्टी भरुन घेण्यात आलेली आहे. त्यापूर्वीची रॉयल्टी भरण्यासाठी पत्र दिलेले आहे. ती सुध्दा भरुन घेण्याची कारवाई लवकरच केली जाईल. शासकीय ड्यूज त्यांनी भरलेले नाहीत करारासंबंधातील तरतूदीनुसार त्याबाबत देखील पत्रव्यवहार झालेला आहे. शासकीय करांचा भरणा ती त्याची करारानुसार जबाबदारी असल्यामुळे त्यांनी वेळेत आणि संबंधीत अखत्यारीकडे भरणे आवश्यक आहे. त्याबद्दल त्यांना कार्यालयामार्फत लेखी दिलेले आहे. जो काही ठराव मांडला गेला आहे. हा ठराव करारातील तरतूदी आणि दिलेली दरवाढ ह्या सर्व बाबींचा विचार करुन निर्णय घेण्यात येईल.

**बर्नड डिमेलो :-**

दरवाढ जी केलेली आहे ती आर.टी.ओ. कडून मिळालेली असली पण बसेसची ठेवण कशी ठेवतात. कोणत्या प्रकारची सेवा देतात ह्याच्याकडे पण आपण लक्ष दिले पाहिजे.

**भगवती शर्मा :-**

साहब इसका परिणाम इन्होंने बताया ना एक पेसेजर टायर फटने से जखमी हो गई इन्होंने अपने मुद्दे में लिखा है की, कल कोई ऐसी घटना घट जाए तो क्या होगा। क्योंकि बसका मेन्टेनस नहीं है। उस बस में जानवर भी जाए तो उनकी भी सुरक्षा चाहिए। यहाँ तो इन्सानो को लेके जा रहे है। इसकी व्यवस्था देखे। इस बस में जो प्रवासी प्रवास कर रहे है वह भाडा दे रहे है। तो उसके अनुसरुप बस तो होनी चाहिए। कोई मेन्टेनन्स नहीं है। साहब इन्होने अपने मुद्दे में लिखा है समय-समय पर जाँच होनी चाहिए। उस करारनामा के अंदर वो बसेस चलनी चाहिए। ड्रायव्हर से लेके उसका पालन करना चाहिए। हमको कोई आपत्ती नही। आप महासभा में विषय लाए शहर में बसे आ रही है। आज जो १०० बस को मंजूरी दियी जो महापौर के नेतृत्व में मंजूरी देके यह बसे तयार हो रही है। ऐसे ठेकेदार रहेंगे तो इस बस को चलाएगा कौन। मेरा आपसे अनुरोध है की आज जो इन्होंने विषय लिया है गंभीर विषय है। इसपे जाच करके आगे आने वाली बसे कैसी चलाई जाए उसपे ध्यान दिजीए।

**बर्नड डिमेलो :-**

जोपर्यंत बसेसची सुधारणा होत नाही तोपर्यंत भाडेवाढ करायची रद्द करावी किंवा स्थगित ठेवावी.

**गिता जैन :-**

मा. महापौर मॅडम, नयना मॅडमनी खुलासा मागितला आहे की दरवाढ आम्ही मंजूर केली नाही ते होऊ शकते का? त्याचा खुलासा द्यावा.

**शरद पाटील :-**

मा. महापौर मॅडम, मा. आयुक्त साहेब त्या महिलेची परिस्थिती अशी झालेली की दोन पाय कापण्याची परिस्थिती उद्‌भवली होती. तिच नशिब चांगले आहे की डॉक्टरानी ऑपरेशन केल्यावर सांगितले की दोन्ही पायात रॉड टाकण्यात येतील मग रॉड टाकून त्याचे पाय वाचले एवढी भयानक परिस्थिती असताना ठेकेदार त्याच्या मुलावर दबाव टाकून २५,०००/- रुपये देऊन त्याच्यावर सही करायला लावली. ह्याची पण नोंद घ्या. आणि ठेकेदाराला ताकीद द्या की झाला तो खर्च तुम्हाला द्यायला लागेल त्याच्या कडून मनपानी वसून करुन घ्या.

**मा. आयुक्त सो. :-**

सर्व सन्मा. सदस्यांनी जे मुद्दे ह्या ठिकाणी उपस्थित केले त्याच्या मताशी अंशतः सहमत आहे. त्याचे प्रमुख कारण असे की आपण ह्याच्यावर विचार करताना एका अंगानी विचार करतो की, तो ठेकेदार चांगल्या सुविधा पुरवत नाही. त्याचबरोबर एक गोष्ट आपण विसरत चाललो की ह्या ठेकेदाराला चांगल्या सुविधा पुरवण्यासाठी जे पोषक वातावरण पाहिजे उदा. बस डेपोसाठी जागा देण्याची आवश्यकता आहे. कारण मला माहित नाही परंतु ह्या ठेकेदाराला जागा देऊ शकलो नाही महागाई वाढ होत राहते ह सत्य आहे. त्याच्याबद्दल दुमत असण्याचे कोणतेही कारण नाही. एका सन्मा. सदस्यांनी उल्लेख केला की ७ ते ८ रु. डिझेलचे दर कमी झालेले आहेत. माझ्याकडे २०१० पासून ते आतापर्यंतची आकडेवारी आहे. ७ रु. २१ पैसे डिझेलची दरवाढ कमी झाली आहे. परंतु नेट महागाई जी वाढली आहे डिझेलची जी २० रु. आणि ८ पैसे आहे. एकीकडे डिझेलचे दर वाढलेले आहेत. आपण दर वाढल्यानंतर थोड्या फार प्रमाणात कमी करतो. फक्त

थोड्या पुरता विचार केलेला दिसतो. माझी विनंती राहील तेवढ्या पुरताच विचार सिमित न करता एकंदरीत क्युइलिटी इफेक्ट किती आहे ह्याचा विचार करण्याची गरज आहे. तो आहे २० रु. आणि ८ पैसे. त्याचप्रमाणे त्या ठेकेदारानी कर्मचारी, कंडक्टर, ड्रायव्हर मेन्टेनन्स साठीचे कर्मचारी नोकरीला लावलेले आहेत. त्याच्याही पगारात त्यांनी वेळोवेळी वाढ केली ह्याचाही बोझा ठेकेदाराला सहन करावा लागतो. ठेकेदाराचे उत्पन्नाचे एकमेव साधन म्हणजे तिकीट दर ह्या तिकीटदरात आपण वाढ केली नाही त्याला आताच्या बस दरावर बस चालवणे निश्चित शक्य होणार नाही. त्यामुळे तिकीटाची दरवाढ करणे अपरिहार्य आहे. अन्यथा आता ज्या लेवलला तो बससेवा पूरवतो त्यामध्ये पुन्हा घसरण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे माझी सन्मा. सभागृहाला विनंती आहे. आपण हा विषय दोन्ही बाजूने विचार करुन प्रशासनाने जी दरवाढीची अंमलबजावणी केली आहे त्याचे समर्थन करावे.

**सुहास रकवी :-**

मा. महापौराच्या परवानगीने बोलतो साहेबांनी आताच सांगितले की सदरच्या ठेकेदाराला बसची सेवा देणे परवडत नाही. साहेब तुम्ही सकाळच्या वेळेला भाईंदर उत्तन बघा ती जनावरासारखी भरुन आलेली बस दिसते. त्यांना रोजचे कमीत कमी ४ ते ५ लाख रुपये इन्कम आहे. त्यामानाने खर्च बघितला तर ह्याचा मेन्टेनन्स कुठेही दिसून येत नाही. एक तर टायर फुटला आहे, इंजिनचे काम आहे त्या ह्याच्यात मॅडमनी सांगितल्याप्रमाणे इन्शुरन्स काढत नाही. आज इन्शुरन्स असता तर त्या बाईला पैसे देणे सोपे झाले असते. कुठल्याही गोष्टीत त्या कंपनीने त्यानी सुध्दा केले पाहिजे. त्यांनी इम्पलीमेंट करण्यासाठी आपण दबाव आणला पाहिजे. साहेब त्याच्याकडून काय सेक्युरिटी घेतली आहे का? ती सेक्युरिटी ठेवली असती तर आज ही परिस्थिती नसती. साहेब तिकडची परिस्थिती बघा. भाईंदर स्टेशन बस नाहीच आहे. भाईंदर उत्तनच जास्त चालतात. ज्या येतात त्या भरलेल्या असतात त्यांचे टाईमिंग असे आहे की त्या पूर्ण भरल्याशिवाय येऊ शकत नाही. साहेब तुम्हाला विनंती आहे त्यांचे सगळे जे आहे ते बघा. त्यांना परवडतील दरवाढ रद्द झालीच पाहिजे. भाईंदर उत्तनचे नागरिक गरीब आहेत. त्यांना दरवाढ परवडत नाही. डिझेल दर कमी झालेले आहे. २० रु. ची तफावत बघता तेव्हा त्यांनी पैसे कमावले आहेत. तुम्ही विचार करा ही दरवाढ रद्द करा अशी मी सुचना करतो.

**वेंचर मेन्डोंसा :-**

मा. महापौर मॅडम, आपल्या परवागनीने बोलतो. इकडून बस ठाण्याला जातात तेव्हा त्याचे ३२ रु. भाडे होते. मध्येच ती बस बंद पडते मग ते नागरिक दुसऱ्या बसमध्ये जातात. मग त्यांचा मोबदला त्यांना का भेटत नाही. किंवा दुसऱ्या बस पण येत नाही. तसेच बसेसला स्पिड लिमिट किंवा लॉक असे काही लावले पाहिजे हे गरजेचे आहे. कारण बस एवढ्या वेगाने धावतात त्यामुळे उत्तनवाले गाडी चालवताना घाबरतात. ह्याच्यावर लक्ष देण्यात यावे ही नम्र विनंती.

**शर्मिला बगाजी :-**

मा. महापौरांच्या परवानगीने बोलते, आता रकवी साहेबांनी सांगितले की उत्तन परिसरामध्ये एम.बी.एम.टी. ची जी बससेवा चालू आहे ती जास्तीत जास्त ७५ टक्के उत्तन भागावर अवलंबून आहे. ती सेवा एकदम खालच्या दर्जाची आहे. मा. आयुक्त साहेब सांगतात की, महागाईच्या हिशोबाने ही दरवाढ केली पाहिजे. परंतु महासभेची किंवा कोणाची परमिशन न घेता परस्पर ही दरवाढ प्रत्येक वेळेला करु शकतात का? आधी पण अशीच दरवाढ झाल्याने आंदोलन झाली होती. आता पण एकदम जास्त दरवाढ केलेली आहे. ही दरवाढ शासन आणि प्रशासनाला न शोभणारी दरवाढ आहे. जर तुम्ही दरवाढ करता तर बससेवा व्यवस्थित करा कारण उत्तनवरुन येणाऱ्या नागरिकांना बसशिवाय काही पर्याय ठेवलेला नाही. जे टमटम चालायचे ते प्रशासनानी बंद केले आहेत. महामंडळाची जी सेवा होती ती पण बंद केली आहे. जर ह्या ठेकेदाराना परवडत नसेल तर ही सेवा एस.टी. महामंडळाकडे द्यावी अशी सुचना आहे. जर ह्या ठेकेदारानाच द्यायची असेल तर आमची विनंती आहे की ही दरवाढ पूर्णपणे रद्द करावी.

**मा. आयुक्त सो. :-**

मा. महापौर महोदय, सन्मा. सदस्यांनी जे मुद्दे उपस्थित केले की ह्या सभागृहासमोर विषय न आणता एकतर्फी दरवाढ करण्यात आली. मी आपल्या निर्दशनास आणून देऊ इच्छितो की १८ जून २००९ रोजी ह्या सन्मा. सभागृहाने अधिकार मा. आयुक्तानां दिले आहेत. आयुक्तांनी सर्व प्रस्ताव रिजनल ट्रान्सपोर्ट ॲथोरिटी ह्याच्याकडे हे प्रधान सचिव परिवहन ह्याच्या अध्यक्षतेखाली कार्यान्वित असणारी ऑथोरिटी आहे. त्यांनी अतिशय शास्त्रोक्त पध्दतीने ह्याचा अभ्यास करुन ही दरवाढ निश्चित केलेली आहे. एवढच नव्हे तर ह्या शहराच्या धर्तीवरच इतर ज्या आजूबाजूच्या ४-५ महानगरपालिका आहेत त्याचेही दर काय आहेत त्याची माहिती ..............

(सभागृहात गोंधळ)

**बर्नड डिमेलो :-**

बसेस पण बघा. भाववाढला आमचा विरोध नाही. त्याप्रकारची सेवा द्या.

**भगवती शर्मा :-**

एस.टी बसचे ते लोक भाड देतात. बसेसची सेवा चांगली आहे.

[illegible]

**बर्नड डिमेलो :-**

त्या बसमध्ये बसून एकदा अनुभव घेतल्यास तुम्हाला कळेल की लोक कसा प्रवास करतात. आम्ही भाव वाढ देऊ पण त्यांनी प्रवाशाची तसे साजेस वागले पाहिजे. भाववाढीला विरोध नाही त्यांची सेवा उत्तम करावी आणि भाववाढ करावी.

**शरद पाटील :-**

मा. महापौर मॅडम, अशी परिस्थिती आलेली आहे की, आपली बससेवा बंद करुन एस.टी. महामंडळाची सेवा चालू करावी असा प्रकार उत्तनमध्ये चाललेला आहे.

**मा. आयुक्त सो. :-**

तशी वेळ येणार नाही.

(सभागृहात गोंधळ)

**अनिल भोसले :-**

मा. महापौर मॅडम, आपल्या परवानगीने बोलतो. आपल्या बसेस अशा आहेत की त्याच्यात गूर सुध्दा बसून जाऊ शकत नाही. त्या सीट सगळ्या फाटल्या आहेत. आपण एक व्हिजीट मारा.

**मा. महापौर :-**

मी साहेबांना ऑलरेडी सांगितले आहे की पहिले उत्तन स्टार्ट करा स्वतः जाऊन बघा.

**बर्नड डिमेलो :-**

मा. आयुक्त साहेब उत्तन परिसरात मच्छिमार आणि शेतकरी लोक आहेत. नोकरीला आणि शाळा कॉलेजला जाणारी लोक आहेत. तिकडे गाडी घोड्यावाली लोक नाहीत. फोर व्हिलर, टू व्हिलरवाली लोक नाहीत. बस शिवाय त्यांना पर्याय नाही. ह्याच्यावर विचार करावा त्यांना चांगली बसची सेवा पूरवावी. तिकीट वाढीला आमचा विरोध नाही त्यांनी जी दरवाढ केली आहे त्याला मान्यता देऊ जर त्यांनी साजेशा बसेस दिल्या वेळेवर आणि दिलेल्या वेळेत बसेस सुटल्या पाहिजेत १५-१५ आणि १०-१० मिनिट दिलेली आहेत. त्या वेळेत कधीच बसेस सूटत नाही.

**रोहिदास पाटील :-**

मा. महापौर मॅडम, ठेकेदाराकडून सुरु केलेली बस ठेकेदारांनी ज्या वेळेला बससेवा सुरु केली ह्या सभागृहात सभागृहाच्या बाहेर वर्तमानपत्रात आपल्या कामकाजाची मग त्यात महापौर, आयुक्त सगळे नगरसेवक आले जेवढी बदनामी झाली त्याच्यापेक्षा आणखी बदनामी व्हायची गरज नाही. आपण वेगवेगळा विषयात लक्ष घालता त्या बद्दल धन्यवाद. पण तुम्ही ह्या बससेवेत लक्ष घाला तुम्ही अथेन्टीक माहिती घेतली हे खर आहे. अधिकार दिले हे ही खर तो ठराव तुम्ही वाचून दाखवला २००९ चा ठराव आजची परिस्थिती काय आहे. आजची परिस्थिती ज्या पध्दतीने ती बस चालते एखाद्या रुटवर ती बस चालते त्या ठिकाणी ती पूर्ण प्रॉफिटमध्ये आहे. पण त्या बस प्रवाशाला समाधान मिळाले पाहिजे की नाही. बस ही भाईंदरहून सुटते उत्तनला जाते. उत्तनहून येते भाईंदरला खाली होते. शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी असलेली चौकावरुन सुटणारी बस आता बंद झाली काय आपण सेवा देतो. साहेब महापालिका काम करते. विद्यार्थ्यांसाठी काहीतरी करते नगरसेवक नगरसेविका कोणीतरी विनंती करतात मा. महापौराना विनंती करतात. मा. आयुक्तांना विनंती करतात बस चालू होते. सुरु झालेली बस चालू आहे की नाही हे बघणारे आपले कोणी नाही आहे. सुरु असलेल्या बसमध्ये सीट आहेत की नाहीत आपला काही रिपार्ट नाही साहेब आम्ही तुमचे सर्व काही ऐकतो परंतु ते किती ऐकायचे आपल्या डिपार्टमेंट्चा रिपोर्ट काय? अधिकाऱ्यांचा रिपोर्ट काय? बस बरोबर आहेत, टायर बरोबर आहेत, स्टेअरिंग बरोबर आहेत, हॉर्न वाजतो, बोर्ड लिहता, काच आहेत हे काहीच नाही. तरीही बस आपल्या उपस्थितीत ती बस चालू आहे त्यांचे आपण समर्थन करतो. आम्हाला ह्या बस पाहिजेत. उत्तन चौक निघणाऱ्या बाई, पुरुष, म्हातारे विद्यार्थ्यांना ती बस पाहिजे. दुसरे साधन नाही. तुम्ही जे द्याल त्यामध्ये ती लोक बसतात. आंदोलन पण करत नाही. तुमच्याकडे विनंती करतात. काही तरी चांगले द्या ते काही नाही. आम्ही विनंती करतो. २३ नंबरची बस जी कॉलेज विद्यार्थ्यांना, नागरीकांना उपयोगी पडते. विनंती केली की बस सुरु होते. टाईमटेबल देते ते टाईमटेबल मला घरपोच पोहचते, की ह्या बसच्या फेऱ्या आहेत. परंतु त्यापैकी १/४ फेऱ्या चालू नाहीत. बस चालेल कशी कोणीतरी सांगते बसला पॅसेंजर मिळत नाही. अर्निंग नाही, प्रॉफीट नाही. बंद करायला लागेल. त्या बसला टायरच नाही ती बस चालेल काय? आमची विनंती आहे, सभागृहाने सांगितले आहे की त्याची दरवाढ रद्द करा. त्याला लाईनीत उभं करा. त्यांनी सांगितल्यापेक्षा दरवाढ आपण देऊ. पण व्हीजीबल असली पाहिजे. तो मागतो आपण देतो. त्याच्यामुळे किती वाद झाले. साहेब, तुम्हाला माहित नाही त्यानंतर त्या कर्मचाऱ्यांनी चालवायला घेतली ते पैसे देत नाही आम्ही चालवतो. तेच मजूरी करत होते तेच दिवसभर चालवत होते. आलेले पैसे एकत्र मोजत होते. ह्या परिवहनमध्ये आपण पूर्ण बदनाम आहोत. महानगरपालिका बदनाम झाली. नगरसेवक बदनाम झाले. आपण त्याचा सखोल अभ्यास करावा, अशी आमची सभागृहाची विनंती आहे.

**मा. महापौर :-**

काका, कमिशनर साहेब समजले, त्यांना मी पण सांगितले आहे.

**रोहिदास पाटील :-**

माझे नाही तर तुमचे तरी ऐकू द्या.

**मा. महापौर :-**

माझे असे नाही. सर्वांचे ऐकू द्या. भाईंदर शहर सर्वांचे आहे. ठराव सर्वानुमते मंजूर.

**प्रकरण क्र. ४२ :-**

सन्मा. सदस्य श्री. बर्नट डिमेलो यांचा दिनांक १०/११/२०१४ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. --- मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या परिवहन उपक्रम ठेकेदाराने लागू केलेली अन्यायकारक तिकीट दरवाढ रद्द करुन ती कमी करणेबाबत.

**ठराव क्र. ४६ :-**

मिरा भाईंदर महापालिकेने पी.पी.पी. तत्वावर बस पुरवठा करण्याचा ठेका मे. केस्ट्रल इन्फ्रा.प्रा.लि. या कंपनीस दि. ०९/१०/२०१० पासुन दिलेला आहे. सदर ठेकेदाराच्या कंपनीसोबत मिरा भाईंदर परिवहन उपक्रमाचा करारनामा झालेला आहे. आता परिवहन उपक्रमाचा विचार करता ठेकेदाराकडून मिळणारी सेवा ही अत्यंत हलक्या दर्जाची आहे. याची कारणे अशी की, ठेकेदार चालवीत असलेल्या बसेसचे मेन्टेनन्स वेळेवर करीत नाही. यामुळे परिवहन विभागाच्या बसेस रस्त्याच्या कडेला नादुरुस्त अवस्थेत बऱ्याच वेळा उभ्या असतात. तसेच गेल्या अनेक वर्षापासुन करारनाम्याच्या कोणत्याही अटीशर्तीचे पालन सदर ठेकेदार करीत नसल्याचे निदर्शनास येत आहे. त्या गंभीर बाबी खालीलप्रमाणे आहेत.

१) करारनाम्याच्या अटीशर्तीनुसार परिवहन ठेकेदाराने महापालिकेस पी.पी.पी. तत्वावर बस सेवा चालवताना १ रु. प्रति कि.मी. प्रमाणे प्रति बस प्रति दिवस १८०/- रु. प्रमाणे जे.एन.एन.यु.आर.एम. अंतर्गत ५० बसेसची नियमित रॉयल्टी स्वरुपात पैसे भरणे बंधनकारक असताना सदरच्या ठेकेदाराने महापालिकेची सन २०१० ते २०१४ पर्यंत लाखो रुपये रॉयल्टी थकवलेली आहे. त्याचा भरणा ठेकेदाराकडून महापालिकेने प्रथम दंड व व्याजासहित सदरची थकीत रक्कम वसुल करावी व त्यानंतरच काही अंशी तिकिट दरवाढ लागू करण्यास परवानगी द्यावी. परंतु, जोपर्यंत ठेकेदार मनपाची थकित रॉयल्टी भरणा करीत नाही तिकिट वाढ प्रशासनाने स्थगीत ठेवावी.

२) ठेकेदाराने बस सेवा देताना प्रत्येक बसचे इन्शुरन्स, आर.टी.ओ. टॅक्स, फिटनेस तपासणी इ. कागदपत्र चालु स्थितीत ठेवणे बंधनकारक असताना सुध्दा ठेकेदार हा बसेसचे इन्शुरन्स, फिटनेस व आर.टी.ओ. टॅक्स तसेच शासनाचा प्रवासीकर अधिभार भरीत नाही त्यामुळे ठेकेदाराने वरील सर्व रक्कमेचा भरणा करुन ती सर्व कागदपत्र महापालिकेस चालु स्थितीत असल्याचे सादर करावे व तद्नंतरच तिकीट दरवाढीस मनपाने मान्यता द्यावी तोपर्यंत दरवाढ रद्द करावी.

३) ठेकेदाराने परिवहन उपक्रमाच्या बसेसचे मेन्टेनन्स दररोज चांगल्या प्रकारे देखभाल करणे बंधनकारक असताना बऱ्याच बसेस यांत्रिक बिघाडामुळे तसेच अस्वच्छ सिट फाटलेल्या, काचा फुटलेल्या अशा स्थितीत बसेस सुरु आहेत त्या सर्व बसेसचे मेन्टनन्स व वरील नमुद कामे सुस्थितीत असल्याचे मनपास लेखी कळवावे व मनपाच्या संबंधित उपायुक्ताने प्रत्यक्ष बसेसची तपासणी करुन तसा सविस्तर अहवाल मा. आयुक्त व मा. महापौर यांना सादर करावा व समाधानकारक काम न आढळल्यास सदरची तिकिट दरवाढ रद्द करावी.

४) ठेकेदाराकडे बसेसवर कार्यरत असलेले वाहन चालक यांच्याकडे वैध स्वरुपाचे बस चालविण्याचे लायसन्स बऱ्याच चालकांकडे नाही तसेच बऱ्याच वाहकाकडे वैध स्वरुपाचा कंडक्टर बॅच नाही तरी मनपाने या सर्व आवश्यक गोष्टी तपासाव्या अन्यथा एखादा दुर्देवी अपघात घडल्यास मनपा या सर्व घटनांना दोष्टी राहील याची प्रशासनाने गंभीर नोंद घ्यावी.

५) करारनाम्याच्या अटीशर्तीनुसार ठेकेदाराने त्यांच्याकडे कार्यरत असलेल्या प्रत्येक कर्मचाऱ्याचा पी.एफ. व ई.एस.आय.सी. प्रत्येक महिन्यात शासनाच्या संबंधित खात्याकडे भरणा करावयाचा आहे. परंतु, सदर ठेकेदाराने कोणत्याही कर्मचाऱ्याचा पी.एफ. अथवा ई.एस.आय.सी. भरलेला दिसून येत नाही तरी मनपाने ठेकेदाराकडून वरील सर्व थकीत रक्कम भरणा करण्यास ठेकेदारास व पी.एफ.ई.एस.आय.सी. विभागास लेखी स्वरुपात नोटीस द्यावी व सदरची कर्मचाऱ्यांची रक्कम शासनास दंड व व्याजासहित भरणा केल्याचे प्रमाणपत्र ठेकेदाराने मनपास सादर केल्यानंतरच प्रशासनाने परिवहन उपक्रमाची तिकिट भाडेवाढ लागु करणेस परवानगी द्यावी तोपर्यंत सदरची बस भाडेवाढ त्वरीत रद्द करावी.

६) आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाचे दर घसरल्याने मा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली एन.डी.ए. सरकारने पेट्रोल व डिझेलच्या भावामध्ये मागील महिन्यात दोन टप्प्यात डिझेलचे दर कमी करुन साधारणतः ६ रुपये ५० पैसे दरवाढ कमी केलेली आहे. ही बाब लक्षात घेऊन सदर ठेकेदाराने लागु केलेली अन्यायकारक तिकिट दरवाढ रद्द करावी.

तसेच दरवाढीचा प्रस्ताव मा. महासभेमध्ये मंजुरी घेणे आवश्यक होते. सदर दरवाढीचा प्रस्ताव महासभेमध्ये मंजूर न करता परिवहन विभागाने परस्पर दरवाढ केलेली आहे ही बाब नियमबाह्य आहे. त्याचप्रमाणे सदर ठेकेदार हा कर्मचाऱ्यांना वेतनवाढ देत नाही.

वरील सर्व महत्वाच्या बाबी लक्षात घेता प्रशासनाने सदर ठेकेदारास थकबाकीदार असुनही पाठीशी घालण्याचे काम करित असल्याचे सिध्द होत आहे. तरी आजच्या महासभेमध्ये ठेकेदाराने प्रवाशावर लादलेली अन्यायकारक बस तिकिट भाडेवाढ त्वरीत रद्द करावी असा मी ठराव मांडत आहे.

**सुचक :- श्री. बर्नड डिमेलो** **अनुमोदक :- डॉ. नयना वसाणी**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**ठराव वाचून कायम करण्यात आला**

**सही /-**

**महापौर**

**मिरा-भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. ४३, सन्मा. सदस्य श्री. हंसुकुमार पांडे यांचा दिनांक ११/११/२०१४ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव. ---- आरक्षण क्र. १०२ बगीचा व मैदान या जागेमध्ये वास्तुविशारद मे. तेजस कन्सल्टंट यांचा इमारत बांधकामाचा प्रस्ताव व मनपामार्फत प्राप्त झालेली बांधकाम परवानगी रद्द करणे व संबंधित वास्तुविशारद यांच्यावर दंडात्मक कारवाई करणे. सदस्य गैरहजर असल्यामुळे सदरचा प्रस्ताव मागे जात आहे.

**प्रविण पाटील :-**

मा. महापौर मॅडम, भाईंदर पूर्वेला एक अग्निशमन दल झालेले आहे. तर ते महानगरपालिकेने बांधले आहे की दसरे कोणी बांधले आहे त्याची माहिती द्या.

**मा. आयुक्त सो. :-**

महानगरपालिकेने बांधले आहे.

**प्रविण पाटील :-**

सुरु झालेले आहे की नाही झाले?

**मा. आयुक्त सो. :-**

सुरु झालेले आहे.

**प्रविण पाटील :-**

त्याचे उद्घाटन करावे. त्यासाठी मी अनेक पत्र पालिकेला दिलेली आहेत. स्थानिक नगरसेवक म्हणून मला त्याची काही कल्पना नाही. आमच्या पत्राचे उत्तर तरी द्यावे.

**मा. आयुक्त सो. :-**

उत्तर देण्याची व्यवस्था उपायुक्त............

**प्रविण पाटील :-**

उद्घाटन आपण करु शकतो की नाही करु शकत असे तरी द्या. उद्घाटन झाले की नाही ते तरी सांगा.

**मा. आयुक्त सो. :-**

मी माहिती घेतो.

**प्रविण पाटील :-**

पेपरमध्ये बातमी आली की त्याचे उद्घाटन झाले आणि सन्मा. नगरसेवक रोहिदास पाटील ह्यांनी त्याचे उद्घाटन केले.

**मा. आयुक्त सो. :-**

त्याची मी चौकशी करतो.

**प्रविण पाटील :-**

चौकशी कसली करता? उद्घाटन झाले.

**निलम ढवण :-**

मा. महापौर मॅडम बरोबर आहे. जेव्हा अशा वास्तु उभारल्या जातात अशा वेळी कमीत कमी सर्व पक्षाचे स्थानिक नगरसेवक किंवा सर्व पक्षाचे गटनेते ह्यांना तरी त्याची माहिती असावी. आमच्या शेजारी किंवा त्यांच्या प्रभागात एवढे मोठे फायर ब्रिगेडचे स्टेशन उभारले तर आम्हाला त्याची कल्पना येईल.

**प्रविण पाटील :-**

गेल्या कित्येक वर्षापासून आम्ही मागणी करतो.

**मा. महापौर :-**

महासभेत मी पण मागणी केलेली. सन्मा. सदस्या वंदना विकास पाटील ह्यांचेसुध्दा पत्र आहे.

**प्रविण पाटील :-**

त्यांची मागणी आहे, मान्य करतो. आम्ही दोघांनी मागणी केलेली आहे.

**मा. महापौर :-**

त्यांचे मला पहिले पत्र आले आणि मी महासभेत घेतले. ते त्यांच्या पत्रावर घेतले.

**प्रविण पाटील :-**

आता काय कारवाई करणार?

**मा. महापौर :-**

आता त्यांना माहिती नाही, तुम्हाला माहित नाही आणि मला पण माहित नाही.

**प्रविण पाटील :-**

कोणीही यावं आणि काहीही करावं.

**मा महापौर :-**

पत्रव्यवहार तुम्ही केला महासभेत, मी घेतला.

**प्रविण पाटील :-**

मॅडम शहराची गरज आहे आम्हाला माहित आहे. तिथे फायर स्टेशन असावे.

**मा. महापौर :-**

ठिक आहे. त्याचे व्यवस्थित उद्‌घाटन करुया.

**प्रविण पाटील :-**

आमची मागणी आहे त्याचे उद्‌घाटन रितसर व्हावे.

**निलम ढवण :-**

अशा वास्तुचे उद्‌घाटन, भुमीपुजन करताना स्थानिक आमदारांना आमंत्रित करावे, अशी मी सुचना करते.

**प्रमोद सामंत :-**

मा. महापौर मॅडम, त्यादिवशी सन्मा. सदस्य जुबेर ईनामदार ह्यांनी लक्षवेधी मांडली होती. डेंग्यु आणि आरोग्यावर लक्षवेधी होती. काल आमच्या प्रभागात पुनम सागर, शांतीनगर, सृष्टी, जेसलपार्क अशा चार ठिकाणी सिव्हरेजचे एस.टी.पी. प्लान आहेत ते होते. आता नविन बनतात. कालच त्या ठेकेदाराचा पाठलाग करुन त्याला विचारले ड्रेनेज क्लीयर नही होता है तू क्या कर रहा है? त्याला जास्त बोलल्यावर त्यांनी माझे हात जोडले. बोलो मत किसीको वो, एस.टी.पी. बन रहा है इसके लिए तुम्हारा ड्रेनेज जाम है। शांतीनगरमध्ये रेनवॉटर जाण्यासाठी पावसाळी पाणी जाण्यासाठी गटर बनवलेले आहेत. कायम सुकी असायची जोपर्यंत बिल्डरच्या हातात होत ना तोपर्यंत गटारात कुठेही पाणी नसायचे. आता गेल्या २-४ वर्षात शांतीनगरमधली सर्व गटार पाण्याने भरलेली आहेत. शांतीनगरमध्ये पूर्णपणे ड्रेनेज लाईन अस्तित्वात आहे. दोन सम्प चालतात ते सम्प चालवण्यासाठी आपण ठेकेदाराला आपण दरवर्षी ५० लाख देतो. आजची परिस्थिती अशी आहे की, सगळी गटार भरलेली आहेत. मी गेल्या महिन्याभर आरोग्याचे जे सफाई कर्मचारी आहेत त्याच्या मागे आहे. त्याच्या मागे लागून रोज सफाई करायला सांगतो. गेल्या आठवड्यात मी अंडरग्राऊंड टॅन्क त्यांना ओपन करायला सांगितले. ते टॅन्क भरलेले होते म्हणून त्याची सफाई रोज करायला लावली. मी त्या ठेकेदाराच्या माणसाबरोबर फिरतो. पण अजून पर्यंत सफाई झालेली नाही. सफाई का झाली नाही म्हणून विचारले असता सांगितले की एस.टी.पी. प्लान्टमध्ये त्याच्या व्हीलमध्ये जे पाणी घेतले जाते त्यामुळे सफाई होत नाही. मग गेला महिनाभर किंवा वर्षभर तिथे गटारात आम्हांला पाणी दिसते आणि त्यामुळे विविध आजार तेथील नागरीकांना होतात. त्याला जबाबदार कोण आहे? जर त्या व्हेलमध्ये पाणी गेल्यामुळे जर गटार भरत असतील, सगळी गटार ओपन आहेत. तर त्याची जबाबदारी कोणाची आहे. मा. आयुक्त साहेब ह्याबद्दल काल मी तुम्हाला फोन करुन कळवले. मला ठेकेदार आणि ऑफीसर ह्यांची एकत्र बैठक लावली पाहिजे आणि मला ह्याचे उत्तर द्या. सगळ्या सदस्यांना पण कळले पाहिजे की, प्रशासन कशी दिशाभूल करतो आणि आम्हाला कामाला लावते. आम्ही रोज सांगायचे की गटारात पाणी आहे. मग ह्यांची लोक येणार मग सांगणार त्या सोसायटीचे ड्रेनेज जाम आहे. त्यांना नोटीस द्या. त्यांच्यामुळे जाम होते मग आम्ही त्या सोसायटीच्या लोकांबरोबर वाद घालायचा हा काय प्रकार आहे. ह्याचे स्पष्टीकरण संबंधीत अधिकाऱ्याने द्यावे.

**मा. आयुक्त सो. :-**

ह्या संदर्भात बैठक होईल.

**प्रमोद सामंत :-**

बैठक व्हावी असे मला वाटत होते. योगायोगाने ही सभा लागली आहे. अधिकारी हजर आहेत त्यांनी उत्तर द्यावे की, हे दोन वर्षापासून काय चालले आहे.

**सुरेश वाकोडे :-**

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो. आपण जो शांतीनगरचा जो प्रॉब्लम उपस्थित केला आहे. त्याठिकाणी जे गटर भरले जाते, पाणी येत नाही हा जो प्रकार आहे तो शांतीनगरमध्ये कुठे कुठे प्रॉब्लम येतो तो आपल्याला चेक करायला लागेल.

**प्रमोद सामंत :-**

तुम्हाला दोन महिन्यांपासून मी सांगतो. तुम्ही चुकीचे उत्तर देता. असे बोलायचे नाही. दिशाभूल करायची नाही. गेल्या वर्षभर मी तुमच्या माणसांना सांगतो. तुमच्या जे.ई. ना बोलवा.

**सुरेश वाकोडे :-**

तुम्हाला सिस्टीम सांगतो. तुम्ही ऐकून घ्या.

**प्रमोद सामंत :-**

तुम्ही सभेत खोटे बोलायचे नाही. खरे काय ते सांगा.

**सुरेश वाकोडे :-**

जे सोसायटीचे प्रॉपर्टी कनेक्शन असतात ते लाईनला जोडलेले असतात. सोसायटीच्या काही ठिकाणी लाईन चॉक-अप होते. काही प्रॉब्लम होतात तर त्या डायरेक्ट ड्रेनेजला जोडलेले असतात. स्ट्रॅम वॉटरलर त्यामुळे हा प्रॉब्लम उद्‌भवतो.

**प्रमोद सामंत :-**

स्ट्रॉम वॉटर ड्रेनला आमच्या शांतीनगरमध्ये एकही कनेक्शन जोडलेले नाही. आम्हाला येवून दाखवा. तुम्ही खोटे बोलायचे नाही. तुमचे सम्प काम करत नाही. तुम्हाला पाणी २० फुट वर चढवायला लागते म्हणून ते पाणी ड्रेनेजमध्ये येते. त्यामुळे लोकांना रोगराई होते. साहेब हे त्याला जबाबदार आहेत.

**सुरेश वाकोडे :-**

त्याठिकाणी पंम्पींग सिस्टीम आहे.

**प्रमोद सामंत :-**

तुम्ही लोकांच्या आरोग्याला जबाबदार आहात. जबाबदारी निश्चित करा.

**मा. आयुक्त सो. :-**

मी सन्मा. सदस्यांच्या भावनांशी सहमत आहे. मी स्वतः उद्या सकाळी ११.०० वाजता स्पॉटवर येतो. इंजिनिअर सोबत असतील आपल्याला विनंती आहे आपणही या. ठेकेदाराला बोलावतो आपण पाहणी करु. त्यानंतर माझ्या दालनात मिटींग घेऊ आणि ह्याच्यावर तोडगा काढू.

**प्रमोद सामंत :-**

मा. महापौर मॅडम मला हेच सांगायचे आहे की, आपल्या मनपामध्ये आयुक्त साहेबांकडे मिटींग घेतली तर आयुक्त साहेबांनी आम्हाला असे सांगितले की, शहरामध्ये तुम्हाला काही पॉझीटीव्ह गोष्टी दिसत नाहीत का? दिसतात पण नेगेटिव्ह इतक्या एवढ्या आहेत की त्यामुळे पॉझीटिव्ह दडल्या जातात. साहेब आजचा एक विषय बघा. आरक्षण बाबत आपण कोणावरही जबाबदारी निश्चित करत नाही. समाजमंदिर वर्षभर भाड्याने दिले जात नाही. आपण कोणावरही जबाबदारी निश्चित करत नाही. डायलेसीस मशिनसाठी मा. आमदार आपला निधी देतात पण डायलेसीस मशीन येत नाही. शेकडो एकरमध्ये अतिक्रमण होते. जबाबदारी कोणावरही नाही. गेली चार वर्षे ऑडीत रिपोर्ट सादर होत नाही. कोणावरही जबाबदारी नाही. चार वर्षे डेपो नव्हते कोणाला माहित नव्हते. परिवहन विभागाला बसेससाठी डेपो द्यायचा कोणाला माहित नाही. का अगोदर येत नाही. चार वर्षात आपण एखादी जागा उपलब्ध करुन देऊ शकत नाही. मॅडम हे महत्वाचे विषय आहेत. बी.एस.यु.पी. चा ठेकेदार आपण त्याच्याकडून मॉबीलायजेशन ॲडवान्स परत घेतला पाहिजे. त्यांच्याकडून इंट्रेस्ट घेतला पाहिजे. सहा करोड रुपये त्याच्याकडे बाकी आहेत. त्याला कोण जबाबदार आहे. प्रशासन जबाबदार आहे की नाही? जबाबदारी निश्चित करा.

**वंदना चक्रे :-**

मा. महापौर मॅडम माझ्या वॉर्डातसुध्दा एस.टीपी. प्लान्टचे लेबोरेटी आर.एन.ए. फार मोठ्या प्रमाणात रिबीटचे गटार आहे. आपण २०१२ ला निवडून आल्यानंतर त्याचे उद्‌घाटन केलेले आहे. ते हॅन्डवर्क केले की नाही?

**मा. महापौर :-**

मॅडम ती साईट झालेली आहे.

**वंदना चक्रे :-**

मी परवाच आयुक्त साहेबांना पत्र दिलेले आहे. माझ्यामते चार लोक मेलेली आहेत.

**मा. महापौर :-**

तुम्ही कमिशनरकडे या मी साहेबांना सांगते.

**प्रविण पाटील :-**

मा. महापौर मॅडम, एक गंभीर बाब आहे. नवघर गार्डनमध्ये तीन दिवसापूर्वी एका माणसाला साप चावला आहे. मी ईरकर साहेबांकडे गेलो. ते बोलतात लाईट लागणार नाही खांबित साहेबांना विचारा. खांबित साहेबांना विचारले लाईट कधी लागणार तर ते बोलतात ईरकरना विचारा. एक महिन्यापासून त्या गार्डनमध्ये लाईट नाही. ज्या व्यक्तीला साप चावला आहे ती व्यक्ती अत्यंत गंभीर आहे. ही व्यक्ती मरण पावली तर ह्याला जबाबदार कोण? महापौर, आयुक्त की खांबित की ईरकर साहेब?

(सदरचा प्रस्ताव संबंधीत सदस्य श्री. हंसुकुमार पांडे हे गैरहजर असल्याने फेटाळण्यात आला.)

**रोहिदास पाटील :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील खारीगाव येथील कृष्णा भाऊ पाटील ह्यांचे दि. १०/११/२०१४ रोजी दुःखद निधन झाले. त्यांचे अल्पशिक्षण असून देखील त्यांनी १६ नाटके लिहीली, १५ कांदबऱ्या लिहील्या, १० एकांकीका लिहल्या. त्यांचा १९६७-६८ साली महाराष्ट्र नाट्य क्षेत्रात नाट्यलेखन परिक्षा प्रथम श्रेणीत उत्तम गौरव करण्यात आला होता. त्यांचा मी शोकप्रस्ताव मांडत आहे.

**शरद पाटील :-**

भाईंदर पूर्व येथील भवननिर्माते चंदुभाई रावल ह्यांचेदेखील निधन झालेले आहे त्यांचा शोकप्रस्ताव मांडत आहे.

**अशरफ शेख :-**

मुरली देवरा यांचा शोकप्रस्ताव मांडत आहे.

**दु:खवठा ठराव क्र. ४७ :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील खारीगाव येथील कृष्णा भाऊ पाटील ह्यांचे दि. १०/११/२०१४ रोजी दु:खद निधन झाले. भाईंदर पूर्व येथील भवननिर्माते चंदुभाई रावल ह्यांचेदेखील निधन झालेले आहे त्यांचा शोकप्रस्ताव मांडत आहे. तसेच श्री. मुरली देवरा यांचे दु:खद निधन झालेले आहे. त्यांचा शोकप्रस्ताव मांडत आहे.

**सुचक :- श्री. रोहिदास पाटील** **अनुमोदक :- श्री. शरद पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजुर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मा. महापौर :-**

आजची सभा संपली असे मी जाहिर करते.

**(सभा संपण्याची वेळ दु. २.२५)**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मा.महासभा दि२३/०३/२०१५

**।। गोषवारा ।।**

**प्रकरण क्र.८० मिरा भाईंदर महानगरपालिकेवर ५व्या नामनिर्देशित सदस्याची नेमणूक करणे बाबत.**

**ठराव क्र.**

मिरा भाईंदर महानगरपालिकेवर नेमावयाच्या पाच नामनिर्देशित सदस्यांपैकी चार नामनिर्देशित सदस्यांची आयुक्तांच्या शिफारसीनूसार दि.०६/०७/२०१३ रोजीच्या ठराव क्र.२२ अन्वये मा.महासभेने नियुक्ती केलेली आहे. दि.१२/१२/२०१३ रोजी मा. उच्च न्यायालयाने रिट याचिका क्र.३७४८/२०१३ मध्ये महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या नियम २०१२) चे नियम ५(१) मधील तरतुदीनूसार महानगरपालिकेवर पाचव्या नामनिर्देशित सदस्याचे नाव, आदेश पारीत केल्यापासून चार आठवडयात शिफारस करण्यास महानगरपालिका आयुक्तास आदेशित केलेले आहे.

मा.उच्च न्यायालयाच्या सदर आदेशानुसार मिरा भाईंदर महानगरपालिकेवर नेमावयाच्या पाचव्या नामनिर्देशित सदस्याच्या नेमणूकीबाबत दि.३१/१०/२०१४ रोजी गटनेते व पदाधिकारी यांची आयुक्त दालनात बैठक घेण्यात आली होती. सदर बैठकीत भारतीय जनता पार्टीचे गटनेता श्री.शरद केशव पाटील यांनी उमेदवार श्री.हेमंत सदानंद म्हात्रे यांचे व राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे गटनेता श्री.बर्नट डिमेलो यांनी उमेदवार श्री.चंद्रकांत सिताराम वैती यांचे नाव ५व्या नामनिर्देशित सदस्याच्या पदासाठी शिफारस केलेले आहे.

राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे नगरसेवक श्री. रवि व्यास यांनी ऑगस्ट २०१४ मध्ये नगरसेवक पदाचा राजीनामा दिल्यामुळे त्याचे पद रिकामे झाले आहे. त्यामुळे सद्यस्थितीत महानगरपालिकेतील भारतीय जनता पार्टी व राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीची संख्या बलाबल व तौलानिक संख्याबळ खालीलप्रमाणे आहे.

| पक्षाचे नाव | पक्षीय सदस्य संख्या | तौलानिक संख्याबळ |
|---|---|---|
| भारतीय जनता पार्टी | २८ | १.५२ |
| राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी | २७ | १.४६ |

भारतीय जनता पार्टीची तौलानिक संख्याबळ राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीपेक्षा अधिक आहे. तरी वरील तौलानिक संख्याबळाची सद्यस्थिती पाहता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या नियम २०१२) चे नियम ५(१) अन्वये भारतीय जनता पार्टीच्या उमेदवाराचे नाव शिफारस करणे अनिवार्य असल्यामुळे भारतीय जनता पार्टीचे उमेदवार श्री.हेमंत सदानंद म्हात्रे यांची ५व्या नामनिर्देशित सदस्य पदी नियुक्ती होण्यासाठी शिफारस करण्यात येत आहे.

आयुक्त 3.११.१४

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

E/Procedding/Hearing/Aayukt Dalan dt. 31-10-2014

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा.महासभा दि.२३/०३/२०१५

## // गोषवारा //

**प्रकरण क्र (७१) :-** **मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील इमारतींना वापर परवाना देणेबाबत विशेष सवलत मोहीम राबविणेकरिता मंजूरी मिळणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात बांधकाम परवानगी घेऊन बांधण्यात आलेल्या इमारतींमध्ये बऱ्याच इमारतीत वापर सुरु असून वापर परवाना घेण्यात आलेला नाही. याबाबतची सर्वसाधारणपणे कारणे खालीलप्रमाणे दिसून येतात.

१) परवानगीमधील अटींची पुर्तता न झाल्यामुळे

२) वास्तुविशारद व विकासक ह्यामध्ये झालेल्या वादामुळे

३) विकासकाने इमारतीचे बांधकाम विहीत वेळेत पूर्ण न केल्यामुळे सदनिका खरेदीदारांनी परस्पर घेतलेल्या ताब्यामुळे

४) इमारतीमध्ये काही भागात मंजूरी व्यतिरिक्त झालेल्या बांधकामामुळे

सद्यस्थितीत वापर परवाना अदा करणेची कार्यवाही महानगरपालिकेच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील विनियम क्र. ६(७)(८) मधील तरतूदीनुसार खालीलप्रमाणे केली जाते.

वास्तुविशारद वापर परवाना मिळण्यासाठी अर्ज सादर करतात. अर्जासोबत बांधकाम परवानगीप्रमाणे काम पुर्ण झाल्याबाबत व संरचनात्मकदृष्ट्या बांधकाम सक्षम असल्याबाबत मान्यता प्राप्त संरचना अभियंता यांचे प्रमाणपत्र (Structural Stability Certificate) सादर करतात. परवानगीमधील अटीशर्तींची पूर्तता झाल्यावर विना वापरपरवाना वापर सुरु असल्यास रु.२००/- प्रती चौ.मी. प्रमाणे दंड वसूल करुन वापर परवाना देण्याबाबत धोरण आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीत ब-याच जुन्या इमारती अश्या आहेत कि, वापर सुरु असून वापर परवाना घेतलेला नाही अथवा वापर परवाना दिलेला नाही. अश्या इमारतींना वापर परवाना देणेबाबत खालीलप्रमाणे विशेष मोहिम लागु करता येईल.

**विशेष मोहिमेतील अटी व शर्ती खालीलप्रमाणे.**

१. फक्त बांधकाम परवानगी घेतलेल्या व मंजूर नकाशा नुसार बांधकाम करण्यात आलेल्या इमारतींना सदर विशेष मोहिम लागू होईल.

२. बांधकाम परवानगीतील अटी व शर्तींची पुर्तता करणे आवश्यक आहे.

३. अग्निशमन विभागाकडील अग्निशमन सुरक्षेबाबत नाहरकत दाखल सादर करणे आवश्यक आहे.

४. अर्जदार यांनी विहीत नमुन्यातील अर्जासोबत नोंदणीकृत संरचना अभियंता यांचे स्ट्रक्चरल स्टॅबॅलिटी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

५. अर्जदार गृहनिर्माण संस्थेची नोंदणी पाच वर्षापूर्वी झालेली असावी.

६. गृहनिर्माण संस्था नोंदणीकृत नसल्यास भोगवटा इमारत पाच वर्षापूर्वीची असल्याचे पुरावे सादर करावे. म्हणजेच पाच वर्षापेक्षा कमी कालावधी करीता वापर असलेल्या व गृहनिर्माण संस्था नोंदणी नसलेल्या इमारतीना विशेष मोहिम लागू होणार नाही.

७. सदर विशेष मोहिमेनुसार दंडनिय शुल्क रू. २००/- प्रति चौ.मी. आकारण्यात येईल.

८. सदर विशेष मोहिम एक वर्षासाठी म्हणजेच दि. १/०४/२०१५ ते दि. ३१/०३/२०१६ या कालावधीसाठी लागू राहील.

उपरोक्त विशेष मोहिम पाच वर्षापूर्वीच्या गृहनिर्माण संस्था/भोगवटादार यांचे मर्यादीत असून विकासकास सदर विशेष मोहिम लागू होणार नाही. विकासकांकडून प्राप्त होणाऱ्या भोगवटा दाखला प्रस्तावात यापूर्वी घेण्यात येणारे विना वापर परवाना दंडनिय शुल्कात वाढ करून ते यापुढे रू. ४००/- प्रति चौ.मी. आकारण्यात यावे.

वरीलप्रमाणे अटीसह विशेष मोहिम लागू करण्यास मा. सर्व साधारण सभेची मंजुरी घेण्यास प्रकरण मा. महासभेपुढे सादर.

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, छत्रपति शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)
ता. जि. ठाणे, ४०१ १०१.

अपंग कल्याण विभाग
सभा दि :-२३/०३/२०१५

## ।। गोषवारा ।।

**प्रकरण क्र.७२ - अपंग व्यक्तींना स्वंय रोजगारासाठी आर्थिक मदत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका अपंग कल्याण योजने अंतर्गत महानगरपालिका क्षेत्रातील अपंग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी आर्थिक मदत प्रदान करणे यासाठी लेखाशिर्षकामध्ये १५ लाखाची तरतुद करण्यात आली आहे.

महाराष्ट्र शासन निर्णयानुसार अपंग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी बीज भांडवल उपलब्ध करुन देणे या योजने अंतर्गत जे अपंग लाभार्थी छोटया उदयोजकातील स्वयंरोजगार करण्यासाठी मान्यता प्राप्त बँकेकडुन प्रकल्प खर्चाची मर्यादा रु.१,५०,०००/- पर्यंत कर्ज पुरवठा घेतल्यास कर्जाच्या २०% रक्कम हि अनुदान म्हणुन देण्यात यावी असा प्रस्ताव आहे. त्यासाठी लागणाऱ्या अटीशर्ती खालीलप्रमाणे.

१) कुंटूबाचे मागील वर्षाचे वार्षिक उत्पन्न रु.१,००,०००/- पर्यंत असलेबाबत तहसिलदार, ठाणे यांचेकडील उत्पन्नाचा दाखला सादर करणे आवश्यक राहील.

२) मान्यता प्राप्त बँकेकडुन कर्ज मंजुर केलेले पत्र.

३) ४० % अपंग असल्याचा ठाणे सिव्हिल हॉस्पिटलचा दाखला.

४) रहिवासी दाखला-किमान तिन वर्षे.

तरी अपंग कल्याण योजने अंतर्गत अपंग व्यक्तींनी रु.१,५०,०००/- लाखापर्यंत बँकेकडुन जर कर्ज मंजुर करुन घेतले तर त्यानां मंजुर कर्जाच्या २०% रक्कम अनुदान प्रदान करण्यास सदरची योजना यापुढे राबविण्यास व येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरीस शिफारस आहे.

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

११/०३/१५

प्राप्त दि. ११/०३/२०१५
वेळ : १२:००

मा. महाराष्ट्र गोवा
रजिस्टर नोंद क्र.

# मा. महासभा दि :- २३/०३/२०१५

## ।। गोषवारा ।।

**विषय 03 :- मिरा भाईंदर महानगरपालिका प्राथमिक शाळेतील विदयार्थ्यांना गणवेश व शैक्षणिक साहित्य खरेदी करण्यासाठी प्रशासकिय व आर्थिक मंजुरी मिळणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या ३५ शाळा असुन दि.३० सप्टेंबर २०१४ च्या पटसंख्येनुसार इ. १ली ते इ.८वी पर्यत एकुण ९२६२ विदयार्थी-विदयार्थीनी शाळांमध्ये शिक्षण घेत आहेत. यामध्ये सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षात १०% संभाव्य वाढ लक्षात घेवून एकुण अंदाजे १०,१८८ पर्यंत पटसंख्या अपेक्षित आहे. सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षामध्ये विदयार्थी-विदयार्थीनींना शैक्षणिक साहित्य, शालेय गणवेश-टाय सह (प्रत्येकी-२), बुट-मोजे, वहया, बॅग, पाण्याच्या बाटल्या इत्यादी पुरवठा करण्याबाबत महानगरपालिकेचे धोरण आहे. मनपा शाळेतील विदयार्थी-विदयार्थीनींना सदर धोरणानुसार सन २०१५-१६ या शैक्षणिक वर्षामध्ये सदर साहित्य खरेदी करणे आवश्यक आहे. यासाठी आवश्यक तरतुद सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पात प्रस्तावित करण्यात आली आहे. सबब साहित्य खरेदी करण्याकरिता शिफारस आहे.करिता मा. महासभेची आर्थिक व प्रशासकिय मंजूरी करिता सविनय सादर

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका
11/3/15

प्राप्त दि. ११/०३/२०१५
वेळ: ०५:३५ वा.

गोषवारा प्राप्त दि. ११/०३/२०१५ वेळ ०५:३५
[illegible]
नोंद रजिस्टर अ. क्र. ४८

नगरसचिव विभाग.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महासभा दि.२३/०३/२०१५

(५)

## ।। गोषवारा ।।

**विषय :- टेंबा इस्पितळासाठी नियुक्त केलेल्या वैद्यकिय अधिकारी/ कर्मचारी यांच्या नियुक्ती बाबत.**

**प्रकरण क्र.७४ :-**

मा. उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये टेंबा इस्पितळाकरीता आवश्यक असलेले अधिकारी/कर्मचारी पद भरतीची मोहिम राबविण्यांत आली. घेण्यात आलेल्या थेट मुलाखती व मुलाखती अंती निवडण्यात आलेले विविध संवर्गातील अधिकारी/कर्मचारी यांची निवड यादी व प्रतिक्षा यादी मुलाखत घेतलेल्या दिवशी प्रसिध्द करण्यात आली आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५३(१) नुसार "*महानगरपालिकेचा जो अधिकारी सहाय्यक आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे- मग असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत-त्यांची नेमणुक करण्याचा अधिकार महानगरपालिकेमध्ये निहित असेल" आणि उक्त अधिनियमाच्या कलम ५३(३) नुसार, त्या व्यतीरिक्त, नगरपालिका अधिकारी व कर्मचारी- मग ते कायम असो किंवा तात्पुरते असोत- यांची नेमणूक करण्याचा अधिकार आयुक्तांकडे निहित असेल.*

त्या अनुषंगाने सहा. आयुक्त या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे अशा सवंर्गातील उमेदवारांची निवड यादी व प्रतिक्षा यादी ची विगतवारी खालीलप्रमाणे आहे.

**निवडयादी**

| अ. क्र. | संवर्ग | निवडलेला उमेदवार | प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १. | वैद्यकीय अधिकारी (स्त्रीरोग व प्रसुतिशास्त्र) | १. डॉ.सरीता अरुण चन्नावर | खुला |
| २ | वैद्यकीय अधिकारी | १. डॉ. दिनेश पुनमचंद प्रजापती<br>२. डॉ. वंदना सत्यनारायण गुंडला<br>३. डॉ. संजय दशरथ गईवाले<br>४. डॉ. प्रणिल राजेंद्र पढयार<br><br>५. डॉ. आकाश प्रेमलाल रंगारी<br>६. डॉ. संदिप प्रधान<br>७. डॉ. मोहन गोविंदा गायकवाड<br>८. डॉ. तानाजी दशरथ म्हारनूर<br>९. डॉ. प्रणव नरेश शिरभाते | खुला-१<br>खुला-२<br>खुला-३<br>खुला-४ (अपंग)<br><br>अ.जा.१<br>अ.जा.२<br>अ.ज.१<br>भ.ज.(क)१<br>इ.मा.व.१ |

②

**प्रतिक्षा यादी**

(जाहिरातीमध्ये नमुद केल्याप्रमाणे खालील प्रतिक्षायादी दि. १२/०२/२०१५ पासून एक वर्ष म्हणजेच दि. ११/०२/२०१६ पर्यंत वैध राहिल.)

| अ.क्र. | संवर्ग | प्रतिक्षायादीतील गुणानुक्रमे उमेदवार | प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १. | वैद्यकीय अधिकारी (स्त्रीरोग व प्रसुतीशास्त्र) | १. डॉ. आशिष विद्याधर श्यामकुल | खुला |
| २. | वैद्यकीय अधिकारी | १. डॉ. प्रशांत मारुती बोडके | खुला |
| | | २. शिल्पा व्ही. नाईक | खुला |
| | | ३. डॉ. मनाली प्रमोद राउत | खुला |
| | | ४. डॉ. विजय कारभारी कवर | अ.ज. |
| | | ५. डॉ. राजु बी. सुळे | भ.ज.(क) |

वर नमुद संवर्गासाठी महासभा नियुक्ती प्राधिकारी आहे. त्यामुळे प्रस्तुत निवड यादीस व प्रतिक्षा यादीस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५३(१) नुसार महासभेची मान्यता आवश्यक आहे. सबब, निवडलेल्या व प्रतिक्षा यादीतील उमेदवारांच्या नियुक्तीस मान्यता मिळणेस शिफारस असे.

(सुभाष लाखे) १८/२/१५

आयुक्त

मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महाळजा आयवार नोंद रजि. क्र. - ७४
दि. २१/५/२०१५ रोजी सायंकाळी ५:००

२१/५/१५

# मिरा भाईंदर महानगरपालिका

सर्वसाधारण सभा दि.२३/०३/२०१५.
//गोषवारा//

७५
विषय:- श्री. स्वप्निल सावंत(सहा.आयुक्त) प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र. १ निलंबन कायम करणेबाबत.

श्री. स्वप्निल सावंत हे प्रभाग अधिकारी प्रभाग क्र. १ येथे कार्यरत होते. महापालिका हद्दीतील अनधिकृत बांधकामे/अतिक्रमणे निष्कासित करण्याची व नव्याने कोणतीही अनधिकृत बांधकामे/अतिक्रमण होउ न देण्याची जबाबदारी प्रभाग अधिकारी यांची आहे. सदर जबाबदारी सक्षमतेने पार पाडता यावी यासाठी प्रभाग अधिकारी यांना पदनिर्देशित अधिकारी म्हणून शासन राजपत्र क्रमांक मिभा/मनपा/आयुक्त/४३/२०१४ दि. १० सप्टेंबर २०१३ नुसार घोषित करण्यांत आले आहे. अनधिकृत बांधकामे/अतिक्रमणांस आळा न घालणारे प्रभाग अधिकारी शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र आहेत.

प्रभाग क्र. १ मधील कार्यक्षेत्रात मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकामे/ अतिक्रमणे उभी राहिली असून निष्कासित करण्यांत आलेली बांधकामे सुध्दा पुन्हा नव्याने उभी राहीली आहेत. श्री. स्वप्निल सावंत प्रभाग अधिकारी यांनी आपल्या कर्तव्यात कसुर केली असून अनधिकृत बांधकामे/ अतिक्रमण यास एक प्रकारे संरक्षण दिले आहे. त्या अनुषंगाने जा.क्र. मिभामपा/ सा.प्र./३५८/२०१४ दि. १०/११/२०१४ रोजी निलंबन केले आहे.

श्री. स्वप्निल सावंत यांचे मुळ नियुक्ती पद (सहा.आयुक्त) असून सद्यस्थितीत प्रभाग क्षेत्रीय अधिकारी, प्रभाग क्रमांक १ यांची नियुक्ती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५ अन्वये करण्यांत आलेली असल्याने त्यांचे निलंबन व त्यासंबंधीची कारणे आयुक्तांनी निलंबन तारखेपासून सहा महिन्याच्या मुदतीत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (२)(ब) अन्वये महासभेत कळविणे बंधनकारक आहे. सबब श्री. स्वप्निल सावंत(सहा.आयुक्त) प्रभाग क्षेत्रीय अधिकारी, प्रभाग क्र. १ यांचे निलंबन कायम करणेस शिफारस करीत आहे.

आयुक्त,
मिरा भाईंदर महानगरपालिका.
१७/३/१५

मा. महात्मा गांधीवाश नोंद रजि क्र. ४३

दि. २१/२/२०१५ रोजी स. ११:०० वाजता

21/2/15

11:00

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.२३/०३/२०१५

## // गोषवारा //

**प्रकरण क्र७६:- शहरातील पावसाळ्यापुर्वी कच्चे/पक्के नाले सफाई/खेदाई करणे व इतर आरोग्य विभागाच्या कामास आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देणेबाबत.**

**अ) शहरातील कच्चे, पक्के नाले पावसाळयापुर्वी सफाई/खोदाई व गाळ/माती वाहतुक करणे.**

संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या डोंगरावरून पावसाळया दरम्यान मोठ्याप्रमाणावर पावसाचे पाणी शहरात शिरत असते. शहराच्या तीन बाजूने खाडी व समुद्राचा परिसर आहे. शहरातील नाले, गटारे उघड्या स्वरुपाचे असून या नाल्यांमार्फत शहरातील सांडपाणी व पावसाळी पाण्याचा निचरा नागरी व औद्योगिक वसाहती मधुन खाडी व समुद्रात होत असतो. महापालिका क्षेत्रात काही ठिकाणी कच्च्या नाल्यांचे पक्क्या नाल्याच्या स्वरुपात बांधकामे सुरु आहे. त्याचप्रमाणे मिरा भाईंदर शहर हे खाडी लगत असल्याने शहरात काही परिसरात सखल भागात पावसाळ्या दरम्यान पावसाचे पाणी साचुन नागरीकांना गैरसोय होत असते.

शहरातील कच्चे, पक्के नाले सफाई/खोदाई करणे सदर कामातुन निघालेला गाळ/माती/कचरा वाहतुक आदी साफसफाई विषयक कामे पावसाळयापुर्वी पुर्ण व समाधानकारक होण्याच्यादृष्टीने या कामाच्या निविदा मागवून सदर कामाचा कार्यादेश माहे एप्रिल पुर्वी दिल्यास कच्चे/पक्के नाले सफाईच्या कामासाठी पुरेसा कालावधी प्राप्त होईल व कामे मुदतीत पावसाळयापुर्वी पुर्ण करता येतील. नाले सफाई कामासाठी सहा प्रभाग समिती निहाय लागणारे जे.सी.बी. मशीन, पोकलन मशीन, बोटसह पोकलन मशिन, क्रेन मशिन, हायड्रा मशिन, डंपर, टोरस व कंत्राटी मजूर इत्यादी तसेच सखल भागातील पावसाच्या पाण्याचा उपसा करणे कामी विविध क्षमतेचे सक्शन पंप भाड्याने घेणे त्याचप्रमाणे आवश्यक त्याठिकाणी पावसाच्या पाणी निचरा करणेसाठी रोड क्रॉसिंग मध्ये टाकणेकामी विविध व्यासाचे आर.सी.सी. पाईप खरेदी, आदी कामे करणे आवश्यक आहे.

**ब) एकात्मिक डास नियंत्रण करणे कामी अळी नाशके, किटक नाशक, दुर्गंधी नाशके खरेदी करणे.**

महानगरपालिका क्षेत्राच्या तिन्ही बाजूने खाडी/समुद्र परिसर आहे. शहरातील नागरी, औद्योगिक वसाहतीतुन सांडपाण्याचा निचरा कच्चे, पक्के नाले व गटारातून खाडी/समुद्रात होत असतो. खाडी/समुद्रात सांडपाण्याचा निचरा होत असलेल्या ठिकाणी खाडीच्या पात्रात मोठ्याप्रमाणात कांदळवणे आहेत. त्यामुळे सांडपाण्याचा निचरा संस्थगतीने होत असतो. शहरातील मोकळ्या जागेत (ओपन प्लॉट) पावसाळ्या दरम्यान मोठ्याप्रमाणात पावसाचे पाणी जमा होऊन डबकी निर्माण होत असतात. त्याचप्रमाणे एकात्मिक नाले बांधणी अंतर्गत शहरामधील कच्चे नाले पक्क्या नाल्याच्या स्वरूपात बांधणेकामी बांधकामे, भुयारी गटार योजना बांधकामे इत्यादी सुरु असल्याने, ठिक ठिकाणी गटारे/ नाल्यातील सांडपाण्याचा प्रवाह अडविण्यात येत असतो. उपरोक्त सर्व परिस्थितीमुळे शहरात डासांची उत्पत्ती होत असते. शहरात होणारा डासांचा प्रादुर्भाव रोखणे करिता धुर फवारणी सुरू करणेबाबत मागील अनेक मा. महासभेमध्ये मा. सदस्यांमार्फत मागणी करण्यात आली होती.

शहराचा भौगोलिक परिसर लक्षात घेता व वरील परिस्थितीमुळे शहरात होणारी डास प्रदुर्भाव रोखणे व नियंत्रण करणे कामी एकात्मिक डास नियंत्रण कार्यक्रम राबविणे व शहरात डासनाशके, अळीनाशके व धुर फवारणी मोठ्याप्रमाणावर करणे आवश्यक आहे. याकामी नामांकित कंपनीची डासनाशके, अळीनाशके किटकनाशके तसेच फॉग मशीन, आवश्यक वाहने व त्यावर यंत्र सामुग्री खरेदी करणे व बसविणे, त्याचप्रमाणे मंजुर दरात अतिरिक्त कंत्राटी कामगार धुर फवारणी करीता उपलब्ध करणे आवश्यक आहे.

त्याचप्रमाणे महानगरपालिकेच्या विविध आस्थापना शाळा, प्रभाग कार्यालये, मंगल कार्यालये, प्राथमिक आरोग्य केंद्र, समाज मंदिरे, स्पोर्ट्स क्लब, सार्व. शौचालये, मच्छी मार्केट, आदी साफसफाई करणेकामी दुर्गंधीनाशके, साहित्यवस्तु खरेदी करणे. त्याचप्रमाणे महापालिका क्षेत्रात दरवर्षी गणेशोत्सव, नवरात्रोत्सव, दसरा, दिवाळी, नाताळ, आदी सार्वजनिक उत्सवाच्या ठिकाणी फवारणी करणेकामी किटकनाशक पावडरी खरेदी करणे आवश्यक आहे.

सन २०१५-१६ या आर्थिक वर्षातील अर्थसंकल्पिय अंदाजपत्रकातील साफसफाई व सोयी या लेखाशिर्षा अंतर्गत असलेल्या वॉर्ड सफाई/नाले सफाई करणे, एकात्मिक डास नियंत्रण कार्यक्रम राबविणे, दुर्गंधी/किटकनाशके/साहित्यवस्तु खरेदी करणे या लेखाशिर्षाखाली करण्यात आलेल्या तरतुदीतुन करण्यात येईल.

वरीलप्रमाणे कामांना मा. महासभेची आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेस शिफारस असे.

आयुक्त,
मिरा भाईंदर महानगरपालिका
11/3/15

F:\Raj\Raj Documents\STANDING GOSHVARA\Goshwara Nale safsafai - 2015-16.docx

प्राप्त दि. ११/०३/२०१४

वेळ = ११=४० वा.


[illegible] दि. ११/०३/२०१४ वेळ ११:४०

क्र. [illegible] / [illegible]

नोंद रजिस्टर क्र. २७

[illegible]

# मिरा-भाईदर महानगरपालिका

**मा. महासभा दि. २३/०३/२०१५**

**।। गोषवारा ।।**

**प्रकरण क्र. ( ७७ ):- मोबाईल टॉवर्सना अग्निशमन दलाचा ना हरकत दाखला देणेकामी फि ची आकारणी निश्चीत करणेबाबत.**

मिरा भाईदर महानगरपालिका क्षेत्रात विविध ठिकाणी इमारतीवर मोबाईल टॉवर्स उभारणेकामी अग्निशमन विभागाचा नाहरकत दाखला मिळणेकामी अर्ज अग्निशमन विभागास प्राप्त झाले आहेत.

अग्निशमन विभागास प्राप्त झालेले मोबाईल टॉवर्स करीता नाहरकत दाखला मागणी केलेली सर्व प्रकरणे अदयाप पर्यत अग्निशमन विभागाकडे प्रलंबीत आहेत. अग्निशमन फी करीता मा. महासभा दि. १८/०२/२०१२ प्र. क्र. १०८ ठराव क्र. ११४ अन्वये पारित केलेल्या ठरावात मोबाईल टॉवर्सना अग्निशमन विभागाचा नाहरकत दाखला देतेसमयी आकारवयाच्या फी बाबत कोणताही उल्लेख अथवा निर्णय नसल्याने सदर नाहरकत दाखला घेणे करीता प्राप्त झालेले अर्ज अग्निशमन विभागाकडे अदयापपर्यत प्रलबीत आहेत.

मिभा/मनपा/अग्नि/२०९/२०१४-१५ दि.२८/१०/२०१४ अन्वये अग्निशमन विभागाच्या महसुलात वाढ करणारा व नविन दर मंजुरी करिता प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर प्रस्तावात मोबाईल टॉवर्सच्या ना हरकत दाखल्याकरीता आकारावयाच्या प्रस्तावीत फी चा समावेश करण्यात आला होता. सदर महसुल वाढीचा प्रस्ताव हा अस्तित्वात असलेलया फी मध्ये ५० % इतकी वाढ करून प्रस्तावीत करण्यात आला होता. सदरचा महसुल वाढीचा प्रस्ताव मा. स्थायी समिती सभे समोर मांडला असता मा. स्थायी समिती सभा दि. २४/१२/२०१४ प्र. क्र. ११६ ठराव क्र. ११० अन्वये मा. स्थायी समितीने जुन्या दरात ५० % ऐवजी २० % इतकी वाढ करण्यास मंजूरी दिली होती. तद्नंतर सदर प्रस्तावास मा. महासभेची मंजूरी मिळणे आवश्यक होते. परंतू सदर विषय मा. महासभेच्या समोर न आल्याने फी वाढ करणे व नवीन दरास मंजूरी मिळालेली नाही. परिणामी जुन्या ठरावानुसारच फि ची आकारणी करावी लागणार आहे. त्यामुळे मोबाईल टॉवर्सच्या ना हरकत दाखल्याकरीता आकारावयाच्या फि ची निश्चीती करणेकरीता सदर फि बाबत स्वतंत्र प्रस्ताव मा. महासभा सभेसमोर मांडणेत येत आहे. जेणे करून मोबाईल टॉवर्सना ना हरकत दाखला प्रदान करणे सोयीस्कर ठरेल व अग्निशमन विभागाचा महसुल उत्पन्नात वाढ होईल.

मोबाईल टॉवर्सकरीता देण्यात येणाऱ्या अग्निशमन विभागाच्या नाहरकत दाखल्या करीता आकारण्यात येणाऱ्या फि बाबत ठाणे महानगरपालिकेत विचारणा केली असता सदर दाखल्याकरिता रु. १,०००/- इतकी फी आकारण्यात येत आहे.

वर नमुद केल्यानुसार मिरा भाईदर महानगरपालिकेच्या नजिकच्या ठाणे महानगरपालिकामध्ये वरीलप्रमाणे फि कायम करण्यात आली आहे. सदरचे दर हे अत्यंत कमी आहेत. मोबाईल कंपन्या हे टॉवर्स जरी ग्राहकांच्या सुविधेकरीता उभारत असली तरी त्यांचे मुख्य उद्दीष्ट हे वाणिज्यीक सबळता प्राप्त करणे हाच आहे. या कारणास्तव मिरा भाईदर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाकडून देण्यात येणाऱ्या मोबाईल टॉवर्सच्या नाहरकत दाखल्याकरीता खालील प्रमाणे शुल्क आकारण्यात यावे.

| अ. क्र | तपशील | आकारावयाचे शुल्क |
|---|---|---|
| १. | नवीन मोबाईल टॉवर्स करीता देण्यात येणाऱ्या नाहरकत दाखल्याकरीता आकारावयाची फि | रु. ११,०००/- |
| २. | दरवर्षी दिलेल्या नाहरकत दाखल्याचे नुतनीकरण करणेकामी | रु. ५,५००/- |

*तरी उपरोक्त प्रस्तावीत दराप्रमाणे फी ची आकारणी करणेस मा. महा सभेची मंजुरी मिळणेस शिफारस असे.*

आयुक्त
मिरा भाईदर महानगरपालिका

११/०३/१५

प्राप्त दि. ११/०३/२०१५

वेळ : ११:४५ वा.

गोषवारा प्राप्त दि. ११/३/२०१५ वेळ ११:४५

~~मा. स्थायी समिती~~ / [illegible]

नोंद रजिस्टर अ. क्र. ४६

नगरसचिव विभाग.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता. जि. ठाणे - ४०१ १०१
दुरध्वनी क्र. : ८१९ २८२८.

## // गोषवारा //

**मा. महासभा दि. २३/०३/२०१५**

**प्रकरण :- ७८ वाहने वाहन चालकसह भाडे तत्त्वावर इंधनासह (संपूर्ण सेवा) ठेक्याने घेणेकामी निविदा मागविणेकरिता आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत...**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची एकुण ६४ वाहने असुन सदरची वाहने महानगरपालिकेचे अधिकारी यांचे वापराकरिता विविध विभागात कार्यरत आहेत. अधिकारी व विविध विभाग, अत्यावश्यक सेवा इ.ठिकाणी सदर वाहनांची संख्या अपुरी असल्याने सामान्य प्रशासन, मालमत्ता कराची वसुली करणेकामी, आरोग्य विभागात पल्स पोलिओ मोहिमेसाठी, आपत्कालीन सेवेकरिता व इतर विभागांत आवश्यकतेनुसार खाजगी वाहने वाहन चालकासह सेवा भाडयाने घेणे आवश्यक आहे. याकामी सन २०१४ - १५ या आर्थिक वर्षा करिता ठेका वाहने पुरवठा करणे कामी दि. ०५/०३/१४ रोजी वार्षिक कार्यादेश देण्यात आलेला आहे. **सदर कार्यादेशाची मुदत दि. ०४/०३/२०१५ रोजी संपत असल्याने खाजगी गाडया भाडयाने घेणेबाबत नव्याने निविदा मागवुन ठेका निश्चित करणे आवश्यक आहे.**

सन २०१४-१५ या वर्षात सदर कामी मे. सर्वस्व इंटरप्रेनर्स यांना जा. क्र. मनपा/ वाहन/ २५०/२०१३-१४ दि. ०५/०३/२०१४ अन्वये वार्षिक कार्यादेश देण्यात आलेला होता. सन २०१४-१५ या आर्थिक वर्षात खाजगी वाहने वाहन चालकासह भाडेतत्वावर (संपुर्ण सेवा) ठेका घेणे या लेखाशिर्षात १.०० कोटी इतकी तरतुद करण्यात आलेली आहे.

मागील निविदेची मुदत मार्च २०१५ मध्ये संपुष्टात येत असुन नविन निविदा मंजुर झाल्यानंतर सन २०१५-१६ मध्ये नविन अर्थसंकल्पात पुरेशी तरतुद उपलब्ध होणार असुन खाजगी गाडया भाडयाने घेणेकरिता ~~तीन~~ सन २०१५-१६ या वर्षा करिता निविदा मागविणेसाठी मा. महासभेची आर्थिक व प्रशासकिय मंजुरी मिळणेस शिफारस असे.

३/२/१५

आयुक्त,
मिरा भाईंदर महानगरपालिका

गोषवारा प्राप्त दि. ५/२/२०१५ वेळ ११:२५
मा. स्थायी समिती / महासभा गोषवारा
नोंद रजिस्टर अ. क्र. ६०

५/२/१५
नगरसचिव विभाग.

(१)

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २३/०३/२०१५

## //गोषवारा//

**प्रकरण क्रमांक ( ७८ )**:- मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मालमत्तांचे भाडे ठरविणेस मान्यता देणे बाबतचा प्रस्ताव फेर सादर करणे.

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या भाडयाने देण्यात येत असलेल्या मालमत्तेचे भाडे हे अत्यल्प असल्याने सदर मालमत्ताची देखभाल व दुरुस्ती करण्यास निधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने सदर मालमत्तेचे भाडे वाढ प्रशासनाने प्रस्तावित करुन सदर प्रस्ताव दि.२५/११/२०१४ रोजीच्या मा. महासभेपुढे ठेवला होता. मा.महासभा दि.२५/११/२०१५ ठराव क्र. ३९ अन्वये प्रशासनाने प्रस्तावित केलेल्या मालमत्तेचे भाडे हटविण्यासाठी प्रथम सर्व सन्माननीय गटनेत्याची बैठक बोलावून तदनतर प्रस्ताव फेर सादर करण्याबाबत निर्णय झाला. त्याअनुशंगाने मा.महापौर यांच्या दालनात दि.३१/०१/२०१५ रोजी सन्माननीय गटनेत्यांची बैठक आयाजित करण्यात आली, तथापी सदर बैठक होऊ शकली नाही. तदनंतर सदर बैठक दि.०४/०२/२०१५ रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील गटनेते उपस्थित होते.

१) श्री. बर्नट डीमेलो गटनेता राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी

२) श्री. जुबैर इनामदार गटनेता, भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस

३) श्री. राजु भोईर गटनेता, बहुजन विकास आघाडी

| अ.क्र | मालमत्ता प्रकार | सध्याचे दर प्रतिदिन | प्रस्तावित दर प्रतिदिन | सन्माननीय गटनेत्यांनी प्रस्तावित केलेले दर प्रति दिन |
|---|---|---|---|---|
| १ | समाजमंदीर – १६ | रु. ५००/- प्रति दिन | रु. ३०००/- प्रति दिन | रु. १०००/- |
| २ | भाईंदर (पूर्व) खारीगांव हॉल- १ | रु. ५००/- प्रति दिन | रु. ३०००/-प्रति दिन | रु. १०००/- |
| ३ | भाईंदर (प.) विनायक नगर हॉल – ०१ | रु. ५००/- प्रति दिन | रु. ३०००/-प्रति दिन | रु. १०००/- |
| ४ | नगरभवन मंगल कार्यालय | रु. ३०००/- प्रति दिन | रु. १५,०००/-प्रति दिन | रु. ४०००/ |
| ४अ | नगरभवन मंगल कार्यालय (वातानुकूलीत) | - | रु. २५,०००/-प्रति दिन | रु. ५०००/- |
| | ओपन टॅरेस | रु. १५००/-प्रति दिन | रु. ५०००/- प्रति दिन | रु. २०००/- |
| | दिवाबत्ती चार्ज | रु. १०/- प्रति युनिट | रु. १५/- प्रति युनिट | रु. १५/- |
| | व्हीडीयो शुटींग वापर आकार | रु. १००/- प्रति युनिट | रु. ३००/- प्रति युनिट | रु. १००/- |
| | खुर्ची भाडे | रु. ५.००/- प्रति नग | रु. ५/- प्रति नग | रु. ५/- |
| | पाणी वापर | रु. १५०/- | रु. ५००/- | रु. २००/- |
| | साफसफाई चार्जेस | रु. ३००/- | रु. १०००/- | रु. ५००/- |
| | अनामत रक्कम | रु. १०००/- | रु. ५०००/- | रु. ५०००/- |
| ५ | सुभाषचंद्र बोस मैदान (शालेय / महाविद्यालयीन क्रिडा स्पर्धा/) | रु. १०००/- प्रति दिन | रु. ५०००/- प्रति दिन | रु. १५००/- |
| | विजेचा वापर<br>मैदान साफसफाई शुल्क (शाळा)<br>मैदान साफसफाई शुल्क(अन्य संस्था) | रु. १०/-<br>रु.१००/- प्रति दिन<br>रु. ३००/- प्रति दिन | रु. १५/- प्रति युनिट<br>रु. ३००/- प्रति दिन<br>रु.५००/- प्रति दिन | रु. १५/- प्रति युनिट<br>रु. ३००/- प्रति दिन<br>रु.५००/- प्रति दिन |
| ६ | मैदाने (आरक्षणे व आर.जी जागा) | | | |
| | अ) शाळेच्या खेळासाठी / कला व क्रिडा | रु. १००/- प्रति दिन (२०० मी X २०० मी ) | रु. १०००/- प्रति दिन | रु.१००००/- प्रति दिन |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| ७ | शाळा इमारती मधील वर्ग / जागा (सुट्टीच्या दिवसात) शैक्षणिक वापरासाठी | रु. २५०/- प्रति दिन | रु. ५००/- प्रति दिन | रु. ५००/- प्रति दिन |
| ८ | तसेच मंडप परवानगीसाठी खालील प्रमाणे दर आकारण्यात येतात | | | |
| | अ) मंडप परवानगी (विक्री करीता) | रु. १.००/- प्रति चौ.फूट प्रति दिन | रु. १.००/- प्रति चौ.फूट/प्रति दिन | रु. ५.००/- प्रति चौ.फूट/प्रति दिन |
| | ब) मंडप परवानगी (लग्न/इतर उत्सव) | रु. ०.५० प्रति चौ.फूट प्रति दिन | रु.०.५०/- प्रति चौ.फूट/प्रति दिन | रु.१.००/- प्रति चौ.फूट/प्रति दिन |
| | क) गेट/कमानी/बॅनर (धार्मिक शेक्षणिक संस्था) | रु. २५०/- प्रति चौ.फूट प्रति दिन | रु. २५०/- प्रति चौ.फूट/प्रति दिन | रु. १०००/- प्रति चौ.फूट/प्रति दिन |
| | ड) गेट/कमानी/बॅनर (इतर संस्था) | रु. ५००/- प्रति चौ.फूट प्रति दिन | रु. ५००/- प्रति चौ.फूट/प्रति दिन | रु. ३०००/- प्रति चौ.फूट/प्रति दिन |
| ९ | जैसलपार्क चौपाटीवरील मैदान (जिल्हाधिकारी यांच्या पुर्व परवानगीने) | रु.१०००/- प्रति दिन | रु. १०००/- प्रति दिन | रु. ५०००/- प्रति दिन |
| १० | शुटींग साठी मालमत्ता / रस्ते भाड्याने देणे | रु. १०,०००/- प्रति दिन | रु. १०,०००/- प्रति दिन | रु. १५,०००/- प्रति दिन |

वरील प्रस्तावानुसार भाडे ठरविण्यास शिफारस आहे.

५/२/१५

**आयुक्त**
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC-1/DK/2014-15 /MG -12

गोषवारा प्राप्त दि. ८/2/२०१५ वेळ ११:१०

मा. स्थायी ~~समिती~~ / महासभा गोषवारा

नोंद रजिस्टर अ. क्र. ४2

लिपिक ८/२/१५

नगरसचिव विभाग.

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २३/०३/२०१५

## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक ( ८०) :-** छत्रपती शिवाजी महाराज मार्गावर (काशिमिरा रोड) उन्नत मार्ग व अंडरपास बांधणे कामांच्या सुधारीत अंदाजपत्रकांना मान्यता देणेबाबत.

मिरा-भाईंदर महनगरपालिका क्षेत्रातील भाईंदर (पूर्व) वीर सावरकर चौक (गोल्डन नेस्ट सर्कल) ते राष्ट्रीय महामार्ग क्र. ८ हा प्रमुख रस्ता असून सदर रस्त्यावर एकूण ०८ ठिकाणी सिग्नल आहेत. सदर रस्त्यावर वाहतूकीचा प्रचंड ताण असल्याने सकाळ व संध्याकाळच्या वेळेस वाहतूकीचा खोळंबा होत असतो. सदर रस्त्यावर ०६ ठिकाणी उन्नत मार्ग व दोन ठिकाणी पादचारी पुल बांधणेसाठी रू. ३७.८२ कोटी रकमेच्या खर्चास मा. महासभा दि. १९/०७/२०१४ ठराव क्र. २९ अन्वये प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यात आलेली आहे.

तद्नंतर सदर कामासाठी मुंबई महानगरप्रदेश विकास प्राधिकरणामार्फत सर्वप्रथम अनुदान उपलब्ध करून घेण्यास व अनुदान उपलब्ध होत नसल्यास शासकीय / निमशासकीय संस्थेकडून कर्ज उपलब्ध करून घेण्यास मा. महासभा दि. २५/११/२०१४ ठाव क्र. ४० अन्वये मा. महासभेने मान्यता दिलेली आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेने सदर प्रस्तावानुसार मुंबई महानगरप्रदेश विकास प्राधिकरणाकडे पत्र व्यवहार करून पाठपुरावा केला असता, त्यांनी अनुदान देण्यास असमर्थता दर्शविलेली आहे. सदर रस्त्यावर उन्नत मार्ग, पादचारी पुल, अंडर पास बांधणे बाबत मुंबई महानगरप्रदेश विकास प्राधिकरण, (MSRDC) महाराष्ट्र रज्य रस्ते विकास महामंडळ (MMRDA) यांच्यासोबत सन्माननीय स्थानिक खासदार, आमदार यांच्या उपस्थितीत बैठका घेण्यात आल्या. सदर बैठकीमध्ये झालेल्या सूचनेनुसार व भविष्यातील सदर रस्त्यावरील वाढणारी वाहतूक लक्षात घेता खालीलप्रमाणे सुधारीत कामे खर्चासह प्रस्तावित करण्यात येत आहेत.

१) भाईंदर (पूर्व) भागातील वाहनांना जाण्यासाठी वीर सावरकर चौक (गोल्डन नेस्ट सर्कल) व दिपक हॉस्पीटल जंक्शन येथे उन्नत मार्ग (फ्लाय ओव्हर ब्रिज) बांधणे.

२) दिपक हॉस्पीटल जंक्शन, सिल्व्हर पार्क जंक्शन व प्लेझंट पार्क जंक्शन येथे अंडरपास बांधणे.

३) एस. के. स्टोन जंक्शन, कनकिया जंक्शन व शिवार उद्यान जंक्शन (एन.एच. हायस्कुल रस्ता व सरदार पटेल रस्ता) या ठिकाणी एक उन्नत मार्ग बांधणे.

४) काशिमिरा नाका येथे पादचारी पुल बांधणे

वरील सुधारीत कामांसाठी रू. २५६.३४ कोटी खर्च अपेक्षित आहे. सदर प्रस्तावित कामांसाठी दोन ते तीन वर्ष कालावधी लागेल. सदर कामांसाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अथवा इतर शासकीय, निमशासकीय संस्थेकडून कर्ज उपलब्ध होऊ शकेल. तरी वरील कामांच्या सुधारीत खर्चास व आवश्यक रकमेचे कर्ज घेण्यास मान्यता देणेस शिफारस आहे.

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका
१२/०३/१५

PC3/DK/MS/2014-15/MG-2

घोषणापत्र प्राप्ती दि. १२/३/२०२५ वेळ ३.४०

जा. क्र. ____ / स्वीकारले

नोंद रजिस्टर अ. क्र. ..................

लिपिक

नगरसचिव विभाग.

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. २३।०३।२०१५

## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक ( ८९ )** :- भाईंदर (पूर्व) खारीगाव मासळी मार्केट इमारतीच्या जागेचा मोबदला देणेबाबत विचार विनिमय करून निर्ण्य घेणे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर (पूर्व) खारीगांव येथे तळमजल्याची इमारत असून सदर इमारत सन १९८५ पूर्वी पासूनची आहे. सदर ठिकाणी तळ अधिक एक मंजल्याची इमारत बांधण्याचे काम मंजूर झालेले आहे. मौजे खारी, स.क्र.१३९(जुना), ५३ (नवा) हि.क्र.८ हा ८८०.०० चौ.मी. क्षेत्राचा भुखंड तुकाराम बारक्या पाटील व श्री. पद्माकर बारक्या पाटील यांचे नावे नोंद आहे. त्यापैकी ११०.०० चौ.मीटर जागा ही मार्केट इमारतीच्या खालील आहे. इमारती खालील उर्वरीत २३०चौ.मीटर जागेची नोंद खारी पाड्याचे स्मशान नावाने आहे. सदर जागा रहिवास विभागात समाविष्ट होत आहे. सदर जागा मालकांनी सदर जागेचा मोबदला देईपर्यंत सदर मार्केट इमारतीचे नूतनीकरण करू नये म्हणून महानगरपालिकेकडे हरकत नोंदवलेली आहे. सदर जागेपैकी ११०.०० चौ. मीटर क्षेत्राते जागा मालक श्री. तुकाराम बारक्या पाटील व श्री. पद्माकर बारक्या पाटील त्यांनी सदर जागेचे चालू बाजारभावानुसार (रेडी रेकनर) जागेची किंमत देण्याची मागणी केलेली आहे. रेडी रेकनर नुसार जागेची किंमत रू. २५,८५,०००/- (अक्षरी रूपये पंचवीस लक्ष पंच्याऐंशी हजार मात्र) एवढी होत आहे. सदर जागेची मोजणी उप अधिक्षक, भूमी अभिलेख, ठाणे यांच्याकडून करून घेण्यात आलेली आहे.

तरी सदर जागेवर मार्केट इमारतीची पुर्नबांधणी करण्याकरीता जागेचा मोबदला देण्याबाबत विचार विनिमय करून निर्णय होण्यास शिफारस आहे.

आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC2/13-14/DK/MG-9

[illegible] - 30

31/1/15
3.40

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

**मा. महासभा** दि. 23/03/2015

**//गोषवारा//**

**प्रकरण क्रमांक ( ८२ )** :- मौजे महाजनवाडी स.क्र. १०७/१पै,१०८/१,२,३/१०९/२३,२४,२७,२८,११०/५पै या जागेमधील नागरी सुविधा क्षेत्राच्या भुखंडावर तरणतलाव बांधणे कामास मान्यता देणे.

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मौजे महाजनवाडी स.क्र. १०७/१पै,१०८/१,२,३/१०९/२३,२४, २७,२८,११०/५पै या जागेमधील नागरी सुविधा क्षेत्राच्या एकूण ७७८१.०२ चौ.मी. क्षेत्रापैकी ५०% प्रमाणेच्या २८९०.५१ चौ.मीटर क्षेत्रामध्ये शाळेचे बांधकाम करणेस विकसक मे. काऊन टाऊन लँड डेव्हजपर्स प्रा. लि. यांना बांधकाम परवानगी देण्यात आली असून सदरचे क्षेत्र विकासकास मा. महासभेच्या मान्यतेने ३० वर्षे भाडयाने देण्यात येऊन दि. ३०/०६/२०११ रोजी करारनामा करण्यात आला आहे. तसेच परवानगी प्रमाणेच्या मंजूर रेखांकनामध्ये उर्वरीत ५०% प्रमाणेच्या ३८९०.५१ चौ.मीटर महानगरपालिकेच्या मालकीच्या क्षेत्रामध्ये बगीचा दर्शविलेला आहे.

सदर प्रस्तावात नमूद जागा मंजूर विकास योजनेप्रमाणे औद्योगिक विभागामध्ये समाविष्ट असून या जागेमध्ये रहिवास वापरासाठी परवानगी दिलेली आहे. (I to R) त्यासाठी मंजूर विकास निमंत्रण नियमावलीतील विनियम क्र. ५५ अे प्रमाणे सोडावयाच्या नागरी सुविधा क्षेत्राचा भूखंड महानगरपालिकेस हस्तांतरीत झालेला आहे. सदर विनिमय क्र. ५५-अे (III) प्रमाणे नागरी सुविधा क्षेत्राच्या भूखंडाच्या एकूण क्षेत्राच्या ५०% प्रमाणेचा भुखंड अबाधित (Un builtable) क्षेत्र उदा. बगीचा, आर.जी. इत्यादीसाठी ठेवणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे विकासकास शाळेच्या बांधकामसाठी दिलेला ३८९०.५१ चौ.मीटर क्षेत्राचा भुखंड वगळता उर्वरीत ३८९०.५१ चौ.मीटर क्षेत्राचा भुखंड अबांधिव (Un builtable) क्षेत्र म्हणुन (बगीचा) दर्शविलेला असून सदर भुखंड महानगरपालिकेच्या ताब्यात आहे. सदर ३८९०.५१ चौ.मीटर अबांधिव (Un builtable) क्षेत्रामध्ये विकास नियंत्रण नियमावली नुसार १५% बांधकाम क्षेत्र अनुज्ञेय होऊ शकतो. यापैकी तळ मजल्यावर १०% व पहिल्या मजल्यावर ५% कमाल उंची ८.०० मी. याप्रमाणे वापर अनुज्ञेय आहे.

त्याअनुशंगाने ३८९०.५१ चौमीटर चा भुखंड क्षेत्रानुसार ५८३.५७ चौमीटर बांधकाम क्षेत्र अनुज्ञेय होईल. यापैकी तळ मजल्यावर ३८९.०५ चौमीटर व पहिल्या मजल्यावर उर्वरीत १९४.५१ चौमीटर क्षेत्र अनुज्ञेय होवू शकते. सदर अबांधिव (Un builtable) क्षेत्रावर अनुज्ञेय होणाऱ्या तरणतलाव बांधकामासाठी अंदाजे ढोबळरित्या रु. २.५० कोटी एवढा खर्च अपेक्षित आहे. तरी सदर कामास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देणेस शिफारस आहे.

3/2/15

आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC-1/DK/2014-15 /MG -9

ના. મહેકમા ગોપાલભાઈ કોર્ટ રજિ-ફી- ૩૯

[illegible]
૭|૩|૭૫
૧૨:૦૦

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.२३/०३/२०१५

## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक (८३):-** महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत मंजूर झालेल्या पर्जन्य जलवाहिन्या प्रकल्पाअंतर्गत (टप्पा १) अतिरिक्त निधी शासनाकडून प्राप्त करून घेणेबाबत.

मिरा-भाईंदर महानगरपालिके मार्फत महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानाअंतर्गत पर्जन्य जलवाहिन्या प्रकल्प राबविण्यासाठी मा. महासभा दि.२०/०३/२०१० ठराव क्र. ६४ अन्वये मान्यता दिलेली आहे. महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानाअंतर्गत रु.१७८.७१ कोटी रक्कमेचा प्रस्ताव तयार करण्यात आला होता. सदर प्रस्तावास जा.क्र. मु.अ./प्र.व्य.स.वे/पुणे/तांशा-०५/३१० दि.०९/०२/२०१३ अन्वये. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्याकडून तांत्रिक मंजूरी प्राप्त झालेली आहे. सदर प्रस्तावास राज्य शासनाची मान्यता मिळालेली असून त्याबाबत पारीत शासन निर्णयानुसार एकूण अंदाजपत्रकाच्या ५०% रक्कम (८९.३५५ कोटी रक्कम) शासनाकडून अनुदान म्हणून प्राप्त झाली आहे. ५०% (८९.३५५ कोटी) रक्कम महानगरपालिकेमार्फत खर्च करावयाचे आहेत. राज्य शासनाद्वारे अनुदानाद्वारे प्राप्त होणाऱ्या ५०% (८९.३५५ कोटी) रक्कमेपैकी शासन निर्णय क्र. नगरो-२०११/प्र.क्र.२१८/११/नवि-३३ दि.३१/०३/२०१२ व शासन निर्णय क्र. नगरो-२०१२/प्र.क्र.४५/१२/नवि-३३ दि.३१/०३/२०१२ अन्वये ५०% रक्कम म्हणजे ४४.६८ कोटी प्राप्त झालेली आहे.

सदर योजनेच्या कामासाठी पुर्ण झालेल्या कामाचे शासनाकडे ७०% रक्कमेचे उपयोजिता प्रमाणपत्र सादर करण्यात आल्यानंतर उर्वरीत ५०% रक्कम (४४.६७५) संदर्भिय शासन निर्णय क्र. नगरो-१०१४/प्र.क्र.३६/नवि-३३ दि.२४/०३/२०१४ अन्वये प्राप्त झालेली आहे. अशाप्रकारे शासनाकडून एकूण ८९.३५५ कोटी रक्कम प्राप्त झालेली आहे. शासन निर्णय क्र. नगरो-२०१४/प्र.क्र.११९/नवि-३३ दि.२१/०८/२०१४ अन्वये शासन निर्णयानुसार महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानाअंतर्गत मंजूर झालेल्या प्रकल्पाअंतर्गत ड वर्ग महानगरपालिका यांना मंजूर प्रकल्प किमतीपैकी राज्य शासनाद्वारे ७०% अनुदान देण्याबाबत निर्णय घेतला आहे.

त्यासाठी शासन निर्णयामधील अ.क्र. ज मध्ये काही अटी व शर्ती नमूद करण्यात आलेल्या आहेत. त्या खालीलप्रमाणे आहेत.

१) शासन निर्णयानुसार खालील सुधारणा पूर्ण करणे बंधनकारक आहे.

अ) द्विलेखा नोंद पध्दतीचा अवलंब करणे.

ब) महानगरपालिकेच्या कामकाजाचे पूर्ण संगणीकरण करणे.

क) मालमत्ता कर विषयक सुधारणा

ड) पर्जन्य जलसंचय

इ) नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यक्षेत्रात पाणी बचतीच्या उपाययोजना राबविणे.

ई) नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यक्षेत्रात ऊर्जा बचतीच्या उपाययोजना राबविणे.

२) नागरी स्वराज संस्थेने सुधारीत वित्तीय आकृती बंधाच्या प्रमाणानुसार देय होणारा त्यांचा हिस्सा यापूर्वी उघडलेल्या स्वतंत्र बँक खात्यामध्ये प्रथम जमा करणे आवश्यक राहील.

(२)

३) सदर योजनेअंतर्गत मंजूर प्रकल्प विहीत कालावधीत पूर्ण करत असल्याबाबतचे हमीपत्र महापौर व आयुक्ताच्या स्वाक्षरीने सादर करणे तसेच त्याबाबतचा ठराव सादर करणे आवश्यक राहील.

वरील तीन अटीपैकी मिरा-भाईंदर महानगरपालिकेने द्विलेखा नोंद पध्दती, महानगरपालिकेच्या कामकाजाचे पूर्ण संगणीकरण, पर्जन्य जलसंचय, महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रामध्ये उर्जा व पाणी बचतीच्या उपाययोजना राबविणे या सुधारणा करण्यात आलेल्या आहेत.

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान अंतर्गत वरील कामांसाठी राज्य शासनाने शासन निर्णयात नमुद केल्याप्रमाणे महानगरपालिकेस लागणारी रक्कम उभी करण्यास व आवश्यकतेनुसार कर्ज उभारण्यास व सदर योजनेंतर्गत राज्य शासनाच्या प्रमुख सुधारणांचा अंगीकार करण्यास बंधनकारक केले आहे. त्या सुधारणांचा (Reforms) अंगीकार करण्यास मंजुरी देण्यात आलेली आहे.

सद्यस्थितीमध्ये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानाअंतर्गत सुरु असलेल्या प्रकल्पावर आजपर्यंत रु. १२६.६४ कोटी खर्च झालेला असून त्यापैकी ८९.३५५ कोटी रक्कम शासनाद्वारे अनुदानाद्वारे प्राप्त झालेली आहे. उर्वरीत रु. ३७.२९ कोटी रककम महानगरपालिकेच्या निधितून खर्च करण्यात आलेली आहे. शासन निर्णयानुसार एकूण अंदाजपत्रकाच्या (१७८.७१ कोटी) रक्कमेच्या ७०% म्हणजे (रू.१२५.०९७ कोटी) रक्कम प्राप्त होणार आहे. त्यापैकी ५०% रक्कम (रू.८९.३५५ कोटी) प्राप्त झालेली असून, उर्वरीत २०% (रू.३५.७४२ कोटी) रक्कम सुधारीत वित्तीय आकृतीबंधानूसार शासनाद्वारे प्राप्त होणार आहे. सदर रकमेच्या प्रमाणानुसार देय होणारा हिस्सा म्हणजे (रु.३४.७४२ कोटी) रक्कम महानगरपालिकेने आपल्या निधितून यापुर्वी खर्च केलेली आहे.

शासनानुसार सुधारीत वित्तीय आकृतीबंध लागू करण्यासाठी असलेल्या अटी व शर्ती पैकी अ.क्र. १ व २ ची पुर्तता महानगरपालिकेमार्फत करण्यात आलेली असून अट क्र. ३ नुसार मा. महापौर व मा. आयुक्त यांच्या स्वाक्षरीने प्रकल्प विहीत नमुन्यात पुर्ण होईल. याबाबतचे प्रमाणपत्र द्यावे लागेल व शासनाकडून महानगरपालिकेमार्फत खर्च केलेली रक्कम ३५.७४२ कोटी अनुदान स्वरुपात उपलब्ध करून देण्यासाठी महानगरपालिकेच्या ठरावाद्वारे शासनास कळवावयाचे आहे. तसेच महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत दुसऱ्या टप्प्यात शासनास खालील प्रस्ताव सादर केले आहेत.

१) एकात्मिक नाला प्रकल्प (पर्जन्य जलवाहिन्या प्रकल्प टप्पा – २) रु. १०४.६० कोटी

२) रस्ते बांधणी प्रकल्प रु. ९९.८६ कोटी

वरील दोन्ही प्रस्तावासाठी देखील ७०% रक्कम अनुदान स्वरूपात शासनाकडून उपलब्ध होणार आहे. तरी वरील सर्व प्रस्तावीत कामांसाठी ७०% रक्कम शासनाकडून अनुदान स्वरूपात उपलब्ध होण्यासाठी ठराव पारीत होऊन शासनास कळविणेस शिफारस आहे.

आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC2/14-15/CM/MG-5

सूचना प्राप्त दि. ८/२/२०१५ वेळ १०.१०

मा. ~~स्थायी समिती~~ / महासभा सूचना

नोंद रजिस्टर अ. क्र. ६९

लिपिक ८/२/१५

नगरसचिव विभाग.

५७१५

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.२३/०३/२०१५

## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक (८४)**:- "महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान" अंतर्गत तयार करण्यात आलेल्या पर्जन्य जलवाहीन्या व रस्ते बांधणे कामाच्या सविस्तर प्रकल्प अहवालास मान्यता देणेबाबत...

मिरा-भाईंदर महानगरपालिकेमार्फत "महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानाअंतर्गत पर्जन्य जलवाहिन्या प्रकल्प (टप्पा-१)" राबविण्यासाठी मा. महासभा दि.२०/०३/२०१० ठराव क्र. ६४ अन्वये मान्यता दिलेली आहे. "महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानाअंतर्गत पर्जन्य जलवाहिन्या प्रकल्प (टप्पा-१)" अंतर्गत रु.१७८.७१ कोटी रक्कमेच्या प्रस्तावास राज्य शासनाची मान्यता प्राप्त झालेली आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने राज्य शासनाव्दारे ५०% अनुदान (८९.३५५ कोटी) रक्कम महानगरपालिकेस प्राप्त झालेली आहे.

नविन शासन निर्णय क्र. नगरो-२०१४/प्र.क्र.११९/नवि-३३ दि.२१/०८/२०१४ अन्वये "महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानाअंतर्गत" मंजूर झालेल्या प्रकल्पाअंतर्गत 'ड' वर्ग महानगरपालिका यांना मंजूर प्रकल्प किमती पैकी राज्य शासनाव्दारे ७०% अनुदान देण्यात येणार आहे.

"महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानाअंतर्गत पर्जन्य जलवाहिन्या प्रकल्प (टप्पा-१)" अंतर्गत ९०% कामे पूर्ण झालेली असून सदर कामे मार्च २०१५ अखेर पर्यंत करावयाची असून टप्पा-१ अंतर्गत ७०% अनुदान प्राप्त करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या बंधनकारक व वैकल्पिक सुधारणा अंगीकृत केलेल्या आहेत.

"महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानाअंतर्गत" खालीलप्रमाणे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्यात आलेले आहेत.

१) एकात्मिक नाला प्रकल्प पर्जन्य जलवाहिन्या प्रकल्प (टप्पा-२) - रु. १०५.०० कोटी

२) रस्ते बांधणी प्रकल्प - रु. १००.०० कोटी

वरील दोन्ही प्रस्तावास शासन निर्णय क्र. नगरो-२०१४/प्र.क्र.११९/नवि-३३ दि.२१/०८/२०१४ अन्वये शासनाकडून ७०% अनुदान प्राप्त होणार असून नविन शासन निर्णयानूसार विहीत केलेल्या सर्व अटी व शर्तीचे पालन करण्याबाबत बंधनकारक व वैकल्पिक सुधारणा राबविण्यास व शासनाचा निधी विहीत केलेल्या वेळेत उपलब्ध करण्याबाबत तसेच सदर प्रकल्प यशस्वीरीत्या व जबाबदारीने राबविण्यासाठी महानगरपालिकेने ठराव करणे बंधनकारक आहे. या अटीची पुर्तता केल्याशिवाय महानगरपालिकेचा प्रकल्प मान्यतेबाबतचा प्रस्ताव विचारात घेतला जाणार नाही असे शासन निर्णयात नमूद आहे. तरी सदर प्रकल्प अहवालास प्रशासकीय व आर्थिक मान्यता देण्यास शिफारस आहे.

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका
०९/०३

PC2/14-15/CM/MG-4

४५

नोंदणी ... दि. १० / ३ / २०२५ वेळ . १०.४५

मा. ... / ... 

नोंद ... ४५

१०/३/२५

... विभाग.

(७)

# मिरा-भाईंदर महानगरपालिका
# पाणी पुरवठा विभाग
## मा. महासभा दि. २३/०३/२०१५

## ।। गोषवारा ।।

**प्रकरण क्र. ८५ :- पाणीपट्टी दरात वाढ करणेबाबत.**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात पाणीपट्टी घरगुती जलजोडण्यांना रू.७/- प्रति हजार लिटर व वाणिज्य जलजोडण्यांना रू.२८/- प्रति हजार लिटर या दराने एप्रिल २००३ पासून आकारण्यात येत आहे. सदर पाणीपट्टी दरात गेल्या सात वर्षापासून कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही.

जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनरूत्थान अभियानाअंतर्गत (JNNURM) केंद्र शासन, राज्य सरकार व महानगरपालिका यांच्यात करण्यात आलेल्या सामंजस्य करारनाम्यानुसार पाणी पुरवठा दरवाढ करावी लागणार आहे.

महानगरपालिकेस दररोज शहाड-टेमघर (स्टेम) पाणी पुरवठा प्राधिकरणाकडून व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून पाणी पुरवठा होतो. या पाणी पुरवठ्याबाबत स्टेम प्राधिकरणास रू.४,५००/- प्रति द.ल.लि. पाणी देयक अदा करावे लागत होते. सदर दर एप्रिल २०१३ पासून वाढविण्यात आले असल्याने सद्यस्थितीत सदर दर रू.६,५००/- इतके अदा केले जात आहे. तर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास चे दर रु.८,०००/- प्रति द.ल.लि होता तो सद्या रु.१५,०००/- प्रति. द.ल.लि. या दराने पाणी देयके अदा करावे लागते. सदर पाणी देयक विहीत मुदतीत अदा करणे आवश्यक असते. सदर देयकापोटी प्रदान करावयाची रक्कम व इतर पाणी पुरवठा वितरणाबाबतचा खर्च तसेच रिलायन्स एनर्जी व महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांचेकडील वीज दरात मोठ्या प्रमाणात झालेली दरवाढ या सर्व बाबींचा विचार करता पाणीपट्टी दरवाढ करणे आवश्यक आहे. महानगरपालिकेला आता सरासरी १३६ द.ल.लि. पाणी पुरवठा केला जातो. सदर पाणी पुरवठा सरासरी ३६ ते ४५ तासांतून केला जातो. शहराच्या लोकसंख्या वाढीचा वेग जास्त आहे. नविन पाणी पुरवठा योजना हाती घेणे आवश्यक आहे. यासाठी निधी महानगरपालिकेला उभारावा लागणार असल्याने या भांडवली खर्चाची व्यवस्था आतापासून करावी लागणार आहे. महानगरपालिकेंचे उत्पन्न वाढ झाल्याशिवाय कर्ज प्राप्त होउ शकत नाही. तसेच शहरास दररोज पाणी पुरवठा करावयाचा असल्याने दरवाढ करणे क्रमप्राप्त आहे.

महानगरपालिका क्षेत्रात नविन जलजोडणीकरीता सध्या आकारण्यात येणारे जलजोडणी शुल्क व इतर शुल्क जून २००२ पासून लागू करण्यात आलेले आहेत. मात्र सदर शुल्कात गेल्या सात वर्षापासून कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही. सहाव्या वेतन आयोगानुसार कर्मचाऱ्यांची पगारवाढ फार मोठ्या प्रमाणात झालेली आहे. यामुळे दुरूस्ती व जलजोडणी खर्चातही वाढ करणे आवश्यक आहे. पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेवरील व इतर योजनेवरील खर्च लक्षात घेता होणारा खर्च व जमा बाजू यामध्ये सन २०१३-१४ अर्थसंकल्पानुसार मोठी तफावत येत आहे. सन २०१३-१४ पाणी पुरवठा महसुल खर्च ४३८६.१८ लक्ष व भांडवली खर्च ३५३६.९२ लक्ष एकुण खर्च रु.७९२३ लक्ष यंदा एवढा आहे. महसुल जमा ३६५७.६५ एवढी आहे. त्याकरीता मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलमं १५० मधील तरतूदीप्रमाणे पाणीपट्टी दरात वाढ प्रस्तावित करण्यास शिफारस आहे.

अ) पाणीपट्टी दरातील वाढ

| जलजोडणीचा प्रकार | सध्याचे दर (रू.) प्रति हजार लिटर | प्रस्तावित केलेले दर (रू.) प्रति हजार लिटर |
|---|---|---|
| घरगुती | ७/- | १८/- |
| वाणिज्य | २८/- | ५०/- |

ब) नविन जलजोडणी शुल्क

| जलजोडणीचा प्रकार | सध्याचे दर (रू.) | | प्रस्तावित दर (रू.) | |
|---|---|---|---|---|
| | १/२" व्यास | १" व्यास | १/२" व्यास | १" व्यास |
| घरगुती | १५,०००/- | २५,०००/- | ३०,०००/- | ५०,०००/- |
| वाणिज्य (बार, रेस्टॉरंट, शॉपींग, मॉल व कॉल सेंटर) | १५,०००/- | २५,०००/- | ४५,०००/- | ७५,०००/- |

वरीलप्रमाणे दरवाढ लागू करणेसाठी मा. महासभा दि.३१/०३/२०१०, ठराव क्र. ६८ नुसार पाणीपट्टी दर घरगुती रू.१०/-, वाणिज्य रू.४०/- प्रति हजार लिटर मान्यता दिलेली होती. सदर पारित केलेला ठराव क्र.६८ शासनाने निलंबीत केला आहे. त्यामुळे सदर दरवाढ लागू झालेला नाही. परंतु सद्यस्थितीत वाढीव खर्च लक्ष घेता वरील तक्त्याप्रमाणे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १५० मधील तरतूदीनुसार पाणीपट्टी दरवाढ करणेस मा. महासभेस शिफारस आहे.

आयुक्त २८/१०/१४

मिरा-भाईंदर महानगरपालिका

5 Maha 14

(७)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा.महासभा दि २३/०३/२०१५

## // गोषवारा //

प्रकरण क्र. (६) - मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील आ.क्र. ९६ (खेळाचे मैदान) व आ.क्र. १९१ (प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान) या आरक्षणाचे करारनाम्याबाबत.

उपसचिव, नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र. गिभाम/याचिका१४१३/प्र.क्र.५८१३/ नवि-२८, दि.१३/११/२०१३ अन्वये स्थायी समिती ठराव क्र. ३०, दि.२४/०१/२००८ विखंडीत करावा किंवा कसे याबाबतचा अहवाल शासनास सादर करावयाचा असून तत्पूर्वी शासनाकडून प्राप्त अहवाल मा. महासभेसमोर सादर करावयाचे निर्देश आहेत. त्याअनुषंगाने सदरचा विषय मा. महासभेस सादर करण्यात आला आहे.

सदर प्रकरणातील वस्तुस्थिती अहवाल खालीलप्रमाणे आहे.

- मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) दि.१४/०५/१९९७ रोजी मंजूर झालेली असून दि.१५/०७/१९९७ पासून अंमलात आलेले आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना दि.२५/०८/२००० रोजी मंजूर झालेली असून दि.१५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे. मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत शासन निर्णय क्र. टिपीएस-१२०८/१३४६/प्र.क्र.२६७ /०८/नवि-१२, दि.२९/०८/२००९ अन्वये फेरबदल मंजूर झाले आहेत.
- मिरा भाईंदर महानगरपालिका मंजूर विकास योजनेमधील आरक्षणाची जागा मा. महासभा प्रकरण क्र. ९५ ठराव क्र. ७२ दि.११/१२/२००६ अन्वये महानगरपालिकेच्या ताब्यात असलेल्या आरक्षीत जागा खाजगी विकासकांमार्फत / सेवाभावी संस्थांमार्फत भाडेतत्वाद्वारे विकसीत करण्याबाबत प्रशासनाने जागा ताब्यात घेवून अटीशर्ती ठरवून व महानगरपालिकेच्या हिताच्या अटीशर्ती ठरवून निविदा मागवून सदर प्रस्ताव सहाय्यक संचालक, नगररचना, महापौर, उपमहापौर, आयुक्त, सभागृह नेता, सभापती स्थायी समिती, विरोधी पक्षनेता, शहर अभियंता यांची समिती नेमून त्यांच्या समोर ठेवून अंतिम निर्णय घेण्यात यावा, याप्रमाणे तसेच शहरातील आरक्षणे "बांधा वापर व हस्तांतरीत करा" (B.O.T.) या तत्वावर विकसित करणेबाबतचे धोरण ठरवण्यात आले आहे.
- यानंतर वरील महासभेच्या ठरावानुसार मा. महापौर, मा. उपमहापौर, आयुक्त, मा. स्थायी समिती सभापती, सभागृह नेता, मा. विरोधी पक्षनेता, मा. शहर अभियंता व मा. सहाय्यक संचालक, नगररचना यांचा समावेश असलेल्या समितीची दि.२६/०४/२००७ रोजी प्रथम बैठक झाली असून सदर बैठकीत सादर नियमावलीस सूचनांसह मंजूरी दिलेली आहे.
- सदर तयार करणेत आलेल्या निविदा सूचना दैनिक लोकमत व दैनिक सन्मित्र या वृत्तपत्रात दि.१२/०२/२००७ रोजी एकूण १० आरक्षणे भाडेतत्वावर विकसीत करणेकरिता निविदा सूचना प्रसिध्द करणेत आली होती.
- सदर निविदांच्या अनुषंगाने विकसित करणेत येणाऱ्या ०४ आरक्षणांचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | आरक्षण क्र. | आरक्षणाचे नाव | मौजे | स.क्र./हि.क्र. | विकास योजनेप्रमाणे आरक्षणाचे क्षेत्र (चौ.मी.) | विकास हक्क प्रमाणपत्राद्वारे हस्तांतरित झालेले आरक्षणाचे क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|---|---|---|
| १) | ९६ | खेळाचे मैदान | भाईंदर | २७५ पै., २७६पै.,२७७पै., २६२पै., २७८पै., | ६,०००.०० | ६,०००.०० |

(२)

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २) | ११६ | प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान | नवघर | १९९पै., २००पै., | ४,५००.०० | २३६३.५० |
| ३) | १९१ | प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान | पेणकर पाडा | ३१पै., ३१पै | ३,३००.०० | ३,३००.०० |
| ४) | ३०० | खेळाचे मैदान | नवघर | ११७पै.,१२०पै., १२४पै., १२, १२३पै., १२५पै., १२२पै. | २६,६००.०० | १६८०१.८६ |

- प्रसिध्द निविदा सूचनेच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे विकासकाने मुदतीत निविदा सादर केलेल्या आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | दर प्रति वार्षिक |
|---|---|---|
| १ | **आरक्षण क्र. ९६ – खेळाचे मैदान विकसीत करणे** | |
| | १) मे. सिमरन एंटरप्राईजेस | रु.३,७०,०००/- |
| | २) मे. राणावत कन्स्ट्रक्शन | रु.३,८५,०००/- |
| | **३) मे. श्री जी एक्झिबिटर** | **रु.१०,००,०००/-** |
| | ४) मे. सालासर बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स | दर सादर केलेले नाहीत. |
| २ | **आरक्षण क्र. ११६ – प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान विकसीत करणे.** | |
| | १) मे. बाबुलाल मिश्रीमल वर्धन | दर सादर केलेले नाहीत. |
| | **२) मे. मणिभद्र वीर चॅरीटेबल ट्रस्ट** | **रु.३,३३,०००/-** |
| | ३) मे. अमरदीप शिक्षण संस्था | रु.३,००,०००/- |
| ३ | **आरक्षण क्र. १९१ - प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान विकसीत करणे.** | |
| | १) मे. बाबुलाल मिश्रीमल वर्धन | रु.३,६०,०००/- |
| | २) मे. मणिभद्र वीर चॅरीटेबल ट्रस्ट | दर सादर केलेले नाहीत. |
| | **३) मे. दिपक चॅरीटेबल ट्रस्ट** | **रु.१०,००,०००/-** |
| ४ | **आरक्षण क्र. ३०० – खेळाचे मैदान विकसीत करणे.** | |
| | १) मे. लक्ष्मी वेलफेअर ट्रस्ट | रु.८,०१,०००/- |
| | **२) मे. गुजरात एंटरप्राईजेस** | **रु.२१,००,०००/-** |
| | ३) मे. बाबुलाल मिश्रीमल वर्धन | रु.३,६०,०००/- |
| | ४) मे. मणिभद्र वीर चॅरीटेबल ट्रस्ट | दर सादर केलेले नाहीत. |
| | ५) मे. मिरा भाईंदर शिक्षण क्रिडा आणि सांस्कृतिक संकूल | रु.२०,७५,०००/- |

- मा स्थायी समिती प्रकरण क्र. ६७ ठराव क्र.६०(अ) दि.१५/०६/२००७ अन्वये आ.क्र. ९६, (खेळाचे मैदान) विकसित करणेकरीता खाजगी संस्थापक मे. श्री.जी. एक्झीब्युटर्स, आ.क्र. ११६ (प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान), विकसित करणेकरीता खाजगी संस्थापक, मे. मणिभद्र विर चॅरीटेबल ट्रस्ट यांना, आ. क्र. १९१ (प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान) विकसित करणेकामी खाजगी संस्थापक मे. दिपक चॅरिटेबल ट्रस्ट यांस व आ.क्र. ३०० (खेळाचे मैदान) विकसित करणेकरीता खाजगी संस्थापक मे. गुजरात एंटरप्रायजेस यांस मंजूरी देण्यात आली आहे.

- उपरोक्त नमूद आ.क्र. ११६ (प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान) व आ.क्र. ३०० (खेळाचे मैदान) ही आरक्षणे विकसित करणेसाठी सादर केलेले निविदा धारकाचा करारनामा (कागदपत्रांअभावी) झाल्याचे दिसून येत नाही. उर्वरित आ.क्र. ९६ (खेळाचे मैदान) व आ.क्र. १९१ (प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान) याबाबत संबंधित यंत्रणेस "बांधा वापरा व हस्तांतरीत करा" (B.O.T.) या तत्वावर ३० वर्षे कालावधीकरीता विकसित करणेसाठी देण्यात आलेली असून या मोबदल्यात सदर संस्था मिरा भाईंदर महानगरपालिकेस वार्षिक भाडे - १० लाख रुपये जमा करावयाची आहे.
- सदर आरक्षणांपैकी आ.क्र. ९६ (खेळाच मैदान) व आ.क्र. १९१ (प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान) ही आरक्षणे विकसित करणारे संबंधीत खाजगी संस्थाधारक व मिरा भाईंदर महानगरपालिका यांचेतील निविदे सूचनेच्या अनुषंगाने दि.३१/०५/२००७ रोजी सादर करारनाम्यावर स्वाक्षरी करण्यात आल्या आहेत.
- आ.क्र. १९१ (प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान) ही जागा विकसित करणेकरीता संस्थाधारक मे. दिपक चॅरिटेबल ट्रस्ट यांस महानगरपालिकेने पत्र क्र.मनपा/नर/१०३६/०७-०८ दि.२०/०६/२००७ अन्वये व आ.क्र. ९६ (खेळाचे मैदान) ही जागा विकसित करणेसाठी संस्थाधारक मे. श्री.जी. एक्झीबिटर यांस महानगरपालिकेने पत्र क्र.मनपा/नर/१०३५/०७-०८ दि.२०/०६/२००७ अन्वये कार्यादेश दिलेले आहेत. सदर कार्यादेशानुसार ७ दिवसात संबंधीत विकासकाने मिरा भाईंदर महानगरपालिकेशी नोंदणीकृत करारनामा करणेकरिता संपर्क साधणेबाबत अट नमुद करणेत आली होती.
- तद्नंतर मिरा भाईंदर महागनरपालिका व संस्थाधारक मे. दिपक चॅरिटेबल ट्रस्ट यांचे सोबत दि.१८/०७/२००७ रोजी व संस्था धारक मे. श्री.जी. एक्झीबिटर यांचेसोबत दि. ३१/०७/२००७ रोजी नोंदणीकृत करारनामा करण्यात आलेला आहे.
- मा. स्थायी समितीच्या दि.२४/०१/२००८ रोजीचा ठराव क्र. ३० नुसार दि.१५/०६/२००७ रोजीच्या स्थायी समिती सभा ठराव क्र. ६०(अ) रद्द करणेस ठराव स्थायी समिती कडून करणेत आला होता. सदर ठरावासाठी प्रशासनाने गोषवारा दिलेला नाही.
- मा. स्थायी समिती, दि.२४/०१/२००८, ठराव क्र. ३० रोजीच्या ठरावातील मुद्दे खालीलप्रमाणे आहेत.
- (१) या ठरावात मंजूर करण्यात आलेल्या निविदा या बेकायदेशीर असून तसेच त्यात महानगरपालिकेच्या हितास तिलांजली देण्यात आलेली आहे. सबब सदरहू ठराव क्र. ६०अ, दि.१५/०६/२००७ हा या कारणास्तव रद्द बातल करावा.
- (२) ह्या संपूर्ण प्रक्रियेमध्ये ज्या अधिकारी, पदाधिकारी व संबंधितांनी भाग घेवून या बेकायदेशीर कृत्यास खतपाणी घातलेले आहे व महानगरपालिकेचे हित जपलेले नाही. त्यांची खातेनिहाय चौकशी करुन त्यानंतर त्यांच्यावर योग्यती कायदेशीर कारवाई करावी.
- (३) वरील ठरावाच्या अनुषंगाने महानगरपालिके बरोबर केलेले लिज करार दि.१८/०७/२००७ म्हणजेच महानगरपालिका व मे. दिपक चॅरिटेबल ट्रस्ट तसेच दि.३१/०७/२००७ महानगरपालिका व मे. श्रीजी एक्झिबिटर्स हे दोन्ही करारनामे रद्द बातल करावे तसेच करारनाम्यातील परिच्छेद क्र. २३ नुसार कोणत्याही इतर कार्यक्रमासाठी आयुक्तांची पूर्व परवानगी घेवून आरक्षीत जागेचा वापर आरक्षीत कारणाव्यक्तिरीक्त करण्याची तरतूद केलेली आहे. परंतू तश्याप्रकारचे कायदेशीर अधिकार आयुक्तांना नाहीत. परिच्छेद क्र. ४३ हा संदिग्ध आहे. परिच्छेद क्र. ४० हा भारतीय राज्य घटनेच्या विरुध्द आहे.
- (४) वर उल्लेख केलेल्या संस्थांचे नोंदणीपत्र, या संस्थांची पात्रता दर्शविणारी कागदपत्र, संस्था किती वर्ष मिरा भाईंदर मध्ये कार्यरत आहे याचे पुरावे, संस्थेचा पूर्वानुभव, इत्यादी महत्वाची कागदपत्रे या करारनाम्यामध्ये करण्यात आलेल्या नाहीत.

- (५) मा. स्थायी समिती सभा दि.१५/०६/२००७ द्वारे प्रकरण क्र. ६७ व ठराव क्र. ६०अ हा ठराव बेकायदेशीर असल्याने सर्वप्रथम तो रद्द करण्यात यावा. तसेच या ठरावात अंतर्भूत असलेले दि.१८/०७/२००७ व दि.३१/०७/२००७ रोजीचे नोंदणीकृत करारनामे रद्द करावेत व यामुळे महानगरपालिकेचे आजपर्यंतचे झालेले आर्थिक तसेच अन्य नुकसान व भविष्यात होणारे नुकसान याची सखोल चौकशी होवून नुकसानीस असणा-या संबंधीत पदाधिकारी व अधिकारी म्हणजेच वरील बेकायदेशीर प्रकरणी जबाबदार असलेले विधी अधिकारी, सहा. संचालक, नगररचनाकार व तत्कालीन आयुक्त व संबंधीत पदाधिकारी यांच्याकडून व्यक्तीशः वसूल करावी व आजमितीस पदावर असलेल्या अधिका-यांस कार्यमुक्त करावे, याप्रमाणे ठराव करणेत आला आहे.
- सदर प्रकरणी अर्जदार श्री. मिलन वसंत म्हात्रे यांचे दि.२४/०१/२००८ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने तत्कालीन प्रभारी आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी नगरसचिव मिरा भाईंदर महानगरपालिका यांस पत्र क्र.मिभा/मनपा/आयुक्त/१९९/०७-०८ दि.३०/०१/२००८ अन्वये मा. स्थायी समिती ठराव क्र. ३०, दि.२४/०१/२००८ रोजीच्या पारित ठरावाबाबत पत्र दिले असून सदर पत्राची छायाप्रत अपिलार्थी श्री. मिलन वसंत म्हात्रे यांस देण्यात आलेली आहे. सदर पत्राचा तपशील खालील प्रमाणे आहे.
- मा. स्थायी समितीने दि.२४/०१/२००८ रोजी पारित केलेल्या ठराव क्र. ३० बाबत परिच्छेदनिहाय अभिप्राय खालीलप्रमाणे.
  १) ठरावात मंजूर केलेल्या निविदा कायदेशीर असून त्यात संपूर्ण पारदर्शकता अवलंबिण्यात आलेली आहे. व त्यात महानगरपालिकेचे हितच पाहिल्याचे दिसते.
  २) सदर कृत्य कायदेशीर असल्यामुळे या प्रक्रियेत ज्या अधिकारी, पदाधिकारी व संबंधितांनी भाग घेतलेला आहे त्यांची खोतेनिहाय चौकशी करुन त्यानंतर त्यांच्यावर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.
  ३) मा. स्थायी समिती मंजूरीनंतर कार्यादेश दिलेले असून त्यातीत अटीशर्तीनुसार करारनामा करावयाचा आहे. परिच्छेद क्र. २३ मध्ये अयुक्तांची पुर्व परवानगीनुसार असे नमूद असून भविष्यात त्या त्या वेळी निर्णय घेणे शक्य आहे.
  आ.क्र. ९६ खालील ६००० चौ.मी. जागा खाजगी मालकीची असून मालकानें जागा ७/१२ उताऱ्यावर महागनरपालिकेच्या नावे केल्यानंतरच बांधकाम प्रारंभप्रमाणपत्र देण्यात आलेले आहे. सबब वास्तुविशारदांचे नाव काळया यादीत टाकणे संयुक्तिक होणार नाही.
  ४) सदर कागदपत्रे तपासूनच करारनामे केलेले आहेत. सर्व करारनामे अधिनियमातील तरतूदीनुसार आयुक्तांनीच करावयाचे आहेत.
  ५) दि.१८/०७/२००७ व दि.३१/०७/२००७ रोजीचे करारनामे रद्द करण्याची आवश्यकता नसून आजपर्यंत महानगरपालिकेचे कुठलेही आर्थिक नुकसान झालेले नसून आर्थिक फायदाच झालेला असून यात चौकशी करण्याची आवश्यकता वाटत नाही. तसेच जबाबदार अधिकारी यांचेकडून व्यक्तीशः वसूल करण्याची व आजमितीस पदावर असलेल्या अधिकाऱ्यांना कार्यमुळे करण्याची आवश्यकता वाटत नाही.

मा. स्थायी समिती ठराव क्र. ३० दि.२४/०१/२००८ चे अवलोकन करता सदर ठराव अत्यंत संदिग्ध व मोघम स्वरुपाचा आहे. सदरचे प्रकल्प B.O.T. तत्वावर दिल्याने महानगरपालिकेचे नुकसान झालेले आहे. किंवा भविष्यात होणार आहे ही बाब पूर्णपणे निराधार आहे. याउलट पूर्वी झालेला निर्णय लोकाभिमुख व महानगरपालिकेच्या आर्थिक हिताचा आहे असे कागदपत्रांच्या पाहणीवरुन दिसते.

क्रिडांगणासारखे आरक्षण व स्वखर्चाने विकसित करुन त्याची देखभाल करणे व विनामुल्य नागरिकांना उपलब्ध करणे शिवाय महानगरपालिकेला वार्षिक भाडे रु.१०/- लाख देणे ही बाब निश्चितपणे वैशिष्टयपूर्ण व प्रशंसनीय आहे.

एकंदर प्रक्रियेचे अवलोकन करता तत्कालीन मा. महासभेचा ठराव व त्यास अनुसरुन महासभेने नियुक्त केलेल्या समितीने घेतलेला निर्णय व त्यास तत्कालीन स्थायी समितीने दिलेली मंजूरी, निवीदांची प्रसिद्धी व झालेले करार यात संपूर्ण पणे पारदर्शकता असून शंका घेण्यास वाव आहे असे वाटत नाही. विद्यमान स्थायी समितीने सदर करारनामा रद्द करण्याचा घेतलेल्या निर्णयाचे अवलोकन करता त्यातील बहुतांश सन्माननीय सदस्य तत्कालीन महासभेने घेतलेल्या ठरावाच्या प्रक्रियेत सहभागी होते.

सद्यस्थितीत दोन प्रकल्पांचे कार्यादेश देवून करारनाम झालेली आहेत अशा परिस्थितीत ठराव क्र. ३० ची अंमलबजावणी केल्याने महानगरपालिकेसारख्या लोकशाही संस्थेच्या विश्वासार्हतेल तडा बसेल व कायदेशिर गुंतागुंत निर्माण होईल. प्रथमदर्शनी सदर ठराव करणेसाठी कोणतेही संयुक्तिक कारण दिसून येत नाही केवळ काल्पनिक भितीच्या आधारे पुर्वीच्या प्राधिकरणाने केलेला ठराव रद्द करण्यामुळे महापालिकेत घातक प्रथा पडेल व ते महापालिकेच्या व्यापक हिताच्या दृष्टीने योग्य होणार नाही. तसेच या पुढील लोकहितकारक अशा कोणत्याही प्रकल्पास जनतेकडून भितीपोटी प्रतिसादर मिळणार नाही. समोरील पक्षाला कुठलीही संधी न देता असा ठराव करणे नैसर्गिक न्यायाला धरून होणार नसल्याने कायदेशीर नाही. सदर बाब विचारात घेता या ठरावाची अंमलबजावणी करणे शक्य होणार नाही. तसेच सदर प्रकरणातील गुणवत्ता व पारदर्शकता पाहता तसे आवश्यकही वाटत नाही.

- मा.स्थायी समिती दि.२४/०१/०८, ठराव क्र. ३० मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५१ अन्वये विखंडीत करणेकरिता मिरा भाईंदर महानगरपालिकेने शासनास महानगरपालिकेचे पत्र क्र. मनपा/आयुक्त/३१/१०-११, दि.२६/०४/२०१० अन्वये विनंती पत्र देण्यात आले आहे.
- शासनास दि.२६/०४/२०१० रोजी दिलेल्या पत्रात ठळक कारणे दिलेली आहेत, ती खालीलप्रमाणे आहे.
  १) आरक्षणे विकासापोटी व देखभालीसाठी महानगरपालिकेस काहीही खर्च होणार नाही.
  २) आरक्षित जमिनीवर अतिक्रमणे होणार नाही.
  ३) वाणिज्य भाड्यापोटी महानगरपालिकेस आर्थिक लाख होणार नाही.
  ४) सदर आरक्षण लवकर विकसीत झाल्यामुळे नागरीकांना लवकरात लवकर सुखसुविधा उपलब्ध होवू शकतील.
  ५) जागेची मालकी महानगरपालिकेकडे राहुन ३० वर्षानंतर विकसीत आरक्षण महानगरपालिकेकडे हस्तांतरीत होणार आहे.
- आरक्षण क्र. ९६ (खेळाचे मैदान) विकसित करणेच्या अनुषंगाने मिरा भाईंदर महानगरपालिकेने सदर आरक्षणाच्या नकाशास पत्र क्र.मनपा/नर/४५७/०८-०९ दि.०८-०५/२००८ अन्वये मंजूरी दिलेली आहे.
- तसेच आ.क्र. ९६ (खेळाचे मैदान) हे आरक्षण संबंधित संस्था धारकाकडून विकसित करणेत आलेले असून सदर आरक्षणाचा वापर सुरु आहे.
- तसेच आ.क्र. १९१ (प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान) करीता B.O.T. नुसार विकासकाने शाळेसाठी करारनामा करुन दिलेला आहे व कायदेशीर प्रक्रिया पुर्ण झाली असल्याने स्थायी समितीचा ठराव क्र.३० नुसार करारनामा रद्द करणेबाबतचा ठराव लागू पडत नाही. तसेच महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान होवू नये म्हणून शाळेसाठी नकाशे मंजूरी करणेसाठी तत्कालीन आयुक्तांनी दि.१३/०७/२०१० रोजी उपरोक्त जागेतील बांधकाम प्रस्तावास मान्यता दिलेली आहे. व तद्नंतर सदर जागेतील शाळा इमारतीच्या तळ मजल्यास भाग भोगवटा दाखला देण्यात आलेला आहे.
- सदयस्थितीत आ.क्र. १९१ (प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान) या जागेवर तळ मजल्यावर इमारतीचा शैक्षणिक वापर सुरु असुन उक्त इमारतीचे सद्यस्थितीत जागेवर तळ + ३ या स्वरुपात बांधकाम पूर्ण झालेले आहे.

(६)

- सदर आरक्षणे "बांधा वापरा व हस्तांतरित करा" (B.O.T.) या तत्वानुसार विहित कार्यपद्धतीचा अवलंब करुन विकसित करणेत आलेली आहेत. व त्यांचा वापर सद्यस्थितीत सुरु आहे. आरक्षण क्र. ९६ (खेळाचे मैदान) या आरक्षणाच्या निविदा धारकाकडून आतापर्यंत रु. ६१,००,०००/- भाड्यापोटी महानगरपालिकेने जमा केले आहेत. तसेच आ.क्र. १९१ (प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान) या आरक्षणाच्या निविदा धारकाकडून आतापर्यंत रु. ६७,९७,५००/- भाड्यापोटी महानगरपालिकेने जमा केले आहेत. उपरोक्त नमुद दोन्ही आरक्षणांबाबत भाडयाची रक्कम नियमितपणे वसुल होत आहेत. तसेच आरक्षणाखालील सुविधा विकसित होवून उपलब्ध होणार आहेत. मा. स्थायी समिती सभा ठराव क्र. ६०अ, दि.१५/०६/२००७ नुसार अंमलबजावणी करणेत आलेली आहे. त्यामुळे अंमलबजावणी केलेला ठराव व त्या अनुषंगिक कार्यबाही रद्द करणे कायदेशीररित्या शक्य होत नाही.

तद्नंतर सदर प्रकरणात महानगरपालिकने पत्र क्र. मनपा/नर/८९३/२०१३-१४, दि.१०/०६/२०१३ अन्वये शासनास अहवाल सादर करणेत आलेला आहे.

तद्नंतर शासनाने श्री. मिलन वसंत म्हात्रे यांनी दि.१९/०६/२०१३ अन्वये अर्ज शासनास सादर केलेला आहे. शासनास सादर केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने अहवाल सादर करण्यास आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांनी निर्देश दिले आहे. त्याअनुषंगाने तपासणी अहवाल शासनास दि.१३/११/२०१३ रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेस प्राप्त झाला आहे. यासोबत प्रत देणेत येत आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिकेने आ.क्र. ९६ (खेळाचे मैदान) व आ.क्र. १९१ (प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान) बाबत करारनाम्यातील अटी व शर्तीचा तपशील व सद्यस्थिती / अटीबाबतची कार्यवाही दर्शविणारा तपशील यासोबत सादर करण्यात येत आहे. तसेच श्री. मिलन वसंत म्हात्रे यांनी दि.१९/०६/२०१३ रोजी शासनास सादर केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने वस्तुस्थितीदर्शक अहवाल यासोबत सादर करण्यात येत आहे.

प्रस्तुत प्रकरणी उपरोक्त अहवालाचे अवलोकन होवून प्रकरण निर्णयासाठी सादर करणेत येत आहे.

सोबत ६१ ते २९१.

(signature)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## परिवहन विभाग

## मा. महासभा दि.२३/०३ /२०१५.

## ।। गोषवारा ।।

**प्रकरण क्र८७** आ.क्र. ३२६ अ टी. टर्मिनल विकसित करणेचे कामास प्रशासकिय व आर्थिक मंजुरी मिळणेबाबत.

उपरोक्त प्रकरणानुसार मिरा भाईंदर महानगरपालिका परिवहन उपक्रमात सोई सुविधा करीता महानगरपालिका क्षेत्रातील घोडबंदर येथे टी. टर्मिनल विकसित करावयाचे आहे. सद्य: स्थितीत परिवहन उपक्रमात ५० बसेस असून केंद्र शासनाच्या JnNURM-II या योजने अंतर्गत १०० बसेस मंजूर झालेल्या आहेत. तरी एकूण १५० बसेस पार्किंग, दुरुस्ती संबंधित कामकाजाकरिता सोई सुविधा युक्त असे टी. टर्मिनल नमूद जागेत विकसित करणे गरजेचे आहे. करिता टी. टर्मिनल विकसित करणेकरिता सुमारे रुपये १४.५० कोटी इतका खर्च अपेक्षित आहे.

तरी वरिल काम परिवहन उपक्रमातर्फे चालविण्यात येणाऱ्या बसेस सेवा कार्यक्षम करणेकरिता अत्यावश्यक असुन त्यामुळेच परिवहन सेवा सुरळीत चालणार असल्याने नमूद कामाकरिता आर्थिक व प्रशासकीय मंजूरी मिळणेस शिफारस आहे.

(अच्युत हांगे) १६/०३/१५<br>
आयुक्त<br>
मिरा भाईंदर महानगरपालिका, जि.ठाणे

गोषवारा प्राप्त दि. १६/03/२०१५ वेळ 0२:१२

मा. स्थायी समिती / महासभा गोषवारा

नोंद रजिस्टर अ. क्र. 40

दिनांक

नगरसचिव विभाग.

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा.महासभा दि.२३/०३/२०१५

## // गोषवारा //

**प्रकरण क्र. (८८) - महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कारवाई करणेबाबत.**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना विकास नियंत्रण नियमावलीसह (वगळलेला भाग सोडून) दि.१४/०५/१९९७ रोजी मंजूर झालेली असून दि.१५/०७/१९९७ पासून अंमलात आलेले आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना दि.२५/०८/२००० रोजी मंजूर झालेली असून दि.१५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे.

सदर मंजूर विकास योजनेनुसार मौजे गोडदेव, स.क्र. ३३४/२,६,८ (जुना), ३७५/२,३,६ (नविन), २६/२,६,८, ६८/२,३,६ (नविन) ही जागा आ.क्र. २३७ "टेक्निकल हायस्कूल व प्ले ग्राऊंड" या आरक्षणाने बाधीत होत आहे. विषयांकित जागेमधील आ.क्र. २३७ "टेक्निकल हायस्कूल व खेळाचे मैदान" हे आरक्षण समावेशक आरक्षणाच्या तरतूदी अन्वये विकसीत करणेसाठी विकासकाने त्यांचे वास्तुविशारदामार्फत सादर केलेल्या कागदपत्राच्या आधारे जा.क्र. मनपा/नर/१२५९/२००६-०७, दि.२१/०७/२००६ अन्वये ७९६२.२२ चौ.मी. क्षेत्रासाठी रेखांकन नकाशे मंजूरीसह अकृषिक परवानगी प्राप्त करणेसाठी नाहरकत दाखला देणेत आलेला असून त्यानंतर विकासकाने सदरच्या जागेसाठीचे मा. जिल्हाधिकारी, ठाणे यांचेकडील अकृषिक परवानगीचे आदेश सादर करुन बांधकाम परवानगी अपेक्षिल्याप्रमाणे जा.क्र. मनपा/नर/३३०/२००७-०८, दि.३०/०४/२००७ अन्वये बांधकाम परवानगी व जा.क्र. मनपा/नर/४६९४/२००७-०८, दि.१५/०३/२००८ अन्वये सुधारीत बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे.

तसेच जा.क्र. मनपा/नर/३०२७/२००८-०९, दि.०४/११/२००८ अन्वये व जा.क्र. मनपा/नर/११८१/२००९-१०, दि.०१/०७/२००९ व जा.क्र. मनपा/नर/३४४८/२०१२-१३, दि.१३/१२/२०१२ अन्वये सुधारीत नकाशे मंजूरीसह सुधारीत बांधकाम परवानगी देण्यात आलेली असून या जागेच्या मंजूर रेखांकनामधील मंजूर इमारत क्र. १, २, ३ साठी पत्र क्र. मनपा/नर/६४८/१०-११, दि.१५/०५/२०१० अन्वये भोगवटा दाखला देणेत आलेला आहे. सदर आ.क्र. २३७ "टेक्निकल हायस्कूल व खेळाचे मैदान या आरक्षणासाठी ५ एकर पेक्षा जास्त क्षेत्र आवश्यक आहे. तथापी सदर आरक्षणाचे क्षेत्र ५ एकर पेक्षा कामी असल्यामुळे मे. सेवन इलेवन एज्युकेशन सोसायटी यांनी सदर आरक्षणाचे महाराष्ट्र प्रादेशिक अधिनियम १९६६ कलम ३७ अन्वये सदर आरक्षणाचे प्राथमिक व माध्यमिक शाळा फेरबदल करणेबाबत मागणी केलेली आहे.

वरील प्रमाणे फेरबदल करणेकामी प्रकरण मा. महासभेपुढे निर्णयासाठी सादर.

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका